# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड ४ : आदिपर्व ४



# महाभारत

## खंड ४था : आदिपर्व

अशोक कोठारे

ई साहित्य  प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवायी होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्याप्पु र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० मे २०१८**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंचवीस पेक्षा जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा चौथा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच

मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याच प्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई-मेल – ashokkothare@gmail.com



ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते __

# - महाभारत आदिपर्व खंड चौथा प्रारंभ -

## आदिपर्व भाग एकशे एकोणसाठावा

(बकासूर वध पर्व सुरु)

जनमेजय विचारतात, अहो ब्रह्मर्षी, मला सांगा, एकचक्र गांवात आल्यावर त्या महारथी, शूरवीर लढवय्या अशा माझ्या पूर्वजांनी, पांडवांनी तेथे काय केले?

वैशंपायन सांगतात, एकचक्र गांवात तुझे महारथी, शूरवीर लढवय्ये पूर्वज एका ब्राह्मणाच्या घरात संन्याशाच्या सोंगात आपली माता कुंती बरोबर राहू लागतात. तेथे ते लोकांशी दोस्ती करतात व त्यांना त्यांच्या प्रवासातील अनुभव सांगून त्यांची मनें जिंकून घेतात. एकचक्र गांवात ते सगळे पांडव सर्वांना प्रिय होतात. पांडवांच्या अनेकविध गुणांची झलक त्या रहिवाशाना येते व त्यामुळें ते एकचक्र गांवाचे रहिवाशी पांडवांना चाहतात. पांडव तेथे भिक्षा मागून जगू लागले. आणलेली भिक्षा एकत्र करून मग त्याची वाटणी कुंती करीत असें व प्रत्येकाला त्यांचा सारखा वाटा ती देत असें. अशारितीने ते त्या गावात जीवन कंठत होते. अशामुळें कुंतीला पांडवांने जे कांहीं आणले , त्याची सारखी वाटणी करण्याची सवय होते.

एक दिवशी, ते पांडव भिक्षा मागण्यासाठी भटकत असतात, फक्त भिम घरात आईला मदत करण्यासाठी थांबला होता. अशावेळी गांवातून असलेल्या ब्राह्मण वाडीतून जेथे ते रहात होते, कांहीं भयंकर आरडाओरडा व माणसाच्या विव्हळण्याचा आवाज त्यांना ऐकावयास येतो. त्या ब्राह्मणाच्या घरातील माणसें दुःखातिरेकांने रडत होती. ते रडणे ऐकून कुंतीला फार वाईट वाटले . तिला ते रडणे असहय्य झाले, त्या प्रेमळ मनाच्या पृथाने तिच्या मुलाला, भिमाला विचारणा करण्यास सांगितले, किं, काय प्रकार आहे कीं, ते इतके ओक्शाबोक्शी रडत आहेत. कुंती भिमाला बोलते , "हे बघ पुत्रा, आपण येथे ह्या ब्राह्मणांच्या घरात धृतराष्ट्राच्या मुलांपासून सुरक्षित असें सुखाने रहात आहोत, तरी मला वाटते किं, आपली कांहीं जबाबदारी ह्या ब्राह्मणांप्रती आहे. मी नेहमीच ह्यांचे भले व्हावे म्हणून विधात्याकडे प्रार्थना करत असते, त्यांच्या चांगुलपणामुळे आपण येथे रहात आहोत तरी त्याची उतराई आपल्याला कोणत्या ना कोणत्या रीतीने करावयास पाहिजे. त्यांच्या

ह्या अशा उपकाराची परत फेड आपण केली पाहिजे, आज त्या आपल्यावर उपकार करणार्या ब्राह्मणांवर कोणता वाईट प्रसंग आला आहे ते तू जरा जाऊन पहावेस असें मला वाटते". त्यावर भिम तिला सांगतो, "मी येथे घराचे काम करीत आहे, तेव्हां तू जाऊन पहा काय प्रकार आहे".

मातेचे ते काकुळतीचे पुनः पुन्हा विनवणे ऐकून तो आज्ञाधारक पुत्र तिला बोलतो, "तुझी जी इच्छा ती माझी आज्ञा असते, तेव्हां जसे तू सांगतेस त्याप्रमाणे मी जाऊन पहातो किं, नेमके काय विपरीत घडले आहे त्या घरात व जर त्याला सुधारणे मला शक्य असेल तर ते मी त्वरित करून टाकतो".

वैशंपायन सांगतात, अशारितीने त्या मुला आईत संभाषण होत असतांना त्यांना पुनः एका स्त्रीचे रडणे एकू येते. आता मात्र कुंतीला रहावत नाही व गाय जशी आपल्या भुकेल्या वासराकडे दूध देण्यासाठी धांवते तशी ती उत्स्फूर्तपणें त्या ब्राह्मणाच्या घरात मागील भागातून शिरते, तेथे तो ब्राह्मण, त्याची भार्या व मुलगी घाबरलेल्या अवस्थेत एकमेकांना पकडून बसलेली ती कुंती पहाते . कुंती ऐकते कीं , तो ब्राह्मण बोलत असतो, "धिक्कार असो ह्या मर्त्य जीवनाचा जेथे फक्त दुःख व पिडा ह्यांच्या शिवाय कांहींच उरत नाही. जीवन हे ह्याशिवाय दुसरे कांहींच नाही. हा देह सद्गुण, संपत्ति व आनंद शोधण्यात आपण व्यतित करतो, परंतु, हे तिनही एकाच वेळी प्राप्त करण्याच्या खटाटोपात आपण बरेच कांहीं घालवून बसतो, व फक्त हाती लागते ते दुःख. आपण समजतो, मोक्ष हेंच आपले अंतिम ध्येय असावे पण मी समजतो, तो मोक्ष आपण कधीच मिळवू शकणार नाही. संपत्ति मिळवणे हे पाप केल्याशिवाय शक्य नसते, त्यामुळें त्या संपत्तीबरोबर येते दुःख, ती मिळवलेली संपत्ति कांहीं करणाने गेली तर आणखीन दुःख, मला समजत नाही, अशा गोष्टींपासून मी व माझी पत्नी कसें व कोठे पळून जाऊ जेथे हे दुःख नाही"? अशारितीने विव्हळणारा तो ब्राह्मण नंतर त्याच्या बायकोस बोलतो, "मी येथून निघून जाण्याची गोष्ट केली होती पण तू येथेच रहाण्याचा हट्ट धरलास व आज आपल्यावर ही परिस्थिती गुदरली आहे. तू सांगत राहिलीस, कीं, तू येथे जन्मलीस व येथेच वृद्ध होणार, तुझे आई व पिता येथेच झाले व येथेच स्वर्गवासी झाले. तुझ्या ह्या हट्टापायी आज हा प्रसंग आपल्यावर आला आहे. तुझे सगळे आप्त आता मरून गेले आहेत तरी येथे रहाण्याचा

तुझा आग्रह कां? आता आणखीन किती आप्तांचे मृत्यू तुला अशारितीने पहावयाचे आहेत? मला वाटते एक दिवस माझासुद्धा असाच मृत्यू येईल तुझ्या ह्या हट्टापायी. तूच माझी खरी मैत्रीण व साथीदार आहेस, माझ्या व आपल्या सुखात व दुःखात आपण एकत्र राहिलो पण आता अशी वेळ येणार असें दिसते किं, आपल्यापैकीं कोणी एक जाणार आहे. मी तुला सोडून जाऊ इच्छित नाही. आता आपला एकच लहान पुत्र ज्याने अजून पुरते जगसुद्धा पाहिलेले नाही, ह्याठिकाणी आपल्याला अशारितीने सोडून गेला तर आपले श्राद्ध कोण करणार ते सांग? आता ह्यानंतर माझ्या मुलीची वेळ येणार आहे कां? कांहीं कळत नाही. जिने अजून आयुष्य जगण्यास सुरुवात सुद्धा केलेली नाही, अशी ती माझ्या जीवाची कन्यासुद्धा आपल्याला अशारितीने सोडून जाणार कां? लोक कांहीं म्हणोत मी मानतो किं, पुत्री व पुत्र एकासारखेच असतात, कोणी जास्त युक्त असें समजणे अयोग्य आहे. जर तीसुद्धा अशाप्रकारे गेली तर माझे काय होणार? तिच्या ऐवजी मी गेलो तर तुझे काय होणार, तू कोणाकडे पहाणार? मी जर असां मेलो तर मला शांति प्राप्त होणार नाही कारण मी सदैव तुमचाच विचार करत रहाणार. ह्या सगळ्या कल्पनाच किती घाबरवणार्या आहेत ते कोणाला सांगता येणार नाही. माझा धिक्कार असो, मी तुमचे संरक्षण करण्यास असमर्थ आहे ह्या जाणीवेने मी शरमेने खजिल झालो आहे. ह्यातून सुटकासुद्धा नाही ह्याचे अपरिमित दुःख होत आहे. अशा जाणीवांपुढे मी ह्यापेक्षा जास्त जगू इच्छित नाही. पुढच्या वेळी मींच जाऊ इच्छितो". असें तो बरळत रहातो, त्या दुःखामुळें.

अशारितीने आदिपर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे एकोण साठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे साठावा

(बकासुर वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्या ब्राह्मणाचे ते बोलणे ऐकून त्याची पत्नी रडत रडत सांगते, "मला काय माहिती किं, तो ब्राह्मणाला सुद्धा खाईल, मला वाटत होते कीं, तो फक्त ब्राह्मणेतरांचा आहार करतो, जर मला हे माहीत असते कीं, हा असुर भुक लागल्यावर कोणालाही खाईल तर मी तुमच्या सांगण्याप्रमाणे केव्हांच हा माझ्या पूर्वजांचा प्रदेश सोडण्यास तयार झाले असते". पुढे ती त्याला सांगते, "आता शोक करण्यात काय अर्थ आहे, प्रत्येक जीवास मरणे क्रमप्राप्त आहे, जे होणे अनिवार्य आहे त्याच्यासाठी शोक करणे अयोग्य समजले जाते. आपले आप्त आपल्या स्वार्थासाठी आपण जपत असतो, आता शोक करण्यात वेळ न घालवता माझ्या जाण्याची तयारी करा, मी तुमची अर्धांगिनी आहे व म्हणून मी तुमच्या आधी जाणे हे शास्त्र संमत आहे. तुमच्या आधी जाण्याने माझी ख्याति होईल व ते एका पत्नीसाठी मोठे पुण्य कमावण्यासारखे असते. आपल्याला एक मुलगा व एक मुलगी झाली आहे म्हणून आपण त्या ऋणातून मुक्त झालो आहोत. तुम्ही त्या अपत्यांमुळें जितके आनंदी होत होता तितकी मी कधीच होत नव्हती. तुम्ही माझे देव अहात, सर्वस्व अहात. तुमच्या शिवाय मी ह्या जगात कशी राहीन? माझ्यानंतर तुम्ही ह्या मुलांना घेऊन कोठेतरी जाऊन चांगले जीवन जगावे अशी माझी इच्छा आहे तरी ती तुम्ही पूर्ण करावी. आपण जाणता किं, जसें मातीवर फेकलेल्या खाण्याच्या तुकड्याकडे कुत्री धावत जातात व तो तुकडा मिळवण्यासाठी एकमेकांशी लढतात तसेंच नवरा मेलेल्या बाईच्या बाबत होत असते, व तेंच माझ्याबाबतसुद्धा होईल म्हणून मीच जाणे चांगले हे समजून घ्या. तुमच्या पश्चात जर माझी मति भ्रष्ट झाली व मी अपमार्गांने गेले तर तुमच्या ह्या मुलीचे काय होईल त्याचा विचार करा, म्हणून मींच जाणे श्रेयस्कर आहे. तुमच्या जाण्यानंतर मी ह्या मुलांवर कसें चांगले संस्कार करणार ते सांगा, त्यापेक्षा मींच जाते व तुम्ही मागे राहून संसार सांभाळावा हेंच योग्य होईल. तुम्ही नसल्याने शक्तिहीन अशा माझ्या कडे एकाद्या शुद्राने तुमच्या मुलीचा हात मागितला तर मी त्याला विरोध करू शकणार नाही व त्या प्रसंगी ज्या यातना मला व तुमच्या आत्म्याला होतील त्याचा विचार करा. अशा गोष्टी घडत गेल्या तर मी पाण्यातून बाहेर फेकलेल्या माशासारखी तडफडून

मरीन ते तुम्हाला रुचेल कां? अशामुळें वर्णसंकर केल्याचे पाप आपल्या माथी लागेल त्याचा विचार करा. अशा सर्व गोष्टी लक्षात घेऊन तुम्ही मला जाऊ द्यावे. माझी ही मागणी पवित्र नियमांनुसार अगदी योग्य आहे म्हणून त्याला अनुमोदन द्या. पतिसाठी त्याग करणे हे मोठे पुण्याचे कार्य असते एका स्त्रीसाठी, हे तुम्हाला वेगळे सांगण्याची आवश्यकता आहे कां? मला जाऊ द्या व आपण आपल्या मुलांबरोबर सुखाने रहा, ते पहाण्यात माझ्या दिवंगत आत्म्यास संतोषच होईल. असें ज्ञानी माणसे सांगतात, कीं, बळीसाठी फक्त नरच योग्य समजला जातो, हा नियम राक्षसांनासुद्धा लागू असेल तर कदाचित् ते बकासुर मला न खाताच निघून जाईल असें झाले तर बरेच होईल. जर त्याने मला खाल्ले तर तुम्ही पुन्हा लग्न करून रहावे, बाईला मात्र दुसरे लग्न करणे भ्रष्टतेचे लक्षण समजले जाते. म्हणून माझ्या जाण्यांचे दु:ख करू नका. शेवटी एकच सांगते, मी त्या  राक्षसाकडे जाण्याचा निर्धार केला आहे व तुम्हाला परवानगी द्यावीच लागेल". असें बोलून ती त्याची बायको, नवर्याच्या अनुमोदनाची प्रतिक्षा करत रहाते. वैशंपायन पुढे सांगतात, बायकोचे ते आर्त बोलणे ऐकून शोकाकुल झालेले ते दोघे एकमेकांना घट्ट मिठी मारून रडत रहातात. हे सगळे त्या दोघांचे संभाषण कुंत्ती व भिम मागील दारातून ऐकत होते .

अशा रितीने आदि पर्वातील बकासुर पर्वाचा एकशे साठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकसष्ठावा

(बकासुर वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे बोलतात, आपल्या माता पित्यांचे ते शोकमय संभाषण ऐकून त्याची मुलेसुद्धा रडू लागली होती. ते पाहून त्याची माता त्यांना बोलते "माझ्या बाळांनो तुम्ही दुःख करू नका, तुमची काळजी घेण्यासाठी तुमचे पिता सदैव असतील. मी आता काय सांगते ते नीट एका व जे तुम्हाला रास्त वाटेल तेंच करा.  तुम्हाला माहीत आहे किं, भविष्यात केव्हातरी मी तुमच्या पुढे मरणार आहे. सामान्यपणे माणसांना मुलं हवी असतात कारण ती त्यांची काळजी घेतील यथावकाश अशी अपेक्षा असते. पितरांचा सन्मान करून ती त्यांचे जीवन पलिकडील जगात सुसह्य करतात. त्यासाठीच त्या मुलाला पुत्र म्हणतात.

ते ऐकून त्यांची मुलगी बोलते, "पितरांना मुलीच्या मुलाकडून तशीच अपेक्षा असते. परंतु, मी त्यासाठी न थांबता स्वतःच ते काम करणार आहे मला अर्पण करून. हा माझा भाऊ अजून फार लहान आहे. जर तू माझी आई आता मेलीस तर ह्या लहानग्याची कोण काळजी घेईल? असें सगळे आधी मेले तर पिंड कोण देणार, मी मुलगी असल्याने मला पिंड देण्याचा नियमानुसार अधिकार नाही हे तुम्ही जाणताच. अशामुळें माझा नाश ह्या जीवंतपणी होणार, त्यापेक्षा मींच त्या राक्षसाकडे जाते. पितरांच्या शांतिसाठी हेंच प्रस्तूत वाटतेय. माझ्या जाण्याने वंशाला कांहींही धोका नाही. मी गेल्यानंतर तुम्ही त्वरित येथून निघून जा अशा ठिकाणी, जेथे तुम्ही सुखाने कोणत्याही राक्षसाच्या त्रासाशिवाय रहू शकाल. मी मुलगी असल्याने बाप व आई गेल्यावर माझी सर्वात जास्त अडचण होणार आहे, मला कोण वाचवणार माणसांतील राक्षसांपासून? ते होऊ नये म्हणून तुमच्यापेक्षा मींच त्या राक्षसाकडे जाणे मला योग्य वाटते. असें केल्यामुळें मला पूण्य प्राप्त होईल व तुम्ही सुखाने उर्वरित आयुष्य मजेत घालवू शकाल. पितरांच्या शांतिसाठी ज्या विधी करावयाच्या त्या होत रहातील. सगळेंच सुखात रहातील व मलासुद्धा माझे कर्तव्य मी केले ह्याचे पुण्य मिळेल".

वैशंपायन सांगतात, तो ब्राह्मण व त्याची पत्नी ह्याचे व त्यांच्या मुलीचे बोलणे झाल्यावर ते सगळे एकत्र रडू लागतात. त्यांचा लहान पुत्र त्याला कांहींच न समजल्यानंतर सुद्धा

त्यांच्या सह रडू लागतो. तो लहान मुलगा त्यांना स्वतः रडत बोलतो, "तुम्ही रडू नका". तो छोटाला निष्पाप बालक त्या सगळ्यांच्या कडे जात बोबडा बोलतो, "तुम्ही घाबरू नका", तो हातात एक गवताचे पाते घेऊन त्यांना सांगतो, "मी ह्या गवताच्या पात्यानी त्या माणसांना खाणार्या राक्षसाला मारीन", जरी ते सगळे शोकाकुल होते तरी त्या छोट्याच्या त्या बोबड्या बोलण्याने त्यांच्या मुखावर हास्य उमटले होते.
हे सगळे कुंती ऐकत असते, ती विचार करते, हींच वेळ आहे त्या ब्राह्मणाचे ऋण फेडण्याची, ती त्या शोकाकुल कुटूंबाला भेटते व त्यांच्याशी बोलते, ते ऐकून त्या ब्राह्मण कुटूंबाला मोठा दिलासा मिळतो. जणू त्यांच्यावर अमृत शिंपडले आहे!
अशारितीने आदिपर्वातील बकासुर पर्वाचा एकशे एकसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बासष्ठावा

(बकासुर वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन त्यांना बोलतात, कुंती न राहून त्या ब्राह्मण कुटूंबाला विचारते, "मला सांगा तुम्ही इतकी चांगली मंडळी, कशामुळें असें दुःखकारक बोलत अहात? मला वाटते तुमच्या दुःखाला माझी मुलं संपवू शकतील". तिला तो ब्राह्मण सांगतो, "अहो संन्याशांच्या माते, आपण जे बोलता ते पटण्यासारखे आहे. परंतु, आमचे दुःख सहज संपण्यासारखे वाटत नाही. माणसांना तर ते निश्चितच जमण्यासारखे वाटत नाही. त्याचे कारण, ह्या नगराच्या पासून दूर अंतरावर एक राक्षस रहातो. त्याचें नांव बकासुर आहे. तो नरभक्षक आहे. तो ह्या भागाचा ताबेदार आहे. माणसाचे मांस खाऊन त्याची ताकद एवढी वाढली आहे किं, त्याला कोणी कांहीं करू शकत नाही. तो असुरांचा मुख्या आहे व तोच ह्या भागावर राज्य करत असतो. त्याच्या असण्यामुळें आम्हाला कोणाच्या आक्रमणाची भिती नसते. फक्त त्याला कांहीं जनावरे खाण्यासाठी द्यावी लागतात तोंच काय तो खर्च. ते काम आम्ही एकचक्रवासी वाटून घेऊन करतो. त्याला सतत हे त्याचे खाद्य पाठवावे लागते. तो त्या खाण्या बरोबर ते आणणार्या माणसासुद्धा खातो. प्रत्येक कुटूंबावर ही पाळी कांहीं वर्षानंतर येत असते. ह्यावेळी ते काम करण्याची पाळी आमच्या कुटूंबावर आली आहे. जर कोण्या परिवाराने ते केले नाही तर तो बकासुर त्या सगळ्या परिवाराला खाऊन टाकतो. हा प्रदेश वेत्रक्य नांवाच्या शहरात रहाणार्या राजाच्या सीमेत येतो परंतु, त्या राजाला राज्य कसें करावयाचे ते अजिबात समजत नाही, त्या राजाला अक्कलच नाही. त्यामुळे तो ह्या बकासुराकडे व त्याच्या त्रासाकडे लक्ष देत नाही. म्हणून तो राक्षस माजला आहे. ह्याला कांहीं प्रमाणात आम्हीच जबाबदार आहोत, जोवर आम्ही ह्या भागात रहात आहोत हा त्रास कायम रहाणार. आम्ही ब्राह्मण खरे तर एका जागी न रहाता पक्षांप्रमाणे देशोदेश भटकत फिरत रहाणे पसंत करतो, पण माझ्या नशिबी येथे कायम रहाणे आले आहे. आणि आता आमची पाळी आहे तो राक्षसाचा खुराक घेऊन जाण्याची. म्हणजे आमच्या पैकीं जो तो खुराक घेऊन जाईल त्याला तो बकासुर खाणारच, हाच तर प्रश्न आमच्यापुढे आहे, समजले कां मातोश्री". असें तो ब्राह्मण कुंतीला सांगतो . पुढे तो बोलतो, "असें सांगतात, चांगला राजा, चांगली बायको व पुरेशी संपत्ति असली कीं, जीवन सुखी होते. येथे

माझ्याबाबत नंतरच्या दोन मला जमल्या परंतु, पहिली जी माझ्या हातात नाही ती जमलेली नाही. त्याकारणांने आज आम्ही मोठ्या संकटात सांपडलो आहोत. जर आमच्यापैकीं कोणीही तो खुराक घेऊन गेले तर आमचे घर कायमचे बरबाद होणार आहे त्याचें दुःख होत आहे. ह्या दुःखातून आम्हाला कोणी वाचवू शकेल असें सुद्धा वाटत नाही. माझ्याकडे कोणी दास नाही किं, त्याला मी तो खुराक घेऊन जाण्यास सांगू शकेन. म्हणजे आमच्यापैकींच कोणाला जावे लागणार! ह्यातून माझी कोणीही मदत करणारा सुद्धा नाही. त्या कारणांने आम्ही दुःख करीत आहोत, समजले कां मातोश्री". पुढे तो द्विज सांगतो, "मी जर आज खुराक घेऊन गेलो तर माझे सगळे कुटूंब माझ्यासह येणार म्हणजे, तो आम्हा सगळ्यांना खाणार, हे असें कसले प्राक्तन आमच्या नशिबी लिहीले आहे, अहो दुर्भाग्य".
अशारितीने आदिपर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे बासष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे त्रेसष्ठावा

(बकासुर वधपर्व पुढे चालू)

ते ऐकून कुंती त्याला  सांगते , "अरे संसारी ब्राह्मणा, ह्या तुमच्या संकटावर माझ्याकडे इलाज आहे. मी जे सांगते तसें जर तू केलेस तर तू व तुझे कुटूंब ह्या त्रासातून मुक्त होईल. तुला फक्त एकच मुलगा व मुलगी आहे, माझ्याकडे पांच मुलं आहेत, तुझा मुलगा फारच छोटा आहे, माझी मुलं खूप मोठी आहेत, म्हणून मी सांगते ते ऐक, तुम्ही तो खुराक घेऊन जाऊ नका, तुमच्या ऐवजी माझा एक बलवान मुलगा तो खुराक घेऊन जाईल व त्या राक्षसाला भेटेल".

हे कुंतीचे बोलणे ऐकल्यावर तो ब्राह्मण उत्तर देतो , "अहो मातोश्री, माझे व माझ्या कुटूंबाचे जीव वाचवण्यासाठी तुमच्या संन्याशी मुलाचा बळी जाणे मला कदापिही स्वीकारता येणार नाही. ते मोठे पापकर्म होईल. त्यात तुम्ही माझे अतिथी अहात व त्याशिवाय ब्राह्मणसुद्धा अहात, अशा कर्मांने मी नरकात जाईन, ते योग्य होणार नाही, त्यापेक्षा आम्ही आमचे प्राक्तन स्वीकारणेच जास्त प्रस्तूत वाटते. अशा प्रसंगी एकादा हीनकुळीन सुद्धा असें पाप करण्यास तयार होणार नाही व मी तर ब्राह्मण आहे, तेव्हां मी तुमचे आभार मानतो कारण कीं, तुम्ही माझ्या दुःखात सहभागी झालात परंतु, असें कांही करणे मला योग्य वाटत नाही व अशा कर्माला शास्त्राचा आधारसुद्धा नाही. पुढे तो ब्राह्मण बोलतो, "शास्त्र सांगते, ब्राह्मणाच्या संरक्षणासाठी माणूस स्वतः व त्याचा परिवार कामी आला तरी त्यामुळें त्यांना सद्गती मिळते. मी त्याप्रमाणे वागणे रास्त समजतो व मी तसेंच करणार आहे. माझ्यावर दोन पर्याय असतील किं, एक म्हणजे ब्राह्मण मरणार व दुसरा, मी मरणार तर मी दुसरा पर्याय आवडीने निवडीन. तुम्ही जाणताच कीं, ब्राह्मणाच्या मृत्यूस कारणीभूत होण्यासारखे महापाप नाही. मग माझ्याकडून तुम्ही असे कसे अपेक्षिता"?

तो ब्राह्मण पुढे कुंतीला सांगतो , "नाइलाजाने स्वताचा बळी देणे हे, जाणूनबुजून दुसर्या कोण्या ब्राह्मणाचा बळी देण्यापेक्षा चांगले असते. माझा बळी देण्यात मला पाप केल्याचे दुषण लागत नाही, परंतु, तुमच्या चांगुलपणाचा असा गैरफायदा घेण्याने मला फार मोठे पाप लागेल त्याचा मी जास्त विचार करतो. अशा पापाला शास्त्रात प्रायश्चित्तसुद्धा नाही. माझ्याकडे रहावयास आलेल्या तुमचा बळी चढवणे मग ते कोणत्याही कारणांने असो,

शास्त्राला मान्य नाही हे तर तुम्ही जाणताच. त्याच्यासारखा दुष्टपणा दुसरा नाही. अखेरीस मी ठरवले आहे किं, मी व माझी पत्नी व माझी मुलं बळी जावयाला पाहिजे, कारण, त्याला कोणताही शास्त्रसंम्मत पर्याय नाही". ते त्याचे बोलणे होत असतांना त्याची बायको मात्र त्याच्या विचाराशी सहमत नाही हे कुंती ओळखते म्हणून त्या यजमानाला बोलते, "मीसुद्धा ह्याच विचाराची आहे, कीं, ब्राह्मणाचा बळी दिला जाऊ नये. मी तुमचा बळी जाऊ नये ह्याचसाठी बोलत आहे. मला माझी मुलं प्रिय नाहीत असें तुम्हाला वाटत असेल तर ते चुकीचे आहे. मला माझी सगळी मुलं सारखीच प्रिय आहेत परंतु, येथे मुद्दा असा आहे किं, माझ्या मुलाकडे एक गुप्त विद्या आहे व त्यामुळें तो बकासुर त्याला मारू शकणार नाही, आणि म्हणूनच मी तुम्हाला सांगते किं, त्याला तो खुराक घेऊन जाऊ द्या. तो त्या विद्येच्या ताकदीवर त्या राक्षसाच्या हातून मरणार नाही. त्यामुळें तुमचा प्रश्न सुटेल. ह्या आधीसुद्धा असें प्रसंग आम्हा भटकंती करणार्या संन्याशांवर आले होते त्यातून आम्ही सहीसलामत सुटत आलो आहोत त्याच्या त्या गुप्त विद्येमुळें. बर्याच वेळा माझा मुलगा अशा राक्षसाला मारून आला आहे". एवढे सांगितल्यावर कुंती त्या ब्राह्मणाला ताकीद देते कीं, "त्यांने ह्याबद्दल कोणालाही सांगता कामा नये कारण जर सांगितले तर ती विद्या नाहीशी होईल व ते योग्य होणार नाही". कुंती पुढे सांगते , "जर माझ्या मुलाला ती विद्या कोणाला शिकवावयाची असेल तर त्यासाठी त्याला त्याच्या गुरूची संम्मती घ्यावी लागते व तो गुरू ती कधीच देत नाही". कुंतीचे ते बोलणे ऐकून तो ब्राह्मण व त्याची बायको अतिप्रसन्न होतात. अखेरीस तो ब्राह्मण कुंतीच्या प्रस्तावाला स्वीकारतो . त्या छोट्याशा कुटूंबात आनंदाचे वातावरण सुरु होते, त्यांचा इवलासा मुलगा कांहीं कळत नसतांना आनंदाने उड्या मारू लागतो. कुंतीला ते पाहून बरे वाटते, तिला त्या ब्राह्मणाचे उपकार फेडावयाचे असतात व अशाप्रकारे ते ती करणार असते. ती तेथूनच भिमाला हांक देते व तो वायूपुत्र तेथे येतो. भिम लागलीच त्यासाठी तयार होतो.

अशारितीने आदिपर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे त्रेसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चौसष्ठावा

(बकासुर वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन ऋषी पुढे सांगतात, भिमाने कुंतीला ते खुराक घेऊन जाण्याचे काम करण्याचे आश्वासन दिल्यानंतर थोड्या वेळांत इतर भाऊ त्या दिवसाची भिक्षा घेऊन येतात. आल्यानंतर युधिष्ठीर भिमाशी बोलतांना त्याला त्या कामाची माहिती समजते. त्याला त्या कामातील धोका जाणवतो व त्याच्या नेहमीच्या भित्र्या स्वभावाप्रमाणे तो कुंतीशी जवळ जाऊन हळू आवाजात बोलतो व विचारतो किं, "काय हे धाडस भिम स्वतःच्या निर्णयाने करत आहे, कां तू त्याला करावयास सांगितले आहे"? कुंती युधिष्ठीराला सांगते, "होय मी त्याला ते काम करण्यास सांगितले आहे, त्यामुळें त्या ब्राह्मणाचे जे उपकार आपल्यावर झाले आहेत त्यातून आपली सुटका होईल, हे गांव त्या राक्षसाच्या त्रासातून मुक्त होईल, भिमाला त्याच्या प्रचंड ताकदीचा पुनः एकदा प्रत्यय येईल हे सगळे माझ्यामते होणे क्रमप्राप्त आहे म्हणून मी त्याला तसें करण्याची आज्ञा केली आहे व त्यांने ती मान्य केली आहे, तुला कां पंचाईत पडली आहे"? ते ऐकल्यावर युधिष्ठीर बोलतो, "हे करणे धोक्याचे नाही कां वाटत तुला"? पुढे तो सांगतो, "आई, आपल्याला येथून पुढे गुप्ततेत जावयाचे आहे, अशा कृत्यामुळें आपल्याबद्दल जास्त चर्चा झाली तर आपण कोठे आहोत ते कौरवांना समजेल, त्याचा तू कां विचार करीत नाहीस? एका राक्षसाला मारले म्हणजे सगळ्यांना तो मारू शकेल असें समजणे योग्य नाही. आपण त्याच्या बळावर किती अवलंबून आहोत ते तू जाणतेस अशा परिस्थितीत असा निर्णय तू घ्यावयास नको होतास. स्वताच्या पुत्राचा अशारितीने नाश करणे वेदांनासुद्धा अमान्य आहे. ज्याच्या ताकदीमुळें आपण निर्धास्तपणे जगत आहोत त्याचा बळी तू ह्या फालतु ब्राह्मणासाठी देण्यास तयार झालीस ही काय दुर्बुद्धी तुला सुचली"? पुढे तो बोलतो, "धृतराष्ट्राच्या मुलांचा पराभव करण्यासाठी आपल्याला भिमाची नितांत आवश्यकता आहे असें जाणत असतांना तू हा धाडसी व आत्मधातकी निर्णय घ्यावयास नको होतास. भिमाच्या जोरावर मी कितीतरी मोठी स्वप्न साम्राज्याची पाहिली आहेत ती कशी साध्य होणार, जर भिमाचे कांहीं बरेवाईट तुझ्या ह्या निर्णयामुळे झाले तर"? शेवटी चिडून तो मतलबी पांडव बोलतो, "अग आई, तुझी बुद्धी भ्रष्ट झाली आहे कां"?

युधिष्ठीराची ती स्वार्थ लोलूप वाणी ऐकून चिडलेली माता त्याला सुनवते, "अरे युधिष्ठीरा, तुला इतकी चिंता तुझ्या भावाची करण्याची गरज नाही. मी हा निर्णय पूर्ण विचारा अंती घेतला आहे. त्या ब्राह्मणाचे उपकार मला खात होते व त्यातून बाहेर पडण्यासाठी काय करावे त्याच्या विचारांने मी सदैव त्रस्त होत होते, जेव्हां मला ही त्या ब्राह्मणाची अडचण समजली तेव्हां मी हा निर्णय घेतला कीं, आपला शक्तिमान वृकोदर त्यातून मार्ग काढील. भिमाच्या क्षमतेबद्दल शंका घेऊन तू तुझ्या भावाचा एकापरीने अपमान करीत आहेस. त्याच्या अफाट सामर्थ्याची कल्पना असतांना तुझ्या डोक्यात असें अभद्र विचार आलेच कसे? केवळ स्वताच्या योजनांसाठी त्याला वापरण्याची ही तुझी वृत्ति तुला, जो स्वताला न्यायी समजतो, शोभत नाही. त्यावर तू मला वेदाचे सांगतोस"? पुढे कुती त्याला सुनवते, "भिमाच्या क्षमतेबद्दल शंका घेणे मूर्खपणाचे आहे, कारण, त्यांने जे लक्षागृहात केले, त्याचे पुरोचनाला मारणे व अखेरीस हिडींबाचा वध हे सगळे काय दर्शवते ते तुला समजत नाही कां? केवळ भिमच ह्या गांवाला त्या राक्षसापासून वाचवू शकतो व त्याकरता मी जे केले ते बरोबरच होते, क्षत्रियांचे कार्य लोकांना वाचवण्याचे असते, ते केवळ राज्यापुरते मर्यादीत नसते तर कोठेही कोणी अन्यायाखाली भरडला जात असेल तर तेथे खरा क्षत्रिय आपले सगळे सामर्थ्य पणाला लावून तो अन्याय नष्ट करील. हजार हत्तींची ताकद असलेल्या स्वताच्या भावाबद्दलचे तुझे विचार मला शरमेने मान खाली घालावयास लावत आहेत. माझा भिम वरनावतचा हत्ती आहे, त्याला कोणीही मारू शकणार नाही असा माझा विश्वास आहे, त्याशिवाय गुरूवर्य व्यासांने सुद्धा मला आशिर्वाद दिला आहे किं माझे पुत्र नेहमीच विक्रमी होतील त्यावर माझी पूर्ण श्रद्धा आहे, त्याकरता अशारितीने नकारात्मक दृष्टीकोन तू ठेवणे एका क्षत्रियाला न शोभणारे आहे. माझा भिम त्या इंद्रालासुद्धा भारी जाईल ह्याबद्दल माझी खात्री आहे. तुला माहीत नाही म्हणून सांगते, एकदा तो नुकताच जन्मला होता व माझ्या कुशीत होता तेथून तो खाली दगडावर पडला तेव्हां त्या दगडाचा चुराडा झाला होता. अशा बलवान भिमाला कोणी राक्षस मारू शकेल हे संभवत नाही. ह्या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन मी हा निर्णय घेतला. माझा निर्णय पूर्ण शुद्धीत व दूरचा विचार करूनच मी घेतला आहे. ह्यामुळें दोन उद्देश साध्य होणार आहेत, एक त्या ब्राह्मणाच्या ऋणातून मुक्तता व दुसरा जेव्हां क्षत्रिय ब्राह्मणाला जीवनदान करतो तेव्हां ते फार मोठे

पुण्यकर्म असते. तसेंच जेव्हां क्षत्रिय क्षत्रियाची, वैष्याची व शुद्राची मदत करतो तेव्हां तो ख्यातनाम होतो. राजाचे काम आहे किं, तो शुद्राचे संरक्षण करेल. महान तपस्वी कृष्ण द्वैपायन मला नेहमी सांगतात कीं, पार्था तुझी मुलं कधीही हरणार नाहीत त्यांच्या शब्दाचे महत्व तू समजून घे व माझ्या निर्णयाला अनुमोदन दे. नाही दिलेस तरी हे होणार व माझा भिम त्या बकासुराला मारणार!

अशारितीने आदिपर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे चौसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पासष्ठावा

(बकासुर वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, कुंतीचे ते निर्धारपूर्वक बोलणे ऐकल्यावर भित्रा युधिष्ठीर नमते घेतो व बोलतो, "तुझा तोंच निरधार आहे तर तसेंच होईल व मलासुद्धा विश्वास आहे माझ्या भावाच्या शौर्यात व धाडसात कीं, तो त्या कामात पूर्णपणे यशस्वी होईल. तरीसुद्धा ह्या निर्णयामागे तुझ्या ब्राह्मणांप्रति असलेल्या भावना मला स्पष्टपणे दिसत आहेत. तू नेहमीच ब्राह्मणांप्रति विशेष अनुकूल असतेस. मला आता एकच चिंता करावीशी वाटते कीं, जर तो ब्राह्मण ह्याबद्दल इतरत्र बोलत राहीला तर त्यामुळें कदाचित आपल्याला अज्ञातवासात रहाणे अशक्य होईल तेव्हा तू त्या ब्राह्मणाल ताकीद दे किं, ह्याबद्दल कोठेही तो अथवा त्याचे कुटूंबातील कोणी कांही सांगणार नाही. तसे त्याच्या कडून वचन घे.

वैशंपायन सांगतात, ठरल्याप्रमाणे, भिम त्या रात्री बकासुर ज्या जंगलात रहातो त्या ठिकाणी खुराकाने भरलेला गाडा घेऊन निघतो. त्या जागी आल्यावर भिम तो खुराक स्वतःच खाण्यास सुरुवात करतो. राक्षस तेथे वाट पहात असतो परंतु, ते जे तो पहातो त्याच्या अपेक्षे बाहेरचे असते. पंडुचा पुत्र त्या राक्षसाकडे दुर्लक्ष करून ते खाणे चालूच ठेवतो. त्यामुळें संतापाने भडकलेला तो उन्मत्त राक्षस आणखीनच चिडतो व ओरडून बोलतो, "हा कोण मूर्ख आला आहे माझ्याकडे व माझाच खुराक खात आहे"? तो राक्षस भिमाचे अवाढव्य शरीर पहातो, त्याचे डोळे लालेलाल झालेले असतात संतापाने, त्याची रक्तवर्णी दाढी, रक्तवर्णी केस ताठ झालेले असतात. तो इतक्या जोरांने आपली पावले टाकत असतो किं, त्यामुळें ती धरती कंप पावत होती. त्याचे तोंड मोठे वासलेले होते जणू काय तो आता भिमाला खाणार. एका कानापासून दुसर्या कानापर्यंत असें ते वासलेले होते. त्याचे कान लांब व टोकदार होते जसें राक्षसांचे असतात. भिम त्याचा खुराक खात आहे ते पाहून त्याचा राग अनावर झालेला दिसत होता. तो त्याचे ओठ चवताळून जोरांने दाबत पुढे येत असतो. त्याचे ते भयावह रुप पाहून कोणीही घाबरून बेशुद्ध झाला असता पण त्याच्या त्या अवताराचा भिमावर कांहींही परिणाम झालेला दिसत नव्हता. उलट भिम त्याच्याकडे न पहाता त्याच्यासाठी आणलेला तो खुराक खाण्यातच दंग झाला होता.

बकासुर ओरडून बोलतो, "हा कोण मूर्ख आहे किं, माझे खाणे खाऊन त्याला यमाकडे जाण्याची घाई झाली आहे"?
त्याच्या त्या बोलण्याची चेष्टा करत भिम त्याचे खाणे चालूच ठेवतो. जाणूनबुजून भिम त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याचे दाखवत त्याच्या हालचालीवर एका नजरेने लक्ष ठेवत खाण्याचा सपाटा चालू ठेवतो. ते लक्षात आल्यावर राक्षस आणखीनच संतापतो. आपले दोनही हात उंचावून तो ओरडत भिमावर चाल करून येतो. बकासुर भिमाच्या जवळ आलेला असतो व तो जोरांने भिमाला एक ठोसा दोनही हातांची मुठ करून मारतो. जरी तो ठोसा भारीभक्कम होता, त्याचा भिमावर कांहीच परिणाम झालेला दिसला नाही. भिम तसांच खाणे चालू ठेवतो. ते पाहून तो राक्षस समजतो कीं, हा कांहीं सामान्य माणूस नाही. त्यानंतर बकासुर जवळचे झाड उपटतो व भिमावर फेकतो. त्याने कांहीं होत नाही असें दिसल्यावर तो आणखीन एक झाड उपटून फेकतो. तोवर भिमाचे खाणे संपलेले असते व तो बकासुराला घेण्यासाठी सज्ज होतो. बकासुराने फेकलेले झाड भिम डाव्या हाताने पकडतो व त्याच्यावर उलट फेकतो. अशारितीने हि झाडांची फेकाफेक चालू रहाते. भिम तुच्छतेने त्या राक्षसाच्या हालचाली पहात असतो व त्याला आणखीन चिडवण्याचा प्रयत्न करत रहातो. त्या झाडांच्या उपटाउपटीमुळें त्या जंगलातील झाडे जवळ जवळ संपतात. त्यानंतर एवढे झाल्यावर बकासुराला लक्षात येते किं, हा दुसरा तिसरा कोणी नसून वृकोदर आहे ज्यांने हिडींबाला मारले व त्याच्या बहिणीशी लग्न केले. बकासुर भिमावर चाल करून जातो व त्याचे दोनही हात पकडतो व त्यांची कुस्ती सुरु होते. दोघे एकमेकांना जोरांने ढकलू खेंचू लागतात. ह्यात तो राक्षस भिमाला थकल्या सारखा वाटतो, तसें तो त्याला जोरांने दाबण्यास व त्याप्रकारे त्याची  दमछाक करण्यास सुरुवात करतो. त्यांच्या त्या धमासान लढाईमुळें सारी धरती कंप पावत होती. अखेरीस थकलेल्या बकासुराला भिम आपल्या गुडघ्यानी जमिनीवर दाबून जोरजोराने बुक्के मारण्यास सुरुवात करतो. त्यानंतर भिम एक गुडघा त्याच्या पाठीत दाबून हाताने त्या राक्षसास पिळण्यास सुरुवात करतो. त्यामुळें घाबरून तो राक्षस जोरजोरांने ओरडू लागतो. त्या दाबामुळें बकासुर रक्त ओकू लागतो. बकासुराचे भिमाने आता दोन तुकडे केले व त्याला बाजूला फेकून दिले. बकासुर मेला होता.

अशारितीने आदि पर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे पासष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सहासष्ठावा

(बकासुर वधपर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाच्या पायाखाली तो अजस्त्र राक्षस शेवटची भयंकर किंकाळी फोडून मरतो. ती किंकाळी ऐकून त्याचे नातेवाईक राक्षस तेथे जमा होतात. भिमाचे ते कृत्य पाहून ते घाबरून जातात, त्यांना भिम सांगतो किं, त्यानी नरभक्षण सोडून द्यावे नाहीतर त्यांचीसुद्धा अशीच गत होईल. त्याप्रमाणे ते भिमाला नरभक्षण ह्यापुढे न करण्याचे आश्वासन देतात. त्यानंतर बकासुराचे शव खेचत भिम त्या एकचक्र गांवाच्या वेशीवर आणून ठेवतो व कोणालाही समजणार नाही अशाप्रकारे तेथून निघून जातो. त्या दिवसापासून त्या भागातील रहिवाशाना दिसले किं, ते राक्षस माणसाशी फार चांगल्या प्रकारे वागत आहेत. बरेच राक्षस ते गांव सोडून जातात. भिमाने त्याला मारल्यानंतर तो घरी आला व आपल्या मातेस व युधिष्ठीराला जे घडले ते सगळे सांगितले. दुसर्या दिवशी गांवातील लोकांना ती बातमी समजली व लोक झुंडीने त्यांच्या बाया बापड्या, मुलं, लेकी, सुना असें सगळे परिवाराने त्या जागी येऊ लागले व ते रक्ताने माखलेले व दोन तुकडे झालेले बकासुराचे प्रेत पाहून थक्क होत होते. प्रत्येक जण विचारत होता हे कोणी केले. त्याचे ते तशा अवस्थेतील शव पाहून कित्येकांच्या अंगावर शहारे येत होते. त्या बातमीची चर्चा होऊ लागली व त्या दिवशी कोणाची पाळी होती त्याची चर्चा झाली व सगळ्यांना समजले किं, ह्या ब्राह्मणाची पाळी होती. तेव्हा सगळे त्या ब्राह्मणाला विचारू लागतात किं हे कसे झाले"?

अशी विचारणा सगळ्यांकडून होऊ लागल्यावर तो ब्राह्मण गप्प बसू शकला नाही व तो आधी ठरल्याप्रमाणे त्या सगळ्या विचारणार्यांना सांगतो किं, त्याचे रडणे एक फिरस्ता भिक्षूक ब्राह्मण ऐकतो जो त्याच्याकडे भिक मागण्यासाठी आला होता. तो ब्राह्मण मंत्रविद्या जाणणारा होता तो त्याला सांगतो किं, त्याचे काम तो करील व त्याप्रमाणे तो भिक्षूक ब्राह्मण तो खुराक घेऊन जातो व मंत्रशक्तिने बकासुराला मारतो. त्यानंतर तो ब्राह्मण निघून जातो. त्या सांगण्याने एकचक्र गांवाच्या रहिवाशांचे समाधान होते. एक बला टळली ह्याचेच त्याना समाधान असते, त्यानंतर ते चारही (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र) जातीचे गांवकरी

त्या अज्ञात ब्राह्मणाचे स्मरण व कौतुक करण्यासाठी एक सोहळा ठेवतात, ज्याच्यामुळें गांवावरील मोठे अरिष्ठ टळले.

अशारितीने आदिपर्वातील बकासुर वध पर्वाचा एकशे सहा सष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सदुसष्ठावा

(चैत्ररथ पर्व सुरु)

एकचक्र गांवाचे रहिवासी समाधानाने आपापल्या निवासी परततात व पांडव आपले अज्ञातवासातील जीवन चालू ठेवतात. पुढे जनमेजय राजा विचारतो, "बकासुराचा वध केल्यानंतर ते शूरवीर पांडव पुढे काय करतात"?

वैशंपायन त्याला सांगतात, पांडव, अरे महान राजा, जनमेजया, बकासुराला मारल्यानंतर त्या एकचक्र गांवात रहातात. त्या वास्तव्यात ते आपला वेदांचा, वेदांगांचा अभ्यास चालू ठेवतात. त्यानंतर एके दिवशी एक थोर ब्राह्मण त्याच्या घराच्या मालकाकडे त्याच्या जागेचा ताबा घेण्यासाठी येतो ज्या भागात पांडव रहात होते. तो यजमान ब्राह्मण त्याचे यथार्थ स्वागत करतो. त्यानंतर तो त्याला त्याच्या जागेतला एक भाग त्याला रहाण्यासाठी देतो. तेथे त्यांचा त्या नव्याने आलेल्या ब्राह्मणाशी चांगला परिचय होतो व एक दिवस ते बलशाली पांडव त्याला विचारतात, त्याच्या भटकंतीतील अनुभव. तो विद्वान ब्राह्मण त्यांना त्याचे विविध विलक्षण अनुभाव सांगतो, त्यात अनेक गांवातील गोष्टी, राजांच्या गोष्टी, पवित्र ठिकाणे, तीर्थक्षेत्रे अशा सगळ्या जांगातील त्याचे बरेवाईट अनुभव तो दररोज सांगत असतो, त्यात त्यांचे भरपूर मनोरंजन होत असते. एक दिवस तो ब्राह्मण, पांचाल नरेश यज्ञसेन त्याच्या मुलीच्या स्वयंवराबद्दल पांडवांना बोलतो. त्यानंतर धृष्टद्युम्न व शिखंडी ह्यांच्या जन्माबद्दल सांगतो. त्याशिवाय पांचाळ नरेशांची मुलगी कृष्णा तिच्या विलक्षण जन्माची कहाणी सांगतो. त्या सगळ्या कथांमुळें पांडवांची त्यांच्या बद्दलची उत्सुकता इतकी वाढली कीं, ते त्याला त्यांच्या बद्दल आणखीन माहिती सांगण्यास सांगतात. ते त्या ब्राह्मणाला विनंती करतात किं, त्याने यज्ञसेनाचा मुलगा धृष्टद्युम्न व कन्या कृष्णा, कसे जन्मले ते सांगावे. यज्ञकुडातून कसा काय त्या कृष्णाचा जन्म झाला ते त्याना समजेना. द्रुपदाचा मुलगा द्रोणाकडून सगळी धनुर्विद्या कसा शिकला. तसेंच असें काय झाले, म्हणून द्रोण व द्रुपद ह्याची मैत्री संपली.

पुढे वैशंपायन सांगतात, अशा प्रकारे पांडवांनी विचारणा केल्यामुळें तो विद्वान ब्राह्मण त्यांना त्या सगळ्या गोष्टींची इत्तंभूत माहिती सांगू लागतो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे सदुसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अड्डसष्ठावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

तो विद्वान ब्राह्मण सांगू लागतो, त्या प्रदेशात जेथे गंगानदी सपाट प्रदेशातून वाहू लागते, एक महान ऋषी रहात होता. विवेकयुक्त अतितीव्र व्रतस्थ राहून, असें तप तो करीत होता. त्याचे नांव होते भारद्वाज. एके दिवशी गंगेच्या तटावर त्याचे नित्याचे अर्ध्य देण्यासाठी तो आला असतां तेथे त्याला एक अप्सरा, जिचे नांव घृताची होते, त्या परिसरात रेंगाळतांना दिसते. तो तिच्याकडे पहात असतांना नेमके त्याचवेळी एका वार्याच्या झुळकीमुळें तिच्या अंगावरील झिरझिरीत वस्त्र उडून जाते. तिला असें नग्न अवस्थेत तो पहातो व त्याला कामदेव (इंद्र) पकडतो व त्याचे वीर्य स्खलन होते. असें होण्याचे कारण, भारद्वजाचे ब्रह्मचर्य कृष्ण प्रकारातील होते. त्या प्रकारच्या ब्रह्मचार्यास कामवासना नियंत्रित करण्यासाठी स्त्रियांपासून दूर रहावयाचे असते (स्त्री दर्शन वर्ज्य असते, स्त्रियांचा तिरस्कार करणे). स्त्रीच्या शरीराच्या दर्शनाने ते भ्रष्ट होत असते. जर त्याचे ब्रह्मचर्य शुक्ल (शुक्ल ब्रह्मचर्यात तो स्त्री विषयी आत्यंतिक सन्मानाची भावना बाळगतो, सर्व स्त्रिया माते समान, बहिणी समान असें) असते तर असें झाले नसते. परंतु, अरे संन्याशानो (तो ब्राह्मण पांडवांना संन्याशी समजत असतो), त्या प्राचीन काळात ब्रह्मचर्याच्या अशा दोन प्रकारांची माहिती नव्हती. बहुधा सगळेच ऋषी कृष्ण ब्रह्मचर्यच आचरत होते. विश्वामित्र सुद्धा त्यामुळें मेनकेच्या आहारी गेला होता ते तुम्हाला माहीत असेलच. तो ब्राह्मण पुढे सांगतो, भारद्वजाला समजते कीं, त्याचे वीर्य शरीरातून बाहेर आले आहे तर तो ते मातीवर पडू नये म्हणून हाताच्या द्रोणात पकडतो. त्या वीर्यातून एक बालक उत्पन्न होते म्हणून त्याचे नांव द्रोण असें ठेवले जाते. भारद्वजाचा तो पुत्र त्याच्या मार्गदर्शनाखाली सगळे वेद, वेदांत, इतर विविध ज्ञानशाखा शिकून त्यात प्रवीण होतो. त्यामध्ये धनुर्विद्या, मंत्रविद्या सुद्धा असते. त्या भारद्वजाचा एक मित्र असतो त्याचे नांव प्रिशत आणि तो प्रिशत पांचाल राज्याचा अधिपती असतो. ज्यावेळी द्रोण जन्मतो त्याच सुमारास प्रिशताला एक पुत्र होतो, त्याचे नांव तो राजा द्रुपद असें ठेवतो. शिक्षणासाठी द्रुपद भारद्वजांच्याच आश्रमात येतो आणि त्यामुळें द्रोण व द्रुपद लहानपणापासून एकत्र खेळत असतं. यथावकाश प्रिशताच्या स्वर्गवासानंतर नियमांनुसार

द्रुपद गादीवर येतो. येथे द्रोण भारद्वजांच्या निजवासी जाण्यानंतर (मृत्यू नंतर) त्यांच्या आश्रमाचे काम पाहू लागतो व तेथे तो गुरूकूल चालवू लागतो. त्या सुमारास भ्रष्ट क्षत्रियांचा बंदोबस्त करणारे जामद्ग्न्य (परशुराम) आपले सर्वस्व दान करण्याचे जाहिर करतात. त्यात त्यांची भौतिक संपत्ति व शस्त्रार्थ असें सगळे होते. द्रोणाला परशुरामाच्या भौतिक संपत्तीत रस नव्हता परंतु, त्यांच्या शस्त्रार्थात व त्या बरोबर ती विद्या ह्यात रस होता. परशुरामाकडे गेल्यावर द्रोण त्यांना बोलतात, अहो द्विजश्रेष्ठ मला आपल्या संपत्तीत रस आहे. त्यावर तो परमक्षत्रिय जामदाग्न्य त्याला बोलतो किं, माझी भौतिक संपत्ति मी इतर ब्राह्मणांना व भूमी काश्यपाला दान केली आहे आता फक्त शस्त्रार्थ व त्याबाबतची विद्या आहे, ती तुला पाहिजे असेल तर ती मी तुला देण्यास तयार आहे. त्याशिवाय माझे शरीर आहे, तुला त्यातील काय हवे ते बोल. ते ऐकल्यावर द्रोण नम्रपणे त्यांना सांगतात, मी भारद्वजांचा पुत्र द्रोण, मला तुमची शस्त्रार्थ व विद्या दान कराल तर ती पाहिजे. ते परशुराम मान्य करतात व त्यांची सगळी शस्त्रार्थ व त्या संबंधित विद्या ते द्रोणाला दान करतात. ती मिळाल्यावर द्रोणाला अत्यानंद होतो कारण त्यामुळें तो सर्वात श्रेष्ठ शस्त्रविद्याविशारद होत असतो. अशारितीने प्रबळ झालेला भारद्वाजाचा पुत्र त्याचा बालमित्र द्रौपदाकडे जातो. त्याला त्याच्या सगळ्या दरबार्यां समक्ष बोलतो कीं, तो त्याचा बालमित्र आहे. ते ऐकून यज्ञसेनाला, द्रौपदाला कमीपणा वाटतो व तो द्रोणाची ओळख देण्यास नाकारतो. तो बोलतो कीं, हलक्या कुळातील माणसे कधीही उच्चकुलिनांचे मित्र नसतात. जो योद्धा नाही तो योद्ध्याचा मित्र असू शकत नाही. जो स्वतः राजा नाही तो एकाद्या राजाचा मित्र असू शकत नाही.

परशुरामाकडून सामर्थ्य घेऊन आलेला तो ब्राह्मण त्या अपमानाने अस्वस्थ होतो. त्या अपमानाचा वचपा काढण्याच्या उद्देशांने तो स्वाभिमानी ब्राह्मण कुरु राजाच्या कडे त्यांच्या हत्तीचे नांव असलेल्या नगरी जातो व शस्त्र शिक्षकाची नोकरी घेतो. तेथे कुरु वंशाचे भिष्म त्याला सन्मानाने आसरा देतात व तेथे तो त्या तेजस्वी पांडवांना शिकवून तयार करतो. तेवढे झाल्यावर द्रोण आपल्या अपमानाचा वचपा काढण्यासाठी पांडवांकडे त्याची दक्षिणा मांगतो. द्रोण पुढे त्याच्या शिष्यांना बोलतो किं, त्याला जी दक्षिणा पाहिजे ती ते देणार का? द्रोण त्यांना सांगतो किं, त्याची दक्षिणा आहे, पांचाल नरेशाचा पराभव करणे. ते

ऐकून ते त्याचे शिष्य ह्यासाठी तयार होतात. अर्जुन बोलतो, "अशा युद्धामुळे आम्हाला आमच्या विद्येचा प्रत्यय येईल". ते सगळे कुरु राजपुत्र ती दक्षिणा देण्यासाठी तयार होतात. ते निश्चित झाल्यावर द्रोण त्यांना सांगतो, "तो द्रुपद प्रिशताचा मुलगा ज्या नगरीत रहातो त्याचे नांव आहे छत्रवती. त्याच्या हातून ते जिंकून घ्या व मला दान करा. हींच आहे माझी दक्षिणा असेल". त्यानंतर ते शूरवीर महारथी कुरु राजपुत्र छत्रवतीवर हल्ला करतात व द्रुपदाला हरवतात. त्याला कैदी करून द्रोणांच्या पुढे उभे करतात, एकाद्या कैद्यासारखा तो राजा द्रोणाच्या पुढे मान खाली घालून उभा असतो. द्रोण त्याला विचारतात, "माझी मैत्री तुला मान्य आहे कां? तू बोलला होतास कीं, जो राजा नाही तो राजाचा मित्र असू शकत नाही आता तू राजा राहीलेला नाहीस, माझ्यासारखा भिकारी झाला आहेस म्हणून, तू माझी मैत्री मान्य करतोस कां? तसे असेल तर मी तुझ्या राज्याचे दोन तुकडे करणार आहे व त्यातील उत्तम भाग मी माझ्याकरता ठेवणार आहे जो गंगेच्या उत्तरेकडे आहे व उरलेला कमी प्रतीचा हिस्सा जो गंगेच्या दक्षिणेकडे आहे तुला देणार आहे, मग मी सुद्धा राजा होतो मग आपण मित्र म्हणून समजू शकतो कां"? एवढे सांगून तो विद्वान ब्राह्मण थोडा थांबतो व नंतर सांगू लागतो, द्रुपद बोलतो, "हा हरलेला पांचालचा राजा तेथे हजर असलेल्या सगळ्यांना सांगतो, भारद्वाजाच्या सुपुत्रा, तुझे भले होवो. आपली मैत्री सर्वकाळ राहील. मला माझी चूक समजली आहे. दोघे अपवित्रांचे शत्रू रहातील". असें बोलला परंतु, तो स्वाभिमानी राजा ह्यामुळे खरेतर फारच दुखावला गेला होता. त्याचा वचपा काढण्याची स्वप्ने तो मनात ठेवून निघून गेला.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे अड्डसष्ठावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकोणसत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

तो ब्राह्मण पुढे सांगत रहातो, राजा द्रुपद निराश मनाने शांती मिळवण्यासाठी एका आश्रमातून दुसर्या आश्रमात असा भटकत असतो. तो अशा उच्च दर्जाच्या ब्राह्मणाच्या शोधात असतो ज्याचे यज्ञयागात प्रभूत्व आहे. झालेल्या पराभवामुळें व त्यापेक्षा जास्त निपुत्रिकतेमुळें तो हताश झालेला असतो. तो विचार करत असतो, मी कितीही संपन्न असलो तरी मी निपुत्रिक आहे ह्याचे मला दुःख होत असते. माझ्या अपमानाचा सूड द्रोणावर उगवण्यासाठी मला एक पुत्र पाहिजे नाहीतर माझ्यानंतर पितर मला माफ करणार नाहीत. द्रुपदाला ती हार जिव्हारी लागली होती. तो त्यामुळें बेचैन रहात असें. तो श्रेष्ठ राजा यज्ञसेन त्याच्या क्षात्रतेजांने द्रोणाचा म्हणजे त्याच्या पांडव शिष्यांचा पराभव करू शकणार नव्हता. यमुना नदीच्या किनार्यावर व गंगानदीच्या किनार्यावर तो असा ब्राह्मण शोधत होता जो त्याला त्याच्या कामात सहाय्यभूत होईल. तेथे एका आश्रमात सर्व ब्राह्मण स्नातक होते, ते सगळे तत्त्वनिष्ठ होते, कठोर तपस्या करणारे होते, ब्रह्मचारी होते तेथे दोन गुणी तपस्वी बंधू होते त्यांची नांवे होती, यज व उपयज, त्याचे त्याच्या इंद्रीयांवर पूर्ण नियंत्रण होते. त्यांचा प्राचीन विद्या, ज्या काश्यपाच्या परंपरेतील होत्या, चांगला अभ्यास होता. विशेष म्हणजे ते यज्ञसेनाच्या उद्देशाला चांगली मदत करण्याच्या योग्यतेचे होते. ते लक्षात आल्यावर तो राजा आपल्या उद्देशाशी एकनिष्ठपणे त्या दोघांना खूष करण्याच्या कामाला लागतो. त्यांच्या सर्व अपेक्षा तो वेळोवेळी पूर्ण करत असतो. अशारितीने द्रौपदाने त्या दोघांना संतुष्ट केले. अशारितीने ते संतुष्ट झाले आहेत हे समजल्यावर तो त्या दोघांना त्याची इच्छा बोलून दाखवतो. तो राजा त्यांना विचारतो, "अहो ब्राह्मण, आपण माझ्यासाठी ते यज्ञ कांड कराल कां ज्यामुळें मला असा मुलगा होईल जो माझा शत्रू द्रोणाचार्य ह्याला ठार मारील. ते काम जर आपण केले तर मी तुम्हाला दहाहजारांचे खिल्लार देईन. त्याशिवाय आणखीन कांही पाहिजे ते सगळे मी तुम्हाला देईन". ते ऐकल्यावर ते ब्राह्मण त्याला सांगतात, असे यज्ञ आम्ही करणार नाही. ते त्यांचे विचार अंतिम नसल्याचे समजून तो राजा त्या ब्राह्मणांची सेवा तशीच चालू ठेवतो. एक वर्षभर अशी तो सेवा त्या ब्राह्मणांची करतो त्यानंतर मात्र त्या भावांतील एक

उपयज, राजाला मधूर स्वरात बोलतो, "अहो राजर्षी, एके दिवशी माझा मोठा भाऊ वनांत भटकत असतांना मातीत पडलेले एक फळ तो पुढचा पाठचा विचार न करतां उचलतो, त्याच्या मागून मी जात होतो. त्याची ती अनुचित कृती मी पाहिली. माझ्या भावाने बेपर्वाईने ते केले होते. असें फळ खाण्यात कांहीं गैर नाही असें तो समजतो. त्यात पाप नाही असें तो सांगतो. जो एका प्रकारचे पाप करण्यात गैर समजत नाही तो इतर प्रकारचे पापसुद्धा करू शकेल. माझा भाऊ जेव्हां गुरुकुलात रहात होता तेव्हा इतरांनी उष्टवलेले खाद्य तो बिनदिक्कतपणे खात असें. त्याला सगळ्या प्रकारचे खाद्यपदार्थ खूप आवडतात, त्याला आवडत नाही असा खाद्यपदार्थ मला दिसत नाही. ह्यावरून मला वाटते त्याला सगळ्या भौतिक गोष्टींचे आकर्षण असते. म्हणून हे राजा, तू त्याला खूष करशिल तर तो तुझी इच्छा पूर्ण करील". द्रौपदाचे यजाबद्दलचे मत तितकेसे चांगले नव्हते पण तरीसुद्धा उपयज सांगतो म्हणून तो त्याच्याकडे जातो. त्याला बोलतो, "अहो ब्राह्मण, तुम्ही माझे हे काम कराल तर मी तुम्हाला ऐंशी हजार गाई देईन. द्रोणाबद्दलचा माझा द्वेष माझे हृदय सतत जाळत आहे. आपल्या मदतीने तो माझा झळफळाट नाहीसा होईल असें वाटते". पुढे तो राजा त्याला सांगतो, "जेव्हां आम्ही गुरुकडे शिकत होतो, तो द्रोण सर्वच अस्त्र शस्त्र सिद्धींत माझ्यापेक्षा नेहमीच सरस असें. माझ्यामते असा कोणी क्षत्रिय ह्या जगात नसेल किं, ते द्रोणाला मारू शकेल. तो सर्वश्रेष्ठ क्षत्रिय आहे आजच्या घडीला. त्याचे धनुष्य चांगले सहा हात लांब असते. ते नुसते पाहिले तरी धडकन बसते. त्याचा भाला त्यांने फेकला किं, त्यापुढे कोणीही टिकू शकत नाही. तो ब्राह्मण सगळ्या क्षत्रियांचा नाश करीत आहे. जणूकाय हा दुसरा परशुराम आला आहे. आता तर त्यांने परशुरामाची सगळी विद्या प्राप्त केली आहे. त्यामुळें आता त्याच्या पुढे कोणीही क्षत्रिय टिकाव धरणे केवळ अशक्य झाले आहे. परशुरामाने फक्त भ्रष्ट क्षत्रियांचा नाश केला व ते एकापरीने यथार्थ होते पण हा द्रोण कुलिन क्षत्रियांचा नाश करू पहात आहे, हे आर्यांसाठी (सुसंस्कृत समाजासाठी) फारच मोठे अरिष्ठ आहे. द्रोणाकडे ब्रह्मास्त्र आहे त्याचा जर तो उपयोग करील तर सर्व कुलिन क्षत्रियांचा नाश निश्चित आहे. परंतु, आपले ब्रह्मतेज द्रोणाच्या ब्रह्मास्त्रापेक्षा जास्त प्रभावी आहे म्हणून आपण मला जर मदत केली तर हे अरिष्ठ टाळता येईल. कारण मी स्वतः ह्या द्रोणरुपी राक्षसाचा पाडाव

करण्यास असमर्थ आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करतो किं, आपल्या क्षमतेचा जर आपण उपयोग केला तर द्रोणाला थांबवणे शक्य होईल. अहो यज, तुझे श्रेष्ठ यज्ञ माझ्यासाठी करा, त्याचा माझा अर्थ असा आहे किं, मला असा पुत्र व्हावा जो द्रोणाला ठार मारील. एवढे करा म्हणजे मी तुला दहा हजार गाई दान करीन".

द्रुपदाचे असें वक्तव्य ऐकल्यावर तो ऋषी ज्या यज्ञकांडाची अपेक्षा यज्ञसेन करीत होता ते करण्यासाठी लागणार्या सामुग्री गोळा करण्यास सुरुवात करतो. त्या यज्ञाचा परिणाम फार गंभीर असेल ह्याची पूर्ण जाणीव ठेवून आपल्या धाकट्या भावाची मदत मागितली. तो त्याला मदत करण्यास तयार होतो. तयारी पूर्ण झाल्या नंतर यज सांगतो राजाला कीं, आता त्या द्रोणाचा नाश करणार्या यज्ञाची व्यवस्था झाली आहे. त्यानंतर उपयज राजाला कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत त्याची माहीती सांगतो. त्या यज्ञातून द्रुपदाला जो पुत्र पाहिजे तो मिळणार असतो. तो असा सामर्थ्यवान असेल किं, तो द्रोणाला युद्धात हरवेल. ते आश्वासक विधान ऐकल्यावर मोठ्या उत्साहाने तो मत्सरी राजा पुढच्या तयारीला लागतो. सगळी तयारी झाल्यावर यज यज्ञाच्या कुंडात शुद्ध तुपाची धार ओतल्यावर राजाच्या पत्नीला आवाहन करतो, "येथे या, अहो राणी सरकार, प्रिशताच्या स्नुषा, आपल्यासाठी एक पुत्र व एक कन्या उपस्थित होत आहेत". ते ऐकल्यावर राजाची राणी त्या उपाध्यायाला सांगते, "अहो ऋषी, माझ्या तोंडात अजून केशराचा विडा आहे, माझ्या सगळ्या अंगाला विविध सुगंधांचा वास येत आहे, त्यामुळें मी हे यज्ञातील तूप (ब्राह्मणाचे वीर्य), जे मला पुत्र व पुत्री देणार आहेत, स्वीकारू शकत नाही. मला थोडा अवधी द्या, अहो ब्राह्मण, यजर्षी, त्या संभोगाच्या प्रसंगासाठी".

ते ऐकल्यावर तो ऋषी बोलतो, "अहो महाराणी, आपण संभोग करा अगर करू नका, ह्या यज्ञात जे अर्ध्य दिले गेले आहे ते कोणासाठी थांबणार नाही, जे उपयजाने आरंभले आहे. ह्या यज्ञाची पूर्तता कां थाबवावी"? एवढे बोलून तो ऋषी यज्ञकुडात शुद्ध तुपाची धार लावतो, त्याबरोबर, त्या अग्नीतून एक अग्नीसारखे तेजस्वी व दिव्य बालक बाहेर येते. त्याकडे पहाणे अवघड होते. त्याच्या अंगावर अभेद्य चिलखत होते, हातात धनुष्य व बाण होते, त्याच्या तोंडातून भयंकर आरोळ्या उमटत होत्या. अग्नीतून बाहेर आल्यावर ताबडतोबच तो एका रथात बसला व फिरण्यास निघाला. ते पाहून राजा द्रौपद आनंदाने

ओरडला, "अतिउत्तम, अतिउत्तम". पांचाल नरेशाचा आनंद गगनात मावेना. त्यानंतर आकाशवाणी झाली, "हा राजपुत्र द्रोणाला ठार मारण्यासाठी उत्पन्न झाला आहे. हा राजपुत्र पांचाल नरेशाच्या सगळ्या विवंचना दूर करील. त्याच्या पित्याची ख्याति जगभर पसरवेल. राजाच्या दुःखाचे कारण संपवेल. असें होत असतांना यज्ञकुंडाच्या मध्य भागातून एक सावळ्यावर्णाची कन्या बाहेर येऊ लागते. तिचे नांव ठरते, पांचाली, ती अतिशय सुंदर असते, तिचे डोळे निळ्या कमळासारखे व केस कुरळे असतात, तिची अंगकांती सावळी असते. ती मोठे भाग्य घेऊन उत्पन्न झालेली असते. नखांचा रंग आरक्त होता. तिचे उरोज भरपूर व नितंब गोल व भरलेले होते. तिच्या स्वरुपावरून कोणीही सांगेल कीं, ती एक स्वर्गीय कन्या आहे. तिच्या अंगाला निळ्या कमळांचा मोहक सुगंध होता, जो दोन योजने दूरवर जाणवत होता. तिच्या सारखी रुपगर्विता सगळ्या पृथ्वीवर सापडणार नाही असें तिचे सौंदर्य होते. कोणी यक्ष अथवा दानव तिला मांगणी घालण्यास येईल अशी ती दिसत होती. तिच्या आगमनानंतर पुनः एक आकाशवाणी होते, "हि कृष्णवर्णी मुलगी सर्व स्त्रीयांत अव्वल असेल व ती अनेक क्षत्रियांच्या मरण्यास कारणीभूत होईल. ही सुंदरी देवांचे काम करील व कौरवांना अडचणीत टाकील. ती आकाशवाणी ऐकल्यावर मोठ्या समाधानाची द्रुपद राजा आनंदाने गर्जना करतो. त्याचा तो आनंद गगनात मावेनासा होता. एवढे झाल्यावर प्रिशताची स्नुषा आपल्या यज्ञसिद्धा कन्येला पहिले वस्त्र नेसवते व यजाला विनंती करते किं, "मी त्यांची माता आहे ते त्या दोघांना समजूं द्यावे". त्यावर तो ऋषी बोलतो, "तथास्तु". त्यानंतर त्या दोघांचे नामकरण विधी संपन्न होतो व ते काम इतर ऋद्विज उरकतात. त्यानुसार मुलाचे नांव ठरते, धृष्टद्युम्न कारण तो द्युम्नासारखा धाडसी होता व चिलखत व शस्त्रे घेऊन उत्पन्न झाला होता. त्याचप्रमाणे मुलगी सावळी होती म्हणून तिचे नांव कृष्णा ठेवले गेले. तो ब्राह्मण पुढे पांडवांना सांगत रहातो, अशारितीने ती जुळी द्रुपदाच्या यज्ञकुडातून उत्पन्न झाली. यथावकाश द्रोण भविष्याचे भान ठेवून द्रुपदाच्या मुलाला बोलावून परशुरामानी दिलेली व त्याची अशी सर्व शस्त्र सिद्धी शिकवतो व त्यांचे पांडवांनी जिंकून घेतलेले राज्य परत करतो, कारण त्याला त्या यज्ञाचे महत्व समजले होते.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे एकोण सत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्या ब्राह्मणांकडून जी आत्ताची लोकवार्ता पांडवांना व त्यांची माता कुंती ह्यांना समजते. ते समजल्यावर एकादा तीक्ष्ण बाण अंगात घुसावा अशी त्यांची स्थिती होते. त्यांची मनाची शांती नष्ट होते. ते त्याच्या घरी परततात. कुंती आपल्या सगळ्या लेकरांची मनस्थिती पाहून युधिष्ठीराला बोलते, "मला वाटते आपण जरा जास्तच अज्ञातवासात रहात आहोत. तेथे जगात काय होत आहे त्याची आपल्याला कांहींच कल्पना येत नाही. आपण बाहेरच्या जगाचा चांगला अनुभव घेतला आहे. आपण ह्या ब्राह्मणाच्या घरात खूप दिवस राहिलो आहोत. आपला काळ साधारणपणे चांगला मजेत गेला. सज्जन व प्रतिष्ठीत लोकांनी आपल्याला भिक्षा देऊन जगवले. आपण ह्या भागातील अनेक अरण्ये, सरोवरे व गांवे पाहिली. म्हणून मला असें वाटते किं, आता आपण पांचाल देशात गेले पाहिजे. आपण तो देश पाहिलेला नाही. तो देश मला वाटते आपणा सर्वांना नवीन संधी देईल. त्या देशाचा राजा यज्ञसेन ब्राह्मणांसाठी विशेष अनुकूल आहे असें दिसते. मला सांगावेसे वाटते किं, आपण जास्त काळ एकचक्र गांवात राहू नये व म्हणून आता येथून निघावे. आपण ह्या गांवाची सर्व ऋणं सुद्धा फेडली आहेत. मला सांग, माझ्या मुला, तुला काय वाटते". तिचे ते बोलणे ऐकून युधिष्ठीर तिला सांगतो, "आमचे काम तुझ्या आज्ञेचे पालन करणे, त्याप्रमाणे मी तुझ्या इच्छेचे स्वागत करतो. तरी, बाकीचे भाऊ काय विचार करतात ते सुद्धा पाहिले पाहिजे". अर्जुन विचार करत रहातो, द्रोणांनी दृष्टद्युम्नाला माझ्यापेक्षा जास्त शिकवले व परशुरामांचे ज्ञानसुद्धा दिले हे धोकादायक आहे कारण, आता दृष्टद्युम्न माझ्यापेक्षा जास्त हुशार झाला आहे. अशा विचारामुळे अर्जूनाच्या मनांत द्रोणांबद्दल द्वेषाग्नी भडकतो. हे सगळे घडले कारण, आपण तेथे उपस्थित नव्हतो. त्यात द्रोणाचार्यांचा काय दोष? असें विचारसुद्धा येतात.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे सत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकाहत्तरवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराशी बोलल्यानंतर ती प्रेमळ आई भिमसेनाला व नंतर अर्जूनाला व माद्रीचे जुळे अशा सगळ्याना तिचे मत सांगते व त्यांना त्याबद्दल विचारते कीं, त्यांचे काय मत आहे. पांचाल देशांत अशा अज्ञात रुपात जाण्याच्या विचारांना ते पसंत करतात. त्या सर्वांची संम्मति मिळते. त्यानंतर ती माता ज्या घरात ते रहात होते त्या घराच्या यजमानाला अभिवादन करते व आभार मानते. अशा रितीने ते पांचाल देशाकडे निघण्याच्या तयारीला लागतात. तरी नकुल व सहदेव तिला आठवण करून देतात किं, आपण कृष्ण द्वैपायन ह्यांच्या येण्याची प्रतिक्षा केली पाहिजे कारण, व्यास त्यांना बोलले होते कीं, ते आल्यावरच आपण हे गांव सोडावे. त्याचा विसर पडला होता कीं काय, कुंतीला ते स्मरते व ती त्या जुळ्या भावंडांचं आभार मानते . पांडव व्यासांच्या येण्याची वाट पहात बसतात. त्याप्रमाणे एक दिवस व्यासमुनी त्यांना भेटण्यास येतात. त्यांना येतांना पहाताच ते सगळे कुरु राजपुत्र व त्यांची राजमाता उभे राहून त्यांचे स्वागत करतात. त्यांची पादपुजा केल्यानंतर त्यांचे क्षेमकुशल विचारतात. त्या स्वागतामुळें संतुष्ट झालेले कृष्ण द्वैपायन त्यांना बसण्यास सांगतात. नंतर तो ऋषी त्यांना उद्देशून बोलतो, "अहो शूर योद्ध्यांनो, तुम्ही आतापर्यंत सात्त्विक मार्गाने आपले जीवन जगत अहात, वेदांत दिलेल्या पद्धतींचा दैनंदीन जीवनात उपयोग करत अहात, तुम्ही ब्राह्मणांचा आदर करता अहात कां"? त्यानंतर व्यास बोलतात, "तुम्ही ब्राह्मणांचे पाहिजे तसे आवाहन करीत नाही. कांहीं ब्राह्मणांचे जसे पुजन व्हावयास पाहिजे तसे झालेले नाही". असें बोलून नंतर तो ऋषी आणखीन बर्याच महत्वाच्या गोष्टींची चर्चा करतो. त्यानंतर तो ऋषी एका वेगळ्याच गोष्टीचा उल्लेख करतो, तो सांगतो, एका महान ऋषीची कन्या जी विलक्षण देखणी आहे, व इतर बाबीतसुद्धा गुणवान आहे तिच्या मागील जन्माच्या कृत्यांमुळें ह्या जन्मात मोठ्या अडचणीत पडली आहे. ती अप्रतिम सुंदर असूनही तिला योग्य वर मिळत नाही व म्हणून ती संन्यासमार्गाने जीवन व्यतित करण्याचे ठरवते. त्यामागील उद्देश त्या तपस्येने तिला योग्य वर मिळेल अशी अपेक्षा होती. त्या तिच्या घोर तपस्येमुळें महादेव शंकर साक्षात तिला प्रसन्न होतात व विचारतात, "बोल भाग्यवान, तुला कोणता

आशिर्वाद पाहिजे"? ते पाहून ती मुलगी आनंदाने शंकराला सांगते, "मला असा नवरा पाहिजे जो सर्व गुणसंपन्न असेल". ते तिचे बोलणे ऐकल्यावर तो इशान (महादेव) तिला सांगतो, "तुझ भलं हो, तुझ्या कर्मानुसार तुला पुढील जन्मी भरत वंशातील पांच राजपुत्रांशी लग्न करावयाचे आहे". ते ऐकून चमकलेली ती ऋषाकन्या विचारते, "अहो ब्रह्म, मला तुमच्या कृपेने फक्त एकच नवरा पाहिजे व तोसुद्धा ह्याच जन्मात". ते ऐकल्यावर हसून तो एशान तिला आठवण करून देतो किं, तिने पांच वेळा त्याच्याकडे मागणी केली होती किं, तिला चांगला नवरा पाहिजे! त्यामुळें तुला पुढच्या जन्मात पांच नवरे एकत्र मिळणार आहेत, त्याला मी बदलू शकत नाही. आता ती ऋषी कन्या ह्या जन्मात यज्ञकुंडातून द्रुपदाच्या पदरी आली आहे . तिच्यामुळें भ्रष्ट क्षत्रियांचा नाश होणार आहे. आज ती कृष्णा ह्या नांवाने प्रिशताच्या कुळांत आली आहे व ती तुम्हा सगळ्यांची पत्नी होणार आहे. त्या कारणांने तुम्ही सगळे ताबडतोब पांचाल देशाला निघून जा व तेथे अज्ञातवासात रहा. कृष्णाशी तुमचा विवाह झाल्याने तुम्ही सगळे आनंदी व्हाल. पांडवांना एवढे सांगून तो महर्षी त्याना शुभेच्छा देऊन आपल्या ठिकाणी निघून जातो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे एकाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे बाहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, व्यास एवढे बोलून गेल्यावर ते महारथी सामर्थ्यवान पंडुचे पुत्र त्या (गोष्ट सांगणार्या) ब्राह्मणाला वंदन करून पुढच्या प्रवासास पांचालच्या दिशेने निघतात. ते पांच निष्पाप पांडव आनंदाने त्या देशांकडे निघतात व त्यांची आई त्यांच्या बरोबर चालत असते. उत्तरेच्या दिशेने ते रात्रंदिवस चालत प्रवास करीत एका शीव मंदीराकडे पोहोचतात. त्यानंतर ते पुढे गंगेच्या तटी येतात. तेथे धनंजय सर्वांच्या पुढे त्यांना वाट दाखवण्याचे व श्वापदांपासून संरक्षण देण्यासाठी चालत असतो. त्याच वेळी तो अभिमानी व गर्विष्ठ गंधर्व राजा त्याच्या जनान्याबरोबर त्या गंगेच्या पाण्यात त्या निर्जन स्थळी विहार करीत असतो. त्या गंधर्व राजाला पांडवांच्या येण्याची चाहूल लागते. तो दुराभिमानी गंधर्व त्या व्यत्ययामुळें भडकून जातो. त्या पांडवांना त्यांच्या वयस्कर माते बरोबर तो येतांना पहातो. तो स्वताशी बोलतो, हे सर्वांना माहीत आहे कीं, सूर्य मावळल्यानंतरच्या संधीप्रकाशात यक्ष, गंधर्व व राक्षस त्यांना पाहिजे तेथे भटकू शकतात. इतर काळ माणसांचा असतो. म्हणून जर माणसे आमच्या प्रहरी भटकू लागली तर त्या मूर्ख माणसांना मारण्याचा हक्क आम्हाला आहे. तो ओरडून त्या पांडवांना सांगतो, "येथून दूर रहा मी गंगेत माझ्या बायकांसमावेत स्नान करीत आहे. वेदांचे ज्ञान असलेले हा नियम पाळतात". त्यानंतर तो बोलतो, "माझे नांव अंगारपर्ण असून माझ्या वाटेला जे जातात त्यांना मी चांगलाच धडा शिकवतो, मी फक्त इंद्राला (कुबेराला) घाबरतो. जेथे मी मजा करायला जातो त्या प्रदेशालासुद्धा माझ्या नांवावरून अंगारपर्ण असेंच म्हणतात. अशा ठिकाणी कोणीही कपालिक, गंधर्व किंवा यक्ष फिरकत नाही. असें असतांना तुम्ही क्षुल्लक माणसे येथे येण्याचे धाडस कसें करता. मी कुबेराचा खास आहे हे तुम्हाला माहीत नसेल तर येथून निघून जा". गंधर्वाचे ते उद्धट बोलणे ऐकून त्याला उद्देशून अर्जुन सांगतो, "अरे मठ्ठ बुद्धी तो दिवस आहे कां रात्र किंवा संधीप्रकाश कोणालाही समुद्रावरून, हिमालयात व नदीकिनारी प्रवास करण्यापासून बंदी घालू शकत नाही. तुम्ही उपाशी असा अथवा भरल्या पोटी असा कोणालाही रात्रंदिवस प्रवास करण्यापासून अटकाव घालू शकत नाही. हे तुझ्या सारख्या आकाशगमनी गंधर्वास माहीत नाही ह्याचे मला नवल वाटते.

बाकी राहीला आमच्या येण्याचा मुद्दा, आम्ही बलवान आहेत व मी तुला भिक घालत नाही. जे पापी असतात व जे कमजोर असतात तेच फक्त तुझ्या सारख्यांना भिक घालतात. तुला माहीत आहे कां, हि गंगा तिच्या सात उपनद्यांसह (गंगा, यमुना, सरस्वती, वितस्ता, शरयू, गोमती आणि गंडकी) पवित्र मानली जाते व त्यांचे पाणी पिण्याने सर्व पापक्षालन होते म्हणून ह्या नद्यांवर कोणीही केव्हाही येऊ शकतो. पुन्हा आणखीन एक गोष्ट लक्षात घे, कीं, ही नदी अलकनंदा प्रदेशातून जाते तो पितरांचा देश आहे, त्याला वैतरणी म्हणतात व तेथे पापी लोक जाऊ शकत नाहीत, असें प्रत्यक्ष कृष्ण द्वैपायन सांगतात. अशा नदीचे पाणी स्वर्गाकडे त्यात स्नान करणार्यांना नेते असें असतांना तू कां आम्हाला अडवण्याचा प्रयास करत आहेस? हे तुझे वागणे पवित्र नियमाला धरून नाही. गंगेला स्पर्श करण्याचा हक्क सर्वांना आहे, तू कोण आम्हाला अडवणार"?

वैशंपायन सांगत रहातात, हे अर्जूनाचे बोलणे ऐकून तो रागीट गंधर्व अंगारपर्ण चिडून पांडवांच्या दिशेने त्याच्या विषारी बाणांनी तिरंदाजीला सुरुवात करतो. हातात असलेल्या मशालीने व कांठीने ते सगळे बाण अर्जुन निष्प्रभ करतो. अर्जुन त्याला बोलतो, "अरे मूर्खा, ज्यांना शस्त्रविद्या चांगली येते अशाना तू घाबरवण्याचा प्रयत्न न करशील तर ते, चांगले ठरेल तुझ्या भल्यासाठी. हे पहा तू फेकलेली सगळी फुकट गेली. तू जर स्वतःला मोठा धाडसी व वीर समजत असशील तर माझ्या स्वर्गीय ताकद असलेल्या अग्नीअस्त्रांनी, जी वृहस्पतीने इंद्राला दिली, जी भारद्वाजांनी अग्नीवेषाला दिली व त्यांने द्रोणाला दिली व ती त्यांनी मला दिली, त्यानी लढण्यास तयारी आहेस कां"?

वैशंपायन पुढे सांगतात, सात्त्विक संतापाने प्रेरीत होऊन तो पांडव गंधर्वावर एक अस्त्र फेकतो व त्यामुळें त्या गंधर्वाचा रथ तिनदा जळून खाक होतो. त्या आयुधाच्या झटक्याने तो गर्वीष्ठ गंधर्व शुद्धीवर येतो. तो त्याच्या रथातून खाली उलटा कोसळतो. धनंजय त्याला त्याच्या केसांने पकडतो, त्याच्या गळ्यातील हार व इतर दागिने खाली पडतात. तो शुद्ध हरपलेल्या गंधर्वाला इतर भावांच्या कडे नेतो. ते तिच्या जिवलग्याचे होणारे हाल पाहून त्या गंधर्वाची बायको, कुंभिनसी युधिष्ठीराकडे धावत जाते. त्याच्याकडे करुणेची भिक मांगते. गंधर्व बोलतो, अहो महान, मला तुमच्या भावापासून संरक्षण द्या. माझ्या नवर्याला

तुझ्या भावाच्या तावडीतून सोडवा. मी कुंभिनसी त्या गंधर्वाची धर्मपत्नी, आम्हाला तुमच्या भावांकडून वाचवा. त्या गंधर्वाची हालाकीची स्थिती पाहून युधिष्ठीर धनंजयाला सांगतो, जो शत्रू हरला आहे त्याला आणखीन मारणे अप्रस्तूत आहे. ज्याच्या संरक्षणासाठी त्याची पत्नी पाया पडते ते कृत्य न हिम्मतीचे न धाडसाचे. ते ऐकून अर्जुन त्या गंधर्वाला सोडतो व बोलतो, जा, तुला सोडले. हा आमचा कुरुवंशाचा राजा आज्ञा करतो म्हणून तुला सोडले आहे.

गंधर्व सांगतो, "मी मानतो, तू मला हरवले आहेस, म्हणून मी ह्यापुढे माझे नांव बदलणार आहे कारण मी ह्यापुढे अंगारपर्ण (आग सोडणारे वाहन) राहीलो नाही. जेव्हां मला कोणी हरवले आहे तेव्हां आता ते नांव वापरण्यात कांहीं अर्थ रहात नाही. माझे भाग्य मात्र अशात आहे किं, आपण भेटत आहोत. तुझी आयुध कशी काम करतात ते पहायला मिळाले. जर तुला पाहिजे असेल तर मी तुला कांहीं आमच्या अजब विद्या शिकवू इच्छितो. त्यामुळे तू मायावी भ्रम देखावे तयार करू शकशिल. हि विद्या फक्त आम्हा गंधर्वानांच माहीत असते. माझा रंगीबेरंगी रथ तू जाळला आहेस, माझी प्रसिद्धी माझ्या रंगीबेरंगी रथासाठी होती, ज्याचे नांव चित्ररथ होते, म्हणून माझे नांव चैत्ररथ होते. त्या जागी आता मला भस्म झालेल्या रथाचा गंधर्व म्हणून ओळखतील किं, काय अशी भिती वाटते. वैराग्यपूर्ण तपस्या करून ती विद्या (भ्रामक देखावे तयार करण्याची) मी संपादन केली. परंतु, तू मला जीवदान दिलेस म्हणून, प्रतिस्पर्ध्याला हरवल्यानंतर तू जीवनदान केले म्हणून तुला मी ही विद्या शिकवण्यास तयार आहे. हि विद्या मनुने सोमाला व सोमाने विश्ववसूला व त्यांने मला शिकवली. त्या विद्येचे नांव आहे, चक्षूही. आता मात्र, शक्तिहीन झाल्यामुळें मी ती विद्या वापरू शकणार नाही. मी आतापर्यंत चक्षूही कशी पसरली ते पाहिले. आता त्याची उपयुक्तता काय ते पाहू. जे पहावयाचे ते जसे पहावयाचे आहे तसे पहाता येते. ही विद्या प्राप्त करण्यासाठी एका पायावर सहा महिने उभे राहून ध्यान करावयाचे असते, पण मी तुला ती त्याशिवाय शिकवणार आहे".

पुढे तो गंधर्व सांगतो, "अहो राजे, ह्या विद्येमुळें आम्ही माणसापेक्षा जास्त उच्च ठरतो. ह्या विद्येमुळें आपण चर्मचक्षूं शिवाय सगळे पाहू शकतो, जसें आत्मिक चक्षूने पहावे. म्हणून आम्ही देवांच्या बरोबरीचे ठरतो. त्या शिवाय मी तुम्हा सगळ्या भावांसाठी शंभर असें घोडे

देऊ इच्छितो, ते घोडे वेगवान असून ते लांब पल्याची धाव न थकता करू शकतात. त्याचा पालन पोषणाचा खर्च कमी असतो, ते घोडे वजनाने कमी असतात. ते गंधर्वांच्या प्रदेशात होतात. फार प्राचीन काळी इंद्राचे वज्रास्त्र वृत्रास मारण्यासाठी तयार केले गेले, परंतु, जेव्हा ते वृत्रावर फेकले गेले त्याचे हजार तुकडे झाले. स्वर्गातील देव त्या वज्रास्त्राच्या तुकड्यांची मनापासून पुजा करतात. तिनही जगात जी देवांभोवती प्रभावळ दिसते ती त्याच मुळें. ब्राह्मणांचे अर्ध्य देणे, क्षत्रियांचे तत्त्वासाठी लढणे, वैश्याचे दान करणे व शुद्राची सेवा ह्यासुद्धा त्याचाच भाग असतात. असें म्हणतात, क्षत्रियांच्या रथाच्या घोड्यांना अभय असते, ते रथाचा भाग असतात. त्यांना वडव म्हणतात. त्यातील जे गंधर्वांच्या भागात जन्मतात ते कोठेही जाऊ शकतात व त्यांना हवा तो रंग घेता येतो. ते त्यांच्या धन्याच्या मर्जीनुसार वेग घेऊन धावू शकतात. मी जे घोडे तुम्हाला देणार आहे ते तुमच्या मनाप्रमाणे वागतील". गंधर्वाचे ते वक्तव्य ऐकल्यावर अर्जुन त्याला बोलतो, "अरे गंधर्वा, मी तुला जीवनदान केले म्हणून जर तू हे सगळे मला देत असशील तर ते मला नको".

ते ऐकून गंधर्व त्याला बोलतो, "एकाद्या तेजस्वी इसमाची भेट होणे हेंच भाग्याचे असते. त्याशिवाय तू मला वाचवले आहेस, म्हणून मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहे. त्यासाठी मी माझी विद्या तुला देत आहे असें समजून ते स्वीकारावेस. म्हणजे, मी तुझ्या उपकारातून मुक्त राहीन. जर तुला हा व्यवहार मान्य असेल तर ह्या गोष्टींच्या बदल्यात तू मला तुझे अग्नी अस्त्र द्यावे म्हणजे व्यवहार पूर्ण होईल".

अर्जुन बोलतो, "हे मला मंजूर आहे. मी तुझे घोडे घेईन त्या बदल्यात माझे अग्नी अस्त्र देईन. आता आपण मित्र झालो आहोत असें मी समजतो व विचारतो, माणसांने गंधर्वांच्या कोणत्या गोष्टीस घाबरावे"?

अर्जुन पुन्हा विचारतो, "आम्ही वेदशास्त्रसंपन्न आहोत तेव्हां मला सांग, आम्हाला तुम्ही रात्री प्रवास करण्यापासून कां आक्षेप घेता"? गंधर्व त्याला सांगतो, "त्याचे कारण, तू शिक्षण पूर्ण केलेस तरी अजून अविवाहीत आहेस, तुला कोणताही आश्रम (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम अथवा संन्यासाश्रम) मिळालेला नाही. तसेंच तुमच्या पुढून ब्राह्मण तुम्हाला वाट दाखवत नाही. त्यासाठी मी तुम्हा पंडुपुत्रांना अडवले. यक्ष, राक्षस,

गंधर्व व पिशाच्च, उरूग (नाग)  व दानव असें आम्ही त्या गोष्टींचे ज्ञानी असतो, तुझ्या कुरु घराण्याचे ज्ञान असल्यानें, ज्याप्रमाणें जे नारदांने सांगितले आहे, तुझ्या पूर्वजांनी अनेक सत्कृत्ये केलेली असल्याने व मी स्वतः पृथ्वीची भटकंती करतांना तुझ्या घराण्याच्या लोकांचे कार्य पाहीले आहे तरी, तसेंच मी तुझ्या गुरुला, भारद्वाजाच्या मुलाला ओळखतो तरी, पृथाच्या पुत्रा, मला माहीत आहे किं तुम्ही यम, वायू, शक्र व अश्विन जुळे ह्यांचे अंश अहात तरी, तसेंच मला माहीत आहे कीं, तुम्ही सज्जन, गुणी, व्रतस्थ, धाडसी असून सगळी शस्त्र शास्त्र जाणता, तरी मी तुम्हाला अडवले. अरे कुरु राजपुत्रा, सामर्थ्य असलेल्याने अन्याय करणे वा करवणे हे निषेदार्ह असते, आपल्या पत्नीच्या समक्ष कोणतीही गैर गोष्ट करता कामा नये, आमची (गंधर्वांची) शक्ती रात्री जास्त असते, त्यामुळें जेव्हां मी माझ्या पत्नीसह खेळत होतो तेव्हांच तू तेथे आलास त्यामुळें माझा संताप झाला व जे घडू नये ते घडले. माझा तुझ्याकडून एका ब्रह्मचर्याकडून पराजय झाला. जर कोणी लग्नबंधात अडकलेला क्षत्रिय असतां तर मी असा हरलो नसतो. तरी जो लग्नबंधात अडकलेला परंतु, ब्राह्मणांच्या संरक्षणात आहे असा क्षत्रियसुद्धा माझ्याकडून पराजित झाला नसता. इतके ब्राह्मणांचे महत्व असते माणसांसाठी. म्हणून नेहमी क्षत्रियांने पुरोहिताच्या सांगण्यानुसार सगळे व्यवहार केले पाहिजेत. तापतीच्या मुला, त्यासाठी कधीही क्षत्रियांनी विद्वान ब्राह्मणांच्या आधारानेच आपला राज्यव्यवहारसुद्धा केला तर तो सदैव यशस्वी राहील. जो ब्राह्मण वेद शास्त्र संपन्न आहे, वैरागी आहे, तपस्वी आहे, व्रतस्थ आहे, ज्याच्या सर्व वासना सुनियंत्रित आहेत व जो सात्त्विक आहे असा शहाणा ब्राह्मण पुरोहित राजाने पदरी बाळगला पाहिजे. तसें असेंल तर तो राजा दिग्विजयी होईल आणि जो राजा असे पुरोहित सांभाळत नाही तो कधीही उत्कर्ष पावत नाही. अहो कुरु वंशाच्या राजपुत्रा एक लक्षात असू दे कीं, जो असें करतो त्याचे राज्य चिरंजीव होते".

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे बाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे त्र्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

ते ऐकून अर्जुन त्याला बोलतो, "तू मला दोनदा तापती म्हणून बोललास त्याचा अर्थ काय? आम्ही कुंत्तीची मुलं म्हणून कौंतेय मी समजू शकतो पण हे तापती काय"? वैशंपायन पुढे सांगतात, अर्जूनाचा तो प्रश्न ऐकल्यावर तो जाणकार गंधर्व त्याला एक कथा सांगतो, जी तिनही जगांत मशहूर आहे.

गंधर्व सांगतो, अरे पार्था, सर्व हुशार लोकांतील एक, अशा तुला मी आता ती रमणीय कथा सांगतो. ती नीट ऐक, म्हणजे मी तुला तापती असें कां संबोधले ते समजेल. सूर्याला, जो सगळ्या जगाला तप्त करतो, एक कन्या असते. विवस्वाताची (एक सूर्य) ती मुलगी असते. ती सावित्रीची लहान बहिण असते. तापती तिनही जगात प्रसिद्ध असते तिच्या वैराग्यपूर्ण तपस्येसाठी. स्वर्गातील सर्व प्रजातीत, म्हणजे, देव, राक्षस, गंधर्व, यक्ष, अप्सरा आणि असुर (ह्यात दैत्य व दानव येतात) ह्यात ती सगळ्यात जास्त सुंदर असते. तिचा आकृतीबंध प्रमाणबद्ध होता. नेत्र काळे व मोठे, अगावरील वस्त्र देखणे, ती शुद्ध चारित्र्याची व सुस्वभावी होती. जशी तापती वयात आली तशी सूर्याची (सवितृ) तिच्या भवितव्याची चिंता वाढत गेली व तो सदोदित त्या चिंतेत असें किं ह्या माझ्या गुणी कन्येला योग्य उपवर कोठून आणावा? अरें कुंत्तीपुत्रा , त्याच सुमारास रिक्षाचा मुलगा, कुरुवंशाचा नरकेसरी, नांव सौंवर्ण, सूर्याची पुजा करीत असें, जो सूर्याला नियमितपणे अर्ध्य देत असें, फळं व फुलांनी त्याची आरास मढवत असें आणि नवस आणि वैराग्यपूर्ण तपस्या करून नित्य सूर्याचे ध्यान करीत असें. अशारितीने तो सूर्याची साधना पूर्ण श्रद्धेने पावित्र्याने व भक्तीने करीत असें. तो सौंवर्ण वेदाचे पवित्र नियम चांगले जाणणारा व सगळ्या पृथ्वीत श्रेष्ठ असा राजा सूर्याला तापतीसाठी योग्य वर असें वाटू लागते. विवस्वात तापती सौंवर्णास देण्याचे ठरवतो. जसें आकाश सूर्याच्या प्रभेने फुलून निघते तसें सौवर्णाच्या किर्तीने सगळी पृथ्वी प्रभावित होत होती. तापतीच्या साठी चंद्र चांगला वाटत होता परंतु, सौंवर्णाच्या पुढे तो फिक्का पडला होता. एकदा, अरे पार्था, राजा सौंवर्ण शिकारीसाठी अरण्यात फिरत असतांना त्याला योग्य शिकार न मिळाल्यामुळें तो त्या जंगलात त्याच्या घोड्यावरून भटकत होता असें होत असतांना त्याचा घोडा तहान व भूक ह्यांने थकून मरून जातो.

आता तो राजा घोड्याशिवाय एकटाच भटकत फिरत असतो. तसें भटकत असतांना तो एका टेकाड्याच्या माथ्यावर एक रुपगर्विता कन्या पहातो. त्या सुंदरीचे देखणे रुप पाहता तो मतिभ्रष्ट झाल्यासारखा तिच्याकडेच एक टक पहात रहातो. आकर्षक कटीबांधा व काळेभोर डोळे, लांब सडक केश व तिची उभी रहाण्याची ढब सगळे त्याला खेचून घेते व तो तिच्या विचारात गढून जातो. ती तेथे एकटी काय करते असा तो विचार करतो. सूर्याच्या प्रकाशात ती सोन्याची पुतळी असावी असें वाटत होते. जणू साक्षात लक्ष्मी उभी आहे असें त्याला वाटले. तिला पाहिल्यावर त्या राजाच्या मनातून इतर सगळ्या स्त्रिया ज्या त्याने आधी पाहिलेल्या होत्या तो विसरून गेला. तिच्या दर्शनाने डोळ्याचे पारणे फिटले असें त्याला वाटले. तिच्या कडेच पहात रहावे असें तो समजत राहीला. तो राजा त्याचे देहभान विसरला. सर्व स्वर्गातील प्रजातीमधून, हि एकच लावण्यवती, सगळे सौंदर्य घुसळून काढून उत्पन्न केली असावी असें त्याला वाटत होते. राजाला वाटले किं, ह्या सुंदरीची ओळख करून घेतली पाहिजे. त्याच सुमारास कामदेवांने त्यांचे काम सुरु केले व तो राजा काम वेदनांनी अस्वस्थ झाला.

सौंवर्ण राजा शुद्ध रक्ताचा, तिच्या जवळ सरकू लागला. ती निष्पाप कन्या कशाचेही भान नसल्यागत तेथे तशींच स्मितहास्यवदना उभी होती. राजा तिची विचारपूस करणार होता. तो तिला विचारतो, "सुंदरी, तू कोण व येथे एकटी काय करतेस? अशी एकटीच ह्या निर्जन वनात कां भटकत आहेस? असें सगळे दागदागिने घालून तू येथे जंगलात काय करत आहेस? तू स्वर्गीय प्रजातीतील, म्हणजे राक्षस, यक्ष, अप्सरा, नाग, गंधर्व अशा कोणत्या कुळातील आहेस? माझ्या पहाण्यात तुझ्या एवढी देखणी बाई आजपर्यंत झालेली नाही. तुला पाहून माझ्या भावना उद्दिपीत झाल्या आहेत. तुझ्या एवढी सुंदर स्त्री मी आजवर पाहीलेली नाही. ते काळेभोर डोळे, लांब केश, कमनियता सर्वच अवर्णनीय असें तुझे रुप आहे". अशारितीने बोलत तो सौंवर्ण तिच्या नजिक जातो पण ती कन्या त्याला कांहींच बोलत नाही. जसें काय ती तिच्या ध्यानात मग्न होती. सौंवर्ण तिला स्पर्श करणार तितक्यात ती अदृष्य झाली. तिच्याच विचाराने त्रस्त झालेला तो राजा तिच्या अदृष्य होण्याने स्तब्ध उभा राहिला व नंतर तसांच त्या वनात भटकत राहीला होता.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे त्र्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे चौर्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, गंधर्व पुढे सांगतो, ती सुंदर ललना दिसेनाशी झाल्यावर तो शत्रुघ्न राजा कामविव्हल अशा अवस्थेत शुद्ध हरपल्यागत जमिनीवर निपचित पडतो. त्या लावण्यवतीच्या ध्यानात तो तसा किती वेळ पडला होता कोण जाणे. कांहीं समयानंतर ती स्वर्गीय सुंदरी तेथे प्रकट होते व आपल्या सुहास्यवदनाने त्या कुरुवंशाच्या पूर्वजाला चुचकारते. ती बोलते, "अहो नरकेसरी, अशारितीने शुद्ध हरवणे तुम्हाला शोभत नाही". पुढे ती मधूर स्वरात बोलते, "तुम्ही पृथ्वीतलावर ख्यातनाम अहात. उठा आता". ते तिचे भाषण ऐकल्यानंतर तो कामविव्हल राजा शुद्धीवर येतो. डोळे उघडून पहातो ते ती त्याच्याकडे प्रेमळ दृष्टीने पहात आहे असें पहातो. तिचे गोल भरलेले नितंब त्याला त्या खाली पडलेल्या अवस्थेत विशेष जाणवतात. तो राजा सौंवर्ण, अस्पष्ट आवाजात तिला बोलतो, "तू धन्य आहेस, अशी कृष्ण डोळे असलेली व भरलेल्या देहाची माझ्या समोर उभी आहेस, मला तुझी इच्छा झाली आहे. कृपया माझी विनंती स्वीकार व मला धन्य कर". माझे त्राण संपुष्टात येण्याची वेळ आली आहे असें मला वाटते केवळ तुझ्यासाठी. तुझ्यामुळें तो कामदेव माझ्या मागेंच लागला आहे असें वाटते. एकाद्या विषारी नागासारखा तो मला दंश करीत आहे. भरपूर उरोज व नितंब असलेल्या हास्यवदना माझ्यावर कृपा कर. अहो चंद्रवदना, कमलनयना, गोड आवाज असलेल्या रमणी तुझ्याशिवाय माझ्या जीवनात कांहीं तथ्य उरलेले नाही. तुझे किन्नरासारखे बोलणे मला पुनः पुन्हा ऐकावेसे वाटते. तुझ्या शिवाय मी जगू शकणार नाही. हा बघ काम मला पुनः पुन्हा चावत आहे. मी आता काय करू? आपण गंधर्व विवाह करू".

पुढे गंधर्व सांगतो, ते सौंवर्णाचे ऐकून ती सूर्यकन्या तापती त्याला बोलते, "अहो राजर्षी, मी माझी मुखत्यार नाही. माझे तात आहेत ते हे सगळे ठरवतील व त्याप्रमाणेंच काय ते होईल. कन्या नेहमीच पित्याच्या आज्ञेत रहाते हे तुम्हाला माहीत आहे. जर तुम्हाला माझी एवढी इच्छा झाली असेल तर माझ्या पित्याकडे माझ्यासाठी मागणी घालावी. मी सुद्धा तुझ्यावर आसक्त झाली होती पण मी मनाला आवरले ते, तुला पुरुष असल्यामुळें असेल कदाचित जमले नाही. माझीसुद्धा तुझ्याशी रमण्याची वासना आहे पण पित्याच्या मान्यते

नंतरच नाहीतर नाही. तुझ्यासारखा पति तिनही जगात मिळणार नाही, म्हणून कोणीही स्त्री तुला कधीही नाकारू शकणार नाही. तू सर्व गुणी आहेस, उत्तम कुळातील आहेस, म्हणून माझे पिता, आदित्य तुला मान्यता देतील अशी माझी धारणा आहे. तू तुला जशी संधी मिळेल तशी मला मागणी घाल. त्यासाठी व्रतस्थता, प्रार्थना (ध्यान क्षमता), तपस्या (इंद्रीय निग्रह) व वैराग्य (निरहंकारी वृत्ती) तुझ्याकडे असले पाहिजेत. जर तू माझ्या बाबांना आवडलास तर मी कायम तुझी अर्धांगिनी बनून राहीन. माझे नांव आहे तापती, मी सावित्रीची धाकटी बहीण आहे व सवितृची (सूर्य) मुलगी. जो सूर्य सगळ्या जगाला प्रकाशमान करतो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथाचा एकशे चौर्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंच्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

अर्जुन ऐकत होता व गंधर्व त्याला सांगत होता. असें बोलून ती रुपगर्विता तापती, सूर्याची धाकटी कन्या आकाशात निघून गेली. ती गेल्यानंतर तो राजा पुन्हा जमिनीवर पडला. तो तेथे तसांच पडलेला असतांना त्याचे आमात्य व मंत्री त्याला शोधत तेथे आले व त्याला तेथे असें निपचित पडलेले पाहिले. तो तेजस्वी राजा, जसें इंद्रधनुष्य आकाशातून जमिनीवर कोसळले आहे किं काय, असें त्या आमात्यांना वाटले. आपल्या राजाची ती अवस्था पाहून त्या इमानदार सेवकांच्या ह्रदयाला पिळ पडला. त्याला उठवण्याचे प्रयास झाले पण तो राजा त्या स्थितीतून बाहेर येईल असें दिसले नाही. तो वयोवृद्ध शहाणा दूर धोरणी मंत्री राजाला मधूर आवाजात हे असें काय झाले ते विचारतो. राजा कांहींच प्रतिसाद देत नाही तेव्हां ते कारभारी समजतात किं, राजा भूक व तहान ह्यांनी त्रस्त झाला असावा. शिकारीला वनात जाणार्या क्षत्रियांचे असें बर्याच वेळा होते ते त्याला माहीत होते. त्या वृद्ध मंत्र्याने राजाच्या तोंडावर कमळफुलांच्या सुगंधाने बनवलेले पाणी शिंपडले. त्यानंतर राजा सावकाशपणे सावध झाला. शुद्धीवर आल्यावर राजा त्यांना, स्वतः तपस्या करण्याचा निर्धार केल्याचे सांगतो व मुख्य मंत्री तेथे थांबतो व इतर सगळ्यांना परत राजधानाकडे जाण्यास सांगतो. राजा त्याच ठिकाणी त्या डोंगर माथ्यावर वैराग्यपूर्ण ध्यान साधना करू लागतो. हातांने नमस्कार करून तो आकाशात सूर्याच्या दिशेने तोंड करून सूर्यावर लक्ष केंद्रीत करून ध्यान करू लागतो. सौंवर्ण आपल्या राजगुरूचीसुद्धा आठवण करतो जे साक्षात वसिष्ठ ऋषी आहेत. एकचित्त असा तो शत्रुघ्न महारथी राजा आपली तपस्या रात्रंदिवस करत रहातो. बाराव्या दिवशी सर्वज्ञानी राजगुरू वसिष्ठ त्या ठिकाणी येतात. त्यांना आल्याबरोबर त्यांच्या दिव्यदृष्टीने काय प्रकार आहे ते समजते किं, राजा तापतीच्या इच्छेने व्यस्त झाला आहे. तो श्रेष्ठ मुनी जो सर्वकांहीं ओळखत होता, राजाला आश्वासन देतो किं, तो सूर्याला भेटून पुढील कारवाई करण्याचा प्रयत्न करील. त्या नंतर तो ऋषी सूर्याकडे जातो, त्याला आपली ओळख करून देतो कीं, ते वसिष्ठ मुनी आहेत. तो सहस्त्र रश्मी आकाशाला दिपवणारा विवस्वात त्या ऋषीला ओळखतो, व विचारतो, "काय काम काढलेत"? वसिष्ठ मुनी त्याला सर्व कांहीं सांगतो. विचारतो कीं, त्याचा काय

मानस आहे. सूर्य त्या महान तपस्व्याला आदरपूर्वक बोलतो, "अहो महान मुनी, मी तुमची इच्छा पूर्ण करण्यास तयार आहे, तेव्हां सांगा काय पाहिजे तुम्हाला"? असें आश्वासन मिळाल्यावर तो मुनी आदरपूर्वक खाली मान घालून विनंती करतो कीं, "अहो विभावसु, माझा राज, सौंवर्ण जो पृथ्वीवर राज्य करीत आहे जसें तू आकाशावर करीत आहेस, सावित्रीची लहान बहिण, तुझी धाकटी कन्या तापती हींचा हात मांगत आहे आणि त्यासाठी मी हा तुझ्यापुढे त्याच्यावतीने उभा आहे. तुला माहीत आहेच किं, राजा सौंवर्ण गुणवान, यशस्वी, शक्तिमान, कर्तव्यदक्ष असा चतुरस्त्र राजा आहे. माझा राजा, सौवर्ण तुझा जावई होण्यास अगदी योग्य आहे". ऋषीची विनंती विभाकर (सूर्य) मान्य करतो व आपली कन्या सौंवर्णास देण्याची तयारी दाखवतो. तो तपन (सूर्य) आपल्या कन्येस, तापतीला वसिष्ठांच्या हवाली करतो व बोलतो, "हि माझी गुणवान कन्या मी राजा सौंवर्णाला देत आहे".

"राजाचे बारा रात्रीचे व्रत पूर्ण झाल्यानंतर तो ऋषी तापतीला राजाकडे सुपूर्द करतो. त्यासरशी ती सूर्यकन्या आकाशात तीव्र प्रभा पसरवत व दहाही दिसा चमकवत राजाकडे जाते. तिला पाहून राजा सौंवर्ण अतिशय आनंदी होतो. गंधर्व पुढे अर्जूनाला सांगतो अशारितीने तापती कुरुवंशाची पूर्वज होते. वसिष्ठाच्या प्रतिष्ठेमुळें व राजाच्या वैराग्यपूर्ण तपस्येमुळें तापती सौंवर्णाची पत्नी होते. त्याच डोंगरावर त्यांचा विवाह संपन्न होतो. कांहीं काळ आपल्या पत्नीबरोबर त्याच डोंगरावर घालवण्याची परवानगी राजा ऋषीकडून घेतो व मुनी वसिष्ठ परत जातात. राजा सौंवर्ण व तापती एकमेकांत रममाण होतात. तेथे ते उभयता बारा वर्षे तशींच घालवतात.

त्या काळात इंद्र सौंवर्णाच्या राज्यावर पाऊस टाकत नाही. त्यामुळें सारी माणसें त्रस्त होतात, वनस्पती, श्वापदे, पिकं सगळे बरबाद होत जाते. लोक कंटाळून ते राज्य सोडून निघून जाऊ लागतात. तेथे साधे दंवसुद्धा पडेनासे होते. सौंवर्णाचे राज्य उपासमार व रोगबळी ह्यांने उध्वस्त होते. लोक आपली मुलंबाळ सोडून देतात व परागंदा होतात. सर्वकांहीं नष्ट होते. जणू मृतांची नगरी असें त्या प्रदेशाचे होते. फक्त भूतं फिरत आहेत असें झालेले असते. असें झालेले पाहून अखेरीस ऋषी वसिष्ठ राजाला परत बोलावतात व राज्यकारभारात लक्ष घालण्यास सांगतात. बर्याच अवधीनंतर तो तपस्वी राजा आपल्या

बायकोबरोबर राज्यात प्रवेश करतो. जसा राजा राज्यात येतो तसें सर्वकांही पूर्ववत होते, पाऊस पडू लागतो व लोक पुनः परततात. पिकं चांगली उगवतात व राज्यात पुन्हा भरभराटी येते. इंद्राने जसें त्याच्या पत्नी, सांचीबरोबर यज्ञ केले तसेंच तो करतो. अरें अर्जूना, हा आहे प्राचीन इतिहास तापतीचा जी तुमची मूळ पूर्वज आहे. सौंवर्ण व तापती ह्यांना एक मुलगा होतो तो कुरु व त्याच्या वंशाला कुरुवंश असें म्हणतात. म्हणून तुम्ही तापत्य अहात, समजलें"?

अशारितीनें आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे पंचाहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे श्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, तो भरतकुळातील नरकेसरी, अर्जुन, ही कथा गंधर्वाकडून ऐकून प्रभावित झाला व तसांच कांहीकाळ विचारात गढून गेला. वसिष्ठाची अध्यात्मिक शक्ती समजल्यावर त्याच्या मनात उत्सुकता उत्पन्न होते. अर्जुन त्या गंधर्वाला विचारतो, "मला वसिष्ठांबद्दल आणखीन जाणून घ्यावयाचे आहे. कृपया मला त्यांबद्दल सगळे सांग. हा ऋषी कोठून आला, तो आमचा राजगुरू कसा झाला"?

गंधर्व सांगतो, "वसिष्ठ प्रजापतिचा मानसपुत्र (इच्छा शक्तिने उत्पन्न केलेला) आहे म्हणून ब्राह्मण समजला जातो. तो अरुंधतीचा पति, त्याची वैराग्यपूर्ण तपस्या अतुलनीय होती. त्याने सहा विकार (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) संपवले होते म्हणून त्याला जिंकणे माणसाला केवळ अशक्य होते. तरी एकदा विश्वामित्राच्या आगळिकीमुळें तो क्रुद्ध झाला होता. कुशिकराजा (कुशान राजा) विश्वामित्र, वसिष्ठाच्या मुलास ठार मारतो. त्यावेळी हे होते. तरी वसिष्ठ असें कांही करीत नाही किं, ज्यामुळे विश्वामित्राचे खास नुकसान होईल. जसें सागर आपल्या मर्यादेत राहून जमिनीचे पाय धूत असतो तसें वसिष्ठ आपल्या क्रोधाला मर्यादेत ठेवतो. यमाचे नियम वसिष्ठ पाळणे योग्य समजून विश्वामित्राला माफ करतो. जो स्वताला (स्वताच्या वासनांना) जिंकतो जसें राजा ईश्वाकूने केले, ज्यांने सगळी पृथ्वी जिंकली होती, तो कधीही हरत नाही. म्हणून वसिष्ठ त्याची मृत मुलं यमाकडून परत आणत नाही कारण त्याला यमाचे नियम मोडावयाचे नव्हते. वसिष्ठाला मुख्य पुरोहीत नेमून त्यांनी अनेक महान यज्ञ केले. ते स्वयंभू ऋषी त्या तुझ्या वंशातील राजांना सहाय्य करतात जसें देवांना बृहस्पती करतो. म्हणून तूसुद्धा एकादा ज्ञानी वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण नेमून त्याच्या मार्गदर्शनाने तुझे काम कर. जसें सौंवर्णाला वसिष्ठानी मदत केली व त्याची तापती मिळविण्याची इच्छा पूर्ण झाली. ज्या क्षत्रियाला राज्य वाढवावयाचे आहे व उत्तम सत्ता गाजवावयाची आहे तो असेंच करतो. तू ती क्षत्रियांची परंपरा पुढे चालव. त्यातच तुझे भले आहे.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे श्याहत्तरावा भाग संपला.

## आदिपर्व भाग एकशे सत्त्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, हे गंधर्वाचे बोलणे ऐकून अर्जूनाला उत्सुकता प्राप्त होते ती विश्वामित्र व वसिष्ठ जे दोघे स्वर्गात रहात होते, ह्यांच्यातील वादाबद्दल. तो गंधर्वाला विचारतो, "मला त्याची माहीती समजून घ्यावयाची आहे तरी ती सांगा". गंधर्व सागतो, "अरें पार्था, वसिष्ठाच्या कथा तिनही जगात (स्वर्ग, पृथ्वी व पाताळ) पुराणातील महत्वाच्या समजल्या जातात. मी त्या तुला सांगतो त्या नीटपणे ऐक".

गंधर्व पुढे सांगू लागतो, "फार वर्षापूर्वी कन्याकुंज मध्ये , भरत कुळात जन्मलेला एक राजा, महाबलवान, ख्यातनाम गधी त्याचे नांव, कुसीकाचा पुत्र, राज्य करत होता. त्या गुणी राजाला एक पुत्र होता त्याचे नांव विश्वामित्र होते. विश्वामित्र त्याच्या पित्याप्रमाणेच सामर्थ्यवान होता. त्याचे बलशाली सैन्य होते. तो विश्वामित्र राजा त्याच्या मंत्री परिवारासह संपूर्ण प्रदेशात शिकारी साठी भटकत असें. सांबर व डुक्कर मारत व त्यांचे मांस चवीने खात ते सगळे मजेत आपला  काळ घालवत असतं. असेंच भटकत असतांना राजा तहानेने व्याकूळ झाला. तो तशा स्थितीत वसिष्ठ मुनींच्या आश्रमात आला. विश्वामित्र राजा आपल्या येथे आलेला आहे ते पाहून वसिष्ठ त्याचे स्वागत करतो. मुखमार्जनासाठी (तोंड धुण्यासाठी, अर्ध्य करण्यासाठी) पाणी देतो. पाय धुण्यासाठी सुद्धा पाणी देतो व नंतर तेथील वनफळें खाण्यास देतो. त्या वसिष्ठ मुनीकडे एक विलक्षण गाय असते, तिचे नांव कामधेनू. जे मांगाल ते ती देत असें म्हणून तसे नांव होते. अगदी अमृतसुद्धा ती देत असें. औषधीसुद्धा ती देत असें. ती खाण्यापिण्याशिवाय इतर गोष्टीसुद्धा देऊ शकत असें जसें रत्न, माणिक, हिरे वगैरे. म्हणजे असें कांहींही नाही किं, जे ती देऊ शकणार नाही. तिच्या त्या किमयागरीने विविध गोष्टी काढून वसिष्ठ त्या विश्वामित्र राजाचे स्वागत करतो. त्या तशा विलक्षण स्वागतामुळें राजा व त्याचे उडाणटप्पू मंत्री खूष होतात. राजा व त्याचे आमात्य तिचे निरीक्षण करतात तेव्हा त्यांना ती अशी दिसते, तिला सहा मोठे पाय असतात, रुंद छाती असते, मोठे ढुंगण असते, पांच पाय जास्त रुंद होते, डोळे बेडकासारखे शरीराबाहेर आलेले मोठे परंतु, सुंदर होते, तिचे आंचळ मोठे व प्रशस्त होते, सर्वकांहीं निर्दोष व बिनचुक असें होते. तिचे कांन लांबसडक व उंच होते आणि डोके पूर्ण

वाढलेले व तिची मान मजबूत होती. ती पाहून तो गधीचा मुलगा विश्वामित्र वसिष्ठांना बोलतो, "आमचे समाधान तुम्ही केले आहे. परंतु ह्या अजब गाईचे नांव काय"? वसिष्ठ सांगतात किं, त्या धेनूचे नांव नंदिनी असें आहे. वसिष्ठाला विश्वामित्र बोलतो कीं, त्याला ती धेनू पाहिजे व त्याच्या बदल्यात तो ऋषीला दहा हजार गाई किंवा त्यांचे राज्य देण्यास तयार आहे. तो गर्विष्ठ, असुरी संपदेने भ्रष्ट झालेला, विश्वामित्र त्या प्रजापतिच्या मानसपुत्रास बोलतो, "माझे विशाल राज्य घे व मला ही धेनू दे".

राजाची ती मांगणी ऐकल्यावर वसिष्ठ त्याला नीटपणे समजावतात किं, ती त्यांच्याकडे येणार्या देव, ऋषी, पाहूणे, पितर, यज्ञविधीची सामुग्री ह्यांच्यासाठी उपयोगाची आहे, त्याला राज्य अथवा दहा हजार गाई कांही उपयोगाच्या नाहीत. ते सगळे सांभाळणार कोण?

वसिष्ठाचा तो गर्भित नाकार त्या उन्मत्त क्षत्रियास रुचला नाही. तो विश्वामित्र त्या ऋषीला आवाज देतो किं, "मी माझ्या बळावर ती धेनू तुझ्याकडून काढून घेऊ शकतो, हे तुला समजत कां नाही"? तो गदीचा विकारी पुत्र पुढे बोलतो, "जरी तू माझा प्रस्ताव मान्य केलास व ती गाय मला दहा हजार गाईच्या बदल्यात दिलीस तरी मी तुला दिलेल्या गाईसुद्धा काढून घेऊ शकतो. तू ब्राह्मण, एकटा माझे काय बिघडवणार आहेस"? राजाचे ते बोलणे ऐकल्यावर वसिष्ठ उद्गारतो, तू योग्य तेच बोलत आहेस, तुम्ही क्षत्रिय तुमच्या ताकदीच्या जोरावर कांहींही करू शकता हे खरे आहे. विश्वामित्र त्याला बोलतो, आम्ही क्षत्रिय आमचा स्वभाव सोडणार नाही. त्यावर वसिष्ठ त्याला बोलतो, अरें राजा तुमचा दोष असा असतो किं, तुम्ही परिणामांचा विचार न करता धैर्य करता.

राजा विश्वामित्र तिला बळजबरीने खेचून नेण्याचा प्रयास करू लागतो. तिच्यावर चाबकाचे फटके मारतो परंतु, कांहींही केले तरी ती कामधेनू त्या जागेवरून हलत नाही. तो दुष्ट व अविवेकी विश्वामित्र तिचे हाल करतो पण सर्व व्यर्थ ठरते.

ते पहात वसिष्ठ मुनी तिला बोलतात, "अहो नंदिनी मी तुझे दुःखाचे हंबरणे ऐकतो पण मी क्षमाशिल ब्राह्मण काय करणार"?

विश्वामित्राचे सेवक नंदिनीला पकडण्यासाठी धावतात. त्यामुळें संतापलेली ती रिद्धीसिद्धी शेवटचे वसिष्ठाला विचारते किं त्यांनी ती नको कां? त्यावर ते बोलतात, "मी क्षमाशील ब्राह्मण ह्यात काय करणार जर तुला जावयाचे नसेल तर तू तुझे संरक्षण करण्यास सक्षम

आहेस तेव्हां जे तुला पाहिजे तसें कर". हे वसिष्ठाचे बोलणे ऐकल्यावर ती कामधेनू अक्राळविक्राळ रुप धारण करते, ते पाहून आता विश्वामित्राच्या सैन्याची घाबरण्याची पाळी आली. अचानकपणे ती विलक्षण अशी मोठी होत गेली जसे काय एक डोंगर, तिच्या त्या अवतारामुळें स्वतः विश्वामित्र दचकला. तिच्या अंगातून सूर्यासारखा प्रकाश बाहेर येऊ लागला. त्यानंतर तिच्या शेपटातून पेटलेल्या निखार्यांचा ती वर्षाव करू लागली विश्वामित्राच्या सैनिकांवर. त्यानंतर थोड्या वेळानंतर त्या शेपटीतून पल्हवांचे (आजचे पठाण) सैन्य बाहेर येऊन ते सैनिक विश्वामित्राच्या सैनिकांवर तुटून पडले. तिच्या शरीराच्या विविध भागांतून निरनिरीळ्या प्रदेशांतील लोकांचे सैन्य विश्वामित्राच्या सैनिकांवर तुटून पडत असल्याचे विश्वामित्र पहात राहिला. तिच्या आंचळांतून द्रविड आले, त्यानंतर शक येऊ लागले, तिच्या पोटातून यवनांची सेना येऊ लागली, तिच्या मुतातून कांची, तिच्या खांद्यातून शवरसेना, तिच्या शेणातून शवरसेनी, तिच्या तोंडातील फेसातून पौंड्र व किराटसेना येऊ लागली. त्यानंतर यवन, सिंहल, बर्बर, खासी, शिवुक, पुलींड्र, चीनी, हूण, केरली, आणि असंख्य म्लेच्छ असे मोठे लष्कर तिने कांहीं क्षणात उत्पन्न केले व ते पाहून न लढतांच ते विश्वामित्राचे योद्धे सैरावैरा पळून गेले. नंदिनी मात्र तेथेंच उभी होती. विश्वामित्राच्या सैन्यापेक्षा नंदिनीचे असें मिश्र सैन्य पांच ते सहापट मोठे झाले होते. त्यामुळें त्याच्या सैन्यातील कोणताही शूर त्या मायावी सैन्यापुढे उभा राहू शकत नव्हता. अशा विलक्षण हल्ल्यामुळें विश्वामित्र खजिल झाला व वसिष्ठांपुढे खाली मान घालून उभा राहीला. हा सगळा मायावी प्रकार होता ते सैन्य विश्वामित्राच्या सैन्याला व स्वतः विश्वामित्राला भयंकर घाबरवत होते परंतु, प्रत्यक्ष हानि झालीच नव्हती. विश्वामित्राचे घाबरलेले सैन्य चांगले वीस कोस दूर पळून गेले. हे पाहून विश्वामित्राला क्षत्रियांच्या शारिरीक ताकदीपेक्षा ब्राह्मणाचे दैवी प्राबल्य कसें श्रेष्ठ आहे त्याचा प्रत्यय आला, त्याला क्षत्रिय सामर्थ्याबद्दल असलेली घमेंड पार नष्ट झाली. नम्र होऊन तो जगत्ज्जेता विश्वामित्र वसिष्ठांना म्हणाला, "तुम्हा ब्राह्मणांच्या वैराग्याचे सामर्थ्य हेंच खरे सामर्थ्य, भोगमय क्षत्रिय तुमच्यापुढे खचितच कमी ठरतात. त्यानंतर तो क्षत्रिय राजा गधीचा मुलगा, विश्वामित्र सर्व संग परित्याग करून संन्यासधर्म स्वीकारतो. वैराग्यपूर्ण तपस्या करतो. त्याच्या तपोसामर्थ्याने तो तिनही जग जिंकतो व इंद्राबरोबर बसून अमृत

प्राशन करतो. इंद्राला हरवण्यासाठी तो नवीन सृष्टी उत्पन्न करतो त्यामुळें त्याचे विश्वामित्र हे अभिधान सार्थकी होते.

*महाभारताच्या कांही प्रती आहेत त्यात कामधेनूची कथा थोडी वेगळी आहे ती पाहू.*

*कामधेनूला पकडण्यासाठी विश्वामित्राचे सेवक धावतात तशी ती थोडी लांब पळते व जसें ते सैनिक तिच्या जवळ येतात तशी ती एकदम अदृष्य होते. त्यामुळें तिला पकडणे केवळ अशक्य होते. त्यानंतर विश्वामित्र रांगाने वसिष्ठास बोलतो, "तुझ्या नंदिनीला आण". त्यावर तो प्रजापतिपुत्र वसिष्ठ त्याला सांगतो, "अरे राजा, ती अशाने तुला मिळणार नाही कारण, तिला जिंकता येत नाही. ती महादेवाच्या नंदिची बायको रिद्धीसिद्धी आहे. जो महादेवाचा सेवक आहे. ती केवळ माझे तपोसामर्थ्य पाहून माझ्याकडे आली आहे, ती ह्या तीन जगातील नाही, ती त्याही पलिकडील विश्वातून आलेली आहे. जर तुला ती पाहिजे असेल तर तुला माझ्या सारखे वैराग्यपूर्ण तपोसामर्थ्य प्राप्त करावे लागेल आणि जर ते तुला करता आले तर ती कामधेनू स्वतःहून तुझ्याकडे येईल. विश्वामित्राला ते समजते व त्यानंतर क्षात्रतेजापेक्षा खरे ब्रह्मतेजच श्रेष्ठ हे तो मान्य करतो व सर्वसंग परित्याग करून तप करण्यासाठी निघून जातो. नेहमी प्रमाणे इंद्र त्याला आव्हान देतो तेव्हां विश्वामित्र प्रति सृष्टी उत्पन्न करतो व इंद्राला शह देतो. प्रति सृष्टी निर्माण केली म्हणून तो खर्या अर्थाने विश्वामित्र (विश्व अमित्र) ठरला. वसिष्ठाला दैवी संपदेचा प्रतिनिधी समजतात व विश्वामित्राला असुरी संपदेचा.*

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे सत्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठ्याहत्तरावा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, पुढे पंडुपुत्र अर्जुन त्या गंधर्वाला विचारतो, "मला सांगा, विश्वामित्राने वसिष्ठांची मुलं कशी व कां मारली"?

पुढे तो गंधर्व सांगत रहातो, पूर्वी एक राजा होऊन गेला त्याचें नांव कल्माशपाद, तो ईश्वाकू (हल्लीचे अफगाण) कुळातील होता व धाडसात कोणाहीपेक्षा श्रेष्ठ होता. एकदा मृगयेसाठी तो प्रतापी राजा राजधानी सोडून वनांत गेला. त्यांने वनात बरेच सांबर व डुक्कर बाणांने मारले. आणखीन दाट जंगलात तो जाऊन कांहीं गेंडेसुद्धा मारतो. अशारितीने शिकारीचा खेळ खेळत असतांना तो थकून जातो. तो आता विश्रांति घेण्याचे ठरवतो.

गंधर्व अर्जूनाला सांगतो, त्या कल्माशपादाला आपला शिष्य करण्याचा विचार विश्वामित्र कां करतो, ते सांगतो.

जंगलातून त्या भुकेल्या अवस्थेत तो कल्माशपाद जात असतांना त्याची व वसिष्ठांच्या शंभर मुलांची भेट होते. तो राजा पहातो कीं, वसिष्ठ ऋषींच्या वंशाचे शक्त्री तेथे तो पहातो. वसिष्ठ ऋषीच्या शंभर मुलांपैकी एक तो असतो. कल्माशपाद त्यांना सांगतो, माझ्या वाटेतून बाजूला व्हा. ते ऐकून एक वसिष्ठ त्या राजाला मधूर वाणीत विनंती करतो, अहो नृपश्री, हा आमचा नेहमीचा रस्ता आहे, सर्व शास्त्रात सांगितले आहे किं, ब्राह्मणाला क्षत्रिय प्राधान्य देतात. म्हणजे तुम्ही प्रथम बाजूला व्हावे, आम्ही नाही. अशारितीने त्यांच्यात बरोबर काय ह्यावर बाचाबाची होते. ते दोघेही एकमेकांना, "प्रथम तू बाजूला हो", "नाही प्रथम तू बाजूला हो", असें सांगू लागले. ऋषी हलायला तयार नव्हते. न राजा बाजूला होण्यास तयार न ऋषी बाजूला होण्यास तयार अशी वादाची परिस्थिती झाली होती. प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता किं, कोण हटणार, त्यांचे वागणे राक्षसासारखे होते. राजांने ऋषीवर चाबूक उगारला. सर्वकडे संतापाची परिस्थिती झाली होती. चाबकाचा फटका बसल्यावर वसिष्ठांचा संयम संपला. तो ऋषी शक्त्री, संतापाने कल्माशपादाला शाप देतो किं, "तू तुझी मर्यादा ओलांडलीस, एका ऋषीवर हात उगारलास म्हणून तू राक्षस होशिल व नरभक्षण करशील. तू असांच भटकत फिरशील व माणसांचे मांस खाशिल". असा शाप वसिष्ठ ऋषी शक्त्री त्या मग्रूर राजाला देतो. ते घडत असतांना तेथे विश्वामित्र प्रकटतात

पण काय होते आहे ते पहाण्यासाठी अदृष्य रहातात. आपल्याला माहीत आहे कीं, वसिष्ठ व विश्वामित्र ह्यांत तेढ आधीपासूनच होती, तशात तो राजा कल्माशपाद समजून असतो किं, हा ऋषी मामुली नाही किं, त्याला झुगारून देईन, तो वसिष्ठ परंपरेतील आहे. कल्माशपाद आता त्या ऋषींची विनवणी करू लागतो. त्यांच्या नेहमीच्या प्रेमळ व क्षमाशिल स्वभावाप्रमाणे तो वसिष्ठ त्याला क्षमा करण्या आधी विश्वामित्र एका राक्षसाला राजाच्या अंगात घुसण्याचा आदेश देतो. तो एरव्ही सज्जन असलेला सुबुद्ध राजा त्या राक्षसाच्या अंगात घुसण्यामुळें भयंकर होतो. पुढे काय गंमत होते पहाण्यासाठी विश्वामित्र दूर जातो. राक्षसाने पछाडल्यामुळे तो राजा त्याची सगळी सद्बुद्धी हरवून बसतो. अशा अवस्थेत असतांना त्याला एक ब्राह्मण भेटतो, त्याच्याकडे मांसाहाराची भिक्षा मांगतो. राजा त्याला सांगतो थांब, मी मृगया करून तुला मांसाची भिक्षा देतो. राजा असें बोलून तेथून जातो व भटकून आपल्या घरी येतो. तेथे तो त्याच्या स्वयंपाक्याला सांगतो किं जंगलात एक ब्राह्मण बसला आहे त्याला मांसाहार करावयाचा आहे तर तू त्याला मांस खायला घाल. तो स्वयंपाकी मांस आणण्याचा प्रयत्न करतो. त्याला कांही केल्या मांस मिळत नाही. तो राजाला विचारतो, "आता काय करावयाचे"? राजा त्याला सांगतो, "जा आणि जेथे सुळावर कोणी चढवला असेल त्याचे मांस काढून शिजवून त्या ब्राह्मणाला खायला वाढ". तो आज्ञाधारक स्वयंपाकी तसें करतो व ब्राह्मणाला ते नरमांस खाण्यासाठी देतो. ब्राह्मणाला ते समजते व त्यामुळें तो संतापतो व राजाला पुनः तसाच शाप देतो.

असें दोन शाप मिळाल्यामुळे राजा पूर्णतया राक्षस होतो. राजा शक्त्रीला पकडतो व बोलतो तुझ्या शापामुळें मी नरमांस खाणार आहे तेव्हा ते मी तुझ्यापासून सुरु करतो. नंतर तो राक्षस झालेला राजा कल्माशपाद शक्त्रीला खाऊन टाकतो. विश्वामित्र त्या राक्षस झालेल्या राजाला वसिष्ठाचे इतर मुलं खाण्यास पुनःपुन्हा उद्युक्त करत रहातो.

कल्माशपाद अशारितीने एका पाठेपाठ एक अशी बरीच वसिष्ठाची मुलं जे सगळे ऋषी होते, खाऊन टाकत असतो. वसिष्ठाला समजते किं, त्या मागे विश्वामित्र आहे. तो तपोनिधी प्रजापतिपुत्र वसिष्ठ आपला क्रोध आवरतो व उलटवार करणे ब्राह्मणाला न शोभणारे कृत्य होईल म्हणून प्रायश्चित्त करण्यासाठी स्वताः आत्महत्त्या करण्याचा निर्धार करतो. कुशिक

कुळांचा नाश करणे त्याला सहज होते पण मग त्यांच्यात व विश्वामित्रात काय फरक म्हणून, तो तसे करण्याचा साधा विचारसुद्धा करत नाही. शेवटी आत्मघात करण्यासाठी तो मेरू पर्वतावर जातो व तेथून उडी मारतो पण खाली तो पडत नाही व जेव्हां पडतो ते गादीवर व अशारितीने त्याचा तो प्रयत्न असफल होतो. दुसरा प्रयत्न करण्यासाठी अरण्यात तो अग्नी उत्पन्न करतो व त्यात शिरतो पण अग्नी त्याला स्पर्श करत नाही. तिसरा प्रयत्न करतो त्यावेळी तो पाण्यात उडी मारतो तर एक मोठी लाट त्याला पुनः किनार्यावर फेकून देते अशारितीने त्याचे सर्व प्रयत्न फोल ठरतात. शेवटी हताश झालेला वसिष्ठ आपल्या आश्रमात जातो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे अठ्ठ्याहत्तरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एकोणऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

चैत्ररथ गंधर्व पुढे सांगतो, वसिष्ठ पहातात कीं, त्यांचा आश्रम त्याच्या मुलांशिवाय रिकामा होता. मुनी अतिदुःखाने व्यथित झालेले पुन्हा बाहेर पडतात. भटकत जातांना तो महाऋषी एक नदी पहातो जी पावसाच्या पाण्याने दुथडी भरून वाहत होती. त्या पुराच्या पाण्यात अनेक मोठे वृक्ष वाहून जात होते. ते पाहून तो महामुनी समजला, जर तो त्या पाण्यात पडला तर खात्रीने पाहून जाईल. त्या विचाराने त्याला पुनः आत्मघात करण्याची इच्छा बळावते व तो एक वेल घेतो व त्याने स्वताचे हात बांधून टाकतो ते अशासाठी कीं, पाण्यात त्याने पोहण्याचा प्रयत्न करू नये. त्यानंतर कांही अंतर पुढे जाऊन त्या प्रवाहात स्वताला झोकून देतो. परंतु, अरे कुंतीपुत्रा, तापत्या, थोड्याच अंतरानंतर त्या महामुनीला ती ओघवती नदी किनार्यावरील एका दगडांच्या खाचरात फेकून देते. तो तेथे तसांच अडकून रहातो पण मरत नाही. त्याने ज्या वेलीनी स्वताला बांधून घेतले होते ते तुटून जातात. त्या जोराने वहाणार्या प्रवाहामुळे ते तुटले म्हणून त्या नदीला तो विपाशा (बंधन मुक्त करणारी, योगशास्त्रातील विपाशना हा शब्द त्यातून आला आहे) असें नांव देतो. त्या अनुभवानंतर तो मुनी एका जागी कधीही रहात नाही. तो डोंगर दर्या, नद्यामुळें तयार झालेले तलाव असें पहात फिरत राहीला. एकदा हिमावती नदीचे दर्शन तो घेतो. त्यात भयानक सुसरी व इतर जलासुर (हिंस्त्र मासे) तो पहातो. ते पाहून पुन्हा त्याला जीव देण्याची इच्छा होते व तो त्या माशाने भरलेल्या हिमवती नदीत उडी मारतो. परंतु, ती नदी त्या ठिकाणी एकदम पात्र फाकून शतधारा होते व तिचे नांव शतद्रा (शंभर ओघांने वहाणारी) होते. तो महामुनी पुनः कोरड्या जमिनीवर येऊन पडतो. ते झाल्यावर तो समजतो किं, तो स्वताच्या कृतीने आत्महत्त्या करू शकत नाही. ते ध्यानात आल्यावर तो आपल्या आश्रमाकडे वळतो. त्यासाठी त्याला पुन्हा अनेक डोंगर व देश पालथे घालावे लागतात. अखेरीस तो त्याच्या आश्रमात पोहोचतो. तेथे त्याची स्नुषा अद्रिस्यंती त्याच्या पाठोपाठ येते. जशी ती त्याच्या जवळ येते त्याला वाटते आश्रमातून अतिशय उत्कृष्ट व निर्दोष असें वेदघोष (विशिष्ट पद्धतीने वेद उच्चारणे) ऐकावयाला येतात. ते ऐकून तो विचारतो तिला, "हे कोण वेदोच्चार करीत आहेत माझ्या मागून, अगदी

शक्त्रीसारखा आवाज आहे व सर्व अंगांचे उच्चारण पण तसेंच आहे"? ती सांगते, "मी अद्रिस्यंती, शक्त्रीची पत्नी", ती त्या ऋषीला सांगते, "मी गेली बारा वर्षे तपस्या करीत आहे पण व्यर्थ". पुनः वसिष्ठ विचारतात, "पण तो वेद उच्चारणारा कोण"? अद्रिस्यंती सांगते, "बारा वर्षापासून मी तुमच्या पुत्रापासून होणार्या एका मुलाची गर्भवती आहे. तुम्ही जे वेदघोष ऐकत अहात ते माझ्या उदरातून येत आहेत".

एवढे सांगितल्यावर पुढे तो गंधर्व सांगतो, ते तिचे ऐकल्यावर तो मुनी अतिशय हर्ष पावतो आणि तो स्वताशी पुटपुटतो, "अरें, माझा वंश चालवणारा कोणी आहे"? त्यानंतर स्वताला मारून टाकण्याचे विचार वसिष्ठने सोडून दिले. तो त्या खुषीत आपल्या आश्रमात राहू लागला. एक दिवस ते रानात फिरत असतां त्यांना एका भयंकर राक्षसाची चाहूल लागते. तो राक्षस म्हणजे कल्माशपाद होता, अजून त्या राक्षसाच्या तावडीतून सुटला नव्हता. अद्रिस्यंती घाबरून जाते. ती आपल्या सासर्याला सांगते, "तो पहा राक्षस आपल्याकडे येत आहे, त्याच्या हातात एक भला मोठा लाकडी सोटा आहे. मला वाचवा, तुमच्याशिवाय कोण मला वाचवणार"? त्यावर तो मुनी तिला बोलतो, "तो राजा कल्माशपाद आहे, त्याला राक्षसांने पछाडले आहे, मी त्याला त्या बंधनातून मुक्त करतो, तू घाबरू नकोस".

तो राक्षस, कल्माशपाद त्यांच्या जवळ येत असतो आणि त्याची सुन घाबरून एका बाजूला उभी राहून बोलते, "तुमच्या वेदाच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग होईल कां, ह्याला अडवण्यासाठी"?

त्याला जवळ आलेला पाहून तो ऋषी ओम, असें उच्चारतो व त्या राक्षसावर पवित्र जल शिंपडतो व त्या राजाला राक्षसापासून मुक्त करतो. विश्वामित्राचा उद्देश वसिष्ठाची मुलं नष्ट करण्याचा होता को पूर्ण झालेला होता म्हणून त्यांने कल्माशपादातील राक्षसाला तसेंच सोडून दिले होते. जसे सूर्याला राहूने ग्रासावे असें ते होते, तो राक्षस गेल्याबरोबर तो राजा सूर्यासारखा चमकू लागला. त्याच्या दिव्य प्रकाशाने ते सगळे जंगल उजळून निघाले. राजाची बुद्धी पुनः काम करू लागली व त्याला सगळ्या गोष्टी समजू लागल्या. कल्माशपाद वसिष्ठाला वंदन करतो व सांगतो, "मी सुदासाचा मुलगा व आपला शिष्य.

मला आज्ञा द्या मी आपल्यासाठी काय करावे"? हे त्याचे नम्रपणे केलेले वचन ऐकून वसिष्ठ समजतात किं, आता खरोखरच तो राक्षस निघून गेला आहे.

वसिष्ठ त्याला सांगतो, "माझ्या इच्छा आधीच पूर्ण झाल्या आहेत. तू आता तुझ्या राजधानीला जा व सुखाने राज्यकारभार करावा". नंतर तो मुनी त्याला आदेश देतो, "एक गोष्ट लक्षात ठेव किं, कधीही ब्राह्मणाचा अपमान करू नकोस, त्यांच्या आज्ञांचे पालन कर व शक्य असल्यास ब्राह्मणांची पुजा कर. तो कल्माशपाद ते सगळे मान्य करतो. त्यानंतर तो राजा सांगतो, मला माझ्या ईश्वाकू वंशाच्या ऋणातून मुक्त झाले पाहिजे, तेवढे तुम्ही देऊ शकता, तर तेवढे करावे. त्यासाठी मला एक गुणी पुत्र हवा आहे जो माझ्या ईश्वाकू घराण्याचे नांव अजरामर करील.

गंधर्व पुढे सांगतो, राजाची ती मनिषा ऐकल्यावर तो महान ऋषी त्याला बोलतो, "तुला कांही वेळानंतर मी ते देईन. त्यानंतर ते दोघे कल्माशपादाच्या राजधानीकडे रवाना होतात. त्या राजधानीचे नांव होते अयोध्या. लोकांना समजल्यावर तेथील प्रजा आनंदाने फुलून गेली. तिने त्या दोघांचे स्वागत केले. अशारितीने तो राजा कल्माशपाद व वसिष्ठ त्याच्या राजधानीत, अयोध्येत प्रवेश करतात. राजा व त्याचे पुरोहित ह्यांचे ते दर्शन घेत होते. त्यांचा राजा एकाद्या सूर्यासारखा चमकत होता. राजाच्या आगमनाचे स्वागत करण्यासाठी त्या नगरीचे रस्ते पाण्याने स्वच्छ धुतले होते. रस्त्यावर जागोजागी झेंडे, पताका व तोरणे लावून सुंदर सजावट केली होती. अयोध्या दुसरी अमरावती असावी अशी सजवलेली होती. राजधानीत प्रवेश केल्यानंतर राजाच्या सुचनेनुसार त्याची राणी वसिष्ठाना लवून नमन करते व ऋषी तिच्याशी शास्त्राप्रमाणे संबंध घेतो. त्यानंतर लवकरच ती राणी गर्भवती होते. ऋषी राजाचा निरोप घेऊन आपल्या आश्रमाकडे निघून जातो. परंतु, तो गर्भ तसाच न वाढता तेथे तिच्या उदरात रहातो. बरीच वर्षे तो गर्भ वाढत नाही तेव्हां चिडून ती राणी आपल्या पोटाला एका दगडांने फाडून तो मांसाचा गोळा बाहेर काढते. तेव्हां तिच्या पोटातून एक मुलगा बाहेर येतो. त्याचे नांव अष्मक, म्हणजे अष्माने जन्मलेला. पुढे तोच अष्मक, कुर्ली घराण्याचा वारस, पौंड्र नगरीची स्थापना करतो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे एकोणऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे ऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

गंधर्व पुढे सांगतो अर्जूनाला, अहो पार्थ, अद्रिस्यंती जी वसिष्ठाच्या आश्रमात रहात होती, एका बालकाला जन्म देते जो शक्त्रीचा मुलगा होता. तो सगळ्या बाबीत त्याच्या पित्यासारखाच होता. गंधर्व पुढे बोलतो, "अरे भरत श्रेष्ठा, स्वतः वसिष्ठ ऋषी आपल्या नातवाचे बारशाचा विधी संपन्न करतात. बालकाचे नांव ठेवतांना त्या सगळ्या घटनांची आठवण होते किं, त्यांनी अनेकवेळा आत्महत्त्या करण्याचे अनेक प्रयत्न केले होते परंतु, जसे त्यांना समजते किं, त्यांचा वंश वाढत आहे तसें तो आत्महत्त्या करण्याचा विचार ते सोडून देतात. त्यातून त्याना एक नांव सुचते किं, पराशर, म्हणून त्या बालकाचे नांव पराशर (मृत्यूंजय) ठेवले जाते. पराशर वाढत असतो त्या आश्रमात. एके दिवशी तो छोटासा पराशर आपल्या मधूर आवाजात वसिष्ठांना तात (बाबा) अशी हांक मारतो, ती ऐकून त्याची आई त्याला सांगते किं, हे तुझे आजोबा आहेत तुझ्या जन्मदात्याला एक राक्षस खाऊन गेला आहे. ते ऐकल्यावर तो छोटा पराशर रागांवतो व बोलतो, तो हे सगळे जग नष्ट करील. ते ऐकल्यावर ऋषी वासिष्ठ त्याला समजावतात कीं, जग नष्ट करणे हा कांहीं अशा गोष्टींवर उपाय ठरत नाही. ते समजावतांना त्यांनी जे सांगितले ते तुला कुंतीपुत्रा , आता मी सांगतो.

चैत्ररथ गंधर्व पुढे सांगतो, वसिष्ठ त्याला समजावतात, "ऐक माझ्या बाळा, फार पूर्वी एक राजा होऊन गेला, त्या ख्यातनाम राजाचे नांव होते, कृतवीर्य. तो वेदाचार्य भृगूंचा शिष्य होता. तो राजा यज्ञ केल्यावर आलेल्या ब्राह्मणांस सोम पिण्यासाठी देत असे व त्याबरोबर दक्षिणा म्हणून मांस व धन देत असें. यथावकाश तो राजा पृथ्वीलोक सोडून स्वर्गात जातो. कालांतराने पृथ्वीवरील त्याच्या वंशजांना पैशाची कमतरता जाणवू लागते. त्या वंशजाना माहीत असते कीं, त्यांचे पुरोहित भृगू संपन्न आहेत. त्या राजाचा वंशज भिकार्याच्या वेषात भृगूच्या दारी भिक मांगण्यासाठी जातो. कांहीं भृगूच्या वंशजानी त्यांच्या कडील संपत्ति भ्रष्ट क्षत्रियांकडून लुटली जाऊ नये म्हणून जमिनीत गाडून ठेवलेली होती. त्यानंतर ते ती संपत्ति इतर ब्राह्मणांना वाटून टाकत होते. कांहींनी कुलिन क्षत्रियांना मदत म्हणून दिली. असें असतांना कांहीं भ्रष्ट क्षत्रिय भार्गवांच्या घरात खणून ती संपत्ति उकरून

काढतात. ती अफाट संपत्ति ते क्षत्रिय पहातात. ते पाहून कांहीं क्षत्रिय असें समजतात कीं, हे भार्गव (भृगुचे वंशज) बेइमानी करीत आहेत. त्या गैरसमजामुळें ते त्या ब्राह्मणांचा अपमान करतात. भार्गव (भृगूचे वंशज) चूक नसूनही क्षमेची याचना करतात पण ते भ्रष्ट क्षत्रिय भार्गवांची तीक्ष्ण बाणांनी हत्त्या करण्यास सुरुवात करतात. तेवढ्याने समाधान न झालेले ते मूर्ख (भ्रष्ट) क्षत्रिय जगभर फिरून सगळ्याच ब्राह्मणांची हत्त्या करत रहातात. तेवढ्याने समाधान न झालेले ते भ्रष्ट क्षत्रिय ब्राह्मणांच्या गर्भवती बालकांची सुद्धा हत्त्या करू लागतात. अशारितीने संपूर्ण भृगू वंशाचा नाश होत होता. त्यावेळी एक भृगूवंशातील स्त्री हिमालयात निघून जाते. तेथे ती तिच्या मांडीवर थापा मारते ज्यामुळें तिचा पति तिचा गर्भ बनून येईल. जसें त्या ब्राह्मण गर्भवतीच्या अंगावर ते मूर्ख क्षत्रिय तिला मारण्यासाठी जाता तसें तिच्या उदरातून तो गर्भ पोट फाडून बाहेर येतो व त्यांच्याकडे रागांने पहातो. त्याबरोबर त्या प्रखर दृष्टीतून येणार्या किरणांमुळें त्या सगळ्या क्षत्रियांच्या नजरा नष्ट होतात व ते अंध होतात. तसें झाल्यावर त्या मूर्ख क्षत्रियांना पश्चात्ताप होतो व ते त्या गर्भाकडे क्षमेची याचना करतात. अशारितीने अंध झालेले ते क्षत्रिय डोंगर दर्यात आंधळे भटकत रहातात. शेवटी ते त्या भृगूवंशी स्त्रीकडे याचना करतात. ते तिला सांगतात, "अहो ब्राह्मण स्त्री, आम्हाला पुनः दृष्टी मिळवून द्या, आम्ही तुम्हाला वचन देतो कीं, ह्यापुढे आम्ही कोणालाही कोठल्याही प्रकारे त्रास देणार नाही. आमच्या गांवी जाऊन गुपचुपपणे राहू. कोठल्याही प्रकारचे पापकर्म करणार नाही. त्याकरतां तू कृपया तुझ्या मुलास आमची दृष्टी परत करण्यास सांगावे".

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथपर्वाचा एकशे ऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एक्याऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

वसिष्ठ पुढे सांगतात, त्या अंध क्षत्रियांच्या त्या विनवण्या ऐकून ती ब्राह्मण स्त्री बोलली, माझ्या बालकांने तुम्हाला अंध केलेले नाही. तसेंच मी सुद्धा तुमच्यावर क्रुद्ध झालेली नाही. एक गोष्ट खरी आहे किं माझ्या मुलाला तुम्ही जे कृत्य केले ते आवडलेले नाही. तुम्ही जेव्हा ते पाप करत होता तेव्हा मी माझा गर्भ शंभर वर्षे माझ्या मांडीत लपवून ठेवला होता. उद्देश इतकाच होता किं, भृगूवंश चिरंजीव राहो. त्या काळात तो माझ्या गर्भात असतांना सगळे वेद व त्याची अंग तो शिकला. त्याला त्याच्या बापाच्या खूनाचा वचपा काढावा असें वाटले तर ते अयोग्य होणार नाही. परंतु त्याच्या स्वर्गीय सामर्थ्यामुळें तुमचे फक्त डोळे गेले. म्हणून तुम्ही त्याच्याकडे तुमच्या डोळ्यासाठी भिक मांगा कदाचित तो ते देईल.

वसिष्ठ पुढे सांगतात, त्या मुलाच्या आईने सांगितल्या प्रमाणे ते आर्जव करतात व तो भृगू त्यांना माफ करतो. तो भृगू मांडी फाडून बाहेर आला म्हणून त्याचे नांव औरव (मांडीतून आलेला) पडले. त्या क्षत्रियांना त्यांची दृष्टी मिळते व ते आपापल्या घरी निघून जातात. तरी तो औरव शांत झालेला नसतो त्याच्या मनांत सगळी सृष्टी नष्ट करण्याची मनिषा असतेच. त्यासाठी तो घोर तपस्या करू लागतो. त्याची अशी कल्पना असते किं, अशारितीने सूड उगवल्याने त्याचे पूर्वज संतुष्ट होतील. त्याच्या त्या तपस्येची झळ सगळ्या सृष्टीला लागते. स्वर्गातील पितर व असुर, पृथ्वीवरील माणसे हे सगळे समजतात कीं, कां हा ऋषी अशी तपस्या करीत आहे. ती प्रतिज्ञा जगाच्या भल्याची नाही ते समजावून सांगण्यासाठी ते सगळे त्या ऋषीच्या आश्रमाकडे येतात, आणि सांगतात, "तुझी तपस्या फारच कठोर आहे. त्याची झळ आम्हा सगळ्यांना लागत आहे. तुला जसे वाटते तसे प्रत्यक्ष घडलेले नाही, म्हणून जरा ध्यान देऊन ऐक, वस्तुतः आम्ही सगळे भृगू ह्या जगात रहाण्यास कंटाळलो होतो. आम्ही आत्मघात करणे उचित नसल्यामुळें करणार नव्हतो कारण, आत्महत्त्या करणार्याला स्वर्ग मिळत नाही तर पाताळात जाऊ व पुनः पृथ्वी असें फिरत राहू. म्हणून आम्ही त्या मूर्ख क्षत्रियांना आम्हाला मारण्यास उद्युक्त केले व त्यानुसार त्यांनी आमचा नाश केला. त्या लोभी क्षत्रियांना राग व संशय यावा म्हणूनच

आम्ही ती अफाट संपत्ति जमिनीखाली गाडून ठेवली होती. त्यातून ते भांडण उत्पन्न झाले व त्या लोकांनी आमचा नाश करण्यास सुरुवात केली. अशारितीने आमचा मृत्यू झाल्यामुळें आम्हाला स्वर्गात येता आले. येथे कुबेरांनी आमच्यासाठी त्यापेक्षा जास्त माया ठेवलेली आहे. त्या मर्त्य जगातील संपत्ति आमच्यासाठी कांहीं महत्वाची नाही कारण ती संपत्ति नश्वर आहे. नश्वर धनाचा मोह धरणे अज्ञानाचे लक्षण समजले जाते. तू जे करू इच्छितोस ते योग्य नाही म्हणून, ती तपस्या जगाच्या नाशासाठी न करतां स्वताच्या व जगाच्या उद्धारासाठी करावी अशी आमची तुला आज्ञा आहे.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे एक्यांऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे ब्यांऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

तो गंधर्व पुढे सांगतो, तेवढे सांगितल्यानंतर सुद्धा तो महान ऋषी वसिष्ठ पुढे सांगतो. पितरांचे ते ऐकून औरव त्यांना उत्तर देतो, अहो माझ्या पितरानो, तुम्ही कांहीं बोला, आता मी घेतलेली प्रतिज्ञा व्यर्थ जाऊ शकत नाही. मी हे मान्य करण्यास तयार नाही किं माझा राग निरर्थक होता. जर मी आता मागे फिरलो तर ते तप मलाच मारून टाकील. जो माणूस आपला यथार्थ क्रोध आवरतो त्याला ते जीवनाचे तीन उद्देश (धर्म, हित व सुख) कधीच साध्य होत नाहीत. गंधर्व पुढे सांगतो, वसिष्ठ त्यांचे सांगत असतात, ते बोलतात, पितरांचा उल्लेख ऐकल्यावर तो बालयोगी औरव पितरांना उद्देशून बोलतो, अहो पितर, राजाचा राग जसा दुर्जनांचा नाश करण्यासाठी आवश्यक असतो, मी माझ्या आईच्या मांडीत असतांना माझ्या आईचे व इतर बायकांचे रडणे, किंचाळणे ऐकले आहे, जेव्हां त्यांना ते भ्रष्ट क्षत्रिय ठार मारत होते. नेमके त्याचवेळी माझ्यात हा क्रोध जन्मला आहे. माझी आई व तिच्या सारख्या अनेक गरोदर स्त्रीया व माझे पिता ह्यांचे त्यावेळी कोणीही संरक्षण करण्यासाठी आले नाहीत. माझ्या आईने मला तिच्या मांडीत लपवले व ती बोलली, जर अशारितीने कोणी अश्राप जीवांना असें ठार मारू लागले तर पाप वाढेल व जो त्या वाढणार्या पापाकडे निरर्थक असमर्थनीय कारणे देऊन दुर्लक्ष करील तोसुद्धा त्या पापाचा भागिदार असेल. जेव्हा राजे प्रजेचे संरक्षण करू शकत नाहीत व इतर करमणूकीच्या गोष्टीत रमतात तेव्हां असे पापात्मे पुनः पुन्हा असे अत्याचार करीत रहातील. ते सहन करणे मला शक्य नाही म्हणून मी तुमच्या विनंतीला स्वीकारू शकत नाही. जो अग्नी मी चेतवला आहे त्याला वेळीच त्या पापात्म्यांचे सर्पण पुरवले गेले नाही तर तो मला भक्षण करील व ते होऊ नये असें जर तुम्हाला वाटत असेल तर आम्हा दोघांच्या हिताचे काय असू शकेल ते सांगा.

वसिष्ठ सांगत रहातात, पितर त्याचे ते भावूक भाषण ऐकल्यावर त्याच्या बद्दलच्या प्रेमांने बाळ औरवाला सांगतात, तुझा राग व्यर्थ जाणार नाही व तुलासुद्धा कांहीं त्रास होणार नाही. तू तुझा क्रोधाग्नी त्या वरूण राजावर सोड. त्यामुळें पृथ्वीवरील समुद्राचे पाणी त्या उष्म्याने उडून आकाशात जाईल व पर्जन्य उत्पन्न होईल व ते पृथ्वीवरील सगळ्यांना

आवश्यक आहे त्यामुळें तो क्रोध उत्तम कारणी लागेल व तू सुद्धा स्वस्थ होशिल आणि देव सुद्धा सुरक्षित असतील.
वसिष्ठ नंतर बोलले, अरे माझ्या बाळा पराशरा तू त्या प्रमाणे करावेस. त्यानंतर औरवाने आपला क्रोध वरूणावर सोडला. त्यामुळें समुद्राचे पाणी बाष्पिभवन होऊन त्याचा एक मोठा घोड्यासारखा दिसणारा ढग तयार होतो, ज्याचे वर्णन वेदांत वडवामुख (पावसाळ्यातील काळी ढगं) असें केले आहे. तो समुद्रातील पाणी बाष्पाच्या रुपांने उडवत रहातो. म्हणून अरे पराशरा, जग नष्ट करण्याच्या गोष्टी करू नकोस. वरच्या ज्ञानाच्या अवस्थेत असलेल्या पराशरा तू शांत हो.
असारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे ब्यांऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग त्र्यांऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

त्यापुढे गंधर्व अर्जूनाला सांगत रहातो, ब्राह्मण ऋषी पराशर वसिष्ठाचे ते बोलणे ऐकून जग नष्ट करण्याचा विचार सोडून देतो. तरीसुद्धा तो महान ऋषी त्याच्या समाधानासाठी एक राक्षसांचा बळी घेणारा यज्ञ करतो. कारण, त्याच्या पित्याला एका राक्षसाने मारले होते. तो तेजस्वी मुनी राक्षसांना खाऊ लागतो. लहान मोठे असें सगळे राक्षस तो खाऊ लागतो. वसिष्ठ त्याला त्यापासून विरोध करीत नाहीत. आपल्या मुलाच्या दुसर्या प्रतिज्ञे बद्दल कांहीं न करण्याचे ठरवतो. त्या यज्ञात पराशर तीन यज्ञकुडा समोर असा बसतो किं, जणूकाय तो चौथा अग्नीकुंड असावा . तो शक्त्रीचा पुत्र सूर्यासारखा त्यात तळपत होता. सगळे मुनी व ऋषी पहात होते ते दृष्य जसे काय प्रत्यक्ष सूर्यच चमकत आहे. यज्ञकुंडात तुपाची धार धरली गेली होती. शेवटी श्रेष्ठ ऋषी अत्री यज्ञाचा समारोप करण्यासाठी तेथे आले. त्याशिवाय पौलस्त्य, पुलह व क्रतु सगळे महान ऋषी ज्यांना राक्षसांचा त्रास झाला होता ते सुद्धा आले. अरे भरतवंशाच्या कुलदीपका, अर्जूना, तेथे आल्यावर पौलस्त्य ऋषी पहातात किं, आधीच बर्याच राक्षसांचा नाश झाला आहे. ते पराशराला बोलतात, "अरे शत्रुघ्न पराशरा, तुझ्या ह्या यज्ञाला आता कोणीही अडवू शकत नाही. तुला हा यज्ञ करतांना संतोष झाला असेल. परंतु, तू ह्यात अनेक निरपराध राक्षसांचासुद्धा नाश केला आहेस त्याची तुला कल्पना आहे कां? त्या राक्षसांना तुझ्या पित्याच्या हत्त्येची साधी माहितीसुद्धा नसेल. अशारितीने कोणालाही विनाकारण मारल्यामुळें तुझ्यात व त्या अपराधी राक्षसांत काय फरक राहीला"? पुढे ते बोलतात, "असें करणे खर्या ब्राह्मणाला शोभत नाही. क्रोधाची मर्यादा व त्यातून उत्पन्न होणारी शांतता हाच खरा ब्राह्मणांचा गुण समजला जातो. म्हणून अरे शक्त्रीच्या पुत्रा, तुझ्या बापाप्रमाणें तूसुद्धा सर्व जाणून अशा गोष्टींपासून परावृत्त हो. विनाकारण कोणाही जीवाचा अशारितीने नाश करण्यामुळें तू स्वतः एक राक्षस झाला आहेस व म्हणून तूसुद्धा नष्ट झाला पाहिजेस ह्या यज्ञात असें जर कोणी म्हंटले तर ते तुला रुचेल कां? ब्राह्मणांने सर्व गोष्टी विवेकाच्या मदतीने करावयाच्या असतात, भावनेच्या आहारी जाऊन जर तू असे कृत्य केलेस केवळ तुझ्यात तपोसामर्थ्य आहे म्हणून, तर ते पापकारक ठरते. ब्राह्मणाला विवेकाची मर्यादा पाळावीच लागते. तुझ्या

अशा कृत्यामुळें तुझ्या पितरांना फार त्रास होत असेल. तुझ्या पित्याला जे भोगावे लागले ते त्याच्या कर्माचेच फळ होते. अरे वसिष्ठाच्या सुपुत्रा हे जरा समजून घे. तुझा बाप त्यानंतर स्वर्गात गेला आहे. कोणीही राक्षस तुझ्या पित्याला खाऊ शकणारा नव्हता, परंतु, शक्त्रीने स्वतःहून ते ओढवून घेतले होते कारण, त्याला पृथ्वीवर रहाणे अप्रस्तुत वाटत होते. त्यात विश्वामित्रसुद्धा कारणमात्र होता. आता दोघेही शक्त्री व कल्माशपाद स्वर्गात आनंदात रहात आहेत, आणि तू येथे त्यांच्या नांवाने पाप करत आहेस. वसिष्ठाची इतर मुलं, तुझे सगळे चुलते ते सुद्धा स्वर्गात मजेत आहेत. तुला माहीत नसेल म्हणून सांगतो, तू सुद्धा हा जो यज्ञ करीत आहेस ते सुद्धा तुझ्याकडून करून घेतले जात आहे हे तुझ्या लक्षात आले आहे कां? म्हणून अरे भाग्यवान मुला, आता हा यज्ञ आटोपता घे".

गंधर्व पुढे सांगतो, अशाप्रकारे पौलस्त्य सांगत असतांना त्याला वसिष्ठसुद्धा दुजोरा देत रहातात व त्यामुळें अखेरीस पराशर तो विध्वंसक यज्ञ संपवतो. त्या यज्ञाचा अग्नी नंतर ते ऋषी हिमालतातील अरण्याच्या कोठे तरी फार आत नेऊन सोडतात जेथे त्यामुळे कोणाचे नुकसान होणार नाही. तो अग्नी आजही राक्षस, जंगले व पाषाण जाळत असल्याचे दिसेल. *दुसर्या प्रतित दिले आहे, तो अग्नी तेथून पृथ्वीच्या पोटात शिरला व तेथेंच राहीला.*

अशारितीने आदि पर्वातील चैत्ररथपर्वाचा एकशे त्र्यांऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग चौर्यांऐंशीवा

(चैत्ररथ पर्व पुढे चालू)

अर्जुन गंधर्वाला विचारतो, "मला सांग कल्माशपाद राजा त्याच्या पत्नीला श्रेष्ठ योगी वसिष्ठांकडे जायला कां सांगतो? वसिष्ठ त्या राणीला कां जवळ घेतात जिला ते ओळखत नव्हते? ज्याला नैतिकतेचे नियम चांगले माहीत आहेत असा माणूस कां असें करील ते मला समजावून सांगा. त्यात पाप होत नाही का"?

माझ्या शंकांचे निरसन तू चांगले करशिल असें मला वाटते. ते ऐकल्यावर तो चैत्ररथ गंधर्व बोलला, "अरे शूरयोध्या, धनंजया, ऐक आता मी तुला ते सगळे वसिष्ठ व कल्माशपादाचे झाले ते सांगतो. कल्माशपाद असुराच्या कब्जात असतांना रागीट स्वरुपात तो त्याच्या पत्नीला घेऊन जंगलात फिरावयाला जातो. त्या अवस्थेत तो त्या जंगलातील अनेक हरणे, सांबर, विविध झाडे व इतर वेली हे पहात फिरत असतांना त्याला जबरदस्त भूक लागते. त्यावर तो राक्षसाच्या ताब्यात असलेला परंतु एरवी सज्जन असलेला राजा कांही खाण्यासाठी मिळते कां ते पाहू लागतो. राक्षस असल्यामुळें त्याला माणसाला खाण्याची भूक असते व अशात त्याला एक ब्राह्मण त्या जंगलात त्याच्या पत्नीसह संभोग करत असतांना दिसतो. ते दोघे एकमेकांत पूर्णतया रममाण झालेले असतांना तो राक्षस राजा तेथे येतो. त्याला पाहून ते ब्राह्मणाचे जोडपे सैरावैरा पळून जाऊ लागते. राक्षस त्यांचा पाठलाग करतो व अखेरीस ब्राह्मणाला पकडतो. ते पाहिल्यावर त्याची पत्नी राजाला बोलते, "अहो राजश्री, जरा माझे ऐका, आपण सूर्यवंशाचे अहात हे सगळे जग जाणते. आपल्याला नैतिकतेचे सगळे नियम माहीत आहात, आपण ऋषींच्या सेवेत असता, म्हणून आपल्याला हे करणे शोभत नाही, मला माहीत आहे किं, आपण त्या राक्षसाच्या प्रभावाखाली अहात, तरी असें पाप करणे योग्य नाही. आम्ही दोघे पतिपत्नी असून आमचे वासनिक कर्तव्य पार पाडत होतो जे सगळ्याच विवाहीतांना बंधनकारक असते. अजून आमचे कार्य पूर्ण झालेले नसतां तुम्ही मधेंच आलात व ते थांबवले आहे असे करणे तुम्हाला शोभत नाही. कृपा करा व माझ्या पतिला मुक्त करा". तो राक्षसाच्या कब्जात असलेला राजा ते ऐकत नाही आणि त्या ब्राह्मणाला खाऊन टाकतो. ती अभागिनी त्या

ब्राह्मणाची धर्मपत्नी रडू लागते. जसें ते अश्रू तिच्या डोळ्यातून बाहेर येतात तसें त्या अश्रूचे अंगारात रुपांतर होते व भडकून उठतात. त्यांच्या ज्वालांनी तो परिसर जळून जातो. त्या शोकविव्हल अवस्थेत ती ब्राह्मणी त्याला शाप देते. "अरे नीच माणसा, आमचा संभोग अपूर्ण असतांना त्या अस्वस्थ स्थितीत तू माझ्या डोळ्या देखत माझ्या नवर्याला खाल्ले आहेस, ज्याच्यावर माझे अपरिमित प्रेम आहे, माझा तुला शाप आहे किं, जेव्हा तू तुझ्या स्त्रीशी समागम करण्याचा प्रयत्न करशील तेव्हां तू सुद्धा जळून जाशिल आणि तुझी पत्नी त्या वसिष्ठमुनीशी संभोग करील, ज्याच्या पुत्रांना तू खाल्ले आहेस, व त्यापासून जे अपत्य होईल तो तुझ्या वंशाचा वारस होईल. असा शाप देऊन ती ब्राह्मणी, जी अंगीरस वंशाची होती, तिच्याच अश्रूंनी उत्पन्न केलेल्या अग्नीत उडी घेते व राक्षस झालेल्या कल्माशपादाच्या समक्ष सती जाते. ध्यानात बसलेल्या वसिष्ठाना ते सगळे क्षणात त्यांच्या दिव्यदृष्टामुळें समजते. त्यानंतर बर्याच काळानंतर जेव्हां तो कल्माशपाद राजा त्या राक्षसाच्या प्रभावातून मुक्त झाल्यावर तो गुणी राजा स्वताच्या पत्नीला, मद्यंतिला त्या शापाची कथा सांगतो व तिला विनंती करतो किं, ती वसिष्ठाबरोबर समागम करून त्यांचा वंश वाढवण्यात सहाय्य करील. वासनेच्या प्रभावा खाली असतांना एकदा तो राजा आपल्या पत्नीला पकडतो, त्याला त्या शापाचा विसर पडलेला असतो, ती त्याला त्याने सांगितलेली शापाची आठवण करून देते. राजा घाबरून जातो, त्याला त्याच्या त्या अमानूष कृत्याचा पश्चात्ताप होत असतो. त्यानंतर तो राजा आपल्या वंशाचा उद्धार करण्यासाठी वसिष्ठमुनींना आवाहन करतो.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे चौर्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंच्यांऐंशीवा

(चैत्ररथ पर्व संपले)

एवढे सगळे ऐकल्यावर अर्जुन त्या ज्ञानी गंधर्वाला विचारतो, "मला सांग आता, अशा कोणत्या वेदज्ञ ब्राह्मणांस आम्ही आमचे पुरोहित म्हणून नेमावे"? गंधर्व सांगतो, ह्याच वनात एक मंदिर आहे त्याचे नांव आहे, उत्कोचक. देवलाचा धाकटा भाऊ धौम्य तेथे ध्यानसाधना करीत असतो. तो तुमच्यासाठी माझ्यामते योग्य आहे, त्याला नेमावे.

वैशंपायन सांगतात, गंधर्वावर खूष होऊन त्याला शास्त्रशुद्ध पद्धतिने त्याच्याकडे असलेले अग्नीवेषाचे अस्त्र शिकवतो. नंतर तो त्या गंधर्वाला सांगतो आपल्या ठरलेल्या वचनाप्रमाणे जे घोडे तू मला देणार आहेस ते तूर्तास तुझ्याकडेच राहू देत. जेव्हां गरज लागेल तेव्हां ते मी तुझ्याकडून मागून घेईन. त्यानंतर धनंजय गंधर्वास बोलतो, "अरे मित्रा चैत्ररथा, मला आणखीन एक शंका आहे त्याचे समाधान तू करशील तर बरे होईल". ते ऐकल्यावर तो गंधर्व म्हणतो कीं, "निसंकोचपणे विचार काय विचारावयाचे आहे ते". त्यावर अर्जुन विचारतो, "असें बघ, तू आताचा व मी सुद्धा आताचा असें असतांना तुला सगळ्या प्राचीन गोष्टी ज्या तू मला सांगितल्या आहेस त्या कशा समजल्या व मी त्यांवर विश्वास कसा ठेवावा"?

ते ऐकून गंधर्व हसू लागतो व बोलतो, "अरे कुंतीपुत्रा , तुझी शंका तुझ्या अज्ञानातून आली आहे, तरी ती मी आता दूर करतो. मी व इतर स्वर्गीय प्रजाती अदृष्य निसर्गातील आहोत व तू दृष्य निसर्गातील अर्थात् पृथ्वीलोकातील आहेस. पृथ्वीलोकातील सर्व प्रजाती जन्मतात व मरतात व असें सतत होत असते. कारण, त्यांना काया असते जी वस्तुमात्रांची बनलेली असते. म्हणून ती काया यथावकाश नष्ट होणारी असते त्यामुळें मृत्यू अनिवार्य असतो त्या सगळ्या जीवांना, त्यात मनुष्य सुद्धा आला. त्यांचे अनेक जन्म व मृत्यू होत असतात त्याकारणांने भूतकाळ व वर्तमान काळ असें त्याला भासतात. त्याउलट अदृष्य निसर्गातील स्वर्गात जे असतात त्यांना काया नसते, ते नित्य अस्तित्वात असतात. तेथे सदैव वर्तमान काळच असतो. म्हणून पृथ्वीवरील घटना आम्ही स्वर्गीय प्रजाती अनंत काळ पहात असतो. आम्हाला मृत्यू नसतो कारण आम्हाला काया नसते.

म्हणून मी जे सांगितले ते सगळे खरे आहे. मी त्या काळात व आजही तसांच जागृत आहे व म्हणून ते पहात आहे. आम्ही अजरामर असतो. त्यात देव, असुर, गंधर्व, राक्षस, यक्ष, अप्सरा असें बरेच येतात. तरीसुद्धा एक गोष्ट तुला सांगावयास वाटते कीं, आम्ही स्वर्गीय प्रजातींना त्याच्या पुण्यप्रभावात होणार्या फरकानुसार ते पुनः प्राप्त करण्यासाठी अधून मधून माणसाच्या वंशात जन्म घ्यावा लागतो जसें तुम्ही पांडवांनी घेतला आहे. त्यांचे पितर होतात व पुनः स्वर्गात अथवा पाताळात अर्थात् अदृष्य निसर्गात ते जातात. त्यात अनेक स्थर आहेत व ज्याच्या त्याच्या पापपुण्य प्रभावानुसार सगळे होत असते. त्याकारणांने माणसांचे पुण्यकर्मामुळें स्वर्गात जाणे व पुण्य संपल्यावर पुन्हा पृथ्वीवर दृष्य निसर्गात येणे असे अव्याहतपणे होत रहाते, मोक्षप्राप्ती होईस्तोवर. त्यालाच सृष्टीचा क्रम असें म्हणतात". त्यानंतर अर्जुन पुनः चैत्ररथाला विचारतो, "मला सांग, मोक्ष प्राप्ती केवळ माणसालाच होते कां तुम्हा स्वर्गीय प्रजातींना सुद्धा होते? आता तुझे हे जे रुप आहे ती काया तुला कशी प्राप्त झाली"?

चैत्ररथ बोलतो, "आम्हालासुद्धा अखेरीस मोक्ष प्राप्ती अनिवार्य आहे व त्यासाठी आम्हालासुद्धा माणसाचा जन्म घ्यावा लागतो. मनुष्य जन्म सगळ्याना शेवटी अनिवार्य आहे. तुझा दुसरा प्रश्न ह्या माझ्या रुपा बद्दलचा आहे, अरें जिश्नु, हे माझे व माझ्या पत्नीचे मायावी रुप आहे ते खरे नाही. आम्ही स्वर्गीय प्रजाती अशारितीने मायावी रुप घेऊन पृथ्वीवर माणसांत वावरत असतो पण त्या रुपात आम्ही पुण्य मिळवू शकत नाही किंवा पापही करत नाही. हे रुप फक्त विरंगुळ्यासाठी आम्ही घेत असतो. आमच्याकडे ज्या विविध सिद्धी असतात त्यामुळें ते शक्य होते. तो केवळ भास आहे, त्यावर तू जाऊ नकोस. त्या संवादाने पांडवांचे समाधान होते.

त्यानंतर ते सगळे पांडव व तो गंधर्व एकमेकांना आदरपूर्वक अभिवादन करून निरोप घेतात. आणि त्या भागिरथीचा किनारा सोडून ते पुढे निघतात. पांडव त्या उत्कोचक तीर्थक्षेत्री जातात व धौम्यऋषीला त्यांचे मुख्य पुरोहित म्हणून नेमण्याचे ठरवतात. उत्कोचक गेल्यावर ते धौम्यऋषींना भेटतात व त्यांना त्यांचे पुरोहित होण्याची विनंती करतात. तेथे धौम्य वनफळांनी त्यांचे स्वागत करतात. पुढे धौम्यऋषीसुद्धा ते मान्य करतात व रितसरपणे त्यांची नेमणूक होते. आता पांडवाच्या बरोबर सहावी त्यांची मात

असें सहाजण व त्याबरोबर धौम्य पुरोहित असें सातजण प्रवासास निघतात. धौम्य त्यांचे पुरोहित झाल्यामुळें पांडवांचा आत्मविश्वास वाढतो. ते ज्ञानी ब्राह्मण पांडवांना योग्य मार्गदर्शन करतात. त्याप्रमाणें ते आता पांचाल देशाच्या राजकुमारीच्या स्वयंवरासाठी तयारीने निघतात. धौम्य त्या पांडवांची क्षमता ओळखून त्यांना आपले यजमानपद देतात. धौम्य ऋषीला पांडवांच्या पुढच्या वाटचालीची खात्री पटते व सगळे कांहीं निश्चित होते. आपल्या पुरोहिताच्या आज्ञेने ते पांचालदेशात जाण्यासाठी पुढची वाटचाल सुरु करतात.

अशारितीने आदिपर्वातील चैत्ररथ पर्वाचा एकशे पंच्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंच्याऐंशीवा

(स्वयंवर पर्व सुरु)

वैशंपायन ऋषी सांगतात, अशा तयारीने ते महाबली पांच पांडव पांचाल देश पहाण्यासाठी व त्याहून जास्त, द्रौपदीला, लग्नाच्या दृष्टीने, पहाण्यासाठी पुढचा प्रवास करू लागतात. पांच पांडव त्यांच्या आईबरोबर चालत असतां त्याना वाटेत बरेच ब्राह्मण त्याच दिशेने जातांना दिसतात. त्यातील कांहीं ब्रह्मचारी होते. ते ब्रह्मचारी पांडवांना पाहून त्यांना विचारतात, "आपण कोठे जात अहात"? "आपण कोठून आला अहात"? त्यांच्या त्या प्रश्नांना पांडवांतील मोठा, युधिष्ठीर उत्तर देतो. आम्ही पांच सख्खे भाऊ आईबरोबर पांचाल देशाकडे जात आहोत, आम्ही एकचक्र गांवाकडून आलो आहोत". त्यावर ते ब्रह्मचारी पांडवांना सांगतात, "आम्ही द्रुपदाच्या घरी पांचाल देशाकडे जात आहोत. तेथे मोठा सोहळा आयोजला आहे, त्यामुळें तेथे फार पैसा खर्च होणार आहे तेव्हां त्यात आम्हालासुद्धा कांहीं दक्षिणा मिळेल अशा आशेने आम्ही तेथे जात आहो. राजा यज्ञसेन, सामान्यतः द्रुपद म्हणूनच ओळखाला जातो तो त्याच्या यज्ञसिद्ध मुलीचे लग्न स्वयंवर पद्धतीने करणार आहे. असें सांगतात किं, त्या मुलीच्या अंगाला निळ्या कमळांचा सुवास येतो. तिची कांति निर्दोष व शरीर रचना सर्वांगसुंदर आहे. रंगाने सावळी असली तरी त्यात चंद्राची शितळता आहे. तिचा भाऊ दृष्टद्युम्न आहे जो सुद्धा यज्ञसिद्धच आहे. तो यज्ञातून आला तोंच चिलखत व शस्त्रांसह, तो त्याच्या शौर्यासाठी व धाडसासाठी सर्वत्र ख्यातनाम आहे. तो पांडवांचे गुरू द्रोण ह्यांचा वध करणार आहे, अशी वदंता आहे. त्या स्वयंवरासाठी विविध देशांतून राजे रजवाडे त्यांच्या त्यांच्या वैभवाचे दर्शन करत येणार आहेत असें समजते. ते सगळे राजे यज्ञ करणारे आहेत. ते अशा यज्ञात ब्राह्मणांना मोठ्या किमती दक्षिणा देतात. ते राजे महारथी असून त्यांना हरवणारे कोणीही नाहीत असें समजले जाते. ते ह्या स्वयंवरात भाग घेणार आहेत. तो मोठा सोहळा आहे. तेथे आम्हाला बरीच मोठी दक्षिणा व इतर मजेच्या चिजा मिळणार आहेत. त्या सोहळ्यात आम्ही कोठेही फिरण्यासाठी जाऊ शकतो. त्या सोहळ्यात भाग घेण्यासाठी देशोदेशांतून विदुषक, कवी, गायक, नकलाकार, नर्तक, नर्तकी, पुराणिक, मल्ल, कुस्तीगिर, वार्ताहर, स्तुतीभाट असें

सगळे आपापली कला दाखवणार आहेत. ते सगळे पाहून व जे दान मिळेल ते घेऊन आम्ही परत आमच्या आश्रमाकडे परतणार आहो. तुम्हीसुद्धा आमच्यासारखेच अहात कां"? पुढे ते ब्रह्मचारी विचारतात, "तुम्ही इतके सुंदर स्वर्गीय तेजाने चमकणारे कोण अहात"? आम्हाला तर वाटते, ती द्रुपदाची कन्या, कृष्णा तुमच्यापैकीं एकाला पाहून निवडेल. हा तुमचा मल्ल वाटणारा भाऊ कदाचित मल्ल युद्धात मोठी रक्कम सहज जिंकेल". ते त्या निरागस ब्रह्मचार्यांचे निष्पाप बोलणे ऐकून युधिष्ठीर त्याना सांगतो, "आम्हीसुद्धा त्याच उद्देशाने तेथे जात आहोत. आपण सगळे एकत्र तेथे जाऊया. चला, तो स्वयंवराचा सोहळा पाहूया".

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे पंच्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सहाऐंशीवा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया पुढे ऐक, अशा रितीने ते त्या ब्राह्मणांबरोबर बोलत पांचाल देशाच्या दक्षिणेकडील भागात जातात. जेथे राजा द्रुपदाचे राजधानी होती. ते जात असतांना त्यांना वाटेत द्वैपायन मुनी दिसतात, त्यांना इतर अभिवादन करत होते व ते इतरांनी अभिवादन करत असें चालले होते. महारथी पांडव सावकाशपणे त्या प्रदेशातील सुंदर नयनरम्य वने व उपवने आणि सरोवरं पहात व अधून मधून विश्रांती घेत प्रवास करतांना ते सर्व भागाचा अभ्यास करत असतात. त्यांच्या मधूर वाणीमुळें ते सगळ्यांना प्रसंन्न करतात, राजधानीत आल्यावर तेथील किल्ला पाहिल्यावर ते सगळे अखेरीस यज्ञसेनाच्या निवासस्थानी पोहोचतात. पांडवांना त्यांच्या रहाण्याची जागा मिळते. ती एका कुंभाराच्या घराजवळ असते . पांडवांनी ब्राह्मणाचा वेष घेतला असल्याने ते त्याप्रकारचे ब्राह्मणी व्रतस्थ जीवन जगू लागतात. त्यामुळें कोणालाही त्यांच्या खर्या स्वरुपाचा साधा अंदाज देखील येत नाही. तेथे असतांना ते दररोज भिक्षा मांगण्यासाठी रिवाजाप्रमाणे कुंतीला सांगून बाहेर पडत असतं . सगळे बोलतांना त्यांना समजते किं, द्रुपदाला त्याची कन्या धनंजयाला, किर्तीला पंडुच्या तिसर्या पुत्रांस द्यावयाची होती परंतु, तो आता हयात नाही म्हणून कांहीं हळहळ करतांना दिसत होते. द्रुपद म्हणून मुद्दाम असे धनुष्य बनवून घेतो जे फक्त अर्जुनच ताणू शकेल. परंतु तो त्याबद्दल कोणालाही कांहीं सांगत नाही. आकाशात कांहीं यंत्रणा उभी करून त्यात एक लक्ष्य पकडून ठेवले होते व स्वयंवराचा पण असा ठरतो किं, जो दिलेल्या बाणांनी ते लक्ष्य मारील त्याला कृष्णा मिळेल.

वैशंपायन पुढे सांगतात, द्रुपद ते सांगून स्वयंवराच्या परीक्षेस सुरुवात करतो. ते ऐकून देशोदेशीचे राजे त्यांच्या पुरोहितांसह येतात. त्यामुळें बरेच ऋषी तो सोहळा पहाण्यासाठी त्यांच्या राजांबरोबर येतात. त्याच प्रमाणे दुर्योधन सुद्धा कृष्णाला जिंकण्यासाठी येतो. त्याला साथ देण्यासाठी कर्ण येतो. त्याच प्रमाणें अनेक उच्च वेदांती ब्राह्मण विविध प्रदेशांतून आलेले असतात. तेथे आलेल्या सगळ्या पाहुण्यांचे स्वागत मोठ्या आदराने केले जाते. तो स्वयंवर पहाण्यासाठी प्रजाजन लोटून आलेले होते. एका भव्य शामियान्यात त्या सगळ्या आगतांची बसण्याची व्यवस्था केलेली असते. त्या प्रेक्षागाराचे प्रवेशद्वार

ईशान्य दिशेला असते. द्रुपदाची राजधानी भव्य महालांनी सजलेली असते. त्या भोवती रुंद व खोल सीमाचर असतो त्यामुळें कोणीही सहजपणे त्या ठिकाणी येऊ शकत नसे. सीमाचरावर जागोजागी प्रवेश द्वार असतात ज्यांतून अभ्यागतांचे स्वागत होत असते. संपूर्ण प्रेक्षागारावर कापडाचे छत बसवलेले होते. त्यासाठी रंगीबेरंगी कापडाचा उपयोग केला होता. तुतार्या वाजत होत्या त्या सोहळ्याच्या स्वागतासाठी व चौफेर सुगंधी द्रव्यांचा शिडकावा केलेला होता त्यामुळें सगळे वातावरण प्रसंन्न झाले होते. नगरातील कांहीं इमारती इतक्या उंच होत्या कीं जणू काय त्या कैलासाला भिडल्या आहेत. त्या इमारतीच्या खिडक्यांना सोनेरी कापडाच्या जाळ्या बसवलेल्या होत्या. भिंतींवर हिरे व माणके बलवलेली होती. त्यातील जिने सहज चढता येतील अशा उताराचे होते. त्या इमारतीतील मजल्याच्या जमिनी उंची गालिच्यांने सजवलेल्या होत्या. त्यांवर जरीकाम केलेले होते. त्या इमारती हिमालयातील उंच शिखरासारख्या वाटत होत्या. अशा सजवलेल्या सातमजली इमारतींत ते आमंत्रित राजे रहाण्यासाठी उतरले होते. त्या राजांच्या अंगावरील दागिन्याचे काय सांगांवे, ते राजे आमंत्रित इतर राजांच्यापेक्षा आपले वस्त्र जास्त महाग आहे हे दाखवण्यात दंग होते.

प्रजाजन त्या भव्य प्रेक्षाघरात तयार केलेल्या बैठकांवर विराजमान झाले होते. ते सगळे त्यांच्या सुकुमार राजकन्येला सजलेली पहाण्यासाठी आतूर होते. पांडवसुद्धा त्या प्रेक्षागारात जेथे ब्राह्मणांची सोय केली होती तेथे जाऊन बसले. त्यांच्याबरोबर त्यांची माता नसे, कारण तिला वाटत होते किं, तिची मुलं भिक्षा मागण्यासाठी फिरत आहेत व म्हणून ती एकटी त्या छोट्या घरात त्यांची भिक्षा आणण्याची वाट पहात असें. त्या आमंत्रित राज्यांचे चंदनाच्या गंधाने स्वागत केले गेले होते. ब्रह्माचे ते भक्त त्याच्या वतीने त्यांच्या राज्याचे संरक्षण वैर्यांपासून करीत होते. त्यांच्या चांगल्या कामामुळें सगळे जग त्यांचे कौतुक करत होते असे ते सगळे होते.

पंधरा दिवस हा सोहळा चालू होता व त्या काळात विविध करमणूकीचे कार्यक्रम अभ्यागतांच्या मनोरंजनासाठी होत होते. शेवटी स्वयंवराचा शुभ दिवस उगवतो. त्या दिवशी सुद्धा आपली भिक्षा मागून ते महारथी पांडव नित्याप्रमाणे त्या प्रेक्षागृहात येऊन आपल्या आसनांवर बसतात. त्यांचे तेथे झालेले ब्राह्मण ब्रह्मचारी मित्र त्यांची जागा राखून

ठेवत होते. त्यांची माता कुंतीला माहीत नव्हते किं तो स्वयंवराचा दिवस आहे. ती नेहमीप्रमाणे आपली मुलं भिक्षा आणतील ह्या विचारात घराची सगळी कामं उरकत होती.

त्या शेवटच्या दिवशी कृष्णा आपल्या सर्व साजश्रृंगारानिशी त्या मंडपात येते. तिच्या हातात एक सुवर्णाची थाळी असते व त्यात अर्ध्य करण्याची सामुग्री असते. त्या शिवाय वरमाला म्हणून एक हार तिच्या मनगटावर असतो. त्यानंतर खरा विधी आरंभ होतो. ब्राह्मण शुभ कार्याचे विधी करू लागतात. त्यावेळी एकदम सर्व वाजंत्री आपली वाद्ये थांबवतात व एक शांत वातावरण तयार होते. त्यानंतर समारंभपूर्वक दृष्यद्युम्न आपली बहिण कृष्णा तिचा डावा हात अलगद धरून त्या ठिकाणी येतो. आपल्या बुलंद व धारदार कर्कश्य आवाजात मोठ्याने ओरडून जाहिर करतो ते स्वयंवराचे नियम. दृष्टद्युम्न त्या जमलेल्या आमंत्रितांना व इतर समाजाला आपल्या बहिणीच्या स्वयंवराचे नियम सांगतो. तो सांगतो, "ऐका समस्त आमंत्रित सज्जनहो, माझ्या प्रिय बहिणाशी ज्याला विवाह करावयाचा आहे तो येथे असलेले धनुष्य उचलून त्याला ताणून येथे ठेवलेले बाण लावून वर यंत्रात जे एक लक्ष्य फिरत आहे ते छेदेल. जो हे करू शकेल त्याला माझी बहिण कृष्णा वरमाला घालेल, फक्त तीन वेळा संधी दिल्या जातील. त्यानंतर तो दृष्टद्युम्न, आपल्या बहिणाची तेथे जमलेल्या सगळ्या राजांची ओळख करून देतो त्यात त्या राजाचा वंश, त्याची कर्तबगारी इत्यादी माहिती तो तिला व त्याबरोबर तेथे जमलेल्या समस्त प्रजाजनांना सांगत रहातो. त्यात बराच अवधी जातो. त्यानंतर अखेरीस तो सांगतो किं, जर कोणाही क्षत्रियाला ते जमले नाही तर ब्राह्मण ब्रह्मचार्यांस संधी दिली जाईल. त्यानाही नाही जमले तर प्रजाजनातील कोणालाही संधी दिली जाईल. त्याशिवाय स्वयंवराचा अतिम निर्णय कृष्णा घेईल.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे सहाऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सत्त्याऐंशीवा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

तेथे दृष्टद्युम्न त्या जमलेल्यांची नांवे घेत जातो. ती अशी, दुर्योधन, दुर्विसह, दुर्मुख, दुष्प्रदर्शन, विविंसती, विकर्ण, सह, दुःशासन, युयुत्सू, वायूवेग, भिमवेगर्व, उग्रयुधा, वलकी, कनकायू, विरोचन, सुकुंडल , चित्रसेन, सुवर्च, कनकध्वज, नंदक, वाहूशाली, तुहूंद, विकट, हे धृतराष्ट्राकडून आले आहेत. त्यांच्या बरोबर त्यांचा मित्र महाबली धनुर्धारी कर्ण आला आहे. हे सगळे त्या बाजूचे तुझा हात मागण्यासाठी आले आहेत. ज्यांची नांवे घेतली ते त्या प्रमाणे उठून कृष्णेला अभिवादन करतात. असंख्य इतर राजे क्षत्रिय तुझा हात मांगण्यासाठी येथे हजर झाले आहेत. शकूनी, सौवल, वृशक, वृहदेव हे गांधार नरेशाचे सुपुत्र आले आहेत. महायोद्धा द्रोणाचार्यांचा सुपुत्र अश्वत्थामा आणि भोज आपल्या रत्नजडीत पोषाखांने तेथे बसलेले आहेत. त्याशिवाय वृहंट, मनिमन, दंडधर, सहदेव, जयत्सेन, मेधासंधी, विराट, त्याचे दोन मुलगे शंख आणि उत्तर, वर्धक्षेमी, सुसर्म, सेनबिंदू, सुकेतू, त्याची दोन मुलं सुनर्म व सुवर्च. त्याशिवाय सुचित्र, सुकुमार वृक, सत्यध्रिती, सूर्यध्वज, रोचमन, निल, चित्रायुध, अंगसुमन, चेकितन, महाबली श्रेनीम, चंद्रसेन, समुद्रसेनाचा मुलगा जरासंध, विदंत, आणि दंड बाप व लेक पौंड्र, वासुदेव, भगदत्त, कलिंग, तम्रलिप्त, पट्टणचा राजा महारथी सल्य, मद्र देशाचा राजा व त्याचा मुलगा रुक्मंगद, रुक्मारथ, कुरु वंशाचा राजा सोमदत्त व त्याची मुलं भूरी, भुरीश्रव. तसेंच साल, सुदक्सिन. पुरु वंशाची राजा कम्वुज, वृहदत्त, सुशेन, सिवी, उशिनराचा मुलगा पतचरनीहंत, करुषाचा राजा शंकरशन (बलराम), वासुदेव (श्री कृष्ण), रुक्मी, चारुदेशन, प्रद्युम्न, अक्रूर, सत्यकी, तेजस्वी उद्धव, कृतवर्मन, हृदीकाचा पुत्र, पृथू, विप्रीथू, विदूरथ, कंक, शंकू, गवेशौ, असव, अनिरुद्ध, शमिक, शरीमेजय, वातपी, पिंडारक, उशिनर हे सगळे वृष्णी कुळाचे. भगिरथ, विहतक्षेत्र, जयद्रथ, सिंधूचा मुलगा, बृहद्रथ, वल्हीकीन, महारथी शतायू, उलूक, कैतव्य, चित्रंगद, सुवंगद, महाबुद्धीमान वत्सराज, कौसलचा राजा शिशूपाल, मगधचा जरासंध, असें बरेच सामर्थ्यवान राजे क्षत्रिय वर्णाचे जगभरातून आले होते. सगळ्यांना उत्सुकता होती कोण ते लक्ष्य मारेल. कृष्णा कोणाला वरमाला घालेल त्याची उत्सुकता होती.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे सत्याऐंशीवा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठ्याऐंशीवा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, तेथे जमलेले तरुण राजपुत्र आपापल्या श्रीमंती रुबाबात एकमेकांना आपले वैभव दाखवत व चिडवत आपल्या कर्तृत्वाच्या गप्पा मारत आपली खास हत्यारे दाखवत मोठ्या दिमाखाने माजावर आलेल्या हत्तीसारखे डुलत होते. दृष्टद्युम्नाचे प्रास्ताविक संपल्यावर ते मोठ्या हिरीरीने आपल्या स्थानावरून उठून मोठ मोठ्याने ओरडून सांगू लागले किं, कृष्णा माझीच आहे व मी तिला घेऊन जाणारच, वगैरे वगैरे. हे असें दृष्य होते जसें उमाच्या साठी सगळे देव उठून तिचा हात मांगत होते. त्यानंतर प्रत्यक्ष चढाओढ सुरु होते. एक एक करून ते क्षत्रिय राजे कृष्णेचे स्वप्न पहात त्या रिंगणात उतरले. त्यांच्या आव्हानं प्रतिआव्हानाने तो परिसर दणाणून गेला होता. त्यांचे मत्सरांचे टोमणे एकमेकांना मारलेले सगळे ऐकत होते. त्या धुमश्चक्रित ते स्वताच्या जिवलग मित्रालासुद्धा आव्हान देत होते, त्यांना ती मैत्री त्यावेळी आठवत नव्हती.

त्या वेळी स्वर्गीय रुद्र व आदित्य आपल्या रथांतून तेथे आले. त्या शिवाय स्वर्गातून इतर देव जसें वसु, आश्विनीकुमार, स्वाध्य, मरुत, कुबेर आणि प्रत्यक्ष यमदेव पुढे चालत होते व त्या पाठोपाठ दैत्य आणि सुपर्ण, नांग, गुह्यक, चरण, विश्वावसु, नारद, पर्वत आणि उच्च दर्जाचे गंधर्व, अप्सरा त्या सोहळ्याला पहाण्यासाठी आले होते. त्या शिवाय हलयोद्धा (बलराम), जनार्दन (कृष्ण) हे वृश्नी वंशाचे, तो सोहळा पहाण्यासाठी आले होते. वासुदेव तेथे आल्यावर प्रथम सगळ्या अभ्यागतांच्या बसण्याच्या जागी कोण आले आहेत ते पहातो. तेथे तो ब्राह्मण ब्रह्मचार्यांच्या मंडपात ते तेजस्वी पांडव बसलेले पहातो व आपल्या मोठ्या भावास ते दाखवतो. तो बलरामाला दाखवतो, ते पहा, युधिष्ठीर, त्याच्या बाजूला भिम, त्याच्या कडेला जिश्नू (अर्जुन) व नंतर ते दोन देखणे जुळे बंधू आलेले आहेत. त्यांतील भिमाला पाहून बलराम चिडून ओठ चावून गप्प बसतो. हे सुद्धा कृष्णाकडे (द्रौपदीकडे) आकर्षित झाले आहेत हे वासुदेव समजतो. बाकीच्या क्षत्रियांना द्रौपदी शिवाय कांहींही दिसत नसते. त्यांच्या नजरा केवळ त्या सावळ्या रंगाच्या यज्ञसेनाच्या यज्ञसिद्ध कन्येकडे लागलेल्या असतात.

इतर राजे व त्यांचे मुलगे व नातवंडे फक्त द्रौपदीला आपल्याकडे आकर्षित करण्यात दंग झालेले असतात. त्यामुळें त्यांच्या लक्षात हे महाबली पांडव ब्राह्मणाच्या कक्षात बसले आहेत ते येत नाही. पांडव कृष्णाकडे पाहून तिच्या सौंदर्यामुळें आश्चर्यचकित होतात. त्याचप्रमाणे कर्णाचे तेज पाहूनही तो जमाव आश्चर्यचकित होत होता. त्या सोहळ्याला पहाण्यासाठी स्वर्गातून येणार्या स्वर्गीय अभ्यागतांच्या गर्दीमुळें आकाशात सुद्धा दाटी झाली होती. त्यांत ऋषी, गंधर्व, राक्षस, यक्ष, किन्नर, नाग, सुपर्ण, असुर, दैत्य व दानव ह्यांचा मोठा भरणा होता. आकाशातून सुगंधी फुलांचा परिमळ सर्वत्र पसरला होता. नगार्यांचा आवाज व बासुरीची धून सगळ्या वातावरणात दुमदुमत होती. आकाशातून येणार्यांची गर्दी एवढी झाली होती किं, पुढे सरकण्यास जागा नव्हती. जो तो आपला रथ पुढे कसा काढता येईल त्या विवंचनेत होता.

कर्ण, दुर्योधन, सल्व, सल्य, अश्वत्थामा, कृथ, सुनित, वक्र, कलिंगदेशाचा राजा, वंग, पांड्य, विदेहचा राजा, यवनांचा प्रमुख, विविध देशांचे अधिपति त्यांच्या मुलांबरोबर त्या शर्यतीत उतरले होते. आपापली रत्नजडीत वस्त्रे परिधान करून ते तेथे त्यांची पाळी कधी येते ते वाट पहात असतात. त्यांचा जोर कमालीचा दिसत होता. जशी पाळी येई तसे ते पुढे होऊन त्या धनुष्याला ताणून बाण लावण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु, त्या धनुष्याचे दांड असें होते किं, त्यांना तो ताणता येत नव्हता.

प्रत्येक जण बरीच मेहनत केल्यानंतर थकल्यामुळें यत्न सोडून देत होते. कांहीं ते करतांना तोल जाऊन खाली पडत व त्यावेळी इतर बघे हसत होते, त्यामुळें त्या राजांची मोठीच पंचाईत होत असें. त्या राजांची ती खरी परीक्षा होती. धनुष्याला ताणण्यात त्यांचे कपडेसुद्धा खराब होत होते, त्यांच्या गळ्यातील माळा तुटून पडत होत्या. कित्येकांना श्वास लागत होता. एक एक करून ते राजे आलेल्या अपयशामुळें कृष्णेचे स्वप्न पहाणे सोडून देत होते व आपल्या जागी हतबल होऊन बसत होते. सूर्यपुत्र कर्णाची पाळी येते. तो महारथी जेथे धनुष्य होते तेथे जातो व आत्मविश्वासांने ते ताणून त्याला दोर लावून अगदी लिलया बाण मारतो व लक्ष्य खाली पाडतो. सगळ्यांनी ते पाहून जल्लोष केला पण द्रोपदी मात्र ओरडून सांगते, "छी, छी, मी सुतपुत्राशी लग्न नाही करणार". ते ऐकून कर्ण

आकाशातील सूर्याकडे पाहतो व नंतर तुच्छपणे कृष्णाकडे छद्मी हास्य करत पहातो व ते अवघड धनुष्य बाजूला फेकून देत आपल्या जागी जाऊन बसतो.
जवळ जवळ सगळे क्षत्रिय झाले, तरी कृष्णाला हवा तो वर मिळालेला नसतो. शेवटी छेड्डीचा राजा साक्षात यमच जणूकाय असा शिशुपाल, दमघोषाचा पुत्र, तेथे येतो व धनुष्याला ताणण्याचा प्रयत्न करतो. ते करतांना तो तोल जाऊन खाली पडतो. शरमेने मान खाली घालून तो निघून जातो. त्यानंतर येतो जरासंध, महाशक्तिमान, थोडावेळ त्या धनुष्याकडे एकटक पहात रहातो. दम घेऊन धनुष्याला ताणण्याचा प्रयत्न करतो. तोसुद्धा तोल जाऊन कोसळतो जमिनीवर. तो शरमेने खाली मान घालूनच उठतो व आपल्या जागी जाऊन न बसता सरळ ते प्रेक्षागृह सोडून थेट त्याच्या राजधानीकडे निघून जातो. त्याला अशारितीने जाताना पहातांना कृष्णा गालातल्या गालात हसते. त्यानंतर मद्रदेशाचा राजा सल्य येतो धनुष्याला ताणतांना त्याचा अपानवायू मोठा आवाज करून बाहेर पडतो. त्यामुळें सर्व प्रेक्षागृहात एकच हंशा पिकतो त्याचीसुद्धा तिच गत होते. शरमेने तो सुद्धा तडक निघून जातो. अशारितीने त्या भर सभेत सगळ्या राजांची खिल्ली उडते तेव्हां दृष्टद्युम्न ब्राह्मणांतील कोणी ब्रह्मचारी प्रयत्न करतो कां असे जाहिरपणे विचारतो. पांडवांतील युधिष्ठीर जिश्नूकडे पहातो.
अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे एकोण अठ्ठ्याऐंशीवा भाग संपला

# आदिपर्व भाग एकोण नव्वदावा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, सगळे क्षत्रिय आपापला प्रयत्न करून झाल्यावर दृष्टद्युम्नाच्या आदेशानुसार ब्राह्मणांत बसलेला अर्जुन उठतो. तो साक्षात इंद्र जसा सावकाशपणे चालत त्या धनुष्याच्या जागी जाऊ लागतो. ज्येष्ठ ब्राह्मणांतील कांहीं जे चर्मवस्त्र परिधान केलेले होते, आनंदाने जल्लोष करतात. तसेंच कांहीं ब्राह्मण म्हणतात, जे सल्यासारख्या क्षत्रियांना नाही जमले ते हा ब्राह्मण कसा करणार. कांहीं केवळ एक त्यांच्यातील ह्या आव्हानाला सामोरी जाण्याचे धाडस करीत आहे म्हणून आनंद दाखवतात. कांहीं ब्राह्मण म्हणतात, हे दुःसाहस आहे, त्याने कांही साध्य होणार नाही तर दुसरे कांही कुजबूजतात, ब्राह्मणांने निदान प्रयत्न केला हेंच महत्वाचे आहे. आणि जर हा तरुण ब्राह्मण ते करू शकला तर काय मजा येईल असें कांही तरुण ब्रह्मचारी एकमेकांना सांगतात. दुसरे कांहीं बोलतात, जरी हे दुःसाहस असले तरी त्यांने कांही बिघडत नाही, जर जिंकला तर त्याला ती राजकन्या मिळेल व जर नाही तर कांहींच बिघडत नाही, एकंदर हा सौदा दोनही बाजूने फायद्याचाच ठरतो आहे. कांहीं चिरपूट ब्रह्मचारी एकमेकांना विनोदाने विचारतात, अरे, जर त्याला ही सुंदर कन्या मिळाली तर तो काय करणार तिचे, असें विविध कल्पनाविलास त्या ब्राह्मण कक्षात चालू होतात. त्यातील म्हातारे बुजूर्ग ब्राह्मण तरूण ब्रह्मचार्यांना जरा गप्प बसा असें सांगतात पण त्यांचे हास्य विनोद कांहीं थांबत नाहीत. कांहीं म्हणतात काय ह्याने तिरंदाजीचा अभ्यास खरोखरच केला आहे कां उगाचच शिष्टपणा करतोय! कांहीं चिंतातूर ब्राह्मण उगाचच चिंता करतात किं, जर त्याला नाही जमले तर आम्हा सगळ्या ब्राह्मणांची क्षत्रिय छिथू करतील, तर दुसरे कांही बोलतात, ह्यात छिथू होण्यासारखे कांहीं नाही कारण, अजून पर्यंत, कर्ण जो सुतपुत्र आहे, सोडला तर इतर कोणाही खानदानी क्षत्रियांस ते जमलेले नाही. आणखीन एक ज्येष्ठ ब्राह्मण ओरडून बोलतो, अरे, त्याला आपण उत्तेजन दिले पाहिजे मग परिणाम कांहीही हो. अर्जुन आता त्या धनुष्याजवळ पोहोचला होता. आता प्रेक्षकांचा सूर बदलला, ते त्या राजबिंड्या तरुणाचे सौंदर्य, गोरा रंग, पिळदार देहयष्टी व त्याचे रुबाबदार चालणे पाहून हा कोणी ब्राह्मण आहे कां कोणी गंधर्व ब्राह्मणाच्या वेषात पैज जिंकण्यासाठी आला आहे, असें वाटण्याचे कारण कन्या

यज्ञसिद्धा आहे. असा प्रश्न विचारतात. एक बुजूर्ग ब्राह्मण उद्गारतो, हा खरोखरच ब्राह्मण आहे कां? एक दुसरा बुजूर्ग ब्राह्मण बोलतो, मला वाटते हा जिंकणार, चला आपण सगळे त्याला यश इच्छू. दुसरा सुचवतो, अरे, कांहीं हिंमत असल्याशिवाय कोणीही अशी हरकत करणार नाही, दृष्टद्युम्नाची बहिण आहे म्हणून मला वाटते ह्यात खात्रीने धाडस आहे. आणखीन एक वृद्ध ब्राह्मण बोलतो, त्या राजकन्येचा विवाह होणे आवश्यक आहे तरी, कोणीतरी ती पैज जिकली पाहिजेच, नाहीं कां? इतर कांहीं ब्राह्मण बोलतात, असें कांहीं ह्या त्रैलोकात नाही जे एक ब्राह्मण साध्य करू शकत नाही. ह्या आधीसुद्धा ब्राह्मणांनी क्षत्रियांचा पाडाव युद्धात केल्याची अनेक उदाहरणें आहेतच कीं! आणखीन एक बोलतो, अरे ह्या क्षत्रियांना हि विद्या कोणी द्रोण अथवा कृप असें ब्राह्मणच शिकवतात, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ब्राह्मणच क्षत्रियांना सर्व विद्या शिकवतात, तो अश्वत्थामा पहा एक ब्राह्मणच नाहीं कां, तो कसा ह्यात भाग घेत होता, मग ह्याने कां घेऊ नये. पूर्वी जामदग्न्यानी सगळ्या क्षत्रियांना मारले होते, अगस्त्यानी सारा समुद्र प्राशन केला होता, अशी बरीच उदाहरणे आहेत ज्यातून ब्राह्मणांच्या क्षात्रतेजाची पारख होते. ब्रह्मणांनी स्वतःला क्षत्रियांपेक्षा कमी समजू नये ह्या क्षेत्रातसुद्धा अशा विविध प्रतिक्रीया व्यक्त होत होत्या. त्यातला एक छाती फुगवून बोलला, ब्राह्मण शापादपी शरादपी (खरा ब्राह्मण शत्रूला शापाने अथवा शस्त्रांने मारू शकतो) असतात हे आपण सगळे विसरलात कां? सर्व ब्राह्मण त्या नंतर एकवाक्यतेने त्या राजबिंड्या ब्राह्मण रुपातील अर्जूनाला शुभेच्छा जोरांने ओरडून व्यक्त करतात. अशारितीने त्या कक्षात जमलेल्या ब्राह्मणांत चर्चा रंगत असते. आता धनंजय त्या अवघड धनुष्या जवळ उभा असतो. त्याच्याकडे पहात असतो, त्यानंतर तो त्या आडव्या ठेवलेल्या धनुष्याला एक प्रदक्षिणा घालतो व इश देवतेला स्मरतो. त्यानंतर तो कृष्णाकडे एक नजर पहातो. ती खाली मान घालून उभी असते. त्यानंतर तो त्या वर टांगलेल्या लक्ष्याकडे एकटक पहातो. मग मनाचा निर्धार करून तो ते धनुष्य उचलतो व ताणून त्याचा दोर लावतो. त्यानंतर एक बाण उचलून तो नेम धरतो. जे धनुष्य इतर ख्यातनाम क्षत्रियांना साधे उचलता येत नव्हते ते त्यांने पहिल्याच फेरीत साध्य केले होते. पांच बाण जसें नियमांत सांगितले होते तसें तो मारतो व ते लक्ष्य साधतो. त्याचे बाण त्या लक्ष्याच्या अक्षात बसले होते. ते घडल्याने ब्राह्मण कक्षातून विशेष

व इतरत्रसुद्धा आनंदाचा एकच जल्लोष होतो. तेथे उभा असलेला तो इंद्राचा मुलगा साक्षात इंद्र वाटत होता, त्याच्या त्या यशामुळें आकाशातील अप्सरासुद्धा आनंद व्यक्त करू लागतात. सगळे ब्राह्मण आनंदाने आपली वस्त्रे उडवून ते दाखवू लागतात. त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. आकाशातून स्वर्गीय फुलांचा छिडकावा सुरु होतो. तेथे जमलेले हरलेले राजे एकमेकाकडे पहात नवल व्यक्त करू लागतात. त्यांना समजत नाही हे कसें झाले. आता प्रेक्षागृहातील वाजंत्री सुमधूर धून वाजवू लागतात. तेथे द्रुपदाने नेमलेले भाट व गवई जिंकणार्या धनुर्धार्याचे कौतुक करणारी कवने गाऊ लागतात. ते सगळे राजा द्रुपद पहात असतो व अर्जूनाला ते करतांना पाहून त्याला अत्यानंद होतो. ते सगळे होत असतां इतर चार पांडव युधिष्ठीराच्या आज्ञेनुसार तातडीने ते प्रेक्षागृह सोडून बाहेर येतात कारण, जर ते अर्जूनाबरोबर राहिले तर मोठाच घोटाळा होण्याची भिती त्यांना वाटली. ते त्यांच्या मठीत जेथे ते रहात होते तेथे जाण्यास निघतात. तेथे कृष्णा, अर्थात् द्रौपदी ते पाहून व नंतर अर्जूनाला पाहून मनातल्या मनात खूपच खूष झालेली असते. द्रौपदी त्याच्या जवळ हातात कुंकुम तिलक असलेली थाळी व वरमाला घेऊन जाते. तेथे सगळे ब्राह्मण उभे राहून अर्जूनाला अभिवादन करतात आणि आपण उगाचच कांहींतरी मूर्खासारखे बोलत होतो त्याचा त्याना खेद वाटत असल्याचे सांगतात. रिवाजानुसार द्रौपदी अर्जूनाला वरमाला घालते व ती त्याची पत्नी झाल्याचे राजा जाहीर करतो. अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे एकोण नव्वदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे नव्वदावा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, तसें द्रुपद आपली कन्या त्या तेजस्वी ब्राह्मणाला देण्याचे जाहिर करतात तसें तेथे जमलेले समस्त क्षत्रिय राजे नाराज होऊन संतप्त होतात. ते एकमेकाकडे पहात त्यांचे एकमत आहे ते अजमावतात व ठरवतात कीं, ह्या पांचाल नरेशाला चांगलीच अद्दल घडवायची. ते एकमेकांना सांगतात, आम्हा सच्च्या क्षत्रियांना डावलून हा द्रुपद एका ब्राह्मणाला आपली इतकी सुंदर कन्या देतो म्हणजे काय? त्याची अशी हिम्मत कशी झाली? हा पांचाल नरेश आम्हाला काय कचरा समजतो आहे कां? अशी रुपवती कन्या एका भिकार्याला देण्याची कां तर केवळ त्यांने तो फालतु नेम साधला हे आम्ही राजवंशाचे लोक कदापीही सहन करणार नाही. अशा राजाला जगण्याचा अधिकार नाही. त्याला मारून टाकले म्हणजे अशी हिम्मत पुनः कोणी करणार नाही. त्याच्या वयाचीही कदर करण्याचे कांहीं कारण नाही. त्याच्या बरोबर त्याच्या पुत्राचाही वध आपण केला पाहिजे. कारण तो सुद्धा त्यात सामिल आहे. आम्हाला आमंत्रित करून व चांगले जेवण देऊन सगळे झाले असे तो समजत असेल तर ती त्याची चूक आहे हे त्याला समजले पाहिजे. क्षत्रियांच्या कन्या फक्त क्षत्रियांनाच मिळाल्या पाहिजेत, हे फडतूस भिकारडे ब्राह्मण त्या लायकीचे नसतात. स्वयंवर फक्त क्षत्रियांतच होतात, त्यात ह्या ब्राह्मणाला भाग घेण्याची सवलत तिच्या भावाने दिली हे कोणाच्या परवानगीने? एक राजवंशाची कन्या अशा भिकार्याला वरते हेंचमुळी शास्त्रसंम्मत नाही. असें विविध क्रोधाने भरलेले उद्गार त्या क्षत्रियांच्या मेळाव्यात होत होते. क्षत्रियांची बरोबरी करण्याचा हा ब्राह्मणांचा प्रयत्न आत्ताच हाणून पाडला पाहिजे. कांहीं त्यात ठरवतात कीं, जरी त्या ब्राह्मणाने कायद्याने ती जिंकली असली व आम्हा क्षत्रियांना दुखवले असले तरी त्याला आपण ठार मारणे शिष्टसंम्मत होणार नाही. कारण जे कांहीं आपण उपभोगतो ते तत्त्वतः ब्राह्मणांचे असते असें शास्त्र सांगते. तरीसुद्धा, असें कांहीं आपण केले पाहिजे किं, अशी हिम्मत पुनः कोणी ब्राह्मण करणार नाही व क्षत्रियांच्या स्वयंवरात भाग घेणार नाही. म्हणजे ठार मारावयाचे नाही पण त्याला जबरदस्त हिसका द्यावयाचा. विशेष म्हणजे, त्या दृष्टद्युम्नाला चांगला धडा शिकवला पाहिजे कारण त्याच्या आगाऊपणामुळें तो ब्राह्मण पुढे सरसावला. असें

ठरवल्यानंतर ते सगळे आपापली शस्त्रे घेऊन द्रुपदावर चाल करून जातात. त्या हरलेल्या व संतापलेल्या राजांचा तांडा आपल्या दिशेने येत आहे हे पाहिल्यावर द्रुपदाला प्रथम ब्राह्मणांच्या सुरक्षिततेची चिंता वाटू लागली कारण, असें काहीं घडेल ह्याची साधी पुसटशीसुद्धा कल्पना त्याला नव्हती.

क्षत्रियाच्या त्या क्रोधयुक्त हालचालींचा सुगाव त्या चार पांडवांना लागतो. ते एकमेकांकडे पाहून ठरवतात किं ह्या प्रसंगी येथे थांबून काय होते ते पाहिले पाहिजे. त्यात अर्जुन सामिल होतो व ते पांच पांडव, कुंतीचे पुत्र त्या क्षत्रियांकडे सरकू लागतात. अगावर चालून येणार्या राजांच्या घोळक्याला अडवण्यासाठी भिम तेथे असलेले एक भलेमोठे झाड उपटून तिचा गदेसारखा उपयोग करण्याच्या तयारीत त्या राजांच्या समोर साक्षात यमासारखा उभा रहातो. भिमाची ती चाल पाहून अर्जुन आपले धनुष्य सावरून त्याच्या बरोबरीने त्या राजांशी लढण्यासाठी उभा रहातो. त्या दोघा भावांचे ते कृत्य पाहून बुद्धीमान व धूर्त दामोदर आपल्या भावाला, बलरामाला सांगतो तो धनुर्धारी दुसरा कोणी नाही तर अर्जुनच आहे. मला त्यात अजिबात शंका नाही किं, तो झाडाची गदा करणारा सुद्धा दुसरा तिसरा कोणी नाही पण भिम, वृकोदर आहे. कारण अशाप्रकारे झाड उपटून त्याची गदा करण्याची करामत केवळ एक भिमाच करू शकतो. आणि अरे अच्युता, ते बाजूला उभे आहेत ते देखणे दोघे, खात्रीने नकुल व सहदेव आहेत. पुढे वासुदेव त्याच्या मोठ्या बंधूस सांगतो, त्याचा अर्थ, त्यांच्या बरोबर बसलेला व आत्ता सभागृह सोडून गेलेला, निश्चितच युधिष्ठीर असला पाहिजे. पुढे ते दोघे वृष्णी बोलतात, त्याचा अर्थ त्या लक्षागृहातून ते सगळे सहीसलामत सुटले असले पाहिजेत व ते आता कौरवांपासून दूर रहाण्यासाठी असा ब्राह्मण वेश घेऊन रहात आहेत. त्या दोघांना हे स्पष्टपणे लक्षात आल्यानंतर मोठा भाऊ हलधर समाधान व्यक्त करतो किं, ते सगळे त्यांच्या आत्येची, कुंतीची मुलं जीवंत आहेत हे चांगले झाले. केवळ नशिबांने ते वाचले, नाहीतर त्या आगीतून वाचणे केवळ अशक्य होते.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे नव्वदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे एक्याण्णवावा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, त्यानंतर ते महाबली ब्राह्मणाच्या वेषातील पांडव आपली चामड्याची वस्त्रे, नारळापासून बनवलेले पाण्याचे कमंडलू बाजूला टाकून तेथे असलेल्या ब्राह्मणांना अर्जुन हसत हसत बोलतो, "घाबरू नका, आपण सगळे त्यांचा मुकाबला करणार आहोत. तूम्ही बाजूला उभे राहून फक्त मजा बघा". त्यानंतर शेकडो धारदार बाणांचा वर्षाव होत गेला. मंत्रानी भारलेले बाण एकमेकांवर मारले जात होते. अर्जुन त्याच्या धनुष्याने तिरंदाजी करत असतांना भिम त्याच्या बाजूला एकाद्या पहाडासारखा उभा राहून त्याला मदत करत होता. त्यांच्या समोर ते चिडलेले क्षत्रिय व त्यांच्या पुढे त्यांचे नेतृत्व करत कर्ण असें ते पांडवांवर तुटून पडले. ते युद्धासाठी उत्सुक असलेले क्षत्रिय बोलतात, युद्धात समोर आल्यास ब्राह्मणांची हत्या करण्यास मुभा असते. हे ठरल्यावर ते पांडवांना ब्राह्मण समजत असल्यामुळें प्रथम संकोचत असलेले ते वीर त्यांच्याशी लढू लागतात. कर्ण मोठ्या जोशांने जिश्नुवर हल्ला करतो. कारण, त्यांने ती पैज जिंकलेली असते, जर अर्जूनाने ती जिंकली नसती तर कृष्णेला नाईलाजाने कर्णाला वरमाला घालावी लागलीच असती. हे पहाता कर्णाचा राग समजण्यासारखा असतो. मद्र देशाचा महाबली सल्य भिमावर चाल करून जातो. जसे एक हत्ती दुसर्या नर हत्तीवर चाल करतो मादी हत्ती मिळवण्यासाठी अशी ती चढाओढ होत होती. दुर्योधन व इतर राजे तेथील ब्राह्मणाना सतावण्याचे व घाबरवण्याचे, छेडण्याचे काम करत होते. कारण हे पांडव सोडले तर इतर साधे ब्राह्मण ब्रह्मचारी युद्ध करण्याच्या लायकीचे नाहीत हे त्यांना समजले होते. एकंदर ती क्षत्रिय विरुद्ध ब्राह्मण अशी बाचाबाची होती. अर्जुन जसे पहातो किं, सूर्यपुत्र कर्ण त्याच्या कडे वेगांने येत आहे, तो त्याचे खास आयुध त्याच्यावर फेकतो. त्याच्या आघातामुळें राधेय (कर्ण) बेशुद्ध पडतो. पुनः उठून तो धनंजयावर वार अधिक सावधगिरीने करतो. दोघेही तुल्यबळ योद्धे धमासान युद्ध करत असतात. इतर राजे परिस्थिती पाहून त्या जागेतून काढता पाय घेऊन आपापल्या निवासी निघून जातात. जिश्नु व राधेय ह्यांच्या तिरंदाजीतील कसब पणाला लागलेली असते. त्यांच्या बाणांच्या वर्षावामुळें ते त्या बाणांच्या मागे दिसेनासे होतात इतके बाण फेकले जात होते. अर्जुन

कर्णाला आव्हान देतो व कर्ण अर्जूनाला, असें द्वंद्व जोरात चालू असते. इतर क्षत्रिय आपापसात न लढता ह्या दोघांचे द्वंद्व पहाणेच जास्त श्रेयस्कर समजून तेथे ते पहात रहातात. अर्जूनाचे वार परतवल्यावर कर्ण जोरांने ओरडून अधिक आव्हान त्याला देत होता. त्यानंतर तो सूर्यपुत्र कर्ण जिश्नुला म्हणतो, "अरे शूर वीर ब्राह्मणा, तुझ्या युद्ध कलेचे कौतुक केले पाहिजे. तुला थकवा येत नाही ह्याचे मला नवल वाटते. तुझी विद्या एकाद्या उच्च दर्जाच्या क्षत्रियाला शोभणारी आहे. तू युद्ध शास्त्राचा एक उत्तम नमुना आहेस हे मला मान्य केलेच पाहिजे. काय तू परशुराम हे सोंग घेऊन आला आहेस कां? कां तू प्रत्यक्ष इंद्र तर नाहीस? कां तू इंद्राचा धाकटा भाऊ विष्णू ज्याला अच्युत म्हणतात, तो तर नाहीस? ब्राह्मणाचे सोंग घेऊन मला नमवण्याचा प्रयत्न करीत आहेस"? सांचीचा पति किंवा किर्ति, पंडुचा मुलगा हे दोघेच असें युद्ध माझ्याशी करू शकतात".

कर्णाचे ते वक्तव्य ऐकल्यावर धनंजय त्याला उत्तर देतो, "अरें कर्णा मी कोणी शस्त्रविद्या साक्षात आलेली नाही कां परशुराम नाही व कोणी अद्भूत मानव नाही, हे जे तू माझे कर्तब पहातोस ते माझ्या गुरूने शिकवलेले ब्रह्म व पुरंदर शस्त्र आहे ते मी आता तुझ्यावर सोडणार. मी येथे तुला हरवणार आहे. थोड्याच वेळात तुझा पाडाव होईल". वैशंपायन पुढे सागतात, ते ऐकल्यावर कर्ण युद्धातून माघार घेतो कारण त्याला माहीत असते कीं, त्या अस्त्राने त्याची फार मोठी हानि झाली असती व हे युद्ध त्या योग्यतेचे नव्हते. प्रांगणाच्या पलिकडे सल्य व भिम मुष्टीयुद्ध करण्यात दंग झाले होते. जणूकाय दोन बलाढ्य हत्ती झुंजत आहेत. त्यांच्या त्या कुस्तीचे आवाज सर्वकडे घुमत होते. सल्य थकला आहे हे हेरून भिम त्याला खांद्यावर उचलून लांब फेकून देतो. परंतु ते फेकणे असें होते किं, त्यामुळें सल्याला जास्त लागले नाही. भिमाची ती कसब पाहून कर्ण अचंबित होतो, त्याचप्रमाणे इतर राजेसुद्धा चकित होतात. कर्ण बोलतो, "अरे, हा तर एक उत्तम योद्धा आहे. ब्राह्मणांत असा योद्धा आहे हे नवलच वाटते. हे कोण ब्राह्मण आहेत व त्यांचे कुळ कोणते ते समजले पाहिजे कारण, मला व सल्याला हरवणारे फक्त एक परशुराम किंवा द्रोण असू शकतात. किंवा पंडुपुत्र किर्ती असू शकतो, सल्याला हरवणारा फक्त बलराम किंवा वृकोदर आहे, दुर्योधनाला हरवणारा फक्त देवकीपुत्र असू शकतो, किंवा कृप, शरदवनाचा मुलगा असू शकतो. म्हणून आता आपण ही मारामारी बंद करू व हे ब्राह्मणा खरोखरच

कोण आहेत ते शोधून काढले पाहिजे". वैशंपायन सागतात, वासुदेव त्यांची लढाई पाहून खात्रीने समजतो किं, हे अर्जुन व भिमच आहेत. परंतु, त्याची वाच्यता न करता तो सर्व राजांना सांगतो, "झाली तेवढी मारामारी पुरेशी आहे, आता स्वयंवराचा सोहळा साजरा झाला आहे व द्रुपदाची मुलगी एका ब्राह्मणांने जिंकली आहे हे वास्तव तुम्ही कितीही मारामार्या केल्या म्हणून बदलणार नाही हे समजून आपापल्या राज्याकडे सगळ्यांनी जाण्यास सुरुवात करावी. त्याप्रमाणे जमलेले आश्चर्य करीत कीं एका ब्राह्मणाने राजकन्या जिंकली व पांचाल देशाचा जावई एक ब्राह्मण असणार ह्याची गंमत करीत ते आपापल्या घरी जाऊ लागतात. ब्राह्मण मंडळी घडलेल्या प्रकाराने पुरते हादरलेले होते व जे घडले त्यावर विश्वास कसा ठेवावा ह्याची चिंता करत तेथे पांडवांच्या भोवती उभे होते. त्यांना जमलेल्या गर्दीतून वाट करून देण्याचे काम स्वतः कृष्ण करतो व पांडवाना त्यांच्या मठीवर जाण्यास मदत करतो. इतर ब्राह्मण आपापल्या मठाकडे जातात. कुंती काळजी करत असते किं, आज आपल्या मुलांना कधी नाही तितका उशीर कां झाला आहे? तिच्या मनात अनेक शंकाकुशंका उत्पन्न होत रहातात. कुंती विचार करते , इतका उशीर कधीच होत नाही मग आज काय झाले, कौरवांना समजले तर नाही किं हे पांडव आहेत व त्यांनी त्यांना ठार मारले? तिचे दुसरे मन सांगते, ते शक्य नाही कारण, कृष्णद्वैपायनाने माझी मुलं नेहमी सुरक्षित रहातील असा आशिर्वाद दिला आहे त्याचे काय? अशारितीने ती पांडव माता चिंता करीत असतांना तिला कोणी येत असल्याची चाहूल लागते म्हणून ती खोली बाहेर डोकावते परंतु, तेथे फक्त माणसांचे आवाज येत असतात, अधारामुळें कांहीं दिसत नसते. त्या खोलीतही अंधारच असतो. थोड्या वेळांत जिश्नु व त्याचे चार भाऊ त्या मठीत प्रवेश करतात. कुंती नेहमीप्रमाणे ते आल्याचे पहाताच बोलते , "मुलांनो, आणलेली भिक्षा तुम्ही सारखी वाटून घ्या".

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्व भाग एकशे एक्याण्णवावा संपला.

# आदिपर्व भाग एकशे ब्याण्णवावा

(स्वयंवर पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, ते तेजस्वी पंडुपुत्र आपल्या कुंभाराच्या घरात शिरतात . त्यानंतर आपल्या मातेस अभिवादन करतात व त्यांच्यासह आलेल्या यज्ञसेनेची ओळख करून देतात. ते सांगतात हि भिक्षा आज आम्हाला मिळालेली आहे. तिला पाहून कुतीला आश्चर्य वाटते व ती बोलते, "अरेच्या हे मी काय बोलले"? माझ्या कडून पाप तर नाही झाले नां अशी शंका त्या माऊलीला होते. अशा परिस्थितीतून कसे बाहेर पडावयाचे असा प्रश्न तिला पडतो. त्यावर झाकण घालण्यासाठी ती यज्ञसेनेला जवळ घेते. मग युधिष्ठीराकडे पाहून बोलते, "तुझ्या धाकट्या भावांने पांचाल नरेशाची मुलगी दान घेतली ते अज्ञानाने कां? अरे राजा मला सांग, खरे काय झाले आहे? हे दान तुम्ही सुखाने भोगा व माझी वाणी खरी करा. पांचालाच्या कन्येस त्याचे पाप लागता कामा नये, अशी खबरदारी घ्या. तसेंच तिला अवघडल्या सारखे होणार नाही हेसुद्धा पहा". आपल्या आईचे ते बोलणे ऐकून तो कुरुवंशाचा समजूतदार व बुद्धीमान राजपुत्र, युधिष्ठीर थोडा विचार करून आपल्या आईला समजावतो, नंतर अर्जूनाकडे बघून बोलतो, "आई, हे (कन्या)दान अर्जूनाने स्वयंवरात पण जिंकून मिळवले आहे. म्हणून तू (अर्जुन) तिच्याशी लग्न करावेस. लवकरच योग्य विधीपूर्वक तू तिचा उजवा हात तुझ्या डाव्या हातात घेऊन लग्नविधी पूर्ण करावा". ते युधिष्ठीराचे ऐकून धनंजय त्याला सांगतो, "अहो आमचे राजे, मला पापाचा धनी करू नका. तुझा सल्ला योग्य वाटत नाही. अशाप्रकारे पापी लोक वागतात. आईच्या आदेशाचे पालन करावयाचे म्हणजे प्रथम तू तिच्याशी लग्न करावे नंतर भिम करील व नंतर माझा व माझ्या नंतर ह्या दोघांतील नकुल व शेवटी सर्वात धाकटा सहदेव अशा क्रमाने तिच्याशी लग्न करतील हे योग्य होईल. आम्ही चौघे व ही कन्या तुझ्या आदेशाची वाट पहात रहाणार. अशा परिस्थितीत जे सगळ्या संबंधितांना हितकारक असेल ते करावे, त्यात पांचाल नरेशांचा सुद्धा विचार झाला पाहिजे. आम्ही सगळे तुझ्या आज्ञेचे पालन करू. तुला जे योग्य वाटेल ते करावे".

वैशंपायन सांगतात, जिश्नुचे ते प्रेमपूर्वक  व आदरांने भरलेले ऐकून ते पांडव आता त्या पांचाल कन्येकडे अपेक्षेने पहातात. तीसुद्धा आता त्या सर्वांकडे पाहू लागते. ते तिचे पहाणे

बघितल्यावर ते एकमेकांकडे पाहू लागतात. त्यानंतर तो प्रत्येक तिच्याबद्दल विचार करू लागतो. तिच्याकडे पहाण्यांने त्यांच्यातील कामदेव जागृत होतो. त्यामुळें ते विचार करण्याच्या मनस्थितीत रहात नाहीत. त्या अप्रतिम सौंदर्यवतीकडे पहात असलेल्या आपल्या चार भावंडांचे चेहरे पाहून तो मोठा भाऊ युधिष्ठीर समजतो किं ह्या एका मुलीमुळें आमची एकी संपुष्टात येऊ शकते व ते जर होऊ द्यावयाचे नसेल तर ती सगळ्यांची पत्नी होणेंच सर्वांच्या हिताचे आहे. त्याचवेळी त्याला कृष्णद्वैपायनांचे उद्‌गार आठवतात. तो त्या सगळ्यांना सांगतो, "असें पहा, ही पांचाल कन्या आम्हा सगळ्यांची पत्नी असेल. जसे आपण जाणता, व्यासमुनींनी मागे वर्तवले होते तसें होईल".

आपल्या वडिल भावाचा तो आदेश ऐकल्यावर त्या सगळ्या पांडवांच्या चेहर्यावर खूषीचे स्मित झळकू लागले.

वृष्णी वंशाचा नायक दामोदर, श्रीकृष्ण आपला अंदाज तपासण्यासाठी पांडवांच्या मठीत त्या कुंभाराच्या घरात आपल्या मोठ्या भावाबरोबर, रोहिणीपुत्र बलरामासह जातो. कोणालाही समजणार नाही अशाप्रकारे ते तेथे गेलेले असतात. कृष्ण तेथे त्या झोपडीत युधिष्ठीर बसलेला असतो व त्याची चार भावंडे त्याच्या भोवती बसलेले होते. ते शक्तिमान पांचजण लपणे शक्य नव्हते. त्यांचे शरीरयष्टी लपण्यासारखी नव्हती. तेथे घरात आल्यावर श्रीकृष्ण प्रथम अजमिदा घराण्याच्या वारशाच्या, युधिष्ठीराच्या पायाला स्पर्श करतो. त्याचे पाहून बलरामसुद्धा तसेंच करतो. नंतर ते दोघे कुंती, जी कृष्णाची आत्या असते तिला नमन करतात. त्यानंतर तो पांडवांना आपली ओळख करून देतो. "मी श्रीकृष्ण, हा माझा बंधू रोहिणीपुत्र बलराम". त्यांना पाहून पांडवाना फार आनंद होतो परंतु, ते तो दाखवत नाहीत. पुढे कृष्ण बोलतो, मी तुमचे कसब स्वयंवराच्या सोहळ्यात पाहिले. त्यामुळें माझी खात्री झाली कीं, माझे आत्येमामे भाऊ जीवंत आहेत. ते ऐकल्यावर पांडवांना आता त्यांच्या पासून लपवण्यासारखे कांहीं राहिले नाही हे समजते. ते वसुदेवाचे (कृष्णाच्या पित्याचे) क्षेमकुशल विचारतात. त्या ज्वालागृहातून त्यांची सुटका दैवयोगांने झाली म्हणून सगळे विधात्याचे आभार मानतात. युधिष्ठीर विचारतो, "तुला आमचा अंदाज कसा आला"? मघा सांगितल्याप्रमाणे, तुमच्या कारवायां ज्या केवळ फक्त तुम्हीच करू शकता त्या पाहिल्यावर माझा विश्वास बसला कीं, माझा कयास बिनचूक आहे परंतु, आणखीन

खात्री करण्यासाठी आम्ही येथे आलो. आता आमचा पूर्ण विश्वास बसला कीं पांडव जीवंत आहेत. तो बोलतो, "अग्नीला कितीही झाकले तरी त्याची धग लपवता येत नाही". त्यानंतर सावधगिरीची अजून आवश्यकता आहे म्हणून, "आम्ही आता कोणालाही समजणार नाही असें आलो तसेंच येथून निघून जाणार आहो". असें कृष्ण बोलतो. "तुमचे भाग्य थोर म्हणून अजून त्या धृतराष्ट्राच्या मुलांना तुमचा पत्ता लागलेला नाही परंतु, कालच्या धनंजयाचे कर्णाबरोबरचे व सल्याचे भिमाबरोबरचे अशा दोन द्वंद्वां नंतर त्याला तुझा संशय आला आहे ते लक्षात घ्या". "कोणीही ब्राह्मण इतके कसें निष्णात असू शकतील अशी शंका तो कर्ण बोलत होता परंतु, अजून त्यांचा विश्वास आहे किं, त्याच्या ज्वालागृहात तुमचा नाश झाला आहे. परंतु, हे जास्त काळ लपून रहाणे संभवत नाही. ह्याची दक्षता असू द्या". "आता तुम्ही द्रुपदाचे आप्त झाला अहात तेव्हां हे सत्य लपवून ठेवणे केवळ अशक्य आहे तरी जी नवीन परिस्थिती उपस्थित होणार आहे त्यासाठी तयार व्हा", असा सल्ला देऊन ते दोघे बंधू तेथून निघून जातात.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे ब्यांणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे त्र्यांण्णवावा

(स्वयंवर पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, जसें भिम व अर्जुन भिक्षा घेऊन त्यांच्या घरी जात होते, द्रौपदीचा भाऊ ज्याला आपल्या बहिणाच्या स्वास्थ्याची चिंता खात होती, त्या दोघांचा पाठलाग करत त्यांच्या घराकडे येतो व तेथेंच एका आडोशात असा लपतो किं, कोणाला समजणार नाही. तो द्रौपदीचा भाऊ गुपचुप त्या घरावर लक्ष देऊन असतो व त्याचे सेवक आजूबाजूला पहारा देत असतात जसें कोणालाही संशय येणार नाही. ते दोन पांडव आत शिरतात व तेथे बसलेल्या बाकीच्या पांडवांसह त्यांच्या गप्पा सुरु होतात. त्या कुंभाराच्या घराच्या भिंतीना भेगा असतात त्यातून तो दृष्यद्युम्न आत काय चालले आहे ते पहात रहातो, त्याची कल्पना आतील कोणालाही येणार नाही अशी दक्षता तो बाळगतो. आत आल्यावर ते दोघे प्रथम युधिष्ठीराला त्याचे नांव घेऊन अभिवादन करतात व नंतर आईला नमन करतात ते तो पहातो. मोठ्या भावाडे नांव युधिष्ठीर आहे हे तो समजतो. तेथे तो पहातो किं, त्याची बहिण मोठ्या आनंदात आहे. त्याचे त्याला आश्चर्य वाटते, त्याच्या कल्पनेप्रमाणे ती त्या भिक्षेकरी ब्राह्मणाच्या त्या भिकारड्या घरात अतिशच दुःखी झालेली असेल पण तो जे पहातो ते अगदी त्याच्या कल्पनेविरुद्ध असते. त्यांच्या आईचे नांव कुंती आहे हे तो समजतो कारण, युधिष्ठीर तिला कुंतीमाता असेंच हांक मारतो. कुंती नंतर द्रौपदीला सांगते कीं, जी भिक्षा आणलेली आहे त्याच्या त्या दांडगटांच्या शरीराच्या आकाराप्रमाणे वाटण्या कराव्यात कारण ती तिला सांगते हा माझा दुसरा मुलगा आहे तो फार खातो, त्याची भूक जास्त आहे. त्याप्रमाणें त्याची बहिण त्या भिक्षाच्या वाटण्या करते व ते ती नंतर शिजवून सगळ्यांना खाण्यास देते. सर्वकांहीं मोठ्या आनंदात होत असते हे पाहून दृष्टद्युम्नाला नवल वाटते. मुलांची नांव युधिष्ठीर, भिम, अर्जुन, नकुल व सहदेव हे सगळे समजल्यावर दृष्टद्युम्नाला समजते कीं, हे कुरुवंशाचे राजपुत्र पांडवच आहेत व आपल्या बहिणीचा विवाह अर्जूनाशीच होत आहे. हे समजल्यावर त्याला अतिशय संतोष होतो. ते कोणी ब्राह्मण नाहीत तर उच्चकोटीच्या राजघराण्याचे आहेत त्यामुळें त्याला बरे वाटते. कौरवांशी असलेल्या तंट्यामुळें ते असें गुप्तपणे अज्ञातवासात रहात आहेत हे तो समजतो.

त्यानंतर त्यांची झोपण्याची वेळ येते तसें ते सगळे पांच पांडव एका रांगेत दक्षिणेकडे डोके ठेवून झोपतात. त्यासाठी कुस गवताच्या गादीचा उपयोग ते करतात नंतर त्यावर हरणाच्या कातड्याचे पांगरुण घालतात. झोपल्यावर त्यांच्यात गप्पा सुरु होतात. त्यात वेद, शास्त्रे, शस्त्रास्त्र व अस्त्र विद्या, युद्धाचे डावपेंच ह्यांच्या गोष्टी ते करत रहातात. त्यातील लहान दोघे मात्र लवकर निद्रीस्त होतात व मोठे तीन मात्र विविध विषयावर बोलत असतात. ते तो पहातो. नंतर त्यांची माता त्या मुलांच्या डोक्याच्या कडे झोपते व त्याची बहिण त्या सगळ्या मुलांच्या पायाच्या दिशेने झोपते. आपल्या बहिणीने ते घर मनापासून स्वीकारले आहे ते त्याच्या लक्षात येते त्याचप्रमाणे ती संतुष्ट असल्याचे तो ओळखतो व ते पांडव आहेत हेसुद्धा त्याला आता समजलेले असते. एकंदर जे घडले ते तितकेसे वाईट नाही हे लक्षात आल्यावर त्याला ती वार्ता आपल्या पित्यास सांगण्याची उत्कंठा होते. गुप्तपणे असें निरीक्षण केल्यानंतर तो पांचाल देशाचा राजपुत्र आपल्या राजवाड्यात जातो. आपल्या पित्याला बहिणाची वार्ता सांगण्यास तो आतूर असतो.
पांचाल नरेश आपल्या मुलीचा विवाह एका भिक्षेकर्याशी दृष्टद्युम्नाने लावला त्याची त्याला खंत वाटत असते. क्षत्रिय राजे तो पण जिंकू न शकल्याने त्यांने ब्राह्मण ब्रह्मचार्यांना आवाहन केल्यामुळें हे घडले नाहीतर कोणा भिक्षेकर्याची काय हिम्मत आहे पांचालच्या राजपुत्रीकडे पहाण्याची असें विचार त्याच्या मनात येत असतात.
दृष्टद्युम्न येतो व द्रुपदाला भेटतो. तेथे राजा त्याला विव्हळून विचारतो, "अरे पुत्रा, कोठे गेली माझी द्रौपदी. तिचे क्षेमकुशल काय आहे ते सांग". तो आपल्या मुलाला सांगतो, "अरे माझ्या मुला, माझी इच्छा होती किं, तो श्रेष्ठ पंडुपुत्र अर्जुन यावा व माझ्या मुलीला जिंकून जावा म्हणून मी मुद्दामच ते धनुष्य तसें अवघड तयार केले होते जे फक्त अर्जुनच चालवू शकेल पण हे काय झाले, हा कोण त्रयस्थ ब्राह्मण ब्रह्मचारी, ते चालवून माझ्या मुलीला घेऊन गेला! कां, कोणी शुद्र कां वैश्य माझी मुलगी घेऊन गेला कां? काय माझे दुर्भाग्य कीं, कोणी हलक्या कुळातील पुरुष माझ्या डोक्यावर बसण्यासाठी आला आहे कां"?
बापाची व्यथा पाहून दृष्टद्युम्न त्याला सांगतो, "तात, एक चांगली वार्ता आहे. पांडव जीवंत आहेत व ते ब्राह्मणाच्या वेषात फिरत आहेत. आपल्या द्रौपदीला जिंकणारा ब्राह्मण दुसरा कोणी नाही तर अर्जुन आहे. आपल्या इच्छे प्रमाणेच झाले आहे".

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्व भाग एकशे त्र्यांणवावा भाग संपला.

## आदिपर्व भाग एकशे चौर्याण्णव

(वैवाहिक पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, तो सर्वश्रेष्ठ चंद्रवंशी दृष्टद्युम्न आनंदाने आपल्या पित्यास सांगतो जे त्या सोहळ्यात घडले. त्या नंतर ज्याने त्यांच्या कृष्णाला जिंकले त्याची माहिती सांगतो. तो द्रुपदाला सांगतो, "ऐका बाबा, तो राजबिंडा लाल डोळे झालेला, अंगावर ब्राह्मण नेसतात तसें चर्मवस्त्र परिधान केलेला, इतर ब्राह्मणांनी घेरलेला, जे त्याला शुभचिंतन देत आहेत, एकाद्या स्वर्गीय गंधर्वासारखा दिसणारा, ज्याच्या धाडसाची कल्पना त्याच्या ह्या हिम्मतीने स्पष्ट दिसत होती, साक्षात इंद्र वाटावा असा येतो व तो तुम्ही ठेवलेले धनुष्य उचलून ताणतो व अगदी सहजच ते अवघड लक्ष्य मारतो. ते पाहिल्याने आपली कन्या एकाद्या मादी हत्तीणीसारखी त्या शुरवीर तरुणाच्या पाठी धांवत जाते. त्याचे चर्मवस्त्र ती तिच्या उजव्या हातांने धट्ट पकडून त्याच्या बाजूला उभी रहाते. ते झाल्यानंतर जमलेले क्षत्रिय त्याच्यावर रागांवतात व त्याला द्वंद्व युद्धाचे आव्हान कर्ण देतो कारण कीं, त्यानेसुद्धा ते लक्ष्य मारले होते पण आपल्या कन्येने तो सुतपुत्र म्हणून त्याला तो, राजा असूनही नाकारले होते, त्याचा त्याला राग आला असावा. इतर राजेसुद्धा त्याला आव्हान देतात त्यात सल्य होता. तो पुढे आल्यावर त्या ब्राह्मणाचा भाऊ असेल कदाचित् एक आणखीन ब्राह्मण पुढे आला व त्यांने एक झाड उपटून सल्यावर फेकून मारले. तो महाबली ब्राह्मण साक्षात यम वाटत होता. त्यांने सल्याला थोडी कुस्ती केल्यानंतर उचलून दूर फेकून दिले. त्यानंतर तो झगडा संपला व आपली कन्या त्या ब्राह्मणाबरोबर व त्याच्या सह असलेल्या इतर ब्राह्मणांबरोबर, जे कदाचित् त्याचे म्हणजे आपल्या जावयाचे बंधू असावेत, त्यांच्या घरी, जे आपल्या नगराच्या एका उपनगरात आहे, गेली. पुढे दृष्टद्युम्न सांगतो, अहो राजे, मी त्यांच्या मागोमाग ते काय करतात माझ्या भगिनीबरोबर ते पहाण्यासाठी गेलो असा किं, त्यांना समजणार नाही. तेथे मी जे पाहिले व ऐकले ते सांगतो, त्या छोट्याशा घरात एक वयस्कर स्त्री जी त्यांची माता असावी त्या मुलांची वाट पहात बसलेली होती. ती वयस्क स्त्री तेजस्वी होती जसे तेज ब्राह्मण बाईत क्वचितच दिसेल. तिच्या भोवती तीन मुलं बसली होती जी सूर्यासारखी तेजस्वी होती. आणखीन दोन तरुण आले त्यांची त्या स्त्रीस वंदन केले व आपल्या कन्येससुद्धा वंदन केले. त्यानंतर आपल्या कृष्णाला त्या प्रौढ

स्त्रीजवळ ठेवून ते सगळे भिक्षा मांगण्यासाठी बाहेर गेले. कांहीं समयानंतर ते पांच भिक्षेकरी भिक्षा जमा करून परत आले. कृष्णाने त्यांनी आणलेली भिक्षा त्यांच्याकडून घेतली. त्यातील एक भाग देवाला देण्याचे ती मोठी महिला कृष्णाला सांगते. दुसरा भोग ब्राह्मणाला सोडण्यास सांगते, त्यातून जे उरले त्याचा थोडा हिस्सा कृष्णा त्या मोठ्या बाईला देते व बाकीच्याचे पाच हिस्से करते व ते त्या पांचांना देते व थोडा हिस्सा स्वतःसाठी घेते. अशारितीने त्या भिक्षेच्या वाटण्या होतात. सगळ्यांनी खाऊन झाल्यावर कृष्णा तिचा हिस्सा सेवन करते. त्यानंतर त्यांची निजण्याची तयारी होते. कुस गवताच्या गादीवर हरणाच्या कातडीचे पांघरूण घातल्यानंतर ते झोपले होते. झोपल्या वर त्यांच्या गोष्टीत, युद्धाच्या विविध मुद्द्यावर, गप्पा मारत होते. त्यांच्या बोलण्यावरून एक गोष्ट मला समजली कीं, हे कोणी वैश्य, शुद्र निश्चितच नाहीत. किंवा ब्राह्मणसुद्धा नसावेत. ते सतत विविध शासकीय व लढण्याच्या कारवायांवर बोलत होते. आपण जे ऐकले कीं, कुंती व तिची मुलं त्या लाक्षागृहातून निसटली असावीत ते बहुतेक करून खरे असावे कारण, हे पांच पांडवच आहेत असा माझा आता विश्वास झाला आहे. ज्या पद्धतीने त्यांने नेम धरला व लक्ष्य साधले तो पार्थच असला पाहिजे. कौरवांच्या पासून लपण्यासाठी ते असें वेषांतर करून फिरत असावेत, असा माझा कयास आहे.

दृष्टद्युम्नाचे ते ऐकून द्रुपद अतिशय उल्हासित झाला. त्यांने राजपुरोहितांला बोलावून आज्ञा केली कीं, त्यांनी जाऊन अधिकृतपणे चौकशी करावी कीं, ते कोण (पांडव) आहेत. त्याप्रमाणे तो राजपुरोहित कुंभाराच्या घरात येतो व यु‌धिष्ठीराला भेटतो. त्याला बोलतो, "आपण आमचे खास अहात, तरी आमच्या महाराजांना आपली सगळी कुळ, गोत्र, घराणे, वर्ण इत्यादी माहिती करून घ्यावयाची आहे तरी ती द्यावी. आमच्या राजकन्येशी तुमचा विवाह होण्या आधी ती राजशिष्टाचारार्थ आवश्यक आहे. आपले शत्रू कोण, मित्र कोण इत्यादी माहिती गोळा करण्यासाठी मी आपल्याला भेटण्यास आलो आहे". तो पुढे बोलतो, राजे पंडु आमच्या महाराजांचे खास मित्र होते. राज्यासाठी ते पंडु आमच्या राजांचे पर्यायी होते. आमच्या महाराजांची इच्छा होती कीं, त्यांची कन्या पंडुच्या अर्जूनाला द्यावयाची. तुमचा भाऊ अर्जूनासारखाच त्यांना वाटतोय". एवढे बोलून तो ब्राह्मण युधिष्ठीराकडे उत्तराच्या अपेक्षेने पहात रहातो.

युधिष्ठीर तेथे उभ्या असलेल्या भिमाला सांगतो, "हे महाशय राजा द्रौपदाचे पुरोहित अहेत व म्हणून त्यांचा यथोचित सन्मान झाला पाहिजे. त्यांना बसण्यासाठी आसन दे व त्यांचे पाय धुण्यासाठी व अर्ध्यासाठी जल दे". तसें भिमांने केल्यामुळें संतुष्ट झालेले ब्राह्मण युधिष्ठीराच्या उत्तराची वाट पहात बसतात. ते झाल्यावर तो त्या राजपुरोहिताला बोलतो, "आपल्या राजांने एक पण लावला आपल्या राजकन्येच्या स्वयंवरासाठी त्यावेळी फक्त तो लक्ष्य साधण्याची अट होती. त्यावेळी कुळ, गोत्र, घराणे, वर्ण हे कांहींही त्या अटीत नव्हते हे आपण जाणता. त्याप्रमाणे माझ्या भावांने तो पण दिलेल्या नियमांनुसार जिंकला आहे व त्यामुळें तुमची कन्या आता आमची झाली आहे. मग, आता हे कुळ, गोत्र, घराणे कशाला विचारता"?

"तुम्हाला व तुमच्या चंद्रवंशी राजाला जर असें वाटत असेल कीं, माझा भाऊ अर्जूनासारखा वाटतो तर तसें तुम्ही समजू शकता, त्याला आमचा कांहींही आक्षेप नाही. माझ्या भावाचे गोत्र, कुळ, वर्ण व घराणे त्या एका धनुष्याच्या टणत्काराने सिद्ध केले असें तुम्हाला कां वाटत नाही"?

"राजांने अशा गोष्टींची चिंता न करणेंच योग्य होईल. एका परीने, तुमच्या राजाची इच्छा पूर्ण होणार आहे असें समजून रहा". एवढे संभाषण होत असतांना एक दुसरा संदेश वाहक पुरोहित तेथे लगबगीने येतो व सांगतो, "विवाह विधीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे तरी, त्वरित राजवाड्याकडे निघावे कृपया".

अशारितीने आदिपर्वातील वैवाहिका पर्वाचा एकशे चौर्यांणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे पंच्यांण्णवावा

(वैवाहिक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सागतात, तो संदेश वाहक बोलतो, "राजा यज्ञसेनाने त्याच्या कन्येच्या विवाहा प्रित्यर्थ एक चांगली मेजवानी तिच्या नवर्याकडील मंडळींसाठी आयोदित केली आहे. तरी, आपले दैनंदीन विधी उरकून लवकर तेथे येण्याची कृपा करावी. त्या मेजवानीनंतर राजकन्या कृष्णाचा विवाह संपन्न होईल. आपल्याकरता, बाहेर एक सोन्यानें मढवलेला रथ तयार आहे तरी त्यात बसून आपण सगळे राजवाड्यात यावे.

वैशंपायन पुढे सांगतात, त्या ब्राह्मण पुरोहितास निरोप देऊन मग ते कुरु घराण्याचे नरपुङ्व त्यांची माता व कृष्णा असें त्या राजाने पाठवलेल्या रथातून राजवाड्याकडे निघतात. त्या आधी राजाकडे त्याचा पुरोहित पोहोचला होता त्यांने त्याचे व युधिष्ठीराचे जे संभाषण झाले ते सांगितले होते त्याप्रमाणे नवर्याच्या घराण्याचा अंदाज घेण्यासाठी राजा तसल्या प्रकारची युद्धातील आयुधें तेथे रचून ठेवण्याचे आदेश देतो, ज्यांत कोणी ब्राह्मण कधीच विशेष रस घेण्याचा संभव नसतो. त्याशिवाय वैश्याच्या कामाची (शेतीकामाची) अवजारे इतर सामान ठेवली होती. उद्देश असा किं, नवरदेव कोणत्या गोष्टीकडे जास्त लक्ष देतो, त्यावरून त्यांचा वर्ण समजावा. क्षत्रियांच्या विशेषकरून राजांच्या विवाह विधीच्या वेळी जशी हत्यारे रचून ठेवतात तसा सगळा आरास त्या हरप्रकारच्या युद्ध साहित्यांचा तेथे त्यांच्या स्वागतासाठी केलेला होता. त्यात त्यांच्या स्वागतासाठी व अल्पोपहारासाठी सुगंधी पेये, फळं, सन्माननीय हारतुरे होते. चिलखती अंगरखे, गालीचे, वनस्पतीच्या बिया, गाई, शेतीची अवजारं, युद्धाचे हरएक सामान तेथे होते प्रदर्शनात. त्यात दूर फेकण्याची अस्त्रे, तोफा, गरनळ्या (बंदूका), बाण, शर (छोटे बाण जे हातांने फेकले जातात), भाले, बरच्या, तलवारी, खड्ग, दाणपट्टे, अग्नीबाण असें योद्ध्याच्या आवडीचे सगळे ठेवले होते त्यात कशात नवरदेव जास्त लक्ष घालतो त्यावरून त्याचा वर्ण राजाला ओळखता येणार होता. दृष्टद्युम्नाला मात्र त्या बाबत पूर्ण खात्री होती कीं त्याचा भाऊजी अर्जुनच आहे. राजघराण्याच्या बायका त्या नवरदेवाच्या आईचे निरीक्षण करणार होत्या व त्यावरून ती कोणत्या संस्काराची आहे ते त्या अजमावणार होत्या. एकाप्रकारे पांडवांची परीक्षा होणार होती.

व्याही मंडळी आली, कुंतीने तिच्या सुनेचा हात धरला होता. ती तिच्या सुनेला घेऊन आतल्या कक्षात जाते. कुंतीच्या वागण्यावरून त्या पांचालांच्या राजघराण्यातील स्त्रीया समजतात कीं, ही पंडुची विधवा आहे. तिचे त्या राजघरातील वागणे कोणत्याही ब्राह्मण महिलेस शक्य नव्हते हे तेथील सगळे ओळखतात. त्या पाठून ते पांच देखणे शूरवीर आपल्या ब्राह्मणी वेषात तेथे रथातून उतरतात. त्याची देहयष्टी, तो धिप्पाड देह, त्यांचे चालणे, इतर हालचाली, आजूबाजुला पहाण्याची तर्हा, त्याना दिलेल्या आसनांवर त्यांची बसण्याची पद्धत सारे दाखवते कीं, त्यांना राजघराण्याच्या गोष्टींची चांगलीच माहिती आहे. कोठल्याही श्रीमंती थाटामुळें थक्क होणे जे ब्राह्मणांकडून अपेक्षित होते तसें अजिबात त्यांच्या वागण्यात दिसत नाही. तेथे असलेले दरबारी त्यांचे त्याच उद्देशांने निरीक्षण करत होते व सर्वांना खात्री पटत होती कीं, हे निश्चितच भिक्षेकरी नाहीत तर ते राजघराण्याचेच आहेत. त्याची कन्या त्या घरात दोन दिवस राहिलेली असल्यामुळें तिचे काय निरीक्षण आहे हे समजून घेण्यासाठी राजघराण्याच्या बायका व स्वतः द्रुपद उत्सूक होते.
व्याही मंडळी आल्यावर त्यांचे उत्तम स्वागत होते, त्यांना सजवलेल्या आसनांवर बसवले जाते. त्यानंतर उत्तम प्रकारचे वस्त्र परिधान केलेले स्त्री पुरुष सेवक त्यांना विविध प्रकारचे खाद्यपदार्थ खाण्यासाठी आणत रहातात. चांदी व सोन्याच्या ताटांतून सर्व खाद्य वाढले जात होते. पाहिजे तेवढे त्याना खाता येत होते. कांहीं कमतरता नव्हती, अधूम मधून दृष्यद्युम्न त्यांना आग्रह करीत होता. सर्वकांहीं सन्मानपूर्वक होत होते जसे व्याह्यांचे झाले पाहिजे. त्यांच्या अगदी बारीक सारीक हालचालींचे सुक्ष्म निरीक्षण होत होते ते कदाचित् त्या पांडवांना माहीत नव्हते. सर्व निरीक्षणानंतर त्या सगळ्या दरबार्यांचे समाधान होते कीं, दृष्यद्युम्नाचा अंदाज योग्य होता व हे सगळे पांडवच आहेत. त्यामुळें त्या घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. राजा यज्ञसेनाच्या आनंदाला कांहीं मर्यादा राहिली नव्हती. आपल्याला जे व्हावे असें वाटत होते नेमके तेंच घडल्याने तो कमालीच्या समाधानाने शांत झाला होता.
अशा रितीने आदिपर्वातील वैवाहीक पर्वाचा एकशे पंच्यांणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे शहाण्णवावा

(वैवाहीक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, पांचाल देशाचा तो तेजस्वी राजा, जेवणं संपल्यावर युधिष्ठीराला उद्देशून  विचारतो, जसें ब्राह्मणांना यजमान विचारतात, "आपण नेमके कोण अहात कीं तुम्ही उच्च दर्जाचे क्षत्रिय कांहीं कारणांने गुप्तपणे वावरत अहात, कां ब्राह्मण अहात कां कोणी स्वर्गीय लोक अहात व पृथ्वीची सैर ब्राह्मण वेषात करत माझ्या कन्येचा हात जिंकलात, कृपया नेमके काय ते आता सांगा कारण, मला माझी प्रिय कन्या नेमक्या कोणत्या घरात नांदणार आहे हे समजण्याचा हक्क आहे हे तुम्ही समजू शकता. माझ्या मुलीच्या भल्यासाठी मी कांहींही करण्यास तयार आहे म्हणून ते सगळे खरे सांगून आमच्या मनातील शंकांचे निरसन करावे. खरे सांगण्याने आपले कांहीं नुकसान होईल असें आपल्याला वाटण्याचे कारण नसावे कारण आता आम्ही आपले आप्त आहोत. तुमच्या तोंडून ते सत्य आम्हाला ऐकावयाचे आहे, एरवी तुम्ही कोण अहात ते आमच्या जाणकारांनी शोधले आहेच. यज्ञ करण्यापेक्षा, दानं करण्यापेक्षा सत्य आचरणे जास्त श्रेष्ठ असते. म्हणून आता खरे काय ते सांगून टाका. खरे जाहिर केले म्हणजे आपल्या वर्णानुसार जो विवाहविधी अभिप्रेत असेल त्या प्रमाणे विवाह माझ्या मुलीचा करण्याचे योजले जाईल".

द्रुपदाचे ते कळकळीचे उद्गार ऐकल्यावर युधिष्ठीर उठून बोलतात, "अहो राजे, आपल्याला आनंद होईल कीं, आम्ही क्षत्रिय आहोत, एवढेच नाही तर जसा तुमचा अदाज आहे त्याप्रमाणेच आम्ही पंडुराजाचे पांच पुत्र आहोत. मी त्यांतील मोठा आहे. माझ्यानंतर आहे हा येथे बसलेला भिम आहे व ज्यांने पण जिंकून कृष्णा मिळवली तो माझा भाऊ अर्जुन हा येथे बसलेला आहे व ह्याबाजूला आमची आई व कृष्णा आणि नकुल व सहदेव तिच्या बाजूला असें आम्ही येथे बसलो आहोत. अनेक राजांच्या सभेत माझ्या भावाने तो पण जिंकला, हे आपण सर्व जाणताच. तुमच्या मित्राचीच आम्ही मुलं आहोत. कृपया विनाकारण चिंता करू नका. आपली कन्या आमच्या कडे येणे म्हणजे कमळाचे एका तलावातून दुसर्या तशाच तलावात जाण्यासारखे आहे. आता आपण आमचे वडील अहात

व ह्यापुढे आम्ही आपल्या मदतीची अपेक्षा करत  आहोत. हे आहे सगळे सत्य आहे, जे ऐकण्यासाठी तुम्ही आतूर अहात"!

वैशंपायन पुढे सांगतात, द्रुपदाचे डोळे आकाशाकडे गेले. थोडे क्षण तो यज्ञसेन स्तिमित झाला. राजा काय बोलावे तें समजू शकला नाही. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. स्वताच्या भावना आवरणे त्याला फार कठीण जात होते. आपल्या मित्राची मुलं सुरक्षित आहेत, वरनावत मधील लक्षागृहातून ते सहीसलामत सुटले व ते आता आपले संबंधी झाले आहेत ह्या सत्य घटनां त्याला सुखाचा धक्का देत होत्या. त्यानंतर युधिष्ठीराने त्या लक्षागृहातून सुटण्यापासून आतापर्यंत जे घडले ते सगळे सविस्तरपणे जमलेल्या लोकांना सांगितले, त्यात त्या दोन राक्षसांना भिमांने कसे मारले ते सांगितले. अर्जुनाने गंधर्वाला कसें चित केले ते सांगितले.

शेवटी आपल्या भावना आटोपत्या घेत द्रुपदाने धृतराष्ट्राला दोष दिला. त्यानंतर त्याने पांडवाना आश्वासन दिले कीं, तो त्याचे वजन वापरून पांडवांना त्यांचा हक्क मिळवून देईल. त्यानंतर पांडवांसाठी राजाच्या प्रशस्त वाड्यात रहाण्याची व्यवस्था द्रुपदाने केली. तेथे सन्मानपूर्वक त्यांची व्यवस्था राजाने केली. सगळे व्यवस्थित झाल्यावर राजाने अर्जुन व कृष्णाच्या लग्नाची गोष्ट काढली. त्यासाठी आवश्यक प्राथमिक रीतीरिवाज सुरु करावेत असा आग्रह कृष्णाच्या घरच्या मंडळींनी कुंत्तीकडे लावला .

वैशंपायन पुढे सांगतात, द्रुपदाचे ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याला सांगतो, "अहो राजे, मलासुद्धा लग्न करावेसे वाटते". ते ऐकल्यावर राजा त्याला बोलतो, "जर तुला कृष्णाशी लग्न करावयाचे असेल तर त्याला माझी अजिबात हरकत नाही. तसे करू". "किंवा तुमच्यापैकीं, ज्या कोणा एकाला तिच्याशी लग्न करावयाचे असेल त्याच्याशी मी तिचा विवाह लावून देण्यास तयार आहे". ते ऐकल्यावर युधिष्ठीर राजाला सांगतो, "आमच्या आईची इच्छा आहे किं, ती आम्हा सगळ्या पांचांची स्त्री व्हावी, खरे तर तशी तिची आज्ञा आहे". पुढे तो सांगतो, आम्ही सगळेच सध्या अविवाहीत आहोत व कृष्णा अर्जुनाने मिळवली आहे परंतु, भिक्षेकर्याच्या संस्कारामुळें आम्ही नेहमी मिळालेली भिक्षा सारखी वाटून घेत असतो त्याप्रमाणे कृष्णासुद्धा आम्ही वाटून घ्यावी असा आमच्या आईचा आदेश आहे. म्हणून ती आम्हा सगळ्यांची पत्नी झाली पाहिजे". युधिष्ठीराचे ते ऐकून

यज्ञसेन त्याला समजावतो, "एका पुरुषाने अनेक स्त्रिया करण्याचे प्रघात आहेत परंतु, एका स्त्रीने अनेक पती करण्याबद्दल कधी ऐकलेले नाही". पुढे तो आणखीन सांगतो, "अरे पंडुपुत्रा, तू पवित्र नियमांचे शास्त्र जाणतोस, आपल्या येथील नितितत्त्वे जाणतोस, कृपया असें कांहीं करण्याचे योजू नये, ज्यामुळें वेदांचा अपमान होईल व त्यामुळें पाप पदरी पडेल. आपण राजकर्ते असल्यामुळें आपल्यावर योग्य परिपाठ लोकांपुढे ठेवण्याची जबाबदारी असते ते लक्षात घे. सामान्य जनांत असें कांहीं एकवेळ चालेल परंतु, राजघराण्यात असें करणें उचीत होणार नाही. आपल्या पूर्वजांत कोणीही असें केलेले नाही हे लक्षात घे. ते ऐकल्यावर युधिष्ठीर द्रुपदाला सांगतो, "मला कोणतेही पापकृत्य होऊ नये असें वाटते. मी आजपर्यंत कधीही पापकृत्य तोंडानेही केले नाही. मी मनानेसुद्धा पाप केलेले नाही. केवळ माझ्या आईने असा आदेश दिल्यामुळें आम्ही हा निर्णय घेतला आहे. आणि आईचा आदेश असल्याने त्याला पाप समजणे योग्य होणार नाही. त्यात कांहीं पाप होईल असें समजण्याचे कारण नाही". राजाला समजते कीं, युधिष्ठीर त्याच्याने ऐकणार नाही व मातेच्या आज्ञेचे पालुपद चालवत रहाणार तेव्हां तो त्याला सांगतो, "ह्या मामल्यात मी बोलत नाही, तुझी आई, माझा दृष्यद्युम्न व तू असें मिळून ठरवावा. जे तुमच्यात ठरेल तसे करू. उद्या तुम्ही काय ते ठरवून सांगा, हेंच योग्य".

वैशंपायन पुढे सांगतात, ठरल्याप्रमाणे, ते तिघे निर्णय घेण्यासाठी एकत्र बसतात, त्याच वेळी कृष्ण द्वैपायन ऋषी आपल्या भटकंतीच्या निमित्ताने तेथे द्रुपदाला व पांडवांना भेटण्यास येतात.

अशारिताने आदिपर्वातील वैवाहीक पर्वाचा एकशे शह्यांणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे सत्त्याण्णवावा

(वैवाहीक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, ऋषी कृष्ण द्वैपायन द्रुपदाकडे आल्यावर समस्त पांचाल राजाचा परिवार व पांडव मंडळी त्यांचे उभे राहून स्वागत करतात. तो श्रेष्ठ ऋषी त्यांना अभिवादन करून अभिष्ट चिंतन करतो. नंतर जमिनीवर एका आंथरलेल्या सुवर्णाची जरी करून मढवलेल्या जाजमावर ते ऋषी बसतात. त्यानंतर ऋषीच्या संमतीने ते समस्त पांचाल व पांडव तेथे असलेल्या उंची आसनांवर विराजमान होतात. क्षेमकुशल विचारल्यावर द्रुपद, प्रिशताचा मुलगा, हळू आवाजात कन्येच्या विवाहातील अडचण व्यासांना समजावून सांगतो. त्यानंतर ऋषींचे काय मत आहे त्याची विचारणा करतो. मनात घर करून राहिलेला प्रश्न द्रुपद व्यासांना विचारतो, "अहो राजर्षी, मला सांगा आपल्या नितीतत्त्वानुसार एक मुलगी अनेक पती करू शकते कां"? "मला आपले खरे मत सांगा".

व्यास जे सर्वज्ञानी आहेत बोलतात, "हे मान्य केले पाहिजे किं, ही प्रथा आता प्रचारात नाही व वेदांनेसुद्धा तिचा त्याग केला आहे. तरी आता विषय निघाला आहेच तर तुमचे ह्याबद्दल मते आहेत ते समजून घेणे मला आवश्यक वाटते तरी एक एक करून आपले मत काय आहे ते सांगा.

ऋषीचे बोलणे संपल्यावर राजा द्रुपद प्रथम बोलतो, "माझ्यामते असें करणे केवळ पापकृत्य ठरेल. वेदांत व प्रथांतूनही असा प्रकार त्यज्य समजला जात आहे. अहो ब्राह्मण, आजवर मी कधी असा विवाह प्रकार कोठे झाल्याचेसुद्धा ऐकलेले नाही. एक पुरुष अनेक बायकांशी लग्न करण्याचे प्रचलित आहे पण हे नाही. म्हणून माझा अशा विवाहाला विरोध आहे. असे करणे अनैतिकतेचे ठरेल व जर आपल्या राजघराण्याने असा पायंडा पाडला तर इतर राजे कदाचित आपल्याला धिक्कारतील ह्याची मला चिंता वाटते.

द्रुपदानंतर त्याचा मुलगा दृष्यद्युम्न त्याचे मत सांगतो. "अहो ब्राह्मण श्रेष्ठा, आपण वैराग्यपूर्ण अहात, मला सांगा जर मोठ्या भावांने धाकट्या भावाच्या बायकोची इच्छा धरली तर ते निश्चितच अनैतिक ठरते हे जगन्मान्य आहे. मला वेगळे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच अशी प्रथा कधी प्रचारात आलेली नाही व येणारही नाही. म्हणून माझी सद्विवेक बुद्धी सांगते कीं, हे अयोग्य आहे. म्हणून माझी ह्याला मान्यता नाही, माझी बहिण

पांचांची बायको असा प्रकार मी सहन करणार नाही. अहो ब्राह्मण, कृपया, हे होऊ देऊ नका".

त्याच्यानंतर युधिष्ठीर बोलतो, "माझी जिभ कधी खोटे बोलणार नाही. कधी असत्य जे पापकारक आहे ते आचरणार नाही. माझे मन पापकृत्य कधीही स्वीकारणार नाही. पुराणात एक कथा आहे, त्यात जटीला नांवाची पुण्यवान बाई गोतम वंशाची होती, तिने सात ऋषींशी लग्ने केली होती. दुसरे उदाहरण पुराणातील, एका ऋषीची मुलगी जी झाडातून उत्पन्न झाली होती, ती दहा भावांची बायको झाली होती. त्याची नांवे प्रचेता होते. ते सगळे मोठे तपस्वी ऋषी होते. त्याशिवाय माझ्यामते आईची आज्ञा मानणे हे नैतिकतेचे मोठे कर्तव्य समजले जाते. ह्या ठिकाणी हा विषय उपस्थित झाला आहे त्याचे कारण तेंच आहे किं आमच्या आईची ती इच्छा आहे. त्याचे कारण आम्ही भिक्षेकरी बनून जे दान आणत असूं त्याची वाटणी आमची आई सारखी करत असें. कृष्णासुद्धा तिच्यामते असेंच (कन्या)दान द्रुपदाने दिले असे समजून ती म्हणाली कीं. आम्ही तिला वाटून घ्यावी. म्हणून माझ्यामते असे होणे रास्त आहे. आईच्या आज्ञेचे पालन न करण्याचे पाप करणे आम्हाला उचित वाटत नाही".

त्यानंतर कुंतीची पाळी येते. ती बोलते, "युधिष्ठीर जे सांगतो ते खरे आहे व मी असें बोलायला नको होते पण तसे माझ्याकडून अनवधानाने झाले, माझी इच्छा आहे किं, तसें होऊ नये. ह्या अरिष्ठातून माझी कशी सुटका होणार"? त्यावेळी सहदेव मध्येच बोलतो, "आपण ज्येष्ठ अहात पण मला वाटते ह्यात प्रत्यक्ष जिचा विवाह होणार त्या कृष्णाचे काय मत आहे त्याचा विचार कां होत नाही". परंतु, त्याच्या बोलण्याकडे कोणीही लक्ष देत नाही.

त्या तिघांचे सांगून झाल्यावर व्यास बोलण्यास सुरुवात करतात. ते बोलतात, "अरे गुणीजनानो, ह्या असत्यातून सुटका कशी करावयाची हांच प्रश्न आहे. तुम्हा प्रत्येकाच्या बोलण्यात त्या त्या प्रकारचे सत्य आहे, जसें युधिष्ठीराचे आईचे आज्ञापालन, दृष्यद्युम्नाचे बंधू प्रेम, द्रुपदाचे प्रजापालन, कुंतीचा पश्चात्ताप हे सगळे सत्याचे प्रकार आहेत . ह्या जटील प्रश्नावर मी तुम्हा सगळ्यांसमोर यज्ञसेनाशी बोलू इच्छित नाही, त्यासाठी त्याला घेऊन मी

आतल्या कक्षात जाणार आहे. असें बोलून व्यास उठतात व द्रुपदाचा हात धरून त्याच्यासह आतील कक्षात ते जातात. बाकीचे तिघे तेथेच त्यांची वाट पहात बसतात.

आत गेल्यावर व्यास राजाला प्राचीन बहुपतीत्वाची प्रथा काय होती व ती कशी निष्पाप होती ते सांगतात.

अशारितीने आदिपर्वातील वैवाहीक पर्वाचा एकशे सत्यांण्णवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे अठ्ठ्याण्णवावा

(वैवाहीक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, व्यास पुढे बोलत होते, अतिप्राचीन काळी स्वर्गीय लोकांनी एक मोठा यज्ञ निमिषारण्यात आयोजला होता. त्या यज्ञाच्या वेळी यम, विवस्वाताचा मुलगा, बळी घेण्याचे काम करण्यासाठी नेमला होता. त्या यज्ञात तो एकाही मनुष्याचा बळी देत नाही. त्यामुळें पृथ्वीवरील माणसें मरण्याचे थांबले होते. परिणाम स्वरुप माणसांची संख्या वाढत गेली. ते योग्य होत नाही असें पाहून सर्व प्रमुख स्वर्गस्थ देव जसें चंद्र, शक्र, वरुण, कुबेर, साध्य, रुद्र, आणि वसु त्याशिवाय अश्विनीकुमार द्वय असें सगळे जण प्रजापतिकडे गेले. ते तेथे जाऊन प्रजापतिला बोलले, "अहो ब्रह्म, पृथ्वीवरील मनुष्याची वाढत जाणारी संख्या भयावह आहे, त्याकरता आम्ही काय करावयाचे ते ठरवण्यासाठी आपल्याला भेटत आहो". ते ऐकल्यावर प्रजापति त्यांना बोलतात, "तुम्हाला त्याची चिंता करण्याचे कांहीं कारण मला दिसत नाही कारण तुम्ही अमर्त्य अहात". "तुम्हाला माणसाची भिती वाटण्याचे काय कारण"? त्यावर शक्र बोलतो, "नेमके तेंच कारण आहे, कारण, ते मरत नसल्यामुळें ते अमर्त्य झाले म्हणजे त्यांच्यात व आमच्यात कांही फरक राहिला नाही". "हा भेद नाहीसा झाल्यामुळें त्यांची आम्हाला भिती वाटणे स्वाभाविक आहे". ते ऐकल्यानंतर ब्रह्मदेव त्यांना सागतात, "तूर्त विवस्वाताचा मुलगा मोठ्या यज्ञाच्या कामात व्यस्त आहे, ते कामं संपले कां पुन्हा मनुष्य मरावयास लागतील व सर्व पूर्ववत होईल, तेव्हा उगाचच चिंता करू नका. हा यज्ञ संपल्यावर यम मोठ्या प्रमाणात माणसांची हत्त्या करून टाकील. मग त्यांची तुम्हाला भिती वाटणार नाही". त्याने समाधान झालेले ते देव त्या यज्ञाच्या ठिकाणी जातात. तेथे ते भागिरथीच्या किनारी त्या यज्ञस्थळी असतांना त्यांना सोनेरी कमळं पाण्याच्या प्रवाहावर तरंगत जातांना दिसतात. त्यात इंद्राला विशेष उत्सुकता होते व तो ते कमळ कोठून वहात आले ते पहाण्यासाठी त्या प्रवाहाच्या उलट दिशेंने जाऊ लागतो. तो तसा जात अखेरीस गंगा उगमापर्यंत पोहोचतो. तो पहातो किं, तेथे एक अग्नीसारखी चमकणारी स्त्री रडत रडत त्या पाण्यात आंघोळ करत होती. तिच्या अश्रूंची पाण्यात पडल्यानंतर कमळं होत होती. ते पाहून अचंबित झालेला तो इंद्र धाडस करून त्या स्त्रीकडे जातो व तिला विचारतो, "आपण कोण व कोठून आला अहात? आपण

कां रडता, सगळे सांगाल कां? मला ते समजून घेण्याची आतुरता आहे तरी ते सगळे सांगावे".

व्यास त्यानंतर बोलतात, इंद्राच्या त्या विचारण्यानंतर ती स्त्री सांगते, "अरे शक्रा स्वर्गाच्या राजा, तुला समजून घ्यावयाचे आहे कां, मी कोण आहे व कां रडते"? "तर मग माझ्या मागून ये. म्हणजे तुला समजेल मी कां रडत आहे". ते ऐकल्यावर तो देवांचा राजा तिच्यामागून चालू लागतो. लवकरच तो अशा ठिकाणी येतो तेथे एका उंच शिखरावर एक देखणा पुरुष एका दुसर्या बाई बरोबर द्युत खेळत असलेला तो पहातो. त्याचे आसन उंची होते. तो हिमालयाचा भाग होता. त्याला असें बसून द्युत खेळतांना पाहून इंद्राचा अहंकार दुखावला गेला. तो दरडावून त्या युवकाला दम भरतो, "अरे बेजबाबदार युवका, हे जग माझ्या अधिकारात आहे", परंतु, तो तरुण इंद्राकडे ढुमकूनसुद्धा लक्ष देत नाही. त्यामुळें आणखीन संतापलेला देवांचा तो अहंकारी राजा त्याला पुनः दरडावतो, "मी ह्या जगाचा राजा आहे व तू माझ्याकडे पहात नाहीस? अखेरीस इंद्राला समजते किं, तो युवक प्रत्यक्ष ईशान देव होता. तो इंद्राकडे पाहून फक्त एक हलके स्मित करुन पहातो. त्या क्षणी इंद्र जागच्या जागी गारठून दगडा सारखा होतो. त्यानंतर जसें ईशान देवाचे द्युत खेळणे संपते, तो त्या रडणार्या बाईला सांगतो, "त्या माणसाला माझ्या जवळ आण म्हणजे त्याला दाखवीन अहंकार कसा खतरनाक असतो". त्यानंतर इंद्राकडे पाहून तो महादेव त्याला बजावतो, "पुनः असा अहंकाराने कोणाशी बोलू नकोस". त्या नंतर त्याला आज्ञा करतो किं, एक दगड त्या बाजूला असतो, तो त्याने उचलून बाजूला करावा, तो दगड इंद्र बाजूला करतो. त्याखाली त्याला एक भुयार आढळते. त्यानंतर महादेव त्याला सांगतात, "आत डोकावून बघ". इंद्र आत डोकावून पहातो, त्यात त्याला त्याच्या सारखे तेजस्वी चार इंद्र अडकलेले दिसतात. ते पाहून इंद्र थरकापू लागला. त्याला वाटले कीं, आता तोसुद्धा त्यांच्या सारखा आत अडकणार किं काय?

ईशान देव त्याचे डोळे वटारून इंद्राकडे पहात बोलतो, "अरे शंभर यज्ञ करणार्या शक्रा, त्या भुयारात त्वरित प्रवेश कर. माझा अपमान माझ्या देखत करण्याची शिक्षा तुला झालीच पाहिजे". त्या सगळ्या प्रकाराने इंद्र अंगातील त्राण पुरता खतम झाल्यासारखा थराथरा कापत होता. हात जोडून तो इंद्र त्या वृषभ देवाला बोलतो, "अहो विश्वेश्वरा", ते त्याचे

ऐकून तो गिरीश, गालातल्यागालात हसूं लागला, आणि बोलला, "तुझ्यासारखे कधीही माझ्या योग्यतेला येऊ शकत नाही. हे जे आत आहेत तेसुद्धा तुझ्यासारखे इंद्र होते. तुमची शिक्षा काय ते सागतो, तुम्हाला पृथ्वीवर माणसांत जन्म घ्यावा लागेल व तेथे पराक्रम करून आपले हरवलेले स्थान मिळवावे लागेल. तेथे अनेक दुष्टांचा नाश तुम्हाला करावा लागणार आहे. त्याशिवाय इतर पुष्कळ गोष्टी कराव्या लागणार आहेत. त्यानंतरच तुम्हाला तुमचे गेलेले स्थान प्राप्त होईल. ते महादेवाचे ऐकून ते सगळे चार बोलतात, आम्ही स्वर्ग सोडून पृथ्वीकडे जाऊ, जेथे मुक्ती मिळणे मुष्कील आहे, व जे आव्हान पडेल ते करून दाखवू. परंतु, तुम्ही कृपया यम, वायू, इंद्र आणि आश्विनीकुमार ह्यांना आमचे पितृत्व घेण्याची आज्ञा करावी. तेथे आम्ही मानवी व स्वर्गीय शस्त्र-अस्त्र वापरून दुष्टांचे निर्दालन करू व पुनः इंद्रपद मिळवू. त्यानंतर व्यास पुढे सांगतात, शक्र (हल्लीचा इंद्र) सांगतो, माझ्या ऐवजी माझा एक अंश मी तयार करतो जो तुम्ही जे काम करण्याची आज्ञा द्याल ते माझ्यावतीने करुन दाखवेल. तो ह्यांच्यातील पांचवा असेल. विश्वभूक, भूतधमन, महाशक्तिमान शिवी, चौथा शांति आणि पांचवा तेजस्वीन हे मी सांगितलेले पांच इंद्र पूर्वीच्या काळातील आहेत. त्यांना महादेवांनी त्यांच्या कामना पूर्ण होतील असा दुवा दिला आहे. त्यांनी त्यांच्यासाठी एक स्त्री जी साक्षात लक्ष्मी आहे ती ही त्यांची पत्नी म्हणून योजलेली आहे. त्यानंतर महादेव त्या सर्वांसह नारायणाला भेटण्यास जातो. असा नारायण ज्याच्या सामर्थ्याला तोड नाही, जो पुराणपुरुष आहे, जो अनंत आहे. नारायण ती व्यवस्था योग्य आहे असा निर्वाळा देतो. त्यानंतर यथावकाश ते सगळे माणसात जन्मले. त्यावेळी नारायण त्याच्या शरीरावरील दोन केस काढतो, त्यातील एक काळा असतो व दुसरा शुभ्र असतो. ते दोन केश यदु कुळातील दोन बायकांच्या गर्भात शिरतात. काळा केश देवकीच्या गर्भात व शुभ्र रोहीणीच्या गर्भात त्यांतून पुढे देवकीला केशव व रोहीणीला बलराम होतात. त्याच प्रमाणे, ते हिमालयातील गुहेत असलेले इंद्र पंडुच्या वंशात कुंतीच्या व माद्रीच्या पोटी जन्म घेतात . त्यात अर्जुन जो सव्यसाची (दोनही हातांनी काम करू शकणारा) असतो तो महत्वाचा आहे. कारण त्याच्यात सांप्रतच्या इंद्राचा, शक्रचा अंश आहे. व्यास पुढे द्रुपदाला सांगतात, अरे राजा, हे जे पांडव तू पहातोस ते दुसरे तिसरे कोणी नसून ते पांच पूर्वीचे इंद्र आहेत. तसेंच ती साक्षात लक्ष्मी जी रडत होती

ती तुझ्या पोटी तुझी कन्या द्रौपदी बनून आली आहे. अशा शक्तिचा जन्म सामान्य मुलीसारखा होणे शक्य नाही, म्हणून ती यज्ञसिद्धा झाली. त्यामुळेंच तिच्या अंगातून अद्वितीय सुगंध येतो ज्याची दरवळ पुष्कळ दूरवर पसरत आहे आणि जिचे तेज दाही दिशा पसरले आहे. अरे राजा, मी तुला एक दिव्यदृष्टी देतो ज्यामुळें तू त्या पांडवांचे खरे स्वर्गीय स्वरूप पाहू शकशील म्हणजे तुझा माझ्या सांगण्यावर विश्वास होईल. वैशंपायन सांगतात, असें बोलून तो ऋषीश्रेष्ठ कृष्ण द्वैपायन, त्याच्या तपस्येने प्राप्त झालेल्या सिद्धीने द्रुपदाला ती दिव्य दृष्टी देतो. त्यामुळें तो भाग्यवान राजा पांडवांचे खरे दिव्य रुप पहातो. ते सगळे साक्षात इंद्रासारखे दिसत होते. त्यांच्या देहातून सूर्यासारखे तेज येत होते. त्यांच्या तेजस्वी अंगावर विविध प्रकारचे रत्नजडीत अलंकार शोभत होते. त्यांच्या गळ्यात ज्यांतून विलक्षण परिमळ दरवळत होता, असें स्वर्गीय हार होते जसें गंधर्व घालतात. त्यांचे शरीर धिप्पाड व आकर्षक होते. अतिशय सुंदर दिसणारे स्वर्गीय अंगरखे ते नेसलेले होते. त्या पूर्वीच्या इंद्रांतून ईशान, वसु, रुद्र व आदित्य दिसत असल्याचा भास होत होता. अर्जुनातून मात्र शक्र दिसत होता. ते दृष्य पाहून राजा द्रपदाला विलक्षण आनंद झाला होता. राजा यज्ञसेन त्याच्या मुलीकडे पहातो, ती अग्नीसारखी तेजस्वी भासत होती, त्या इंद्रांसाठी ती एकटी पत्नी म्हणून शोभेल हे तो ओळखतो. ते असें सर्व विलक्षण दृष्य पाहिल्याने प्रभावित झालेला राजा व्यासमुनींच्या पाया पडतो व बोलतो, "आपल्याला कांहींही अशक्य नाही हेंच खरे". वैशंपायन पुढे सांगतात, व्यास आनंदाने आणखीन सांगू लागतात, एका आश्रमात एक ऋषीकन्या रहात होती. ती सुंदर व कुमारीका असूनही तिला योग्य वर मिळत नव्हता. तिने थोर तपस्या केली होती. तिच्या त्या थोर तपस्येमुळें ईशान देव (महादेव) प्रसंन्न झाले. महादेव तिला विचारतात, "बोल कन्ये, तू कां हे व्रत आरंभिले आहेस"? ते ऐकून ती ऋषीकन्या घाई घाईत पुनः पुन्हा बोलते पांच वेळा, "मला उत्तम वर पाहिजे". त्यावर परमेत्थी तिला तो आशिर्वाद देतात. ते तिला बोलतात, "मुली तुला तुझ्या इच्छेनुसार पांच पति व तेसुद्धा एकाच जन्मात प्राप्त होतील". ते ऐकून ती आश्चर्यचकित होते व बोलते, "देवा ईशाना, मी एकच पति मागितला होता मग असें पांच कसे तुम्ही देणार अहात"? देव तिला आठवण करून देतात किं, "तिने पांच वेळा तोच वर मागितला म्हणून तुला पांच पती मिळणार व तेसुद्धा एकाच जन्मात आणि हे अटळ आहे व तेसुद्धा तुझ्या

पुढच्या जन्मात होईल, कारण ह्या जन्मात तू तुझी तपस्या पूर्ण करणार आहेस". एवढे सांगून व्यास राजाला सांगतात, "अरे राजा ती ऋषीकन्या दुसरी तिसरी कोणी नसून तुझ्या पोटी जन्मलेली कृष्णा आहे". पुढे तो ऋषी सांगतो, "हे आधीच ठरलेले आहे. किं, ती प्रिशताच्या कुळात जन्म घेणार व तेसुद्धा त्या तुझ्या यज्ञामुळें झाले आहे". "ती ऋषीकन्या साक्षात लक्ष्मी देवीप्रमाणे तुझ्या घरी आली, ते ह्या पांच इंद्रांशी लग्न करण्याचा योग साध्य व्हावा म्हणूनच". मी तुला जे सत्य ते सांगितले, तुमच्या तिघांच्या सत्यांचा विचार केल्यानंतर. ह्यापुढे तू समजून योग्य निर्णय घे.

अशारितीने आदिपर्वातील वैवाहीक पर्वाचा एकशे अठ्ठ्यांणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग एकशे नव्याण्णवावा

(वैवाहीक पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत रहातात, द्रुपद हे त्याचे ऐकून ऋषी व्यासांना बोलतो, "तुमच्या कडून हे सत्य ऐकण्या आधीचा तो माझा विचार होता. परंतु, आता मला खरे सत्य तुमच्याकडून समजले आहे. त्याकारणांने मी देवांच्या इच्छेनुसार व्हावे असेंच करू इच्छितो. कोणाचे भाकित आपण बदलू शकत नाही व ते बदलण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये कारण, त्यामुळें नवीन आपत्ती उत्पन्न होत असतात".

"आता पहिला ठरवल्याप्रमाणे एकाच वराशी तिची विवाह न होता, ती ह्या सगळ्या भावांना वरणार आहे हे निश्चित. जे शंकराने सांगितले त्याच्यापेक्षा मोठे सत्य नाही. लोकाज्ञा साधारण असते परंतु, ईश्वराज्ञा असाधारण असते ती समजण्यास विलंब होतो पण एकदा ती समजली कीं, तिचे पालन करण्यानेच पुण्य प्राप्त होते. म्हणून अशा विवाहात कोणतेही पाप असूच शकत नाही हेंच खरे".

"दुसरा कांहीं विचार न करतां कृष्णाचा हात ह्या पांचांच्या हातात देऊन मी मोकळा होऊ इच्छितो. देवाची आज्ञा पालन करावयाचे असते त्यात न्यून पहाणेच पाप ठरते. म्हणून मोठ्या आनंदाने योग्य अयोग्य काय ते माणसाच्या बुद्धीने ठरवण्यात मी समय व्यर्थ घालवू इच्छित नाही. विवाहाच्या विधींची तयारी सुरु करावा".

वैशंपायन सांगत असतात, त्यानंतर व्यास युधिष्ठीराला बोलतात, "आजचा दिवस शुभ आहे. पंडुच्या मुला, आज चंद्र पुष्य नक्षत्रात शिरत आहे. तू आज कृष्णाचा उजवा हात तुझ्या डाव्या हात घे, तू ज्येष्ठ म्हणून तुझे लग्न प्रथम होणार". व्यासांने अशी आज्ञा केल्यावर त्वरित यज्ञसेन व त्याचा मुलगा त्या विवाहाची व्यवस्था करण्याचे आदेश देतात. त्या लग्नासाठी जरुरी असलेल्या सगळ्या सामुग्री तयार ठेवल्या जातात. त्यानंतर सर्व साज श्रृंगाराने सजलेली कृष्णा आणली जाते. त्या लग्नाला उपस्थित रहाण्यासाठी राजाचे सगळे आप्त येतात. त्यांत त्याचे मंत्री, आमात्य, ब्राह्मण, प्रतिष्ठीत नागरीक हजर होतात. ते सगळे आपापल्या योग्यतेनुसार नेमून दिलेल्या आसनांवर बसतात. त्यांच्या अंगावर त्यांच्या दर्जाची नेमून दिलेली आभूषणं त्यांनी परीधान केलेली असतात. प्रांगण कमळांच्या सुगंधी फुलांनी सजवलेले असते. द्रुपदाचा राजवाडा रत्नांनी व हिर्यांनी व इतर मौल्यवान

दागिन्यानी मढवलेला असतो. जणुकाय आकाश जसें तारकांनी व चंद्रीकांनी चकमकत आहे. आमंत्रितांच्या अंगावर सुगंधी वास येत आहे असें उंची वस्त्रं होते. चंदनाचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. प्रसंगानुरुप कार्यासाठी पांडवांचे पुरोहीत धौम्य उपस्थित होते त्यांच्या सर्व तयारीनिशी. धौम्यांनी विधीस सुरुवात केली पवित्र अग्नी चेतवून. मंत्र उच्चारत धौम्य शुद्ध तुपाची धार त्या अग्नीत सोडतात. ते युधिष्ठीराला बोलावतात. लवकरच त्याचा विवाह कृष्णा बरोबर संपन्न होतो. अग्नी भोवती प्रदक्षिणा करत, एकमेकांचे हात हातात धरून ते तो विधीसुद्धा पूर्ण करतात. त्यानंतर ब्राह्मण धौम्य त्या वाड्यातून बाहेर जातात.

त्यानंतर बाकीचे पांडव उंची वस्त्रं परिधान केलेले असें, एकेक दिवशी कृष्णाचा हात धरून तिच्याशी विवाह संपन्न करतात. अरें राजा, त्या विवाहाबद्दल मला व्यासांनी एक विशेष गोष्ट सांगितली, ती अशी कीं, प्रत्येक संभोगानंतर कृष्णा दुसर्या लग्ना आधी पुनः कुमारिका होत असें. अशा रितीने ती चार वेळा कुमारिका झाली व ते संबध शुद्ध ठरले. विवाह झाल्यानंतर तो राजा आपल्या पांच जावयांना त्यांच्या योग्यतेची संपत्ति भेट देतो. त्यामध्ये त्यांना शंभर रथ जे सोन्याने मढवले आहेत व त्यांना प्रत्येकी चार घोडे आहेत त्याशिवाय प्रत्येकी शंभर सुलक्षणी हत्ती बहाल करतो. त्यांच्या सेवेसाठी शंभर सेविकां देतो. त्यांच्या अंगावर उत्कृष्ट उंची कपडे होते व त्या तरुण देखण्या होत्या. त्याशिवाय तो महाराजा आपल्या प्रत्येक जावयासाठी खास स्वर्गातून आणलेला पवित्र अग्नी भेट देतो. त्याशिवाय विविध महागडे कपडे, दागिने आणि आणखीन बरेच कांहीं तो देतो त्याच्या एकुलत्या एक मुलीसाठी. ते सगळे मिळाल्यानंतर ते पंडुचे वारसदार त्या पांचाल देशात त्यांच्या लक्ष्मीसारख्या एकमेव पत्नीसह बरेच दिवस मजेत रहातात.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा एकशे नव्व्याणवावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशेवा

(वैवाहीक पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, ह्या नातेसंबंधामुळें द्रुपद जास्त शक्तिमान झालेला असतो. तो कोणालाही भित नाही अगदी देवांनासुद्धा. त्या राजघराण्याच्या सगळ्या स्त्रिया कुंतीला भेटून स्वतःचा परिचय करून देतात आणि रिवाजानुसार तिच्या पाया पडतात व डोक्याचे चुंबन घेतात. कुंतीसुद्धा त्यांच्या माथ्याचे चुंबन घेते. त्यात द्रौपदीसुद्धा रिवाजा प्रमाणे कुतीला पाया पडते. त्यावेळी, कुंती तिला आशिर्वाद देते, "जशी साची इंद्राला शोभते, स्वाहा जशी विभावसुला शोभते, रोहीणी सोमाला, दमयंती नळाला, भद्रा वैश्रवानाला, अरुंधती वसिष्ठाला आणि लक्ष्मी जशी नारायणाला तशी तू माझी भाग्यवान कृष्णा, माझ्या मुलांसाठी हो, व गुणी शूरवीर पुत्रांची माता हो". "तुझ्या सगळ्या कामना सफल हो". "तू तुझे पत्नी कर्तव्य चोख बजावशील, सगळ्या यज्ञात तू त्यांना साथ देशिल आणि एक उत्तम गृहीणी होऊन सगळ्यांना (आबाल वृद्ध, पाहुणे इत्यादी) संतुष्ट ठेवशील". "तू कुरुजंगलाची महाराणी बनून राज्य करशिल. हे सगळे जग तुझे पति जिंकतील व ते जग, तू तुझ्या हातानें ब्राह्मणांना अश्वयज्ञात दान करशिल". "जी सगळी रत्नं, जडजवाहिर ह्या जगात आहे ते सगळे तुला मिळो". "तू शतायु हो". "जसे मला, तुला ह्या लाल लुगड्यात पहावयाला आनंद होतो तसा, त्याहूनही जास्त आनंद तुला तुझ्या सुनांना पहातांना हो".

वैशंपायन नंतर सांगतात, पंडुच्या मुलांचा विवाह झाला हे समजल्यावर श्रीकृष्ण त्यांना महागड्या भेटी पाठवतो. त्यात अनेक देशांतून आणलेली मौल्यवान रत्ने, कपडे, गालिचे, मृदू स्पर्श असलेली पांघरुणं व बुरणूसं, जनावरांची उत्तमरित्या कमावलेली महागडी चर्मवस्त्रं, त्याशिवाय रत्नजडीत भांडी असें वस्तु विशेष असतात व त्या बरोबर निरनिराळ्या देशांतून आयात केलेल्या दासी असतात, उत्तमरित्या शिकवलेले हत्ती दक्षिणेकडून, पश्चिमेकडून उत्तम जातीचे घोडे, रथ व त्यांचे सामान असें बरेच कांही पाठवतो. त्याशिवाय अगणित शुद्ध सोन्याची नाणी पाठवतो व ते सगळें युधिष्ठीर मोठ्या अंतःकरणाने आनंदाने स्वीकारतो.

अशारितीने आदिपर्वातील स्वयंवर पर्वाचा दोनशेवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे एकवा

(विदूरागमन पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, ही पांडवांच्या लग्नाची वार्ता सगळ्या राजांना, जे अजून पांचालचे पाहुणे म्हणून तेथे रहात होते, त्यांच्या विश्वासू गुप्तहेरांकडून समजते, जे त्या स्वयंवारासाठी आमंत्रित होते. त्यांना हे सुद्धा समजते किं, ते धनुष्य लावणारा अर्जुन होता. त्यांना हे सुद्धा समजते किं, सल्याला फेकून देणारा दुसरा तिसरा कोणी नव्हता तर तो प्रत्यक्ष भिम होता. ज्यांच्या नुसत्या नांवांने शत्रू चळचळा कापतात असें ते होते. त्यांना हे सुद्धा समजते कीं, पांडव ब्रह्मचारी संन्याशांच्या वेषात तेथे आले जे अनेक देश गुप्तपणें भटकत होते व त्यांनी द्रौपदी जिंकली. त्यांना हेसुद्धा समजले किं, त्यांची आई त्यांच्या बरोबर आहे. म्हणजे लाक्षागृहात ते मेल्यानंतर आता ते पितृलोकांतून आले आहेत. ते समजल्यामुळें सगळे राजवंशाचे ते विविध देशांचे राजे, भिष्म व धृतराष्ट्राची छिथू करतात. त्यांना पुरोचनाच्या दुर्योधनाबरोबरच्या कटकारस्थानाचा सुद्धा सुगाव लागतो. कुरु घराण्याची लाज त्यामुळें चवाठ्यावर येते.

दुर्योधनाला जेव्हां ते सगळे समजते तेव्हां तो बेचैन होतो. तो, त्याची कौरव भावंडे, अश्वत्थामा, शकूनी, कर्ण, कृप सगळे अस्वस्थ झालेले आपल्या हस्तिनापुराला पांचालदेश सोडून जातात. कौरवातील दुःशासन शरमेने दुर्योधनाला हळू आवाजात बोलतो, "जर अर्जुनाने तो ब्रह्मचार्याचा बेमालुम वेष नसता केला तर त्याला ती सावळी सुंदरी कधीच जिंकता आली नसती. त्याच्या त्या वेषामुळें तो धनंजय आहे हे कोणालाही समजले नाही". पुढे तो बोलतो, "शेवटी नशिबच बलवत्तर असते, युक्त्या, योजना, कारस्थानं त्या एका नशिबापुढे कुचकामी ठरतात हेंच खरे". कौरव मात्र समजतात, हे पांडव अजून जीवंत आहेत, पांडव पितृलोकातून आले असे ते इतर राजांप्रमाणे, मानत नाहीत. ते त्या विरोचनाला दोष देतात कीं, त्यांने काम व्यवस्थित केले नाही. पण तो मात्र आता मरून गेला आहे. ते त्यांचा प्रवास त्या नैराश्याने भरलेल्या अवस्थेत करत, हस्तिनापुराला पोहोचतात. पांडव लाक्षागृहातून सुटले व आता द्रुपदाचे आप्त झाले, हे सगळें त्यांना भारी त्रासदायक होणार पुढच्या काळात हे, ते समजतात. ते पांचालचा राजपुत्र दृष्यद्युम्न व

शिखंडी अशा सगळ्या खतरनाक प्रतिस्पर्धांचा विचार करत आणखीनच अस्वस्थ होतात. पांडवांसह त्या सगळ्यानी हस्तिनापुरावर चाल केली तर काय होईल ह्या विचारांने ते अधिकच अस्वस्थ होतात. हस्तिनापुरात ते गेल्यावर सगळें राजघराण्यात समजते किं, पांडव जीवंत आहेत व अर्जुनाने पांचाल कन्या यज्ञसिद्धा द्रौपदी जिंकली स्वयंवरात. ही वार्ता विदूरापर्यंत त्याच्या गुप्त हेरांकडून पोहोचते. त्याला आणखीन समजते किं, कौरव त्यांच्या चांडाळ चौकडीसह राजधानीत पोहोचले आहेत. विदूराला अत्यानंद होतो. तो धृतराष्ट्राला भेटतो व आनंदाची बातमी सांगतो, "कुरुंचा उत्कर्ष होणार, ह्या वंशाचा भविष्यकाळ उज्वल होणार". विदूराचे ते उद्‌गार ऐकून अंध धृतराष्ट्र समजतो किं, त्याचा मुलगा दुर्योधन पण जिंकून कृष्णाला आणत आहे. तो तसे समजून आज्ञा देतो किं, त्यांच्या स्वागतासाठी सगळे हस्तिनापूर सजवा. त्या नंतर विदूर त्याला सांगतो, पांडवाच्या अर्जुनाने पण जिंकला आहे व ते पांचाल देशातच सध्या रहात आहेत. ते सगळे जीवंत आहेत व कुंत्ती त्यांची भावजय सुद्धा त्यांच्या बरोबर सुरक्षित आहे . पांडवांचे द्रुपदाशी व त्यांच्या अनेक राजांशी मित्र संबंध प्रस्थापित झाले आहेत. पांडव आता पहिल्यासारखे एकटे राहिलेले नाहीत त्या परिस्थितीची जाणीव विदूर त्या अंध राजास करून देतो. विदूराच्या सांगण्यामुळें धृतराष्ट्राला परिस्थितीचा अंदाज चटकन येतो व तो विदूराला बोलतो, "अरे क्षत्री, ती सुद्धा माझीच लेकरे आहेत. आता माझे त्यांच्यावरील प्रेम जास्त वाढलेले आहे. ते खुशाल आहेत हे समजून मला संतोष झाला आहे. त्यांनी पुष्कळ मित्र व शक्तिमान आप्त मिळवले आहेत ह्याचा मला अभिमान वाटतो. आता पंडुच्या मुलांची राजकीय शक्ती वाढलेली आहे, हे सगळे आपल्याला चांगलेच आहे असें तुला नाही कां वाटत"?

पुढे तो धूर्त राजा त्याची बाजू सावरण्यासाठी विदूराला बोलतो, "अरे क्षत्री, तुला नाही कां वाटत हे सगळे आपल्यासाठी चांगले झाले आहे"? "द्रौपदासारखा बलाढ्य राजा व त्याचे मित्र राजे आपल्याला जास्त शक्तिमान करत आहेत हे चांगलेच झाले आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकून, तो दूर धोरणी विदूर त्याला सांगतो कीं, त्याचे विचार स्त्युत्य आहेत व ते असेंच आणखीन शंभर वर्षे तसेंच राहोत. अशाप्रकारचे संभाषण केल्यानंतर तो विदूर आपल्या घरी निघून जातो. विदूर गेल्यानंतर त्याची मुलं कौरव आणि

त्यांचा साथीदार राधेय, म्हणजे कर्ण तेथे येतात आणि धृतराष्ट्राला बोलतात, "अहो तात, आम्ही विदूर काकांच्या समक्ष कांहीं बोलू शकत नाही. म्हणून आपल्याला आम्ही एकटे भेटू इच्छितो". तो दुर्योधन नंतर त्याच्या पित्याला बोलतो, "तुम्ही हे काय केलेत? पांडवांची बरकत म्हणजे आमचा नाश हे तुमच्या कसें लक्षात येत नाही"? "तुम्ही उघड उघड त्यांची स्तुति करता कसें"? "त्या विदूरासमक्ष तुम्ही पांडवांना आपली मुलं, असें कसें म्हणूं शकता"? "कृपया राजे, आपण असें वागणे बंद करावे असें आम्हाला सांगावेसे वाटते". पुढे दुर्योधन त्याच्या जन्मदात्याला आर्जव करतो, "राजे ह्यापुढे आपल्याला असें कांहीं सतत करावयाला पाहिजे कीं, त्यामुळें पांडवांचा र्हास होईल". दुर्योधन पुढे सांगतो, त्याच्या अंध पित्याला कीं, "आपल्याला एकत्र बसून विचारविनिमय केला पाहिजे व पांडवांचे हे पुनः गादीजवळ येणे कसें थांबवता येईल त्याची पुरेशी तजवीज कशी करावयाची ते ठरवावे लागेल. योग्य वेळी जर आपण हे केले नाही तर आपण व आपली मुलं फार मोठ्या संकटात सांपडू, पांडवांचे दास बनून आम्हाला रहावे लागेल हे तुम्हाला आवडेल कां"?

अशारितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे एकवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे दोनवा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र त्याच्या ज्येष्ठ मुलांस प्रथम विचारतो, "माझ्या सुयोधना, आता तुझ्यासह कोण तुझे मित्र आले आहेत ते मला सांग"? दुर्योधन सांगतो कीं, त्याच्या बरोबर त्याचा जीवलगा कर्ण आला आहे. त्यानंतर धृतराष्ट्र त्याला सांगतो, "माझ्या प्रिय पुत्रा, मीसुद्धा तेंच अपेक्षित आहे पण त्याची चाहूल तुझ्या काकाला लागता कामा नये, कारण, त्याचा कल पांडवांकडे आहे व तो महामंत्री आहे, भिष्माचार्यांनीच ती नेमणूक केली आहे, त्यात बदल करणे शक्य नाही". नंतर तो त्याच्या मुलांना सांगतो, "आता विदूर गेला आहे, तेव्हा आता तू सांग तुझी काय योजना आहे, ज्यामुळें पांडवांची कोंडी करता येईल व आपल्या कारस्थानाचा त्यांना पत्तासुद्धा लागणार नाही". त्यानंतर कर्णाकडे वळून तो अंध राजा राधेयाची चौकशी करतो.

दुर्योधन बोलू लागतो, त्याच्याकडे बरेच पर्याय उपलब्ध असल्याचे तो धृतराष्ट्राला सांगतो. ते पर्यायि कोणते ते दिले आहेत.

"आपल्या विश्वासू ब्राह्मणांकरवी कुंतीची मुलं व माद्रीची मुलं ह्यात यादवी माजवावी ".

"द्रुपदाच्या मंत्री, आमात्य ह्यांना भरपूर पैशाची लालुच दाखवून त्यांना कुंतीपुत्र युधिष्ठीरापासून वेगळे करावे".

"आपल्या हेरांच्या मदतीने असें साध्य करावे की, पांडव पांचाल देशातच स्थायिक व्हावेत. जेणेकरून त्याची हस्तिनापुरास येण्याची इच्छा नष्ट होई".

"आपल्या कावेबाज दुतांकरवी पांडवांत फूट पाडावी म्हणजे ते एकमेकांत भांडत रहातील व आपल्याला मोकळा श्वास घेता येईल. युधिष्ठीर हा त्यांच्यातील कच्चा दुवा आहे, तो भित्रासुद्धा आहे त्याच्या मनात इतर पांडवांच्याबद्दल शंकेचे बीजं पेरता येतील, तसे करावे. भिम नेहमीच युधिष्ठीराची टर्र घेत असतो त्याचे प्रमाण वाढेल असें पहावे".

"असें करता येते कां, ते पहावे लागेल, ज्यासाठी एकाद्या पांडवांच्या दासीद्वारा त्यांच्यात व कृष्णात मतभेद उत्पन्न करता येतील व त्यांची एकजूट संपुष्टात येईल. तिला अनेक पति असल्यामुळें वासनाक्षोभाचा उपयोग करता येतो कां ते पहावे लागेल".

किंवा, "कावेबाज ब्राह्मणाच्या मदतीने पांडवांच्या मनांत द्रौपदी बद्दल अप्रामाणिकपणाचा संशय उत्पन्न करून ते घर बरबाद करावे".

आणखीन एक पर्याय सुचतो तो असां कीं, भिम जो त्यांची शक्ति आहे त्यालाच मारून टाकावे, म्हणजे न बजे बास न बजे बासुरी. कारण, भिम हि एकच अशी ताकद आहे त्यांच्यात कीं, ती इतर पांडवांपासून वेगळी केली तर इतर पांडवांचा नाश करणे सोपे आहे. त्याशिवाय युधिष्ठीराचा कमकुवतपणा हि आपली शक्ति आहे, ती संधीसाधून वापरावी. भिमाच्या मनात इतर पांडवांच्या बद्दल त्वेष उत्पन्न करण्याचे काम जर कर्ण करेल तर काम सोपे आहे, त्यानंतर कर्णाकडे पाहून दुर्योधन बोलतो, "तू त्याचा खर्या अर्थाने मोठा भाऊ आहेस व कुतीला तुम्ही दोघे एकत्र आले तर ते आवडेल ह्यात तिळमात्र शंका नको". दुःशासन शंका काढतो, "काय कर्ण हे करू शकेल"? दुर्योधन बोलतो, "भिम त्यांच्यातून गेला तर अर्जुन कर्णापुढे फारकाळ टिकाव धरू शकणार नाही, बाकीचे पांडव नष्ट करणे सोपे आहे".

दुःशासन सुचवतो, "शंकासुर मोठा बलवान असतो, त्याला त्यांच्यात पेरण्याचे काम त्यांची सेवा करणार्या सेवकांना फितवून करता येईल कां ते पहावे".

नेमके काय करावे त्याचा निर्णय होत नव्हता. जितके जास्त पर्याय तितके जास्त हे काम मुष्किल असल्याचे कर्णाला वाटते परंतु, तो कांहीं बोलत नाही.

सगळी चर्चा झाल्यावर त्या चांडाळचौकडीचे ठरते कीं, प्रथम औपचारिकतेसाठी पांडवांना हस्तिनापुरी बोलवावे. ते आल्यावर आपला मंत्री कनिक त्याचे डावपेंच खेळेल ते पहावे. त्याशिवाय कांहीं अपघात घडवून त्यांना मारून टाकण्याचा पुनः प्रयत्न करावा. द्रुपदाबरोबर ते जास्त काळ रहाणे आपल्याला त्रासदायक होईल कारण त्या राजाची नजर आपल्या राज्यावर आहे. जर त्यांनी सरळ चाल केली तर आपण आपले हस्तिनापुर वाचवू शकू कां? ते सांगता येत नाही. त्याच्याकडे आता हे पांच पांडव त्याशिवाय दृष्टद्युम्न व शिखंडी आहेत अशा परिस्थितीत आपण जिंकणे मुष्किल आहे.

"म्हणून, अहो राजे, आपण त्वरित त्या सगळ्यांना येथे येण्याचे आमंत्रण द्यावे व त्यांना त्या धूर्त द्रुपदापासून दूर करावे". कर्णाकडे पाहून  दुर्योधन त्याचे मत काय म्हणून विचारतो.

अशारितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे दोनवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे तीनवा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, दुर्योधन तसें कर्णाला विचारतो तेव्हां कर्ण बोलतो, "दुर्योधना, तुझे नियोजन तरी मला निर्दोष वाटते परंतु, एक गोष्ट खरी कीं, कुरुवंशाच्या त्या पांच वीरांना जोवर ते एकत्र आहेत तोवर हरवणे कोणालाही शक्य नाही. तुझे काम करणे मी जवळून पाहिले आहे त्यात तुझ्या कट कारस्थानी कारवाया लाजवाब असतात. तरी तू अजून पर्यंत तुझ्या शत्रूला (भिमसेन) मारू शकलेला नाहीस हेसुद्धा विसरता येणार नाही. ते त्या काळात तुझ्या घरात रहात होते व त्याकाळी ते लहान मुलगे होते तरी तुला त्यांचे नुकसान करता आलेले नाही. आता तर ते खूप लांब रहातात व मोठे तरुण झाले आहेत, दुनिया फिरुन ते खूप शहाणेसुद्धा झाले असतील. अशा परिस्थितीत तुझे प्रयोग कसे काम करणार"? पुढे सूर्यपुत्र बोलतो, "एक गोष्ट लक्षात घे, जसे तुझा भाऊ दुःशासन म्हणाला, त्यांचे नशिब बलवत्तर आहे, त्यात त्यांची आई त्यांना त्यांच्या पित्याची गादी मिळवण्याचा आग्रह करत आहे, तिला राजमाता बनण्याची मोठी हौस आहे, म्हणून मला वाटते त्यांना कोणत्याही शक्तिच्या प्रयोगांने चीत करता येणार नाही. तुला वाटते तितके त्यांच्यात फूट पाडणे वगैरे गोष्टी करणे सोपे नाही व जर त्यात आपण फसलो व ते कारस्थान उघड झाले तर त्यामुळें तुझ्या पित्याची नाचक्कीच होईल. आधीच तू पाहिले आहेस वरनावतातील घटनेमुळें सगळे राजे आपली छिथू करीत आहेत त्यात भर नसावी असें मला वाटते. त्यांची समाईक पत्नी त्यांना धरून ठेवील असें मला वाटते कारण ती कोणी सामान्य स्त्री नाही ती यज्ञसिद्धा आहे, तिचे वळण निराळे असणार. जेव्हां ते खराब परिस्थितीत होते तेव्हां ती त्यांच्याशी एकनिष्ट होती, आता तर परिस्थिती सुधारलेली आहे अशा स्थितीत तशी अपेक्षा करणे आकाशात वावड्या उडवण्या सारखे मूर्खपणाचे ठरेल. तुला माहीत आहे, स्त्रीला एकापेक्षा जास्त पुरुषांचा अनुभव घ्यावयाला आवडते त्यात हे असें बहाद्दर नवरे तिला मिळालेले आहेत त्यामुळें ती खूपच खूष रहाणार तेव्हां त्या सगळ्या योजना फसण्याचीच जास्त शक्यता मला दिसते. त्यांचा सासरा सात्त्विक सज्जन पुरुष आहे, त्याला व त्याच्या समाधानी सेवकांना विकत घेता येईल हि तुझी कल्पना फसण्याचीच जास्त शक्यता आहे. रहाता राहिले दृष्टद्युम्नाचे, तो तर पांडवांशी फारच सलोख्याने वागत

असल्याचे आपण पाहिले आहे. म्हणून मला वाटते आता तुझ्या ह्या सगळ्या योजना तुझ्यावर जर उलटल्या तर तुला कोणीही, अगदी मीसुद्धा, वाचवू शकणार नाही. तरी पांडवांचा नाश करणें आपणा सगळ्यांसाठी अगत्याचे आहे हेसुद्धा मी नाकारत नाही. म्हणून, मला वाटते शक्यतर त्वरित आपण पांचाल देशांवर आक्रमण करावे व त्यांना हरवून आपले मिंधे करावे. आज ते पांडव आपल्या विवाहाच्या खूषीत रमले आहेत, त्या पांचालाची सेना आराम करीत आहे व त्यांचे मित्रपक्ष बेसावध आहेत हींच वेळ आहे पांचालदेशावर अचानकपणें आक्रमण करण्याची म्हणून, तू त्याच्या तयारीस लाग पण कोणालाही हे समजले नाही पाहिजे किं, कोणावर आपण आक्रमण करणार आहोत. त्यासाठी जे धाडस पाहिजे ते मात्र तुझ्याकडे असले पाहिजे. माझ्यामते तो वृश्नींचा कृष्ण, दामोदर, त्यांना भेटण्या आधी हे झाले पाहिजे कारण, तो अतिधूर्त व कावेबाज आहे व तो त्यांना आपल्यावर आक्रमण करण्याचा सल्ला जर देईल तर आपली कांही धडकत रहाणार नाही. तुला मी सांगावयाला नको किं, आक्रमण करणे हे स्वसंरक्षणाचे एक प्रभावी धोरण असते. हा कृष्ण पांडवांसाठी म्हणजे त्याच्या आत्येभावांसाठी कांहींही करण्यास तयार असतो हे मी पाहिले आहे. ज्या प्रकारच्या मौल्यवान भेटी त्यांने पाठवल्या आहेत ते पहाता त्या कृष्णाचा बेत कांहीं खास असावा असें वाटते".

वैशंपायन पुढे सांगतात, कर्णाचा तो सल्ला धृतराष्ट्राला अतिशय आवडतो व तो कर्णाची स्तुति करतो. तो बोलतो, "अरे सुतपुत्रा तू किती छान बोलतो आहेस. तुझी धाडसाची कल्पना मला फार आवडली खर्या क्षत्रियाला शोभेल असेंच तू राधेया, बोलत आहेस परंतु, आपण येथे स्वतंत्र कोठे आहोत"? "ह्या राज्याच्या बाबीत आपल्याला भिष्म व विदूर ह्यांची परवानगी घ्यावी लागते, त्यांच्या आदेशाविना आपली कोणतीही आज्ञा इतर मंत्री व आमात्य मान्य करणार नाहीत म्हणून पांचालदेशावर आक्रमण करण्याचा प्रस्ताव तू दुर्योधना, त्यांच्या पुढे ठेव. त्यासाठी पटण्यासारखे प्रयोजन तुला त्यांना सांगावे लागेल. तसे करण्यातच आपले हित आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र त्याच्या विश्वासातील मंत्री बोलावतो व त्यांच्याशी चर्चा करतो.

अशारितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे तीनवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे चौथा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्र भिष्माला विचारतात त्यांचे मत काय आहे ह्या प्रस्तावा बाबत, भिष्म त्याला उत्तर देतात, "अरे, धृतराष्ट्रा, पांडवां बरोबर भांडणे मला कधीच मान्य होणार नाही. जसा तू माझ्यासाठी आहेस तसांच पंडु माझ्यासाठी आहे. तसेंच गांधारीची मुलं व कुंतीची मुलं मला सारखीच प्रिय आहेत . त्या दोघांचे मी संरक्षण करू इच्छितो. म्हणून जर राज्य गादी हांच प्रश्न असेल तर माझ्यामते आपण ह्या राज्याचे दोन भाग करु व एक भाग कौरव घेतील व दुसरा पांडवांना मिळेल. त्यांने हे लक्षात ठेवले पाहिजे किं, ही त्यांची वडिलार्जित ठेव आहे व तशी ते जपतील असें पहावे. जर पांडवांना त्यांचा हिस्सा नाही मिळाला तर कौरवांनासुद्धा तो कसा मिळेल"? "उगाच वाद न करता शहाण्यासारखे राज्याचे दोन भाग करून हा वाद संपवा". असें निर्वाणीचे उद्‌गार भिष्म काढतात. "दुर्योधनाने तुझ्या नावांला काळिमा लागणार नाही असें वागावे हे माझे मत त्याला सांग". "तुझ्या नावाला काळिमा लागला तर तुझे जीवन काय होईल, त्याचा विचार करावा त्याने. चांगले नांव ही एक शक्ती असते ती अशी घालवू नये. माणूस त्याच्या किर्तीने अमर होतो. माणसाची इज्जत गेली कीं मग त्याच्या जगण्यात कांहीं अर्थ उरत नाही हे तू धृतराष्ट्रा समजून तुझ्या मुलालासुद्धा समजव". "आपल्या घराण्याची लाज चवाठ्यावर येईल असें कांहीं करू देऊ नकोस तुझ्या मुलाला". "आपल्याला आनंद वाटला पाहिजे किं, पांडव त्या अपघातात मृत झाले नाहीत. कुंतीसुद्धा वाचली हे सगळे आपल्यासाठी चांगले झाले हे तू समजून घे. तो पुरोचन त्याच्या योजनेत अयशस्वी झाला व त्याने तयार केलेल्या घरात स्वतः मेला. जे घडले त्यासाठी कोणीही पुरोचनाला दोषी समजत नाही उलट सर्व लोक तुला दोषी ठरवत आहेत हे लक्षात घे, कारण तो पुरोचन तुझ्या दुर्योधनासाठी काम करीत होता हे सगळे जाणतात. आता त्या हातस्यातून ते सगळे जीवानिशी परत आले त्यामुळें जग तुला तेवढा दोष देणार नाही पण जर तू पुन्हा असं कांहीं केलेस तर मात्र जग व मीसुद्धा तुला माफ करणार नाही. जोपर्यंत ते कुरु घराण्याचे पांडव जीवंत आहेत तोवर त्यांची मालमत्ता त्यांच्या पासून कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. एक लक्षात घे, हे पांडव गुणी व सत्प्रवृत्त आहेत. त्यांची एकी मजबूत आहे. आजवर त्यांना चुकीच्या

पद्धतीने त्यांच्या हक्कापासून दूर ठेवले गेले हे सगळे थांबले पाहिजे. मी सांगतो तसें करावे, त्यांना त्यांचा हिस्सा देऊन टाका, असें करून तुम्ही कांहीं मेहरबानी करीत नाही.
अशा रितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे चौथा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे पांचवा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन बोलतात, भिष्माचे बोलणे संपल्यावर द्रोण सांगू लागले त्यांचे मत. ते बोलले, "अरे धृतराष्ट्रा, असें आपण ऐकतो किं, जर मित्राला कांहीं सल्ला विचारला तर त्यांने प्रामाणिकपणे खरा सल्ला द्यावा. ज्यामुळें त्याची किर्ती होईल. मीसुद्धा त्याच विचारांचा आहे जे सन्माननीय भिष्मदेव बोलले. पांडवांचा जो हिस्सा आहे तो त्यांना देऊन मोकळा हो. ते अंतिम सत्याला धरून होईल. माझ्या मते, तू त्वरित आपले दूत द्रुपदाकडे पाठवून त्याच्याशी सन्माननीय वागणूक करून पांडवांसाठी व विशेष करून कुरु घराण्याच्या स्नुषेसाठी महागड्या भरपूर भेटवस्तु पाठवून त्यांचे स्वागत करावे. तो दूत द्रुपदाला धन्यवाद देईल कारण ह्या नव्या नात्यामुळें आपण दोन घराणी जवळ आली आहेत. त्यामुळें कसे दोघांचे भले होणार आहे ते त्याने तेथे विषद करावे. तो तुझा दूत असें सांगेल कीं, पांडवांच्या जीवंत असण्यामुळें तुला व तुझ्या सगळ्या पुत्रांना फार आनंद झाला आहे. ह्या गोष्टाचे द्रुपद व दृष्टद्युम्नापुढे पुनः पुन्हा उच्चारण करून त्यांचा त्यावर विश्वास बसेल असे पहावे. जे घडले ते विधीलिखीत आहे व ते आपण सगळे स्वीकारतो असा युक्तिवाद त्यांने मांडावा. तो तुझा दूत पांडवांचे व कुंतीचे पुनःपुन्हा कौतुक करेल ज्यामुळें जर त्यांच्या मनात कांहीं संदेह असेल तर तो निघून जावा. ते झाल्यानंतर तो दूत पांडवांना हस्तिनापुरी परत केव्हां येणार असें विचारेल. त्या आधी द्रुपदाच्या मुलालासुद्धा कांहीं योग्य दर्जाच्या भेटवस्तु तो देईल. त्यानंतर तुझे दोन मोठे पुत्र दुःशासन व विकर्ण जातील व मोठ्या प्रेमांने त्यांच्या चुलत भावंडांना रत्नजडीत रथांतून हस्तिनापुरी घेऊन येतील. तुम्हाला जरी ते येथे नको असले तरी हे नाटक तुझ्या भवितव्यासाठी आवश्यक आहे हे धृतराष्ट्रा समजून घे. पांडवांचे स्वागत मोठ्या दिमाखदार पद्धतीने झाले पाहिजे. असें केले तरच जी तुमची नाचक्की राजकुळांतून झाली आहे, त्या लाक्षागृहामुळें ती कमी होईल. आल्यावर त्या पंडुच्या मुलांना तू तुझ्या मुलांसारखे वागवशिल, क्वचित प्रसंगी थोडे जास्त प्रेम देशिल".

वैशंपायन पुढे बोलतात, द्रोणाचे ते सांगणे संपल्यावर तेथे हजर असलेला कर्ण चिडून द्रोणावर आंग पाखडतो. तो बोलतो, "हे दोघे म्हातारे नेहमीच पांडवांची बाजू घेतात व

त्यांना शेफारून ठेवत असतात. तुमच्या संपत्तीतून त्यांना म्हणे, महागड्या भेटवस्तु द्या! अहो धृतराष्ट्र राजे, तुम्ही ह्यांना नेहमीच तुमचे हितचिंतक समजता परंतु, त्यांचे सांगणे कधीच तुमच्या हिताचे नसते. मला ह्याची मोठी गम्मत वाटते किं हे दोघे तुम्हाला नेहमी उलटाच सल्ला देत असतात. कोणीही शहाणा माणूस असा सल्ला स्वीकारेल जो उघडपणें त्याच्या हिताविरूद्ध आहे? मनात एक व तोंडात दुसरे असे बोलणारे लोक तुम्ही तुमच्या भोवती जमा केले आहेत त्यामुळें एक दिवस कदाचित् तुम्हाला पश्चात्ताप होईल. हे मात्र खरे आहे, वाईट काळात मित्र उपयोगी पडत नाही. ज्याचे त्याचे सुख व दुःख त्याच्या नशिबावर अवलंबून असते हेंच खरे. तुम्ही शहाणे असा अथवा मूर्ख असा, तरुण असा किंवा वृद्ध असा, मित्र असा किंवा शत्रू असा, तुम्हाला तुमच्या नशिबाप्रमाणेंच फळं मिळतील. तुमचे नशिब तुम्ही बदलू शकत नाही. एक गोष्ट आठवली म्हणून सांगतो, तुमच्या परवानगीने, एक अम्वुविच नांवाचा राजा होता. तो त्याचे काम त्याच्या आमात्यांवर सोडून फक्त हवा खात बसला होता. त्याच्या महाकर्णी नांवाच्या आमात्याने सगळी सत्ता ताब्यात घेतली व अखेरीस तो माजलेला आमात्य त्या राजालाच गादीवरून फेकून देण्याचा प्रयत्न करतो. परंतु, त्यात त्याला यश येत नाही व राजा अम्वुविच तसांच राजा रहातो व मंत्री नष्ट होतो, महाराज ह्या कथेचे तात्पर्य आपण जाणता किं, नशिब थोर असते व त्यानुसारच सगळे होत असते. जर पांडवांचे नशिब तुमच्या मुलांच्या नशिबापेक्षा जास्त बलवत्तर असेल तर तुम्ही कांहींही करा, जय पांडवांचाच होणार हें निश्चित. आणि जर तुमचे नशिब बलवत्तर असेल तर सगळी दुनिया जरी तुमच्या विरुद्ध गेली तरी त्यांने तुमचे कांहींही बिघडणार नाही हेच सत्य आहे. आता तुम्ही तुमच्या सल्लागाराच्या प्रामाणिकपणा तपासून पहावा म्हणजे खरा कोण व खोटा कोण ते समजेल".

वैशंपायन पुढे सांगत असतात, कर्णाचे ते विरोधी बोलणे ऐकून द्रोण त्याला बोलतात, "तुझ्या ह्या बोलण्यावरून तू किती विकृत मनाचा आहेस ते स्पष्ट झाले आहे. तुझ्या विकृत मनातून तुझा कुरु घराण्याचा मनातील द्वेष स्पष्टपणे मला दिसतो आहे. पांडवांना दुखवण्यासाठी तू कोठल्याही थराला जाशिल हे मी समजलो. त्यासाठी तू आमच्या मध्ये दोष शोधण्याचा प्रयत्न करीत आहेस. मी जे सांगितले व जे भिष्म सांगत आहेत ते सगळे

सर्वांच्या भल्यासाठी आहे. जर मी दिलेला सल्ला तुम्ही नाही अजमावला तर लवकरच हे कुळ नष्ट होईल व त्याची जबाबदारी धृतराष्ट्रावर असेल.

अशारितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे पांचवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे सहावा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, द्रोणांचे सांगून झाल्यावर विदूर बोलतात, "अहो महाराज धृतराष्ट्रा, तुझे स्नेही (द्रोण) जे सांगत आहेत ते तुमच्या आमच्या सगळ्यांच्या भल्याचे आहे, ह्यात शंका नको. परंतु, जर तू त्यांचे सांगणे मनावर घेणार नसशिल तर ते व्यर्थ जाईल. ते शंतनुपुत्र भिष्म जे सांगतात ते अतिउत्तम आहे. तू मात्र त्यांच्या विचाराशी सहमत नाहीस असें मला दिसते. कर्णाला मात्र तो द्रोणांचा सल्ला अयोग्य वाटतो असें दिसते कारण, तो कुंतीचा द्वेष करतो, जे जे कुंतीचे आहे ते सगळे त्याच्या द्वेषास पात्र असते व त्याप्रमाणे त्यांने द्रोणांच्या मतावर आक्षेप घेतला आहे हे तू समजून घे. हे सर्व पहाता मला म्हणावयाचे आहे किं, ह्या दोन (भिष्म, द्रोण) मित्रांपैकीं कोण तुला जास्त जवळचा वाटतो ते पहा. हे दोघे महानुभाव तुझ्या पेक्षा वयाने मोठे, ज्ञानाने व अनुभवानेसुद्धा ज्येष्ठ आहेत ते लक्षात घे व ते कधीही कुरु घराण्याचे नुकसान होऊ देणारे नाहीत तसेंच त्यांच्यासाठी कौरव व पांडव सारखेच प्रिय आहेत हे तू नाकारू शकणार नाहीस. त्यांच्या गुणवत्ते बद्दल शंका घेणे मूर्खपणाचे आहे, ते दशरथाच्या रामासारखे व्रतस्थ आहेत. त्यांनी कधी तुला चुकीचा सल्ला दिला आहे कां? तूसुद्धा कधी त्यांचे वाईट चिंतीलेले नाहीस अशा परिस्थितीत ते खोटा सल्ला तुला कां देतील"? हे दोघे ज्येष्ठ मित्र कोणत्याही आमिषाने बधणारे नाहीत व त्यांना कोणी फसवू शकेल असेसुद्धा नाही, म्हणून ते जे सांगत आहेत ते योग्य आहे, त्यांच्या विचारांचा तू स्वीकार करावास. तुला तुझे पुत्र व पंडुचे मुलगे सारखेच असावयास पाहिजे, त्यापेक्षा दुसरे कांहीं तू केलेस तर मोठ्या अरिष्ठाला तू आमंत्रण देशिल व ते आपल्या घराण्यासाठी चांगले नसेल. जर तुझ्या मनात पांडवांबद्दल किंतु व कौरवांबद्दल जिव्हाळा असेल व त्यामुळें तू जर कांहीं पक्षपाती निर्णय घेतलास तर त्याचे विपरित परिणाम सर्वांना भोगावे लागतील. अशाप्रकारचा सल्ला जर कोणी तुला देत असेल तर त्यापासून सावध हो. तू जर पक्षपाती निर्णय घेतलास तर पांडव ते निमुटपणे स्वीकारतील असें समजू नकोस, त्यांची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे म्हणून सामोपचाराने जेवढे घेता येईल त्यावर तू व तुझी मुलं समाधानी रहातील तर ते कुरु घराण्यासाठी चांगले होईल. जर पांडवानी ठरवले तर ते कौरवांना केव्हाही पराजित करून त्यांच्या अंकित करू शकतील जर असें झाले तर जी

बेइज्जती होईल त्याचासुद्धा विचार तू कर. भाऊ बंदकीचा तमाशा करू नकोस. सव्यसाची अर्जुनाला इंद्रसुद्धा हरवू शकत नाही तेथे तुझे वीर काय टिकणार"? युद्धात नकुल व सहदेव आणि युधिष्ठीर कोणालाही हरवता येणारे नाहीत, भिमाशी कोण लढणार? तेव्हां ह्यांच्याशी वैर करून तुझी मुलं कांहींही साध्य करू शकणार नाहीत. तुम्हाला माहीत आहे किं, पांडव व त्यातल्या त्यात युधिष्ठीर प्रेमळ, सात्त्विक व समाधानी आहे त्यामुळें जे योग्य कराल त्यावर ते समाधान मानून शांत बसतील व तुम्ही तुमच्या राज्यात सुखांने राज्य करू शकाल आणि ते त्यांच्या राज्यात. ज्यांच्या बाजूला बलराम आहे, कृष्ण आहे ज्यांच्या कडे सत्यकी आहे अशांना तुम्ही कौरव कधीतरी हरवू शकाल कां? त्यां पांडवानी एकट्यानी सगळ्याना चीत केले आहे त्यांना कशाला आव्हान देता? ज्यांच्या बाजूने द्रुपदासारखा महावीर आहे, दृष्टद्युम्न आहे त्यांच्यापुढे तुम्ही किती काळ टिकाव धरणार? हे सगळे अजिंक्य आहेत व त्यांना तुझी मुलं चिडवू पहात आहेत त्यामुळें फक्त विनाश मला दिसतो. आणखीन एक गोष्ट लक्षात घे, पांडवांचा गादीवरील दावा तुझ्यापेक्षा ज्येष्ठ आहे कारण नियमांने ते पंडुचे वारस आहेत. त्यांच्याशी नीट वाग. दुफळी माजवण्याचा दोष तुझ्यावर येईल. पुरोचनाचे प्रकरण अजून लोक विसरलेले नाहीत तशात आणखीन कांहीं अभद्र कृत्य करण्याचा प्रयास तू दुर्योधनाच्या सांगण्यावरून केलास तर तुम्हा कौरवांचा नाश निश्चित आहे. भांडण न करता त्यांना त्यांचा वाटा देऊन मोठेपणा पदरी पाडून घे त्यात सर्वांचे भले आहे. त्यामुळें सगळे पांडव तुझ्या मुलांच्या बरोबर रहातील व कुरु घराणे सर्व शक्तिमान होईल. त्यामुळें आपणा सर्वांचे जीव सुरक्षित होतील. तू जर असें केलेस तर सगळ्या क्षत्रियांचे भले होईल. द्रुपदाला एकदा आपल्या मुलांनी द्रोणाचार्यांस दक्षिणा देण्यासाठी हरवले होते पण आता तो व त्याच्या बरोबर त्याच्या कुळातील दशरथी आपल्याला सामील असतील त्यामुळें कितीतरी फायदे आहेत ते लक्षात घे. वृश्नी कुळातील सगळे पांडवांच्या बरोबर आहेत अशा परिस्थितीत तुझे कौरव काय मुकाबला करणार? जे सामोपचाराने साध्य होणार आहे व जे न्याय्य आहे ते स्वीकारण्यात आपल्या सगळ्यांचे व सगळ्या क्षत्रियांचे भले आहे हे लक्षात घे. तू पाहिलेस कीं, जेव्हां आपल्या प्रजेला समजले कीं, पांडव जीवंत आहेत तेव्हां ते कसे उल्हासित झाले व रस्त्यावर येऊन त्यांचा आनंद दाखवत होते. त्याचा अर्थ तुला समजतो कां? अरें सगळी

हस्तिनापुराची जनता पांडवांच्या बरोबर आहे, तुझ्या मुलांच्या नाही. अरे धृतराष्ट्रा राजा जनतेचा आवाज असेल तोवर तो निश्चिंत असतो जेव्हां तो प्रजेला फसवतो तेव्हां त्याची सत्ता नष्ट होते. तुझ्या एका चुकीमुळें म्हणजे जर तू दुर्योधनाच्या सांगण्यानुसार निर्णय घेतलास तर ती जनता तुला माफ करणार नाही. तू व तुझे राज्य रसातळाला जाईल. त्यात तू आंधळा आहेस त्याचासुद्धा विचार कर".

अशा रितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे सहावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे सातवा

(विदूरागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, ते सगळ्या महानुभावांचे विचार ऐकल्यावर तो अंध राजा मोठ्या अदबीने बोलतो, "अहो शंतनु पुत्र ज्ञानी भिष्माचार्य, तेजस्वी ऋषी द्रोणाचार्य, आणि आपण स्वतः विदूर बंधू आपण राज्याच्या व संबंधित सर्वांच्या जे अंतिम हिताचे आहे ते मला विशद केले आहे. राज्यशास्त्रानुसार पंडुचे पांच पांडव माझेसुद्धा मुलगे लागतात. जसें माझे मुलगे गादीचे हक्कदार आहेत तितकेच पांडवसुद्धा आहेत हे मी समजतो. म्हणून तुमच्या सांगण्याप्रमाणे मी ठरवले आहे किं, आपण माझी भावजय व तिचे पांच मुलगे व त्यांची समाईक पत्नी ह्यांना सन्मानपूर्वक हस्तिनापुरात आणावे जसें द्रोण सुचवतात, खरोखरच हे आपल्या सगळ्यांचे महद्भाग्य आहे कीं, ते सगळे सहीसलामत आहेत व आता ते आपल्यात येऊन रहाणार आहेत. ह्यापेक्षा आणखीन काय पाहिजे आपल्या सर्वांना"? तो नराधम ज्यांने ती कारवाई केली तो त्या आगीत मेला हे एकापरिने चांगलेच झाले".

वैशमपायन पुढे सांगतात, तशी इच्छा धृतराष्ट्राने व्यक्त केल्यावर विदूर ती आज्ञा समजून त्याच्या बरोबर विपुल धन संपत्ती घेऊन पांडवांसाठी यज्ञसेनाच्या राजधानीकडे निघाला. शिष्टाचाराचे नियम चांगले जाणणारा तो विदूर त्या प्रमाणे, द्रुपदाला भेटतो. द्रुपद विदूरांचे स्वागत करतो. एकमेकांचे क्षेमकुशल विचारण्याचा शिष्टाचार पूर्ण होतो. विदूर तेथे पांडवांबरोबर बसलेला दामोदर पहातो. त्यानां पहाताच तो यमपुत्र त्यांना भेटून घट्ट मिठी मारतो व त्यांची चौकशी रिवाजानुसार करतो. ते कुंतीपुत्र व वासुदेव विद्‌ूरांना गळे लागून मोठ्या आनंदाने त्यांचे क्षेमकुशल विचारतात. त्यावर तो विदूर जसा धृतराष्ट्राचा प्रतिनिधी वागावा तसा मोठ्या अदबीनी त्याची पुनः पुन्हा विचारपुस करत बरोबर आणलेले धन दौलत त्या सगळ्यांना भेट देतो. त्यात त्याची भावजय, स्नुषा कृष्णा, दृष्टद्युम्न व द्रुपदाच्या राजघराण्यांच्या इतर मानकर्यांच्या भेटी त्यांना सन्मानपूर्वक देतो. त्या भेटवस्तुंची पहाणी मोठ्या कौतुकानी सगळे करतात व त्याची व हस्तिनापुरच्या राजाची तारीफ करतात, जसें शिष्टाचारात असते. त्यानंतर वासुदेव आणि पांडवांच्या समक्ष तो बुद्धीमान यमपुत्र नम्रपणे राजाला विनंती करतो, "अहो राजश्री, तुमच्या मंत्री व इतर आप्तांसमक्ष मी सांगू इच्छितो, कीं, माझे राजे धृतराष्ट्र व त्यांचे आमात्य आपली चौकशी करत आहेत व सगळ्यांचे कुशल

इच्छित आहेत. आपल्या बरोबर झालेल्या नातेसंबंधामुळें आम्हा कुरु राजाला अत्यानंद झाला आहे ह्याची कृपया नोंद घ्यावी. त्यात शंतनुपुत्र भिष्म त्यांच्या सगळ्या कुरु घराण्याच्या सदस्यांसह आपले चांगले इच्छित आहेत. भारद्वाज पुत्र द्रोण आणि आपले परम मित्र सुद्धा त्यांच्या सदिच्छा आपल्या सगळ्यांना देत आहेत. आपल्या घराण्याशी झालेले हे नाते आपल्या दोघांना भविष्यात मोठे हितकारक ठरेल अशी आम्ही अपेक्षा धरून आहोत. अशा नातेसंबंधामुळें असा अनुभव आम्हाला येत आहे किं, आम्ही एक लढाई न लढतांच जिंकली आहे. हे सगळे लक्षात घेऊन आपण आपल्या सगळ्या घर जावयांना त्यांच्या घरी जाण्याची परवानगी द्यावी. आम्ही कुरु घराण्याचे त्यांना त्यांच्या मूळ घरात पुन्हा आलेले पहाण्यास फार आतूर आहोत. ते पंडुपुत्र बरेच दिवस आमच्यातून दूर राहिले आहेत त्याचे आम्हाला वाईट वाटते. पृथासुद्धा कदाचित् तिचे मूळ घर पहाण्यासाठी उत्सुक असेल असे मी समजतो. त्याच प्रमाणे हस्तिनापुरचे रहिवासी त्यांच्या लाडक्या राजपुत्रांना भेटण्यास, त्यांचे त्यांच्या नगरात स्वागत करण्यास अधीर झाले आहे. त्या हस्तिनापुरच्या महिलांना त्यांची छोटी राणी पहाण्याची उत्सुकता झाली आहे, आणि म्हणून अहो पांचाल नरेश, लवकरात लवकर आपण आमच्या राजपुत्रांना त्यांच्या घरी जाण्याची परवानगी देतील अशी आम्ही हस्तिनापुरचे रहिवासी प्रार्थना करतो". "जर आपण अशी परवानगी दिली तर मी त्वरित एक संदेशी आमच्या राजधानीकडे पाठवून ते तेथे कळवीन म्हणजे त्यांच्या आगमनाची तयारी ते सुरु करतील". त्यानंतर पांडव व त्यांची माता व कृष्णा असें सगळे जाण्यासाठी निघतात.

अशा रितीने आदिपर्वातील विदूरागमन परिवाचा दोनशे सातवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे आठवा

(विदूरागमन पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगतात, ते प्रेमळ व अदबीची विनंति ऐकल्यावर द्रुपद विदूराला बोलतो, "जशी आपली इच्छा, अहो पुज्य विदूर बंधू, माझीसुद्धा तीच कल्पना आहे कीं, हे नातेसंबंध आपल्या सगळ्याना मोठे हिताचे ठरणार आहे. त्यानंतर तो यज्ञसेन विदूराला सांगतो, आपण म्हणता ते योग्यच आहे कीं, पांडवांनी त्यांच्या घरी निघावे परंतु, मी त्यांचा सासरा असें सांगू इच्छित नाही. जर युधिष्ठीर, जर भिम अथवा कुंतीमाता किंवा अर्जुन आणि दे दोघे बंधू असें सगळेच तसें ठरवत असतील तरच मी त्यांना जाण्याची परवानगी मोठ्या आनंदाने देईन. परंतु, त्यांचे येथे रहाणे आम्हा सर्वांना खूप आनंद देत आहे हे सांगावयाला मला व माझ्या कुटूंबियाना आवडेल. त्याच प्रमाणे, हे दोघे बंधू दामोदर व बलराम सुद्धा तशाच मताचे असतील तर बरे कारण हे दोघे पांडवांची फार काळजी घेतात असें मी येथे पहात आहे. त्यांचा माझ्या जावयांवर फार जीव आहे. तेव्हा त्यांना सगळ्यांना विचारून घ्याल तर बरे होईल". यज्ञसेनाचे ते ऐकून युधिष्ठीर बोलतो, "अहो तात, आम्ही तुमच्याकडे आहोत तर तुम्ही जी आज्ञा द्याल त्याप्रमाणेच होईल". वासुदेव बोलतो, "माझ्या मते पांडवांनी विदूरांच्या विनंतीचा मान राखून घरी जावे. परंतु, अखेरचा निर्णय राजे द्रुपदच घेतील". द्रुपद त्यावर बोलतात, "केशवाचे म्हणणे प्रसंगानुरुप आहे. आम्हाला पांडव गेल्यामुळें अस्वस्थता वाटेल पण कांहीं गोष्टी नियमानुसार झाल्या म्हणजे योग्य असते. तुमची प्रजा तुम्हाला भेटू इच्छिते हे सुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे, शेवटी आपण राजघराण्याचे लोक त्यांच्यासाठी जगत असतो". पुढे तो बोलतो, "तुम्ही गेलात तरी वेळोवेळी येथे आपले सगळ्यांचे येणे होतच रहाणार आहे, त्यामुळें आता जाण्याने कांहीं बिघडत नाही". वैशंपायन पुढे सांगतात, द्रुपदाच्या परवानगीने पांडव आपला परिवार घेऊन हस्तिनापुराला निघतात. त्यांच्या बरोबर त्यांचा आत्येभाऊ श्रीकृष्ण सुद्धा असतो. ते प्रवास मजेत करत जातात. ठिकठिकणी जेथे मौज करता येईल तेथे थांबत व रमत व पुन्हा पुढचा प्रवास करत असें ते त्यांचा प्रवास करत होते. येथे हस्तिनापुरात धृतराष्ट्राला ते महानायक येत असल्याचे समजते. तो त्याच्या मुलांना त्या पांडवांचे स्वागत करण्यासाठी पाठवतो. त्यात प्रमुख विकर्ण व चित्रसेन असतात आणि त्यांच्या बरोबर

द्रोणाचार्य सुद्धा जातात. त्याशिवाय गौतम कुळी कृपाचार्य असतात. अशा प्रकारे वाजत गाजत पांडव त्यांची आई व पत्नी ह्यांच्यासह त्या नगरीत प्रवेश करतात. त्या नगराचे रहिवासी त्यांना पाहून आनंदीत झाल्याचे ते पहातात. ती त्यांची मिरवणूक भर शहरातून जातांना निरनिराळ्या लोकांचे उद्गार ते ऐकतात. कांहीं बोलतात, "हे पहा, आपले युवराज जे त्यांच्या सज्जनपणासाठी ख्यातनाम आहेत येत आहेत". कांहीं जरा मोठ्याने बोलतात, "पहा एकदाचे आमचे खरे त्राता येत आहेत. आता आपण सुखांने राहू शकूं. ते आमचे संरक्षण असें करतील जसें काय आम्ही त्यांचे सख्खे आहोत. देव त्यांचे भले करो". कांही बोलतात, "अरे आपण असें काय भले काम केले आज किं, पांडव त्यांच्या मातेसह व पत्नी घेऊन आले आहेत. त्यांच्या येण्याची वाट पाहून थकलो होतो ते अखेरीस आले"! कांहीं वृद्ध माणसे त्यांना दीर्घायुष्याचा दुवा देतात तर कांहीं बायका द्रौपदीला, वाकून वाकून पुनः पुन्हा पाहून तिच्या सौंदर्याची वाखाणणी करत होत्या. कांहीं बायका कानशिलावर बोटं दाबून त्यांची दृष्ट काढत होत्या. एकंदर सगळे प्रजाजन खूप आनंदी झाले होते असें दिसते. प्रवासा अंती ते राजवाड्यात पोहोचतात. तेथे रथांतून उतरल्यावर प्रथम ते धृतराष्ट्राचे पाय पुजतात. त्यानंतर ते घरातील सगळ्या वडिलधार्यांचे पाया पडतात जसे रिवाजात असते. त्यात भिष्म, द्रोण, गांधारी असें सगळे येतात. कुंतीसुद्धा सगळ्यांना नमस्कार करून त्यांचे क्षेमकुशल विचारते. नववधू सगळ्याना पाया पडते व त्यांचे आशिर्वाद घेते. पांडव वाड्या बाहेर जाऊन तेथे जमलेल्या जनसमुदायांत मिसळून त्यांची वास्तपुस्त करतात, जुन्या दोस्तांना मिठ्या मारून जुन्या ओळखी ताज्या करतात. लहानांना गालगुच्चे घेतात. तेथे जमलेल्या महिलांचीसुद्धा जातीने खुशाली विचारतात. तरुण महिला त्या पांडवांच्या भोवती जमून नववधूबद्दलचे चेष्टा मस्करी करतात जसे नेहमी लग्नानंतर सर्वत्र होते. एकंदर वातावरण अतिउत्साही झाले होतो. प्रत्येकाला असें वाटत होते जणुकाय त्यांच्या घरातीलच कोणी अगदी जवळचा दूर प्रवासातून आला आहे. असें सगळे प्राथमिक औपचारीक आटोपल्यावर सगळे पांडव त्यांच्या परिवारासह त्यांना रहाण्यासाठी नेमलेल्या कक्षात धृतराष्ट्राच्या आज्ञेने प्रवेश करतात. तेथे ते कांहीं काळ आराम केल्यानंतर त्यांना भिष्माच्या आज्ञेने दरबारात बोलावण्यात येते. तेथे धृतराष्ट्रा सह भिष्म, द्रोण व इतर महत्वाचे दरबारी स्थानापन्न होते. दरबारात पांडव आपल्या चालीने

सावकाशपणे येत होते. त्यांच्या कक्षातून ते आतील मार्गिकेने दरबारात आले. पुढे युधिष्ठीर चालत होता व त्याच्या मागून भिम व धनंजय जोडीने व त्यांच्या मागून नकुल व सहदेव जोडीने असें प्रवेश करतात. वाटेत सेवक त्यांना सलाम करत होते व पांडव त्याना हसतमुखाने दाद देत होते. दरबारात आल्यावर त्याना रिवाजानुसार प्रथम स्थानापन्न होण्याची विनंति धृतराष्ट्र करतो. थोडा समय शांतता असते. थोड्या वेळांनी दरबारातील राणीकक्षाच्या दरवाजातून कुंती राजमाता तेथे येते त्यावेळी सगळे दरबारी तिला उठून अभिवादन करतात. सभा सुरु होते. धृतराष्ट्र युधिष्ठीराकडे निर्देश करत बोलतात, "ऐका, पंडुपुत्रांनो, कुंतीच्या सुपुत्रांनो , मी जे आता सांगत आहे ते नीटपणे ऐका. तुमची नेमणूक आपल्या राज्यातील कमी विकसित अशा खांडवप्रस्थ ह्या प्रदेशाचा विकास करण्यासाठी करण्याचे योजलेले आहे. तेथे जर तुम्ही जाण्यास तयार असाल तर तेथे तुम्हाला कोणच्याही प्रकारची बाधा होणार नाही कारण, तो प्रदेश कोणालाही एरवी नको आहे. तेथे जर तुम्ही तुमचे राज्य विकसित करून रहाण्यास तयार असाल तर त्याची त्वरित व्यवस्था होईल. निरंकूश असें तुमचेच राज्य ते असेल व तुम्ही पांचजण तुमच्या आई व पत्नीसह सुखांने राहू शकाल व जो तणाव आपण येथे भावंडांच्या मारामारीचा आजवर अनुभवला तो तणाव रहाणार नाही. त्यामुळें आपल्या राज्याचे दोन समान हिस्से होतील व खांडवप्रस्थ हा त्यातील एक आहे जो तुम्हाला दिला जात आहे. जर तुम्हाला हे मंजूर असेल तर हा तंटा येथेच संपेल व दोनही चुलत परिवार गुण्यागोविंदाने विनातंटा बखेडा ह्यापुढे रहाल अशी ही योजना आहे". ते ऐकल्यावर युधिष्ठीर त्याच्या चारही भावंडांकडे व आईकडे उत्तरासाठी पहातो. त्या प्रस्तावाला नाकारण्यासारखे कांहींच नाही म्हणून तो, तुम्हा मुलांनी आनंदाने स्वीकारावा असे कुंती खुणेने सुचवते. एक एक करून सगळे तो प्रस्ताव योग्य आहे असें मुक अनुमोदन देतात. त्यानंतर ते महारथी, शूरवीर योद्धे शुद्ध क्षत्रिय कुळांचे कुरु वंशी पंडुचे पुत्र खांडवप्रस्थाकडे जाण्याच्या तयारीला लागतात. आपला हक्क संविधानिक मार्गाने मिळाला म्हणून नितिनीष्ठ युधिष्ठीर जास्त समाधानी झाला होता तर दुसर्या बाजूला भिम व इतर तीन खांडवप्रस्थाच्या विकासाच्या योजनांच्या विचारात गुंतून गेले होते. नगर रचना, घरांच्या व्यवस्था, रस्ते, तलाव, बंधारे इत्यादी कशा असाव्यात अशा गोष्टीत अर्जुन मोठी स्वप्न पहात होता. नकुल व सहदेव कृषीचा विकास

तेथे कसा करता येईल व व्यापार, उद्योग कसे वाढतील त्याच्या विचारात असतांना भिम आपले सैन्य कसे असावे व खांडवप्रस्थाचे संरक्षण कसे बिनतोड असेल त्याचा विचार करत होता. युधिष्ठीर न्याय व्यवस्था कशी शुद्ध राहिल व खांडवप्रस्थाच्या आतील न्याय सुव्यवस्था कशी करावी त्यासाठी शिपाई दल कसे असावे अशा गोष्टींच्या विचारात गुंग झाले होते. वैशंपायन सांगत असतात, खांडवप्रस्थाला आल्यावर ते पहातात कीं, तो एक वैराण प्रदेश आहे. ते पाहून अर्जुन समजतो कीं, अशा प्रदेशाचे आकर्षण त्या कौरवांना नसणारच. भिम, नकुल व सहदेव सगळे त्याच विचारात असतात. युधिष्ठीर निराश झाला होता कारण, त्याला वाटत होते एक चांगला समृद्ध भाग आपल्याला मिळेल व आपण तेथे मजेत राहू पण त्याच्या कल्पनेपेक्षा विपरित झाले होते, बायको फुकटात मिळाली आता राज्यसुद्धा मिळेल अशा भ्रमात मुळात भित्रा असलेला तो दैववादी, हतबल झाला होता. कुंती त्यांना सांगते , मुलांनो ही तुमच्या हिम्मतीची परीक्षा आहे. जर त्यात तुम्ही यशस्वी झालात तर तुम्ही खरोखर पंडुची मुलं शोभाल. पुढे ती सांगते, ह्याहीपेक्षा वाईट परिस्थितीतील प्रदेशांचे तुमच्या पित्यांनी नंदनवन केले आहे. हस्तिनापुर काय होते ते तुम्हाला माहीत नाही, ते असेंच होते परंतु, तुमच्या पित्याने ते आजच्या समृद्ध अवस्थेत आणले. जसें त्यांनी केले तसेंच तुम्ही खांडवप्रस्थाचे कराल ह्याबद्दल मला विश्वास आहे. भिष्मदेवांची सुद्धा तशीच अपेक्षा तुमच्या बद्दल असेल म्हणून हा वैराण भाग तुम्हाला त्यांनी दिला आहे, तुमच्या पौरुष्याला हे आव्हान आहे. एक राजा केवळ युद्धात सिद्ध होतो असें नाही तर राज्याच्या विकासाच्या कामातील त्याचे कौशल्य रणात लढण्या इतकेच महत्वाचे असते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे तुम्ही ते करावे. वेळ न घालवता त्वरित विविध योजना आखून तुमच्याकडे जे विपुल धन आहे त्यांचा योग्य विनियोग करून चला आपण ह्या वैराण प्रदेशाचे नंदनवन करू. कुंतीच्या त्या उत्तेजक आवाहनामुळें , आज्ञेमुळें सुरुवातीला मरगळलेला तिचा मोठा पुत्र युधिष्ठीर सावरला व मोठ्या उत्सहाने ते कामाला लागले. त्यांची समाईक पत्नी कुंतीला साथ देते व त्यांना जसें युद्धात पराक्रम करता तसा येथे नियोजनात पराक्रम करून दाखवा असें बोलून ती सांगते किं, तिची नेहमी त्यांना साथ असेल एवढेच नाही तर कांही काम तिला करण्यासारखे असेल तर ते ती करावयाला तयार आहे. हे असें संभाषण झाल्यानंतर त्या सात कुरु जंगलाच्या वीरांचा उत्साह वाढला

व ते कामाला लागले. अथक प्रयत्न व उत्तम नियोजन अशा रितीने ते त्या वैराण प्रदेशांचे नंदनवन करण्यात कांही वर्षातच यशस्वी झाले. त्यासाठी त्या साधारण वैराण असलेल्या प्रदेशातील त्यातल्यात्यात बरा असलेला भाग प्रथम विकासासाठी निवडतात. त्यावेळी त्यांना द्वैपायन तेथे येऊन विकास करावा कसा त्यावर निरुपण देत असत. कुंतीला माहीत होते किं, तिच्या मुलांवर व्यासांची सदैव कृपादृष्टी असेल व तसेंच खांडवप्रस्थात ती अनुभवत होती. त्या ठिकाणी एक राजधानीचे शहर उभे करण्याचे व्यासांनी सांगितले तसें एक शहर त्यांनी उभे केले. नगराभोवती मोठा कालव्यासारखा खंदक ज्याला सीमाचर म्हणतात, तयार केला ज्यामुळे त्या नगराला चांगले संरक्षण प्राप्त झाले होते. त्या शहराच्या वेशी उंच भिंतीने संरक्षित केल्या होत्या. त्या भिंतीना शुभ्र रंग दिला होता. नाग लोकांच्या राजधानी सारखी, भोगवती नगरी सारखी ती पांडवांची नगरी दिसू लागली होती. आत मोठे वाडे व उंच महाल बांधले होते. त्या राजधानीच्या संरक्षणासाठी असलेल्या वेशीवर ठिकठिकाणी रुंद खिंडी दरवाजे होते. नगराच्या संरक्षणासाठी विविध शस्त्रांची व्यवस्था केलेली होती. त्या प्रत्येक खिंडी दरवाज्यावर गरुडाची चिन्हं होती. नगरा भोवतीच्या उंच कोटावर सर्वकडे सुसज्ज पहारेकरी शहराच्या संरक्षणासाठी होते. त्यांच्या दिमतीस शतघ्नी (एकावेळी शंभर सैनिक मारण्याची क्षमता असलेले आयुध, मशीन गन) ठिकठिकाणी होत्या. त्या शहराचे रस्ते पक्के बांधलेले होते. ते पुरेसे रुंद होते त्यामुळें रहदारीमुळें अपघात होण्याची शक्यता नव्हती. ती दुसरी अमरावती असावी अशी सुंदर व सुसज्ज होती, त्या नगराचे नांव इंद्रप्रस्थ ठेवले गेले. शहराच्या अतिसुंदर जागी पांडवांचे महाल बांधले गेले होते. ते महाल सर्वप्रकारच्या वैभवाचे प्रदर्शन करणार्या जडजवाहिरांनी भरलेले होते. जणू कुबेराचे वाडे असावेत. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी अनेक उपवने व छोटे छोटे बगीचे तयार केले होते. त्या उपवनांत विविध फळांचे व फुलांचे वृक्ष लावले गेले. त्यात आंबा, कदंब, अशोक, चंपक, पुंग, फणस, साल, ताड, तमल व बकुळी, केतकी, आवळा, जांभूळ, अमृत, पारिजातक, पळस, अतिमुक्ती, नागचाफा अशा विविध वनस्पति होत्या. त्यांच्या फुलांच्या सुगंधामुळें त्या नगराचे वातावरण प्रसन्न होत होते. त्यामुळें तेथे इतर भागांतून विविध पक्षी उडून येत होते व कांहीं तेथेच कायम वस्ती करून होते. तेथे त्या पक्षांना कोणीही त्रास देत नसल्यामुळें त्यांच्या घरट्यांची संख्या चांगली

झाली होती. त्यात चक्रवाक, मोर, कोकीळ प्रामुख्याने होते. तेथे असलेल्या तलावांत कमळे व इतर जलवनस्पती होत्या त्यामुळे ते तलाव सुंदर दिसत होते. रहिवाशांना करमणूकीसाठी, खेळण्यासाठी, पोहण्याचे तलाव आणि विरंगुळा म्हणून जिमखाने होते. नगराचे काम पूर्ण झाल्यावर अनेक ब्राह्मण तेथे वस्तीसाठी आले, व्यापारी आले, कारागिर आले. त्यांच्यामुळें त्या शहराची संपत्ति वाढत गेली. अनेक पवित्र लोकांच्या तेथे वस्ती करण्याने पांडवांना फार संतोष होत असें. दिवसेंदिवस ती नगरी अधिकाधिक संमृद्ध होत होती. त्यांना त्या कामात भिष्म व धृतराष्ट्र आणि त्याचा आतेभाऊ कृष्ण आणि बलराम आणि कृष्ण द्वैपायन ह्यांचे अनमोल सहाय्य मिळाले होते. सर्व स्थिर स्थावर झाल्यावर कृष्ण व बलराम पांडवांचा निरोप घेऊन आपल्या द्वारकेला जातात.

अशारितीने आदिपर्वातील विदूरागमन पर्वाचा दोनशे आठवा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे नऊ

(राज्यलाभ पर्व सुरु)

जनमेजय विचारतो, अहो तपोसंपन्न वैशंपायन महर्षी, मला सांगा, "ते इंद्रप्रस्थ स्थापन केल्यानंतर माझ्या पणजोबा पांडवांनी काय केले"? "मला आणखीन सांगा, ऋषीवर्य, त्यांची समाईक पत्नी त्यांच्याबरोबर कशी रहात होती"? "एकाच पत्नीबरोबर रहातांना त्या पांच भावंडांत भांडणं तिच्यावरून झाली नाहीत कां, ती झाली असतील तर ती कोणी व कशी सोडवली"? "तुम्ही सर्व ज्ञानी अहात म्हणून विचारतो, ते पांच त्यांचे व्यवहार एकमेकांशी कसे होते व त्यांच्यात जर वाद होत असतील तर ते सोडवण्यात त्यांच्या आईने कांहीं भूमिका कशी बजावली ते सगळे सांगा". "थोडक्यात बोलावयाचे असें किं, त्या सहाजणांचे जे समाईक वैवाहीक जीवन होते ते कसे होते ते सविस्तर सांगा, मला ते ऐकण्याची फार उत्सुकता आहे".

त्यावर वैशंपायन बोलतात, ते शत्रूंचा नाश करणारे क्षत्रिय वीर, पांडव, त्यांना त्यांचे स्वतःचे राज्य मिळाल्यानंतर धृतराष्ट्राच्या आज्ञेने त्या खांडवप्रस्थात द्रौपदी बरोबर मजेत जीवन घालवत होते. त्यांचा ज्येष्ठ बंधू युधिष्ठीर त्या राज्यावर एका सत्त्वशिल नितिमान राजा सारखा त्या राज्याचा कारभार पहात होता व इतर भाऊ त्याला त्यांच्या दिलेल्या जबाबदार्या सांभाळून उत्तम प्रकारे मदत करीत होते. आजुबाजूच्या शत्रूंना पराभूत करून त्यांनी त्यांच्या राज्याचा विस्तार करण्यास प्रारंभ केला होता. त्यांचे राज्य सावकाशपणे समृद्धीकडे जात होते व त्यातच त्यांना आनंद मिळत होता. राज्यकारभार न्यायाने करीत होते. अशा परिस्थितीत एक दिवशी ऋषी नारद त्यांच्या भेटीला आले. त्यांना आलेले पाहून राजा युधिष्ठीर त्यांना बसण्यासाठी आसन देतो. रिवाजाप्रमाणे त्यांना स्वताच्या हातांने अर्ध्य (पाणी प्यायला देणे) देतो. त्या नंतर आपल्या राजकारभाराची माहिती त्यांने नारदमुनींना विशद केली, सांगितली. नारदमुनी त्या आदरतिथ्याने प्रसंन्न झाले, त्यांनी सुद्धा त्यांच्या इंद्रप्रस्थाची वाखाणणी केली आणि त्यांना आशिर्वाद (शुभेच्छा) दिला. त्यानंतर उभ्या असलेल्या युधिष्ठीरास त्यांनी बसण्यास सांगितले. त्या सुचने नंतरच तो सत्त्वशिल राजा त्याच्या गादीवर स्थानापन्न झाला. थोड्या समयानंतर आतील कक्षात असलेल्या आपल्या पत्नीला, द्रौपदीला नारदमुनींचे दर्शन घेण्यासाठी बाहेर बोलावतो. ती

त्या पांचांची समाईक पत्नी त्यानुसार बाहेर येते व मुनींच्या पाया पडते व हात जोडून नमस्कार करून डोक्यावर पदर घेऊन त्यांच्या समोर उभी रहाते. नारद तिला सुद्धा अनेक शुभेच्छा देतात. त्यानंतर ती त्यांची राणी नारदमुनींची त्यांच्या परवानगीने रजा घेते व पुनः आतील कक्षात निघून जाते. युधिष्ठीर व त्याचे चार बंधू तेथे नारदमुनींबरोबर बसलेले होते. युधिष्ठीराकडे पहात परंतु, सगळ्याच पंडुपुत्रांना उद्देशून तो ऋषी बोलू लागला, "द्रुपदाची यज्ञसिद्धा कन्या तुमची समाईक पत्नी विधीवत झाली आहे. त्याला त्यामुळें समाजाची मान्यता आहे. परंतु, त्यात कांहीं दोष उत्पन्न होण्याचा संभव आहे केवळ वासनाक्षोभामुळें असे होऊ शकते, हे तुम्ही जाणता आहात. त्यासाठी अशा परिस्थितीत कसे व्यवहार करावयाचे ह्याचे कांहीं नियम असावेत". असें नारद म्हणाले. "अशा क्षोभामुळें तुमची एकी संपुष्टात येऊ शकते व ते कोणाच्याही हिताचे नाही. परंतु, जर असें नियम असतील व त्यांचे पालन तुम्ही प्रामाणिकपणे कराल तर अशी घातक अवस्था उत्पन्न होणार नाही. असें सुचवण्याचे कारण, अति प्राचीन काळी अशा परिस्थिती उपस्थित झाल्या होत्या. ती उदाहरणे पाहिली तर बरे होईल". पुढे ते सांगू लागले, "फार पूर्वी दोन राक्षस बंधू होते. त्यांची नांवे सुंद व उपसुंद अशी होती. ते इतके शक्तिमान होते कीं. त्यांना ब्रह्मसुद्धा नष्ट करू शकत नव्हता. त्यांना महादेवाचे तसे संरक्षण होते किं, फक्त जर ते एकमेकांला मारण्यास तयार झाले तरच ते मरतील. ते एकाच राज्यावर राज्य करत होते. ते दोघे एकाच जागी बसत, एकाच थाळीत खात होते, एकसारखे कपडे घालत होते, तरीसुद्धा जेव्हां अप्सरा तिलोत्तमा त्यांच्या जीवनात आली तेव्हां त्यांचा वासनाक्षोभ झाला त्यामुळें ते एकमेकांचे उभे शत्रू झाले व शेवटी एकमेकांना त्यांनी मारून टाकले. एक स्त्री हि अशी गोष्ट आहे जिच्यामुळें पुरुषांत तिच्या प्राप्तीसाठी क्षोभ होऊ शकतो. तसें तुमच्याबाबत होणार नाहीच असें गृहीत धरणे योग्य होणार नाही, म्हणून असें मर्यादा सांगणारे नियम जर तुम्ही आचरणात आणले तर ते सर्वासाठी हिताचे ठरेल". नारद एवढे सांगून गप्प बसले.

ते ऐकल्यावर युधिष्ठीराच्या मनात त्या कथेबद्दल कुतुहल उत्पन्न झाले व तो विचारतो नारदांना, "अहो मुनीश्री, सांगा आम्हाला ते सुंद व उपसुंद कोण होते, त्यांना तो आशिर्वाद

महादेवांने कां दिला व त्यांच्या जीवनात ती अप्सरा तिलोत्तमा का व कशी आली, हे सगळे सांगा म्हणजे आम्हाला सगळे समजेल". इतर पांडवसुद्धा त्याला अनुमोदन देतात.
अशारितीने आदिपर्वातील राज्यालाभ पर्वाचा दोनशे नववा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे दहावा

(राज्यलाभ पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, युधिष्ठीराची ती विनंती ऐकल्यावर तो महामुनी नारद सांगू लागतो, "अरे पृथाच्या मुला, तुम्ही सगळे ते ऐका, ते जसें घडले तसेंच येथे सांगणार आहे. फार प्राचीन काळी महाशक्तिमान निकुंभ नावाचा दैत्य हिरण्यकश्यपु ह्या असुरांच्या वंशात जन्मला होता. त्या महाबली निकुंभास दोन मुलगे झाले , त्यांची नांवे सुंद व उपसुंद अशी होती. ते दोघे मोठे धाडसी व प्रबळ होते. ते त्यांच्या ताकदीप्रमाणे क्रूर व भयंकर होते. त्याच्या प्रवृत्ती समान होत्या. सारखेच दुष्ट व बळजबरी करणारे जसें असुर असतात तसेंच ते होते. सुख व दुःख ते सारखेच उपभोगत असतं, ते नेहमी एकत्र फिरत व एकत्रच कांहीं करत असतं. त्यांच्या सगळ्या वागण्यात विलक्षण साम्य होते. त्यांच्या सगळ्या सवयी सुद्धा सारख्याच होत्या. जणूकाय ते एकाच गोष्टाच्या दोन समान प्रतिमा आहेत. त्याच्या महत्वाकांक्षा वाढत गेल्या व तिनही जग जिंकण्याची स्वप्नं ते पाहू लागले. पूर्ण तयारीनिशी ते विंध्य पर्वताकडे गेले. पूर्व तयारी म्हणून ते शस्त्रार्था ऐवजी तपस्येचा मार्ग निवडतात व घोर तपस्या ते करू लागतात. तहान भूक सगळे विसरून ते तपस्या करत असतात. त्यांच्या अंगावर झाडाच्या साली व मेलेल्या जनावराच्या कातड्याचे वस्त्र असतं, त्यांचे केस इतके वाढले कीं, त्याच्या मोठ्या जाडजूड बटा झाल्या होत्या. त्यांच्या सर्वांगाला वनस्पतीचे कांटे रुतलेले असतात, केवळ हवा पिऊन एका पायाच्या आंगठ्यावर दिवसभर उभे राहून ते त्यांची तपस्या करत असतात. ते त्यांचे अंगाचे मांस पवित्र अग्नीत देत, दोनही हात वर केलेल्या अवस्थेत एक टक अनंतात पहात ते सतत ध्यान करत असतात. ते अशारितीने तपस्या करत असतांना एक अद्भुत घटना घडते. त्यांच्या घोर तपस्येमुळें तो विंध्य पर्वत तापून निघाला आणि त्याच्या सर्वांगातून वाफा येऊ लागल्या. तसे घडल्याने त्यावर वस्ती करणारे स्वर्गिय लोक घाबरून गेले. यथावकाश ते पुरेसे तपोसामर्थ्य प्राप्त करतात. त्यांची तपस्या खंडीत व्हावी म्हणून देव विविध व्यत्यय त्यांच्या साधनेत उपस्थित करू लागले. त्यांची साधना भ्रष्ट व्हावी म्हणून सुंदर ललनांचा मोह त्याना लावण्याचा प्रयास होत होता. सर्व प्रयत्न फोल गेले व त्या दोघांची तपस्या तशीच अव्याहतपणें चालू राहीली. ते त्यांच्या व्रतापासून यत्किंचितही ढळले नाहीत. सुंद व

उपसुंदांची साधना मोडण्यासाठी देव मायावी दृष्य त्यांच्या पुढे उभी करतात. त्यात त्यांची भावंडे, आया, बहिणी असें नातलग मोठ्या अडचणीत आहेत अशी दाखवली जात होती. राक्षस त्यांना मारतात असें दाखवले जात होते पण त्यांचा कांहींही परिणाम त्यांच्यावर होत नव्हता. त्यांचे नातेवाईक मदतीसाठी हांका मारत आहेत असें त्यांना दाखवले जात होते. परंतु, त्या कशाचाच त्या भावंडांवर कांहींही परिणाम होत नव्हता. त्यांची साधना तशीच अव्याहतपणे चालू राहिली. जेव्हां त्यांचा कांहींही परिणाम होत नाही असें समजले तेव्हां ती सगळी मायावी दृष्ये विरघळून गेली. शेवटी ब्रह्मदेव जे सगळ्यांचे कारक व त्रातासुद्धा आहेत ते अवतरले व त्यांना कोणता वर पाहिजे ते त्या दोघां असुरांना विचारले. प्रत्यक्ष ब्रह्मदेव आलेले पहाताच ते नीटपणे उभे राहून हात जोडून त्यांना बोलतात, "अहो ब्रह्म, तुम्ही आमच्या तपस्येवर जर संतुष्ट झाला अहात तर आम्हाला जगातील सगळ्या शस्त्र, अस्त्र ह्यांचे ज्ञान प्राप्त व्हावे. आम्हाला कोणतेही रुप घेता आले पाहिजे, त्याशिवाय मायावी भ्रमविद्या प्राप्त व्हावी, आम्ही सगळ्याच्या पेक्षा अधिक बलवान असावे, आणि आम्ही अमर असावे अशी इच्छा त्यांनी सांगितली". ब्रह्म ते ऐकून बोलले, "अमरत्व सोडून बाकी तुम्हाला मी देऊ शकतो परंतु, हि तपस्या करण्यामागचा तुमचा उद्देश त्रिलोक पायाखाली दाबण्यासाठी आहे म्हणून मी तुम्हाला कोणताही वर देणार नाही".

त्यानंतर नारद सांगतात, ते ऐकल्यावर ते दोघे दैत्य ब्रह्माला सांगतात, "तसें नाही तर निदान आम्हाला ह्या त्रैलोक्यातील कोणत्याही उत्पन्न झालेल्या, हलणार्या व न हलणार्या अशा कशापासूनही मृत्यू येणार नाही, व जर मृत्यू आला तर तो आम्हा दोघांनीच जर एकमेकांना मारले तर येईल असा वर तरी आपण देऊ शकाल कां"? ते ऐकल्यावर तो जगद्नियंता, त्याना त्यांची साधना संपुष्टात आणण्याची आज्ञा करतात व तो वर देतात. ब्रह्मदेव परत आपल्या स्थळी जातात. त्या वरामुळें ते दोघे बंधू कोणालाही आटपत नाहीत. त्यांचे आप्त त्यांच्या ह्या कार्यामुळें त्यांच्यावर अतिशय खूष होतात. सगळे दैत्य त्यांची तारीफ करत असतात. सुंद व उपसुंद आपले केस कापतात, राजमुकूट घालतात, उत्तमोत्तम वस्त्र नेसतात त्यामुळें ते खुपच देखणे दिसू लागतात. त्यांच्या त्या सिद्धीचा वापर करून ते चंद्राला त्यांच्या नगरीच्या आकाशात दररोज उभे करतात. त्या चंद्राच्या प्रकाशात ते व त्यांचे मित्र आणि आप्त मजा करतात. खाणे पिणे व मौजमजा करणे त्यात

मोठ्याने ओरडणे असें त्यांचे चालले होते. त्या त्यांच्या बेसुमार वागण्याने सगळ्यांना त्रास होऊ लागला. हे असें दररोजचेच झाले. त्यांच्या त्या दैत्य नगरीत तो मोठा धुमाकूळ होत होता. ते हवे ते रुप घेत व त्याद्वारा गंमत जंमत करत असत. त्यात समय कसा गेला ते त्यांना समजले नाही. सगळे वर्ष एका दिवसासारखे गेले.

अशारितीने आदिपर्वातील राज्यलाभ पर्वाचा दोनशे दहावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे अकरावा

(राजलाभ पर्व पुढे चालू)

नारद पुढे सांगतात, "जसें त्या सर्व मजा संपल्या, ते दोघे भाऊ सुंद व उपसुंद त्रैलोक जिंकण्याची योजना आखतात. त्या बाबत ते त्यांच्या मित्र व आप्तांचा विचार घेतात व तयारीला सुरुवात करतात. स्वारीला निघण्याच्या आधीचे सोपस्कार ते उरकतात. मघा नक्षत्राच्या उदय काळी ते निघतात. मोठी दैत्यांची फौज घेऊन ते स्वारीला निघतात. त्यांच्याकडे त्यांची युद्धाची आयुध असतात. त्यात अंगावर चिलखतं, हातात गदा, कुर्हाडी, काटेरी गदा, तलवारी, घण, हातोडे अशी सर्व तयारी असते. विजय गान गात ते भयंकर लोक जग जिंकण्यासाठी निघतात. कोठेही व कोठल्याही रुपात जाण्याची क्षमता त्यांना असल्यामुळें ते थेट स्वर्गाचे दरवाजे ठोठावतात. स्वर्गातील मंडळींना त्यांच्या येण्याची चाहूल लागते व त्यांना कोणते वर मिळाले आहेत हे सुद्धा त्याना माहीत होते, त्यांच्या दुष्ट उद्देशाचासुद्धा त्यांना अंदाज होता. ते किती खुनशी आहेत तेसुद्धा त्यांना अवगत होते. त्यामुळें पुष्कळ स्वर्गवासी आपले ठिकाण सोडून ब्रम्हाच्या आश्रयाला जाणे पसंत करतात. ते भयंकर राक्षस लवकरच इंद्राचा स्वर्ग काबीज करतात. त्यानंतर यक्ष व इतर स्वर्गस्थ राक्षसांच्या टोळ्यांचा ते पराभव करतात. त्याशिवाय इतर स्वर्गस्थ प्रजातिंचासुद्धा पराजय करतात. त्यानंतर ते समुद्रातील रहिवाशांना हरवतात आणि नंतर ते म्लेच्छ लोकांना मारतात. तेवढ्याने समाधान न झाल्यामुळें ते संपूर्ण पृथ्वी जिंकण्याची योजना आखतात. जसे ते जिंकत होते त्यांची क्रुरता वाढत होती. त्याचवेळी ब्राह्मण व ऋषीमुनींच्या यज्ञयागामुळें देवांची ताकद वाढत होती. देव अधिक समृद्ध होत होते. त्यामुळें ते दैत्य देवांकडे लक्ष देतात. देवांचा खत्मा करणे अगत्याचे होते. सुंद व उपसुंद आणि त्यांचे सैन्य ठरवतो किं, ह्या देवांचा कायमचा नाश केला पाहिजे. त्याप्रमाणे ते त्यांच्या सैन्याला आज्ञा देतात. त्याप्रमाणे, महासागराच्या पूर्वेकडील भागातून ते त्यांचे सैन्य घेऊन सर्व दिशांना पसरतात. यज्ञ करणार्या सगळ्या ब्राह्मणांचा व ऋषींचा ते निर्दयपणे मारून भयंकर असा नाश करतात. ते उरकल्यावर जसे कांहींच झालेले नाही अशा थाटात ते दुसरे ठिकाण जिंकण्यासाठी जातात. त्यांच्या सैनिकांनी ब्राह्मणांचे पवित्र अग्नी पाण्यात फेकून दिले त्यावेळी तपस्या करणार्या ऋषींनी त्याना शाप दिले पण ते शाप

निरुपयोगी ठरले कारण ब्रह्माचा आशिर्वाद त्यापेक्षा जास्त शक्तिमान होता. असुरांना त्या अनेक शापांचा कांहींही त्रास झाला नाही. जेव्हां त्यांना समजले कीं, त्यांच्या शापाचा यत्किंचितही परिणाम होत नाही तेव्हां ते ऋषी सैरावैरा पळू लागले. आपले यज्ञ व इतर कार्ये तेथेच सोडून ते पळत होते. अतिउच्च श्रेणीचे ऋषीसुद्धा त्यात होते. जसें गरुड आल्यावर सर्प पळून जातात. त्यांचे पवित्र आश्रम व इतर जागांचा पुरता सफाया झाला होता. अंतकाळ आल्यासारखी परिस्थिती सर्वत्र झाली होती. सगळ्याच सात्त्विक लोकांचा अशारितीने सफाया केल्यानंतर ते राक्षस त्यांची विविध रुप घेऊ लागले. मदांध झालेल्या हत्तीचे रुप घेऊन ते पळणार्या ऋषींच्या मागे लागले. जेथे ते लपले असतील तेथून त्याना ते त्यांच्या सोंडीनी खेचून काढत व मारत होते. त्यांना अडवणारे कोणीही नव्हते. कधी वाघ तर कधी सिंह अशी रुप घेऊन ते दोघे त्या ब्राह्मणांचा फडशा पाडत होते. त्यांना कोणी मारू शकत नव्हते कारण ब्रह्माचा दुवा त्यांचे संरक्षण करीत होता. ते दोघे विविध पद्धतीने त्या पुण्यवान लोकांचा विनाकारण नाश करीत होते. त्याचा परिणाम असा झाला किं, पृथ्वीवर कोणाही पवित्र कार्य करणारे राहिले नाहीत. सगळे व्यवहार ठप्प झाले. सगळे कर्मकांड विधी थांबले. जणू पृथ्वी निर्जीव झाली. लग्न विधी, व्यापार, शेती सगळेच थांबले. नगरे, गांवं ओसाड पडली होती, सगळीकडे  हाडांचे ढीग पडलेले होते. सगळ्या पृथ्वीवर भयावह परिस्थिती झाली होती. पितरांची श्राद्ध होईनात. सर्व शुभकार्ये बंद पडली होती. जगात कोठेही पहाल तर भितीचे वातावरण पसरले होते. आकाशातील सूर्य, चंद्र, तारे व तारका हे सगळे सुंद व उपसुंदाची ही करामत असहायपणे पहात होते. अशारितीने सगळ्या जगाला पादाक्रांत केलेले ते राक्षस कुरुक्षेत्री रहाण्याचे ठरवतात, आता त्यांना मारणारा कोणीही नव्हता.

अशारितीने आदिपर्वातील राज्यलाभपर्वाचा दोनशे अकरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे बारावा

(राज्यलाभ पर्व पुढे चालू)

नारद मुनी पुढे सांगत असतात, असे विपरित घडल्यामुळें, स्वर्गातील ऋषी, सिद्ध, उच्च दर्जाचे तपस्वी, ज्यांचे संयमन पूर्ण आहे, ते त्या दोन भावांचे राक्षसी कृत्य पाहून अस्वस्थ होतात. ते त्यासाठी ब्रह्माला भेटण्यासाठी जातात. ब्रह्मदेव त्या प्रकाराने स्वतः दुःखी झालेले असतात. ते पहातात किं, ब्रह्म इतर ज्येष्ठ सिद्ध व देवांच्या मध्ये बसलेले असतात. त्यांत महादेव, अग्नी, वायु, शक्र, सूर्य, सोम आणि कांहीं योग्यतेचे महर्षी असतात. त्यांत वैखन, वलिखिल्य, वानप्रस्था, मरीचि, अज, अविमुद असें असतात. ते सगळे प्राप्त परिस्थितीचा आढावा घेत असतात. जेव्हां ते भेटणारे ऋषी दुःखी मनाने त्यांना भेटतात, व ब्रह्माला जे कांहीं घडत आहे ते सविस्तर सांगतात तेव्हां सगळे त्या दोघांचा बंदोबस्त झाला पाहिजे म्हणून आग्रह करतात. त्यांचे ऐकल्यावर ब्रह्म थोडा वेळ विचार करतात व ठरवतात, आणि विश्वकर्माला बोलावणे धाडतात. विश्वकर्मा हजर होतो. ब्रह्मदेव त्याला सांगतात, अहो, विश्वाचे शिल्पकार, मला एक अशी अप्रतिम स्त्री बनवून पाहिजे जी सारखी आजवर झालेली नाही. ती आज्ञा ऐकल्यावर विश्वकर्मा ब्रह्माला वंदन करून कामाला लागतो. खूप काळजीपूर्वकपणे तो एक स्त्री घडवतो. त्रिलोकांत मिळणार नाही अशी अप्रतिम लावण्यवती अशी स्त्री तो तयार करतो. तिला पाहिल्यावर अगदी मोठ्यातले मोठे तपस्वी, ऋषी, साक्षात देव व देवर्षी असें कोणीही थक्क झाले पाहिजेत. तिच्या संपूर्ण अंगप्रत्यंगात सौंदर्य ठासून भरलेले होते. तिच्या सारखी लावण्यवती त्रैलोकात झाली नव्हती. साक्षात लक्ष्मी किंवा त्याहीपेक्षा जास्त सुंदर अशी ती तयार केलेली होती, विश्वकर्माने. तिचे नांव ब्रह्मदेव तिलोत्तमा असें ठेवतात. सर्व झाल्यावर त्या अप्रतिम मूर्तीत ब्रह्मदेव प्राण घालतात. त्या बरोबर ती सुंदरी लवून त्या देवाला वंदन करते. त्या सजीव तिलोत्तमाकडे पाहून स्वतः ब्रह्मदेवसुद्धा थोडे विचलित होतात. तिला आज्ञा देतात, "अग, तिलोत्तमा तू आता जाऊन त्या दोघा राक्षसांना तुझ्या सौंदर्याने घायाळ कर. त्यानंतर ते कामदेवाला सांगतात कीं, त्याने त्याचे काम सुरु करावे. कामदेव व तिलोत्तमा त्या सुंद व उपसुंद असलेल्या कुरुक्षेत्री जातात. ह्या योजनेचा उद्देश असा असतो किं, ते दोघे राक्षस तिला पाहिल्यावर तिच्या सौंदर्याने व कामदेवाच्या प्रभावाने

आकृष्ट होतील व तिच्यासाठी एकमेकांशी झगडा करतील. फक्त आपल्यालाच ती मिळावी अशी प्रेरणा त्यांच्यात उत्पन्न होईल असें योजले होते.
नारद पुढे सांगतात, ती विश्वसुंदरी ब्रह्माला वंदन केल्यावर कुरुक्षेत्री जाण्याआधी स्वर्गात फिरते. तिला पाहिल्यावर ते ऋषी त्यांचे तोंड पूर्वेकडे वळवतात, सगळे इतर स्वर्गीय उत्तरेकडे दृष्टी वळवतात, महादेवांचे तोंड पूर्वेकडे होते, इतर ऋषींची तोंडं इतरत्र होतात, कारण त्या अप्रतिम सौंदर्याकडे पहाणे त्यांना अशक्य झालेले असते. त्यावरून तुम्ही पांडव समजू शकता, ती तिलोत्तमा किती देखणी होती. तिच्याकडे एकटक पहाणे त्यांपैकीं कोणालासुद्धा शक्य नव्हते. फक्त इंद्र व स्थानू तिच्या सौंदर्याने भाळले नाहीत. ते त्यांची स्थिरता राखून होते. बाकी सगळे गारद झाले होते. ती विश्वसुंदरी स्वर्गाचा फेरफटका मारत असल्यामुळें ज्या दिशेला ती गेली त्या दिशेला महादेवाला आणखीन एक तोंड उत्पन्न होत होते अशामुळें त्यांना चार तोंडं प्राप्त झाली होती. तिला पहाण्यासाठी दोन डोळे पुरेसे नाहीत किं काय म्हणून इंद्राला हजार नेत्र मिळाले. तो वलाचा नाश करणारा स्थानू त्याच्या त्या हजार डोळ्याने सुद्धा तिला पाहूनही त्याचे समाधान होत नव्हते अशी ती तिलोत्तमा सुंदर होती. सगळे तिच्याकडे डोळे लावून बसले होते. जेथे ती जाईल तेथे ते तिला पहाण्यासाठी नजरा वळवत होते. अखेरीस ती विश्वसुंदरी त्या राक्षसाच्या ठिकाणी प्रयाण करते. सर्वांना खात्री वाटत असते कीं, ह्यामुळें तें फसतील व त्यांचा नाश होईल. ती गेल्यावर ब्रह्मदेव सगळ्याना आपापल्या घरी जाण्याची आज्ञा देतात.
अशारितीने आदिपर्वातील राज्यलाभ पर्वाचा दोनशे बारावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे तेरावा

(राज्यलाभ पर्व संपले)

नारद पुढे सांगतात, सर्वांनां जिंकल्यामुळें तूर्त त्या दोन राक्षसांना कोणीही प्रतिस्पर्धी उरला नव्हता. त्या जग जिंकण्याच्या कामामुळें ते पुरते थकले होते. त्रैलोक त्यांच्या ताब्यात आले होते. त्यांची मनिषा एका अर्थाने पूर्ण झालेली असते. आता आपल्याला कांहीं करण्यासारखे उरलेले नाही हे ते समजतात. सगळ्या जगातील देव, मनुष्य, गंधर्व, राक्षस, यक्ष, नाग, अशा सगळ्यांचा त्यांनी पराभव केलेला असल्याने व त्या सगळ्यांची सगळी संपत्ति आता त्यांच्याकडे असल्यानें ते आता निर्धास्त झाले होते. ते दोघे आता कांही मजा करायला मिळते कां ते शोधू लागतात. आता फक्त मजा करावयाची हे ते ठरवतात.

मजा करावयाची तर ती स्वर्गीय देव जसें करतात, अप्सरां बरोबर मजा करण्याचे ते ठरवतात. त्यात एक अडचण होती, कीं, ह्या अप्सरा त्यांच्या ताकदीने बधणार्या नव्हत्या. त्यांना जिंकण्यासाठी त्यांना त्या अप्सरांना खूष करावे लागते. कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करून ते शक्य नसते हे ते समजतात. इतर प्रकारची सुखं जसें सुगंध, सुंदर फुलं, अत्तरं, सुंदर कपडे असें सगळे त्यांना मिळवणे सोपे होते पण त्यांने ते सुख मिळणे शक्य नव्हते. बाईपासून जे सुख मिळते त्याची इतर कोणत्याही सुखाशी तुलना करता येत नाही. त्यामुळें आता ह्या सुंद व उपसुंद दोघांना अप्सरा संतुष्ट करावयाची आवश्यकता अनिवार्य झाली. स्त्री कधी घाबरवून सुखासाठी उपलब्ध होत नाही व त्यात अप्सरांना तर कोणीही घाबरवू शकत नाही. इतर प्रकारच्या सुखांसाठी ते विविध ठिकाणी भटकत रहातात जसें मर्त्य करतात. ते एकदा विंध्य पर्वतावरील सपाट  पठारावर गेले. तेथे प्रदेश खडकाळ असूनही झाडे वाढत होती. तेथे त्यांच्याबरोबर त्यांच्या स्त्रिया होत्या व ते सगळे नांच गाणे करत असतात. त्या स्त्रिया त्यांना आनंद देण्यासाठी त्यांची स्तुती करणारी गांणी गात होती. त्या त्यांच्या सेवक स्त्रियांबरोबर मजा करण्याचा आतां त्याना कंटाळा आला होता. कांहीं तरी खास असले पाहिजे. त्याच सुमारास तिलोत्तमा आपल्या रक्तवर्णी झिरझिरीत वस्त्राने त्या परिसरात भटकत होती. तिचे सौंदर्य त्या अर्धपारदर्शक कपड्यातून भलतेच खुलून दिसत होते. तिची चाल व इतर शरीराच्या मोहक हालचाली

कोणालाही बेभान करण्यास पुरेशा होत्या. त्या उपवनात नदीच्या किनार्याला ते राक्षस मजा म्हणून झाडावर आलेली फळं काढत होते व त्याच झाडीतून ती अप्सरा वाट काढत चालली होती. तिलोत्तमाच्या अंगाला येणारा विशेष मादक गंध त्यांना आकर्षित करतो. हा गंध कधी आला नव्हता तो कोठून येत आहे असें ते दोघे शोधण्यास सुरुवात करतात. मोहाच्या झाडांवरील फळं खात असल्यामुळें त्यांना कैफ आला होता व त्या धुंदीत ते इकडे तिकडे तो गंध कोठून येत आहे ते पहात असतात. त्यांना ती दिसते. मोहाच्या धुंदीत ते तसेंच तिच्याकडे जातात व तिचा हात पकडतात. त्या धुंदकीत ते जास्त वासनांध झालेले असतात. कामदेवांने त्याचे बाण मारण्यास सुरुवात केलेली असते. अशांत सुंद प्रथम तिचा उजवा हात पकडतो. यशाच्या मस्तीत तो जास्तच मस्त झालेला असतो. त्याचवेळी उपसुंद तिचा डावा हात पकडतो व ते एकमेकांशी वाद घालू लागतात किं. ती सुंदरी त्यांची आहे. सुंद म्हणतो, "मी तिचा उजवा हात धरला आहे म्हणून ती माझी बायको झाली आहे. म्हणून ती आता तुझी मेहुणी झाली आहे तेव्हां तू तिचा हात सोड". सुरेच्या कैफात आणि वासनेच्या प्रभावाखाली ते त्यांची बंधूभावाची भावना विसरतात. त्यात त्या तिलोत्तमाच्या अप्रतिम सौंदर्यामुळें कोणीही तिच्यावरील हक्क सोडण्यास तयार होत नाही. त्यांच्यात तिच्यावरून तंटा सुरू होतो. वासनेच्या आहारी गेलेल्यांचा विवेक संपुष्टात येतो तसा त्यांचा विवेक नष्ट होतो. सुंद सांगून ऐकत नाही हे पाहता उपसुंद आपली गदा उचलून सुंदावर उगारतो. त्यामुळें सुंद संतापतो व तो त्याची काटेरी गदा उचलून उपसुंदावर मारतो. त्यांच्यात धमासान द्वंद्व होते व त्यात ते दोघे एकमेकांना मारून टाकतात. तिलोत्तमा तेथेच उभी राहून ते पहात असते. इतर राक्षस व त्यांच्या बायका घाबरून तेथून पळून जातात. त्यानंतर ब्रह्मदेव व इतर स्वर्गिय परमात्मे तेथे येतात व तिलोत्तमेला धन्यवाद देतात. सगळें त्रैलोक आनंदाने नाचू लागते. ब्रह्मदेवांकडे तिलोत्तमा वर मांगते. ब्रह्मदेव तिला आशिर्वाद देतात किं, तू ब्रह्मांडात अशीच भटकत रहाशिल व तुझ्याकडे कोणीही पाहू शकणार नाही. त्यानंतर ब्रह्मदेव आपल्या ठिकाणी जातात.

*दुसर्या प्रतित वेगळी कथा आहे. त्याप्रमाणे, जेव्हां सुंद तिलोत्तमाचा उजवा हात व उपसुंद डावा हात पकडतात तेव्हां ती त्यांना सांगते कीं, त्यांनी द्वंद्व करावे व त्यात जो जिंकेल*

*त्याच्याशी ती संभोग करील. त्यामुळें ते दोघे लढतात व त्यात ते एकमेकांना ठार मारतात. त्यानंतर इंद्र ब्रह्मदेवाकडे तिलोत्तमाची मांगणी करतो व ब्रह्मदेव इंद्राला तिलोत्तमा बहाल करतो. त्यानंतर ब्रह्मदेव आपल्या ठिकाणी जातात.*

नारद पुढे सांगतात, "वासनेच्या आहारी गेल्यामुळें ते दोघे बंधू आपले संतुलन हरवतात व त्यांचा नाश होतो. तुम्हीसुद्धा असेंच एकमेकांना बंधूप्रेमाने बांधलेले अहात पण कोणी कांहीं सांगू शकणार नाही केव्हा व कशी तुमची सुद्धा ह्या सुंद व उपसुंदा सारखी गत होईल. येथे तिलोत्तमेच्या तोडीची तुमची पत्नी आहे व तिच्या हक्कासाठी केव्हा तुमच्यात दुफळी होईल ते कसें सांगावे"? "त्यासाठी अशी कांहीं व्यवस्था तुम्ही करा ज्यामुळें अशी परिस्थिती तुमच्यावर येणार नाही".

वैशंपायन सांगतात, ते सामर्थ्यवान पांडव एकमेकांचा सल्ला घेऊन एक नियम निश्चित करतात व तो नारदमुनींच्या समक्ष ते जाहिर करतात. त्याप्रमाणें जेव्हां कोणी एक पति द्रौपदीसह असेल तेव्हा त्या ठिकाणी दुसरा जर गेला तर त्यांने प्रायश्चित्त म्हणून बारा वर्षे वनवासाला जावे आणि ब्रह्मचर्य व्रतात रहावे. तो नियम नारदांने फार विचार न करतांच घाईने योग्य म्हणून मान्य केला. त्यानंतर तो महामुनी आपल्या ठिकाणी गेला. अशारितीने अरे जनमेजया, नारदाच्या सांगण्यावरून ते तुझे पणजोबा त्या नियमाचे काटेकोरपणे पालन करत होते. त्यामुळें त्यांच्यात कधी बायकोवरून वाद झाला नाही.

*दुसर्या प्रतित नियम थोडे वेगळे दिले आहेत, त्याप्रमाणें, प्रत्येक पांडव पूर्ण एक वर्ष द्रौपदीबरोबर राहील त्याकाळात जर कोणी दुसर्या पांडवांने तिला पाहिलं तर तो पांडव पुढील बारा वर्षे ब्रम्हचर्य पालन करील व वनवासात काढील.*

अशारितीने आदिपर्वातील राज्यलाभ पर्वाचा दोनशे तेरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे  चौदावा

(अर्जुन वनवास पर्व सुरू)

वैशंपायन सांगतात, तो नियम ते पाळत आपले जीवन मजेत जगत असतात. त्यांच्या सामर्थ्याने ते अनेक राज्ये जिंकतात व आपल्या राज्याचा विस्तार करतात. त्यांच्या राज्यात अन्याय हि गोष्ट अस्तित्वात नव्हती. कुणी दुर्गुणी इसम त्या राज्यात राहू शकत नसें. त्यामुळें सर्वदूरवरून गुणीजन इंद्रप्रस्थात रहावयास येत होते. पांडवाच्या  घरात मर्यादा तत्त्वाचे अनुचरण होत असल्यामुळें कोणीही आपली मर्यादा ओलांडत नसें व म्हणून कोठेही कोठल्याही तक्रारीला वाव नव्हता. कृष्णा आपल्या पांच पतिंबरोबर सुखाने संसार करत होती. सर्वकांहीं आनंदमय होते. परिणाम स्वरुप, कुरु जंगल पुण्यमय झाले होते. इंद्रप्रस्थाची समृद्धी नजर लागावी अशी होत होती. म्हणतात नां, सगळे कांहीं कायमच तसें रहात नाही त्याप्रमाणे, कांहीं चोर त्या पवित्र शहरात आले व तेथे असलेल्या एका ब्राह्मणाच्या गाई चोरून पसार झाले. त्यामुळें चिडलेला तो ब्राह्मण राजवाड्याकडे आला व अर्जुनाच्या वाड्यापुढे जोरांने ओरडून तक्रार करू लागला. "अहो राजे पांडव, हे पहा माझ्या गाई तुमच्या राज्यात चोरीला गेल्या आहेत. हा कोणता अनर्थ इंद्रप्रस्थात होत आहे"? असें ओरडत राहीला, "कृपया त्यांचा पाठलाग करून माझ्या गाई मला परत मिळवून द्या". "असें जर होऊ लागले तर आम्ही यज्ञ कसे करणार"? "जर तुम्ही मला माझ्या गाई ताबडतोब मिळवून नाही दिल्या तर इंद्रप्रस्थात येण्याचा माझा उद्देशच निष्फळ ठरत आहे". "आम्ही ब्राह्मण समजत होतो, येथे अनर्थ कदापिही होणार नाही पण आता विपरीत झाले आहे, जसें सिंहाच्या गुहेत कोल्हा शिरला आहे".

त्या ब्राह्मणाचा तो आकांत सगळ्याना ऐकू जात होता व त्यामुळें अर्जुन त्याच्या पहिल्या मजल्याच्या सज्जात आला व त्या ब्राह्मणाला बोलला, "थांब ब्राह्मणा, मी त्वरित बंदोबस्त करतो". ब्राह्मण पुढे बोलतो, "असें ज्ञानी सांगतात, जो राजा प्रजेकडून त्यांच्या उत्पन्नाचा सहावा हिस्सा संरक्षणासाठी घेतो तो जर पुरेसे संरक्षण देऊ शकत नसेल तर तो राजा चोरांहूनही जास्त पापी ठरतो. अशा राज्यात शहाण्यानी राहू नये". "मी पुरता बुडलो आहे कृपया मला वाचवां".

वैशंपायन पुढे सांगत असतात, धनंजय कुंतीचा पुत्र असे परखड बोलणे ऐकून त्याला सांगतो, "कृपया निर्धास्त व्हा, मी तुझ्या गाई आणून देतो". अर्जुन त्यांची शस्त्रे आणण्यासाठी लगबगीने शस्त्रे जेथे ठेवलेली असतात त्या दालनात शिरतो. तो हे विसरलेला असतो किं, त्या दालनात त्यावेळी युधिष्ठीर रहात असतो व त्यावेळी तो द्रौपदीबरोबर असतो. नियमाचे उल्लंघन होईल म्हणून तो तसांच त्या दालना बाहेर उभा रहातो व तेथे वाड्याबाहेर तो अभागी ब्राह्मण जोर जोरांने ओरडून त्याला हांका मारत असतो. अर्जुन विचार करतो जर मी त्या दालनात शिरलो तर नियमाचा भंग होईल व मला वनवासात जावे लागेल आणि जर मी शस्त्रे घेतली नाहीत तर ते चोर गाई घेऊन पळून जातील, काय जास्त महत्वाचे आहे? मी त्याच्या गाई त्याला नाही मिळवून दिल्या तर आपल्या कुरु घराण्याची ब्राह्मणात नाचक्की होईल त्यातील कोणती गोष्ट जास्त योग्य ते तो पहात होता. ब्राह्मणाच्या गाई त्याला मिळणे व राज्यात घुसलेले चोर पकडणे अर्जुन जास्त महत्वाचे समजतो. राजाचे कर्तव्य त्याच्या निजी जीवनापेक्षा जास्त मोलाचे आहे हे तो लक्षात घेतो. ब्राह्मणाला किंवा कोणत्याही प्रजाजनाला संरक्षण न देणे हे पाप ठरेल. नियम मोडण्याची चूक करणे परवडेल पण राज्य कर्तव्यात खंड पडण्याचे पाप परवडणार नाही असें तो समजतो. शेवटी निर्णयाचा निर्धार करून तो महारथी शत्रूघ्न राजा अर्जुन त्या दालनात जाऊन ती शस्त्रे घेतो व निघतो. काय गडबड आहे ते पहाण्यासाठी त्याचा मोठा बंधू युधिष्ठीर तेथे येतो व त्याला समजते किं, अर्जुनाने नारदांपुढे घेतलेली नियम पाळण्याची शपथ मोडला आहे. अर्जुन त्याच्या भावाला काय परिस्थिती उत्पन्न झाली आहे ते थोडक्यात सांगतो व त्वरित चोर पकडण्यासाठी निघून जातो. धनंजय त्या ब्राह्मणाला सांगतो, "चिंता करू नकोस, लवकरच तुझ्या गाई तुला मिळतील". ते दोघे रथात बसतात व चोराच्या दिशेने प्रयाण करतात. थोड्याच वेळांत ते त्या चोरांना गाठतात व बाणांने त्यांना जायबंद करतात. ब्राह्मणाला त्याच्या गाई मिळतात. ब्राह्मण राजाचे शतशः आभार मानतो व अनेक आशिर्वाद देतो. त्या चपळाईमुळें इंद्रप्रस्थाची शान कितीतरी उंचावते. लोक पांडवांची स्तुती करतात. अर्जुन ती कामगिरी उरकल्यावर घरी येतो व सर्व वडीलधार्यांना जे घडले ते सांगतो. शेवटी अर्जुन युधिष्ठाराकडे पाहून त्याची क्षमा मागतो व त्यांने नियम मोडला आहे तेव्हां तो प्रायश्चित्त करण्यासाठी बारा वर्षे वनवासात जाण्यास

तयार असल्याचे सांगतो. तो सगळ्या पांडवाना सांगतो किं, त्याने तसें केले कारण, राज्याच्या इभ्रतिसाठी तसें करणे अत्यावश्यक होते. जर तो नियमाचे बंधन जास्त महत्वाचे मानून तसांच बसला असतां तर चोर पळून गेले असते व आपल्या राज्याची नाचक्की झाली असती. म्हणून त्यांने तो नियम मोडला व त्यानुसार तो प्रायश्चित्त करण्यासाठी वनवासात जाण्यास तयार आहे. त्याचे स्पष्टीकरण ऐकून त्याचा ज्येष्ठ बंधू फार दुःखी झाला. तो धनंजयाला बोलतो, "अरे निष्पाप भावा, मला जर कोण्या योग्यतेचा अधिकारी असेल तर माझे ऐकशिल, तू जे केलेस व ज्या उद्देशाने केलेस ते पहाता, तू कोणताही नियम मोडला आहेस असें मला वाटत नाही. माझ्या मनात तुझ्या त्या आगंतुक येण्याबद्दल कोणताही आक्षेप नाही. लहान भाऊ मोठ्या भावाच्या खोलीत केव्हाही येऊ शकतो तसा रिवाज आहे आपल्यात हे तू सुद्धा जाणतोस. परंतु, जर मोठा भाऊ धाकट्या भावाच्या खोलीत गेला त्याच्या परवानगीशिवाय तर ते आक्षेपार्ह समजले जाते. म्हणून, माझी तुला विनंती आहे किं, तू कृपया तुझ्या वनवासात जाण्याच्या निर्णयावर पुनः विचार करावास. तुझ्या ह्या कृत्याने तू अनैतिक कारणांने तेथे आला होता हे सिद्ध होत नाही म्हणून तू तुझी ती आगळीक विसरून जा".

ते मोठ्या भावाचे मत ऐकून तो तत्त्वनिष्ठ, सात्त्विक अर्जुन बोलतो, "तुझे सांगणे मी ऐकले आहे पण, जे तत्त्व मानतात ते त्यापासून विचलित होत नाहीत मग त्याचा परिणाम कांहींही होवो. कारण तत्त्वनिष्ठा हे एक साधन आहे शुद्ध जीवन जगण्याचे". द्रौपदीसुद्धा त्याला सांगते कीं, अशा सामान्य गोष्टी एवढ्या मनाला लावून घेणे तिला योग्य वाटत नाही. नकुल बोलतो, "नियम करतांना सर्व शक्यतांचा विचार नारदांनी केला नव्हता हेंच खरे. ह्यापुढे कोणतेही नियम करतांना त्यात भावना विशेष जर असेल तर असें होणारच म्हणून सर्व शक्यतांचा अंदाज घेऊन त्यानुसार नियम केले गेले तर अशी परिस्थिती येणार नाही. विवेकांनी परिपूर्ण असेच नियम केले गेले पाहिजेत. परंतु, जर कां एकादा नियम स्वीकारला गेला कीं, मग तो कितीही अर्धवट असला तरी त्याचे पालन करणेंच संबंधितांना बंधनकारक असते, कारण त्यालाच तत्त्वनिष्ठा म्हणतात जी धनंजयात ठासून भरलेली आहे. आता ह्या नियमांत आपण नारदांच्या परवानगीशिवाय फेरबदल करू शकत नाही म्हणून जिश्नूचे वनवासात जाणेच क्रमप्राप्त होते".

वैशंपायन सांगतात, त्यानंतर युधिष्ठीराच्या आज्ञेने तो तिसरा पांडव सगळ्यांना सोडून बारा वर्षे वानप्रस्थात जातो.

अशारिताने आदिपर्वातील अर्जुन वनवास पर्वाचा दोनशे चौदावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे पंधरावा

(अर्जुन वानवास पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, कुरुवंशाचा दिपक महायोद्धा अर्जुन वनात जाण्यासाठी निघतो तसें त्याला निरोप देण्यासाठी वेदशास्त्र संपन्न असें कांहीं ब्राह्मण त्याच्या बरोबर कांहीं अंतर चालतात. त्याप्रमाणे, इतर ज्ञानी, संगीतकार, वेदाच्या विविध शाखांचे किल्ल (वेदातील गुप्त अर्थ, वेदातील कोडी) जाणणारे, पुराणांचे वाचन करणारे, कांहीं वानप्रस्थी स्वतः असें बरेच जण त्याला साथ देत वनात शिरतात. त्यातील ब्राह्मण स्वर्गीय धून आळवत चालत होते. जसें कांहीं इंद्र चालला आहे व त्याच्या बरोबर मरुत त्याला साथ देत आहे. असें दिसत होते. वनात कांहीं अंतरानंतर त्यातील कांहीं साथी आपापल्या प्रमाणे निघून गेले व कांही अर्जुना बरोबर त्यांच्या भटकंतीस सुरुवात करतात. तो भरत वंशाचा शिरोमणी अनेक प्रेक्षणिय व आनंद देणारे प्रदेश भटकत पहातो. त्यात सुदर तलाव, समुद्र, नद्या, अरण्ये, माणसाच्या वस्तीची गांव असें बरेच कांही होते. कालंतराने तो गंगा नदीच्या उगमाकडे पोहोचतो. तेथे वनवासाच्या काळात रहाण्याचा तो बेत करतो.

वैशंपायन पुढे जनमेजयाला सांगतात, अरे राजा आता ऐक काय झाले ते. तेथे जेव्हां तो व त्याच्या बरोबर चालणारे ब्राह्मण पोहोचले व तेथे वस्ती करू लागले, तेव्हां त्यांनी अनेक अग्निहोत्र केले. त्या पवित्र ब्राह्मणांने केलेल्या यज्ञयागामुळें, तो गंगा किनार्यावरील वनप्रदेश अधिकच सुंदर झाला. तेथील दैवते त्यांच्यावर प्रसन्न झाली होती. एके दिवशी तो नरश्रेष्ठ पांडव, स्नानासाठी व तिला अर्ध्य देण्यासाठी गंगेच्या पाण्यात उतरला. गंगेत उतरल्यावर अर्जुन त्याच्या पितरांना स्मरून अर्ध्य देतो. त्यानंतर तो यज्ञ विधी करण्यासाठी तेथून उठतो, तेवढ्यात कोणीतरी शक्तिमान जोर त्याला जोरांने त्या पाण्यात खेचून तळाला नेतो. नागदेवांच्या राजाची कन्या, उलुपी त्याला खेचून नेत असते. तिला तिच्या तरुण वयामुळें कामदेवाची बाधा झालेली असते व त्या वेगांत ती तसे करते. त्याला उलुपी नागराजाच्या सुंदर व विशाल वाड्यात, कौरव्याच्या वाड्यात नेते तेथे अर्जुन पहातो ते तेथे होमकुंड पेटलेले असते . ते पहाताच तो आपले यज्ञकार्य त्या अग्नीकुडात मोठ्या भक्तिभावाने उरकतो. ज्या भक्तिने त्या पांडवाने अग्नीत तुप वाहिले त्यामुळें तो अग्नी त्यावर संतुष्ट होतो. ते सगळे उरकल्यावर तो त्या सुंदर युवतीकडे पहातो व हसत बोलतो, "अग

सुंदरी, काय हा अविचारीपणा तू करतेस"? "हा प्रशस्त वाडा कोणाचा"? "तू कोण आहेस"? "तू कोणाची मुलगी आहेस"? ते प्रश्न ऐकल्यावर उत्तेजित होऊन ती नागकन्या त्याला सांगते, "नाग घराण्यातील ऐरावताच्या कुळातील एक नागराजा आहे त्याचे नांव कौरव्य आहे, त्याची मी मुलगी आहे. माझे नांव उलुपी आहे. तुला गंगेत अर्घ्य देतांना पाहिले तेव्हा तुझे कुळ कोणते ते मी समजले व माझा तोल गेला व मी तुला खेचून येथे आणले. मला तुझ्याबद्दल वासना झाली आहे, कृपया तू माझा त्यासाठी स्वीकार कर". ते ऐकल्यावर शांतपणे तो शूरयोद्धा तिला समजावण्याचा प्रयत्न करतो, "माझ्या ज्येष्ठ भावाच्या आज्ञेने मी तूर्त एका तपासाठी ब्रह्मचर्य व्रतात आहे, त्यामुळे ते शक्य होणार नाही. मी वाटेल तसे करण्यास स्वतंत्र नाही तरी ते समजून घे". पुढे तो पांडव तिला सांगतो, "जरी मी प्रत्यक्ष तुझ्याशी संबंध करू शकत नसलो तरी इतर प्रकारे मी तुला रिझवू शकतो, ज्यामुळें मी कोणतेही पापकर्म करणार नाही व माझ्या व्रतात बाधा येणार नाही असें तुला चालत असेल तर सांग". उलुपी त्याला सांगते, "अरे पांडवा, तू कां असे पृथ्वीवर भटकत आहेस व ब्रह्मचर्य पाळत आहेस ते मला माहीत आहे. मला माहीत आहे किं, त्याप्रकारचा नियम तुम्हा भावंडांना बंधनकारक आहे. मला हेसुद्धा माहीत आहे किं, तुमची एक समाईक पत्नी आहे जी द्रुपदाची यज्ञसिद्ध कन्या आहे. हे सगळे त्या एका द्रौपदीमुळे झाले आहे. तू केवळ त्या अटीचे प्रामाणिकपणे पालन करत आहेस हे सुद्धा मी जाणते". एवढे बोलल्यावर ती अर्जुनाकडे निरखून पहाते व नंतर सांगते, "हे बघ, माझ्याशी संबंध घेतल्यामुळें तू तुझी अट मोडणार नाही असें मी करून घेईन. मला सुख देण्यामुळें तुला यत्किंचितही दोष लागणार नाही, त्या माझ्या क्लुप्तीमुळें उलट मला वाचवल्याचे पुण्य तुला मिळेल असें मी करीन. एकाद्याला वाचवण्याने कोणालाही दोष लागत नाही हे तुला माहीत आहे. ते व्रत मोडण्यामुळें जर दोष समजा तुला लागला, तर त्यापेक्षा मला वाचवल्यामुळें जे श्रेय तुला मिळेल ते केव्हांही जास्त श्रेष्ठ असेल हे तुझ्या लक्षात आले कां"? "तुला आठवते कां, जेव्हां तू तुझी शस्त्रे घेण्यासाठी त्या दालनात गेला होतास त्यावेळीसुद्धा तू असाच तौलनिक विवेक करूनच पुढची पावलं टाकलीस व त्यामुळें तुझा व तुझ्या कुळाचा गौरवच झाला होता ते लक्षात घे. जेव्हां कोठल्या दोन कामात निवड करावयाची असते तेव्हां त्यातील जास्त चांगले काम निवडावयाचे असते हा नियम तुला

माहीत आहे कां"? "जेव्हा कोठल्याही दोन दोषांत (पापात) निवड करावयाची तेव्हां त्यातील कमी प्रतीचा दोष स्वीकारावयाचा असतो. त्या तर्कानुसार मी जे सांगते ते तू करशिल तर तुझे व माझे असें दोघांचे हित साध्य होईल". "आता ऐक मी काय सांगते ते, मी तुझी भक्त आहे व मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही जर तू मला शांत केले नाहीस तर मी स्वतःला जाळून घेईन. मी तुझ्या आश्रयाला आलेली आहे अशा परिस्थितीत तू जर एका मुलीचा अव्हेर केलास तर ते तुला पाप लागेल, कारण मुलीचा अव्हेर करणे पापासमान असते, पुरुषाची विनंती नाकारण्यात स्त्रीला धन्यता प्राप्त होते पण स्त्रीची विनंती नाकारणारा पुरुष नामर्द समजला जातो. म्हणून मला तुझ्या बाहूत घेऊन तू पुरुषार्थ सिद्ध करशिल व मला संतुष्ट केल्याने पूण्य मिळवशिल. पुनः आणखीन ऐक, ब्रह्मचर्य मनाचे असावे लागते, शरीराचे नाही कारण तुला माहीत आहे किं, पुरुषाचे वीर्य गळतच असते मग तो भोगी असो अथवा ब्रह्मचारी, पुरुषाचे शरीर कधीच ब्रह्मचारी नसते त्याचे मन, बुद्धी ब्रह्मचारी असू शकते म्हणून, तू मनाने माझ्यापासून दूर राहून तुझे ब्रह्मचर्य सांभाळ व तुझ्या ह्या देखण्या कायेने माझी मदत कर, ते माझ्या स्वाधीन कर म्हणजे तुझे व्रत सांभाळले जाईल व माझी इच्छासुद्धा तू सांभाळशिल. माझ्याशी तुझे शरीर रममाण असतांना तुझा आत्मा त्या कृत्यापासून अलिप्त ठेव जसें तुझ्या आजोबांनी, कृष्ण द्वैपायनाने अंबिका व अबालिकेशी संबंध घेताना केले होते. म्हणून त्यांचे ब्रह्मचर्य अबाधित राहिले होते. अशा ब्रह्मचर्याला निर्गुण ब्रह्मचर्य म्हणतात". पुढे ती नागकन्या अर्जुनाला सांगते, "सगळे ऋषी मुनी आपले ओज (वीर्य) व्यर्थ जाऊ नये म्हणून अशा मार्गाने आपल्या वंशाची (तपस्येची) परंपरा शाश्वत करत असतात".

वैशंपायन पुढे सांगतात, ते उलुपीचे बोलणे ऐकून व त्यातला युक्तीवाद समजून अर्जुन तिला मदत करण्यास तयार झाला. तो सगळी रात्र तिच्याशी घालवतो व जेव्हां सूर्य उगवला तेव्हां तो तिच्या बरोबर त्या नागराजाच्या वाड्यातून बाहेर येतो. उलुपी संतुष्ट झाल्याने ति त्याला एक वर देते. त्यामुळें अर्जुन पाण्यात अदृष्य होऊ शकणार होता. त्या आशिर्वादामुळें तो पांडव कोणत्याही भूजल प्राण्यास (जमिन व पाण्या ह्यात रहाणारे, जसे सुसर, मगर इत्यादी) लढाईत हरवू शकणार होता.

अशारितीने आदिपर्वातील अर्जुन वानवास पर्वाचा दोनशे पंधरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे  सोळावा

(अर्जुन वनवास पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अरें जनमेजया, धनंजयाला गंगेच्या काठावर आणून उलुपीने सोडले व ती परत माघारी गेली. अर्जुन किनार्यावर त्याची वाट पहात बसलेल्या ब्राह्मणांना जे घडले ते सांगतो. ते ब्राह्मण त्याला बोलतात कीं, त्यांने जे केले त्यामुळें तो अजूनही व्रतस्थच राहीला आहे. शरीरापासून मन व बुद्धी अलिप्त ठेवून कर्म करण्याचे त्या प्रसंगामुळें अर्जुन शिकला. नंतर तो हिमालयातील उंच शिखरांकडे गेला. त्यातील अगस्त्यवट नांवाच्या जागी तो पोहोचला. त्यानंतर तो वसिष्ठाच्या आश्रामाकडे गेला. तेथून तो पुढे भृगु शिखरावर गेला. तेथे स्वताला शुद्धीविधी करून तो पवित्र झाला. त्या ठिकाणी त्यांने ब्राह्मणांना पुष्कळ दानं केली. त्यात कित्येक गाई व घरे होती. त्यानंतर तो पांडव राजा अतिपवित्र समजलेल्या हिरण्यबिंदू नांवाच्या तीर्थ क्षेत्री पोहोचतो. तेथे आचमन घेऊन व अर्ध्य देऊन पुजा करतो. त्या अतिउंचावरील प्रदेशाची फेरी झाल्यावर तो आता उतरण्याच्या तयारीला लागतो. त्याच्या बरोबर ते ब्राह्मण होते त्यांच्यासह तो पूर्वेकडील प्रदेश पहाण्यासाठी त्या दिशेकडे निघतो. तो श्रेष्ठ कुरु राजपुत्र अशारितीने तेथील सगळी पवित्र तीर्थ क्षेत्रे चालत जात पहातो. त्या कडील नद्यांच्या पवित्र पाण्यात स्नान करून मोठे पुण्य प्राप्त करतो. त्यानंतर तो तेथील नैमिषारण्याकडे (आसामातील अरण्यमय प्रदेश) निघतो. तेथे तो उत्पालिनी (कमळांनी भरलेली नदी), नंदा, अपरानंदा, प्रसिद्ध कौसिकी आणि पुन्हा गंगा असा त्याचा प्रवास होतो. त्या नद्यांतून आंघोळी करून तो भरपूर पुण्य मिळवतो. त्याच्या बरोबर असलेले ब्राह्मण त्यांचे कर्मकांडयुक्त विधी त्याबरोबर करत असतात. त्यानंतर तो व त्याचे सहप्रवासी ब्राह्मण वंगदेशात येतात, तेथून ते सगळे कलिंग देशात जातात. त्या प्रदेशातील सगळी तीर्थक्षेत्रे तो पहातो व विधीपूर्वक त्या तेथील रिवाजानुसार पवित्र कार्येसुद्धा करतो. ठिकठिकाणी तो गोदान व धनदान ब्राह्मणांना प्रथेनुसार करत असतो. आता पर्यंत अर्जुनाला साथ देणार्या त्या ब्राह्मणांतील बहुतेक कलिंगदेशाच्या सीमेवर त्याला निरोप देतात. त्यापुढे ते त्याला सोबत न करतां त्यांने ह्यापुढे एकट्यानेच वनवास करावा असें ते त्याला सांगतात. तेथून त्याच्या बरोबर आता फार थोडे साथी उरलेले असतात त्यांना घेऊन तो पूर्व सागराकडे निघतो. ह्यापुढे त्याला

दक्षिण दिशेकडील गोष्टी दिसू लागतात. वेगळ्या प्रकारचे लोक, तीर्थक्षेत्रे, घरे, वाडे, महाल असें बरेच तो पहात फिरत असतो. ते करत तो महेंद्र पर्वताच्या पायथ्याशी पोहोचतो. तेथील थोर वैराग्य संपन्न संन्याशांना भेटतो. तेथून तो पुनः समुद्र किनार्याने उत्तर दिशेने मणिपुराला जातो. तेथून तो ख्यातनाम चित्रवहन राजा, मणिपुरचा, त्याला भेटतो. मणिपुरच्या राजाला एक कन्या असते. तिच्या अप्रतिम देखणेपणासाठी ती सगळीकडे प्रसिद्ध असते, तिचे नांव चित्रंगदा असते. अर्जुन तिला तिच्या महालात हिंडतांना पहातो. अर्जुनाला ती हवीशी वाटू लागते. अर्जुन चित्रवहनाला सांगतो, "मी कुरुवंशाचा क्षत्रिय राजपुत्र असून देशाटन करण्यासाठी फिरत आहे, मला तुमची कन्या पत्नी म्हणून योग्य वाटते". ते ऐकून तो मणिपुरचा राजा त्याला विचारतो, "तू कोणाचा मुलगा"? अर्जुन उत्तर देतो, "मी धनंजय, पंडुचा पुत्र". ते ऐकून तो राजा मृदू आवाजात जसे प्रेमांने बोलतात, अर्जुनाला सांगतो, "आमच्या घराण्यात एक राजा होऊन गेला, त्याचे नांव होते प्रभंजन. त्याला मुल होत नव्हते. मुल व्हावे म्हणून तो पुष्कळ व्रतवैकल्ये करतो, त्याच्या त्या तपस्येने संतुष्ट झालेले महादेव, उमापती, हातात पिनाक नांवाचे धनुष्य घेऊन उभा असतो व त्या आमच्या पूर्वजाला वर देतो किं, तुला मुलगा होईल व ह्यापुढे तुझ्या घराण्यात प्रत्येकाला केवळ एकच अपत्य होईल. त्याप्रमाणें आमच्या येथे एकच मुल होते. माझ्या आधीच्या सगळ्यांना एकच पुत्र होत असें पण मला एक कन्या झाली आहे, माझ्या राज्याला वारस म्हणून मी माझ्या मुलीला "पुत्रिका", (पुत्रिकेला पुत्राचे सगळे हक्क प्राप्त होतात. ती पुत्राप्रमाणे घराण्याचे नांव चालवते, तिचे लग्न कन्यादाना शिवाय होते) केले आहे. जर तुझ्यापासून तिला पुत्र झाला तर तो मला पाहिजे. त्यामुळें माझे घराणे चालू राहिल. जर तो पुत्र तू मला देण्यास तयार असशिल तर मी माझी कन्या तुला देण्यास तयार आहे". ते ऐकून अर्जुन ती अट मान्य करतो. त्यानंतर तो पांडव चित्रंगदाशी लग्न करतो. त्या विवाहामुळें अर्जुन तेथे घरजावई बनून तीन वर्षे रहातो. अखेरीस चित्रंगदेच्या पित्यास हवा होता तसा पुत्र तिला होतो. उलुपीच्या सांगण्यानुसार तो चित्रंगदेशी संबंध ठेवत होता व त्यामुळें अर्जुनाची संयम साधना सुधारत होती. वासना विहीन संभोग केवळ कर्तव्य म्हणून तो चित्रंगदाशी करीत असें. म्हणून तो शुक्ल ब्रह्मचारीच (स्त्रियांबद्दलच्या आत्यंतिक आदरामुळें उत्पन्न होणारे ब्रह्मचर्य) राहिला होता. शरीराचे भोग आत्म्यापासून

दूर कसे ठेवावयाचे ते अर्जुन तिथे शिकला. शरीराच्या सर्वच भोगात आत्मा भाग घेत नाही अशी जीवन पद्धती तो जगण्यास शिकतो. अखेरीस तो चित्रंगदेला एक शेवटचे प्रेमाचे आलिंगन देतो व तिचा व त्या परिवाराचा निरोप घेतो आणि पुढच्या प्रवासास सुरुवात करतो. पुनः त्याची भटकंती आरंभ करतो.

अशारितीने आदिपर्वातील अर्जुन वनवास पर्वाचा दोनशे सोळावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे सतरावा

(अर्जुन वनवास पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर तो पराक्रमी अर्जुन दक्षिणेकडील तीर्थक्षेत्रांकडे निघतो. त्या विविध तीर्थक्षेत्री अनेक विरक्त साधू रहात असलेले तो पहातो. त्या प्रदेशाभोवती आणखीन पांच असें भाग असतात जेथे प्रभावी वैराग्यपूर्ण तपस्या करणारे साधू लोक होते. परंतु, त्या पांच नद्यात कोणीही स्नान करण्यास जात नसे. स्नानासाठी ते निषिद्ध समजले जात होते. त्यांची नांवे अशी, अगस्त्य, सौभद्र, पौलोम, करंधम आणि भारद्वज. त्या सगळ्यांची मोठी ख्याति होती यज्ञकर्मासाठी, विशेष करून अश्वयज्ञासाठी त्या जागा सर्वमान्य होत्या. तेथे अर्जुन पहातो किं, त्या तीर्थक्षेत्री कोणीही जात नाही. त्याला त्याचे कारण समजून घ्यावेसे वाटले. त्यांने विचारले तेव्हां त्याला समजले किं, त्या पाण्यांत खूप मोठ्या मगरी रहातात व जर कोणी त्यात स्नानासाठी उतरला तर त्या त्याला खाऊन टाकतात.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर तो महापराक्रमी पांडव त्या जागा पहाण्यास जातो. सगळे त्याला ताकीद देतात पण तो त्यांना मानत नाही. प्रथम तो सौभद्रच्या पाण्याकडे जातो. तो त्या पाण्यात स्नानासाठी शिरतो. तेथे खाली असलेली एक प्रचंड आकाराची सुसर वर येते व त्याला पकडते. त्या सरशी तो पराक्रमी कुरु राजपुत्र मोठ्या शिताफीने त्या सुसरीला एका हातांने उचलून त्या नदीच्या किनार्यावर फेकतो. तसें होतांच किनार्यावर पडलेल्या त्या सुसरीचे एका सुंदर बाईत रुपांत होते. ती अप्सरे सारखी दिसते. ते पाहून तो कुंतीपुत्र आश्चर्यचकित होतो. आता त्याला तिची भिती वाटत नाही. तो तिला विचारतो, "तू सुंदरी कोण आहेस? तू अशी पाण्यात सुसरीच्या रुपांत कां वावरत आहेस? तू अशारितीने त्या साधूंना कां खात असतेस, असे कृत्य तुला करवते तरी कसें"? त्यावर ती बोलते, "मी एक अप्सरा आहे व सुसरीच्या रुपांत येथे रहात असते. माझे नांव वरगा आहे. आम्ही चारजणी येथे पाण्यात सुसरीच्या रुपात रहातो. आम्ही सगळ्या अशाच देखण्या आहोत. आमच्या मनात येईल ते करण्याची सिद्धी आमच्याकडे आहे. एकदा आम्ही चौघीजणी कुबेराकडे जात होतो. वाटेत आम्ही एका सुस्वरूप तेजस्वी परंतु, व्रतस्थ अशा ब्राह्मणाला पहातो. तो एकटाच वेदांचा अभ्यास करत होता. तो ज्या

जंगलात होता त्या संपूर्ण जंगलावर त्याच्या तेजाची प्रभावळ पसरलेली होती जसे सूर्य आकाशाला उजळवतो. त्याला पाहिल्यावर आम्हाला त्याची तपस्या मोडण्याचा मोह झाला. म्हणून आम्ही येथे उतरलो. मी व माझी मैत्रीण सौरवेई, समिची, वुवूदा आणि लता त्या ब्राह्मणाच्या जवळ गेलो. त्याला मोहीत करण्यासाठी आम्ही सुरेल आवाजात गाणी गाऊ लागलो. परंतु, त्या तपस्व्याने एकदासुद्धा आमच्याकडे ढुमकूनही पाहिले नाही. त्याची त्राटक ध्यानस्थता किंचितही ढळली नाही. फक्त क्रोधाने तो आमच्या कारवायां पहात होता. नंतर त्यांने आम्हाला शाप दिला कीं आम्ही सुसरी बनून शंभर वर्षे राहू".

अशारितीने आदिपर्वातील अर्जुन वनवास पर्वाचा दोनशे सतरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे अठरावा

(अर्जुन वनवास पर्व पुढे चालू)

वैशंवायन पुढे सांगतात, ती वरगा सांगत रहाते, "त्या शापामुळें आम्ही सगळ्या फार दुःखी झालो. आम्ही त्या ब्राह्मणाची क्षमा मागितली. त्याला बोललो, "अहो तपस्वी, आम्हाला आमच्या सौंदर्याचा माज आला होता व म्हणून आम्ही ही चूक केली. आमची दुसरी कोणतीही इच्छा नव्हती, तुम्हाला त्रास झाला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो पण ह्यातून तुम्ही आमची सुटका कृपया करावी. तुमच्या सारख्या ऋषीतुल्य ब्राह्मणाला त्रास झाला ह्याचे आम्हाला दुःख होत आहे. तुम्ही जाणता किं, स्त्रीला तिच्या वासनां माफ असतात व त्यासाठी ती जे करील ते सगळे क्षम्य असते म्हणून कृपया आम्हाला आता वाचवा. असा जीवघेणा  शाप देऊ नका. असे सांगतात किं, ब्राह्मण क्षमाशिल असतो. छोट्यांच्या चुका माफ करतो, तो सदैव स्नेहपूर्ण असतो, ते खरे हो, श्रेष्ठ लोक कनिष्ठाना नेहमी क्षमेच्या दृष्टीने पहातात, त्यांना सुधारायला वाव देतात, म्हणून तुम्ही कृपया एकवेळ माफ करा. आम्हाला आमच्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आहे". वैशंपायन सांगतात, ते त्यांचे काकुळतीने केलेले आर्जव ऐकल्यावर तो दयाशिल ब्राह्मण थोडा शांत होतो व आपण जरा जास्तच कठोर झालो असें त्याला समजले. लहान मुलं खोड्या काढतात तसा हा निष्पाप प्रकार होता हे तो समजतो व त्याला त्या पांच अप्सरांची दया येते. तो बोलतो, "शंभर आणि हजार हे शब्द रुपकात्मक रित्या अनंत असेंच निर्देशिवतात. परंतु, मी मात्र शंभर वर्षे शंभर ह्या अर्थीच बोललो होतो. म्हणून तुम्ही फक्त शंभर वर्षेच सुसरी बनून रहाणार आहात आणि ह्या पाण्यात उतरणार्यांना खाणार अहात कारण, मी एकदा बोललो कां ते घडणार ह्यात शंका नाही. शंभर वर्षानंतर तुम्हाला इंद्र माणसाच्या अंशावतारात येईल व मुक्त करील परंतु, ह्या पाण्याच्या तीर्थाला नारीमुक्ति तीर्थ असें ओळखले जाईल. वैशंपायन पुढे सांगतात, त्याने ते सांगितल्यानंतर आम्ही त्याला वंदन केले व त्याच्या प्रदक्षिणा केल्या. तेथून मोठ्या जड अंतःकरणाने आम्ही विचार करत होतो केव्हां तो इंद्राचा अंशावतार आम्हाला भेटणार व आम्हाला आमचे मुळ रुप मिळणार. अशाप्रकारे विचार करत आम्ही जात असतांना आम्हाला नारदमुनी दिसतात. त्यांना पाहिल्यावर आम्हाला थोडे बरे वाटले कारण कीं, ते कांहीं मार्ग त्यातून सांगतिल अशी आशा उत्पन्न झाली.

त्यांना भेटून व वंदन करून आम्ही आमची व्यथा त्यांना सांगितली. आम्ही लाजत शरमेने चूर झालेल्या त्यांच्या पुढे उभ्या झालो. ते आम्हाला बोलले, दक्षिणेस असलेल्या समुद्राजवळ पवित्र पाण्याची पांच तीर्थक्षेत्रे आहेत. अतिप्रसन्न अशा त्या ठिकाणी तुम्ही त्वरेने जा तेथे तुम्हाला त्या पाण्यात तुम्ही असतांना तो माणूस भेटेल जो तुमचे मुळ रुप तुम्हाला परत मिळवून देईल. नारदमुनींच्या त्या वाणीप्रमाणे खरोखरच आज शंभर वर्षांनी माझी सुटका झाली आहे. परंतु, अजून माझ्या चार मैत्रीणींना मुक्ति मिळावयाची आहे. कृपया तुम्ही त्या जलाशयात जाऊन स्नान करा म्हणजे त्या तुम्हाला तेथे भेटतील जशी मी भेटले. त्याना मुक्त करा कारण आमचा शिक्षेचा काळ संपला आहे. वैशंपायन पुढे सांगतात, त्याप्रमाणे अर्जुन त्या प्रत्येक तीर्थक्षेत्री जाऊन त्या इतर चार अप्सरांनासुद्धा त्यांच्या शापातून मुक्त करतो. त्यानंतर त्याला त्याच्या दुसर्या पत्नीची आठवण येऊ लागते व म्हणून तो पुनः मणिपुराला जाण्याचे ठरवतो. तेथे गेल्यावर तो पहातो कीं, त्याचा मुलगा तेथे राजगादीवर बसला आहे. त्या राजपुत्राचे नांव ठेवलेले असते, बभ्रुवाहन. ते पाहून त्याला फार आनंद होतो. तेथे चित्रंगदा त्याचे स्वागत करते, तेथे थोडे दिवस राहून तो पुन्हा भटकंतीला निघतो. तेथून तो गोकर्ण नावांच्या तीर्थक्षेत्री पोहोचतो.
अशारितीने आदिपर्वातील अर्जुन वनवास पर्वाचा दोनशे अठरावा भाग संपला.

# आदिपर्व भाग दोनशे एकोणीसावा

(अर्जुन वनवास पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर अर्जुन एका मागोमाग एक अशी पश्चिम समुद्राच्या किनार्यावरील सगळी तीर्थक्षेत्रे पहातो. विभत्सु (अर्जुन) प्रभास नांवाच्या पवित्र स्थळी जे आल्हाददायक आहे तेथे अदृष्य रुपात येतो. तेथे त्याचा आतेभाऊ कृष्ण समजतो किं, विभत्सु आला आहे तसे तो त्याला भेटण्यासाठी तेथे येतो. कृष्ण व अर्जुन तेथे भेटतात. ते एकमेकांना कडकडून मिठी मारतात. बर्याच काळानंतर त्यांची व्यक्तिशः भेट होत असते. जसें नर व नारायण भेटले. वसुदेव त्याची व विभत्सु कृष्णाची वास्तपुस्त करतात. कृष्ण त्याला विचारतो, "असा एकटाच काय भटकंती करत आहेस"? त्यावर अर्जुन त्याला सगळा वृत्तांत सांगतो, त्यात आलेले अनुभव सांगतो. ते ऐकल्यावर दामोदर त्याला बोलतो, "असें होणार हे ठरलेले होते". तेथे ते खुप मजा करतात. प्रभास नंतर तो पांडव व कृष्ण, रैवातक नांवाच्या पहाडाकडे जातात. तेथे थंड हवामानाचा आनंद भोगतात. कृष्णाच्या आज्ञेनुसार तो संपूर्ण पहाड अर्जुनाच्या स्वागतासाठी सुंदर प्रकारे सजवला होता. तेथे खाण्यापिण्याची भरपूर व्यवस्था केलेली असते. तेथे नट व नट्यांचे कार्यक्रम सादर केले जातात अर्जुनाच्या करमणुकीसाठी. तेथे अर्जुन खूप मजा करतो कृष्णाच्या संगतीत. तेथे त्याच्याकरतां एक छानदार बिछाना त्याच्यासाठी मुद्दाम तयार केलेला असतो त्यावर अर्जुन कार्यक्रम झाल्यावर निजतो. त्यावेळी सुमधूर पार्श्वसंगीत वाजवले जात होते. त्या सगळ्यातून अर्जुनाला ते वृश्नी त्याच्यावर किती प्रेम करतात ते जाणवते. त्यानंतर सोन्याने मढवलेल्या रथातून तो कृष्णाच्या द्वारका नगरीतील वाड्यात येतो. द्वारका यादवांची राजधानी असते. तेथील सुंदर रचना असलेली लहान व मोठी घरे तो त्यावेळी पहातो. अरे जनमेजया, अर्जुनाच्या स्वागतासाठी सगळी द्वारका नव्या नवरीसारखा सजवलेली होती. ते सगळे प्रेक्षणीय होते. त्याला पहाण्यासाठी त्या नगरीतील सगळी माणसे, लहान थोर, बायका, मुलं, तरुण, वृद्ध असे सारे रस्तावर ओतून आल्या सारखे वाटत होते. जागोजागी गुढ्या उभारून त्याच्या स्वागताची व्यवस्था केली होती. सगळी माणसे बाया बापडे एकत्र मिसळून तेथे त्याला पहाण्यासाठी आलेले होते. अधून मधून बारकी पोर टोरसुद्धा आपली डोकी काढून तो प्रसंग व तो अर्जुनाच्या मिरवणुकीचा

सोहळा पहात होती. त्यात भोज लोक मोठ्या प्रमाणात होते. त्याशिवाय वृश्नी व अंधक अशा विविध घराण्याचे लोक होते. अर्जुनाला पहाण्यासाठी ते तेथे आले होते. अशारितीने धनंजयाचे स्वागत मोठ्या दिमाखात झाले. रथातून उतरल्यावर अर्जुन सगळ्यांना अभिवादन करतो. मोठ्याना मोठ्यांचा व लहानांना लहानांचा असे तो वंदन करतो. अनेकांना तो आलिंगन देतो. त्यानंतर तो सगळे कृष्णाच्या खाजगी वाड्यात येतात. रत्नजडीत असा सुंदर प्रकारे सजवलेला तो वाडा प्रेक्षणीय होता. त्यानंतर त्याला दिलेल्या दालनात तो विश्राति करता जातो. तेथे तो बरेच दिवस कृष्णाबरोबर रहातो.
अशारितीने आदिपर्वातील अर्जुन वनवास पर्वाचा दोनशे एकोणविसावा भाग संपला.

## - महाभारत आदिपर्व खंड चौथा समाप्त -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ पेक्षा जास्त खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत

आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा

प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक

नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी

मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद